# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०६/२०१९** **दिनांक २६.०७.२०१९**

**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- सकाळी १०.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.२६.०७.२०१९ रोजी शिर्डी येथील संस्थानचे साईनिवास अतिथीगृहामध्ये सकाळी १०.०० वाजता आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/१४५६/२०१९, दि.१८.०७.२०१९ अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते. त्यानुसार शुक्रवार दि.२६.०७.२०१९ रोजी सकाळी १०.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.ॲड मोहन मोतीराम जयकर, सदस्य
०३. मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंह,सदस्य ०४. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे,सदस्य
०५. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य ०६. मा.श्रीमती अर्चना उत्तमराव कोते, सदस्या

मा.श्री.दी.म.मुगळीकर,भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर सकाळी १०.३० वाजता सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

त्यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दिनांक ०४.०७.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३८३** **दिनांक ०४.०७.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. निर्णय क्र.३३०- यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर करीता शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इयत्ता ७ वी व इयत्ता ९ वी ची प्रत्येकी १ वाढीव तुकडी सुरु करणेस तसेच श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील कार्यभार कमी असलेले ०३ शिक्षक कन्या विद्या मंदीर विभागाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर करीता शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इयत्ता ७ वी व इयत्ता ९ वी ची प्रत्येकी १ वाढीव तुकडी सुरु करणेस तसेच श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील कार्यभार कमी असलेले ०३ कुशल कंत्राटी शिक्षक कन्या विद्या मंदीर विभागाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

२. निर्णय क्र.३६३- सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आला.

(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)**

---

**३. निर्णय क्र.३४४/३-** यावर सविस्तर चर्चा होऊन, जिल्हा परिषद,अहमदनगर यांचे प्रस्तावानुसार शाळा खोल्या बांधकामासाठी १५९ खोल्यामधून तालुकानिहाय खालील प्रमाणे १२४ खोल्यांची निवड करण्यात आली.

| अ.न. | तालुका | अंतिम यादी शाळा नांव | वर्ग खोली संख्या |
|---|---|---|---|
| १ | नेवासा | जि. प. प्राथमिक शाळा रस्तापूर | ०१ |
| २ | | जि. प. प्राथमिक शाळा, खुपटी | ०१ |
| ३ | | जि. प. प्राथमिक शाळा, बाभुळवेढा | ०१ |
| ४ | | जि. प. प्राथमिक शाळा जैऊर हैबती | ०१ |
| ५ | | जि. प. प्राथमिक शाळा, गणेशवाडी | ०१ |
| ६ | | जि. प. प्राथमिक शाळा, गळनिंब | ०१ |
| ७ | | जि. प. प्राथमिक शाळा, पिंप्रीशहाली | ०१ |
| ८ | | जि. प. प्राथमिक शाळा, फत्तेपुर | ०१ |
| | | एकूण खोल्या | **०८** |
| ०९ | कर्जत | जि. प. प्राथमिक शाळा, कोरेगाव | ०१ |
| १० | | जि. प. प्राथमिक शाळा, राशीन | ०१ |
| ११ | | जि. प. प्राथमिक शाळा टाकळी खंडेश्वरी | ०१ |
| १२ | | जि. प. प्राथमिक शाळा, पिंपळवाडी | ०१ |
| १३ | | जि. प. प्राथमिक शाळा, तिखी | ०१ |
| १४ | | जि. प. प्राथमिक शाळा, घुमरी | ०१ |
| १५ | | जि. प. प्राथमिक शाळा, दिघी | ०१ |
| १६ | | जि. प. प्राथमिक शाळा, कर्जत शहर (मुलांची) | ०१ |
| | | एकूण खोल्या | **०८** |
| १७ | पाथर्डी | जि. प. प्राथमिक शाळा, मोहटे | ०१ |
| १८ | | जि. प. प्राथमिक शाळा, खरवंडी कासार | ०१ |
| १९ | | जि. प. प्राथमिक शाळा,कळसपिंप्री | ०१ |
| २० | | जि. प. प्राथमिक शाळा, साकेगांव | ०१ |
| २१ | | जि. प. प्राथमिक शाळा, सुसरे | ०१ |
| २२ | | जि. प. प्राथमिक शाळा, टाकळी मानुर | ०१ |
| २३ | | जि. प. प्राथमिक शाळा, धामणगांव | ०१ |
| २४ | | जि. प. प्राथमिक शाळा, खोजेवाडी (निवडुंगे) | ०१ |
| | | एकूण खोल्या | **०८** |
| २५ | कोपरगांव | कारवाडी | ०१ |
| २६ | | डांगेवाडी | ०१ |
| २७ | | भास्करवस्ती (खिर्डी गणेश) | ०१ |
| २८ | | ओगदी | ०१ |
| २९ | | शिवाजीनगर (दहेगाव बोलका) | ०१ |
| ३० | | रांजणगांव देशमुख | ०१ |
| ३१ | | रेलवाडी कोकमठाण | ०१ |
| ३२ | | अंचलगांव | ०१ |
| ३३ | | करंजी | ०१ |
| ३४ | | परजणेवस्ती सवंत्सर | ०१ |
| ३५ | | शिंदेवस्ती पढेगांव | ०१ |
| ३६ | | कान्हेगांव | ०१ |
| ३७ | | धोत्रे | ०१ |
| ३८ | | चासनळी | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३९ | | कारवाडी (कोकमठाण) | ०१ |
| ४० | | नाटेगांव | ०१ |
| ४१ | | पढेगांव | ०१ |
| | | एकूण खोल्या | १७ |
| ४२ | संगमनेर | जि. प. प्रा. शाळा, अंभोरे | ०१ |
| ४३ | | जि. प. प्रा. शाळा, चिंचेवाडी | ०१ |
| ४४ | | जि. प. प्रा. शाळा, साकूर | ०१ |
| ४५ | | जि. प. प्रा. शाळा, कासार दुमाला | ०१ |
| ४६ | | जि. प. प्रा. शाळा, दे. ख. आखाडा | ०१ |
| ४७ | | जि. प. प्रा. शाळा, डिग्रस | ०१ |
| ४८ | | जि. प. प्रा. शाळा, कौठे धांदरफळ | ०१ |
| ४९ | | जि. प. प्रा. शाळा, गुंजाळवाडी | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ५० | श्रीगोंदा | जि. प. प्रा. शाळा, कोकणगाव | ०१ |
| ५१ | | जि. प. प्रा. शाळा, येळपणे | ०१ |
| ५२ | | जि. प. प्रा. शाळा, वेळू | ०१ |
| ५३ | | जि. प. प्रा. शाळा, चिंभळा | ०१ |
| ५४ | | जि. प. प्रा. शाळा, ढोकराई | ०१ |
| ५५ | | जि. प. प्रा. शाळा, घारगांव | ०१ |
| ५६ | | जि. प. प्रा. शाळा, दत्तवाडी | ०१ |
| ५७ | | जि. प. प्रा. शाळा, म्हसे | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ५८ | जामखेड | जि. प. प्राथमिक शाळा, सातेफळ | ०१ |
| ५९ | | जि. प. प्राथमिक शाळा, हापटेवाडी | ०१ |
| ६० | | जि. प. प्राथमिक शाळा, फाळकेवाडी | ०१ |
| ६१ | | जि. प. प्राथमिक शाळा, इनामवस्ती | ०१ |
| ६२ | | जि. प. प्राथमिक शाळा, नाहूली | ०१ |
| ६३ | | जि. प. प्राथमिक शाळा, पारेवाडी | ०१ |
| ६४ | | जि. प. प्राथमिक शाळा, कडभनवाडी | ०१ |
| ६५ | | जि. प. प्राथमिक शाळा, जातेगाव | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ६६ | नगर | खांडके | ०१ |
| ६७ | | सारोळा बध्दी | ०१ |
| ६८ | | भोरवाडी | ०१ |
| ६९ | | नेप्ती | ०१ |
| ७० | | चिंचोडी पाटील | ०१ |
| ७१ | | माथणी | ०१ |
| ७२ | | पदमपूरवाडी | ०१ |
| ७३ | | खातगाव टाकळी | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ७४ | श्रीरामपूर | सुतगिरणी | ०१ |
| ७५ | | हरिहरनगर उर्दु | ०१ |
| ७६ | | अशोकनगर उर्दु | ०१ |
| ७७ | | वांगी खुर्द | ०१ |
| ७८ | | खानापूर | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७९ | | गळनिंब | ०१ |
| ८० | | खोकर | ०१ |
| ८१ | | फत्याबाद | ०१ |
| ८२ | | खंडाळा | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०९ |
| ८३ | शेवगांव | जि. प. प्रा. शाळा क-हे टाकळी | ०१ |
| ८४ | | जि. प. प्रा. शाळा शहरटाकळी | ०१ |
| ८५ | | जि. प. प्रा. शाळा, सामनगांव | ०१ |
| ८६ | | जि. प. प्रा. शाळा, मजलेशहर | ०१ |
| ८७ | | जि. प. प्रा. शाळा खामगांव ऊर्दु | ०१ |
| ८८ | | जि. प. प्रा. शाळा चापडगांव | ०१ |
| ८९ | | जि. प. प्रा. शाळा ढोरजळगांव | ०१ |
| ९० | | जि. प. प्रा. शाळा मुंगी | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ९१ | अकोले | जि. प. प्राथमिक शाळा, गणोरे | ०१ |
| ९२ | | जि. प. प्राथमिक शाळा, नायकर वाडी | ०१ |
| ९३ | | जि. प. प्राथमिक शाळा, हिवरगांव आंबरे | ०१ |
| ९४ | | जि. प. प्राथमिक शाळा, शेलद | ०१ |
| ९५ | | जि. प. प्राथमिक शाळा, रेडे | ०१ |
| ९६ | | जि. प. प्राथमिक शाळा, धामनवन पाटीलवाडी | ०१ |
| ९७ | | जि. प. प्राथमिक शाळा, शिरपुंजे देवाचीवाडी | ०१ |
| ९८ | | जि. प. प्राथमिक शाळा, तांभोळ | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ९९ | पारनेर | जि. प. प्राथमिक शाळा, वाळवणे | ०१ |
| १०० | | जि. प. प्राथमिक शाळा, घाणेगांव | ०१ |
| १०१ | | जि. प. प्राथमिक शाळा, अळकुटी | ०१ |
| १०२ | | जि. प. प्राथमिक शाळा, पवळदरा | ०१ |
| १०३ | | जि. प. प्राथमिक शाळा, पारनेर मुली | ०१ |
| १०४ | | जि. प. प्राथमिक शाळा, वरखेड मळा | ०१ |
| १०५ | | जि. प. प्राथमिक शाळा, गणेशवाडी रायतळे | ०१ |
| १०६ | | जि. प. प्राथमिक शाळा, वडनेर | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| १०७ | राहूरी | जुंदरेवाडी | ०१ |
| १०८ | | लाख | ०१ |
| १०९ | | मालुंजे खु. | ०१ |
| ११० | | गोटुंबे आखाडा | ०१ |
| १११ | | हनुमान वाडी | ०१ |
| ११२ | | करजगांव | ०१ |
| ११३ | | बाभुळगांव | ०१ |
| ११४ | | खडांबे बु. | ०१ |
| ११५ | | महारुख वस्ती | ०१ |
| ११६ | | डुक्रेवाडी | ०१ |
| | | एकूण खोल्या | १० |
| ११७ | राहाता | शिंगवे जाधव वस्ती | ०१ |
| ११८ | | जि. प. प्रा. शाळा पुणतांबा | ०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ११९ | | जि. प. प्रा. शाळा, कोकणे वस्ती | ०१ |
| १२० | | जि. प. प्रा. शाळा सदाफळ क्लास | ०१ |
| १२१ | | जि. प. प्रा. शाळा वाळकी | ०१ |
| १२२ | | जि. प. प्रा. शाळा, इनामके वस्ती | ०१ |
| १२३ | | जि. प. प्रा. शाळा लक्ष्मीवाडी | ०१ |
| १२४ | | जि. प. प्रा. शाळा केलवड | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| | | एकूण एकंदर | १२४ |

प्रस्तुत प्रकरणी निधी उपलब्ध करुन दिला असला तरी संस्थानचा निधी इतर सस्थांना वितरणाबाबतचे प्रकरण न्यायालयात चालू आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव जिल्हा परिषद, अहमदनगर यांना पाठविण्या अगोदर ॲड नितीन भवर यांचा कायदेशीर सल्ला घेण्यात यावा, व त्यांचे सल्ल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी, तसेच निधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या शाळा-खोल्यांचे भूमिपुजन तात्काळ करुन घेण्यात यावे, अशी या उपसमितीची शिफारस होती.

सदरची शिफारस मान्य करतांना पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त १२४ शाळा खोल्यांच्या निवडीस मान्यता देण्यात आली. तसेच प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८९३/प्र.क्र.८८/का.१६ दि.२६ जुन,२०१८ अन्वये जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळांच्या नविन खोल्या बांधण्यासाठी पहिल्या टप्प्यात रक्कम रु.१० कोटी अनुदान दि.२९.१२.२०१८ रोजी आदा करणेत आलेले आले, त्यामुळे निवड करण्यात आलेल्या १२४ शाळा खोल्यांचे भूमिपुजन तात्काळ करुन घेण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही- लेखाशाखा)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, खालील प्रमाणे १२४ शाळा खोल्यांची निवड करण्यात आली. तसेच प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.सासंवि-१०१८/८९३/प्र.क्र.८८/का.१६ दि.२६जुन,२०१८ अन्वये जिल्हा परिषद, अहमदनगर यांना शाळांच्या नविन खोल्या बांधण्यासाठी पहिल्या टप्प्यात रक्कम रु.१० कोटी अनुदान दि.२९.१२.२०१८ रोजी आदा करणेत आलेले आले, त्यामुळे निवड करण्यात आलेल्या १२४ शाळा खोल्यांचे भूमिपुजन तात्काळ करुन घेण्यात यावे, असे ठरले.**

| अ.न. | तालुका | अंतिम यादी शाळा नांव | वर्ग खोली संख्या |
|---|---|---|---|
| १ | नेवासा | जि. प. प्राथमिक शाळा रस्तापूर | ०१ |
| २ | | जि. प. प्राथमिक शाळा, खुपटी | ०१ |
| ३ | | जि. प. प्राथमिक शाळा, बाभुळवेढा | ०१ |
| ४ | | जि. प. प्राथमिक शाळा जैऊर हैबती | ०१ |
| ५ | | जि. प. प्राथमिक शाळा, गणेशवाडी | ०१ |
| ६ | | जि. प. प्राथमिक शाळा, गळनिंब | ०१ |
| ७ | | जि. प. प्राथमिक शाळा, पिंप्रीशहाली | ०१ |
| ८ | | जि. प. प्राथमिक शाळा, फत्तेपुर | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ०९ | कर्जत | जि. प. प्राथमिक शाळा, कोरेगाव | ०१ |
| १० | | जि. प. प्राथमिक शाळा, राशीन मुली | ०१ |
| ११ | | जि. प. प्राथमिक शाळा टाकळी खंडेश्वरी | ०१ |
| १२ | | जि. प. प्राथमिक शाळा, पिंपळवाडी | ०१ |
| १३ | | जि. प. प्राथमिक शाळा, तिखी | ०१ |
| १४ | | जि. प. प्राथमिक शाळा, घुमरी | ०१ |
| १५ | | जि. प. प्राथमिक शाळा, दिघी | ०१ |
| १६ | | जि. प. प्राथमिक शाळा, कर्जत मुले | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ | पाथर्डी | जि. प. प्राथमिक शाळा, मोहटे | ०१ |
| १८ | | जि. प. प्राथमिक शाळा, खरवंडी कासार | ०१ |
| १९ | | जि. प. प्राथमिक शाळा,कळसपिंप्री | ०१ |
| २० | | जि. प. प्राथमिक शाळा, साकेगांव | ०१ |
| २१ | | जि. प. प्राथमिक शाळा, सुसरे | ०१ |
| २२ | | जि. प. प्राथमिक शाळा, टाकळी मानुर | ०१ |
| २३ | | जि. प. प्राथमिक शाळा, धामणगांव | ०१ |
| २४ | | जि. प. प्राथमिक शाळा, खोजेवाडी | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| २५ | कोपरगांव | कारवाडी ब | ०१ |
| २६ | | डांगेवाडी | ०१ |
| २७ | | भास्करवस्ती | ०१ |
| २८ | | ओगदी | ०१ |
| २९ | | शिवाजीनगर | ०१ |
| ३० | | रांजणगांव देशमुख | ०१ |
| ३१ | | रेलवाडी | ०१ |
| ३२ | | अंचलगांव | ०१ |
| ३३ | | करंजी | ०१ |
| ३४ | | परजणेवस्ती सवंत्सर | ०१ |
| ३५ | | शिंदेवस्ती पढेगांव | ०१ |
| ३६ | | कान्हेगांव | ०१ |
| ३७ | | धोत्रे | ०१ |
| ३८ | | चासनळी | ०१ |
| ३९ | | कारवाडी कोकमठाण | ०१ |
| ४० | | नाटेगाव | ०१ |
| ४१ | | पढेगाव | ०१ |
| | | एकूण खोल्या | १७ |
| ४२ | संगमनेर | जि. प. प्रा. शाळा, अंभोरे | ०१ |
| ४३ | | जि. प. प्रा. शाळा, चिंचेवाडी | ०१ |
| ४४ | | जि. प. प्रा. शाळा, साकूर | ०१ |
| ४५ | | जि. प. प्रा. शाळा, कासार दुमाला | ०१ |
| ४६ | | जि. प. प्रा. शाळा, दे. ख. आखाडा | ०१ |
| ४७ | | जि. प. प्रा. शाळा, डिग्रस | ०१ |
| ४८ | | जि. प. प्रा. शाळा, कौठे धांदरफळ | ०१ |
| ४९ | | जि. प. प्रा. शाळा, गुंजाळवाडी | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ५० | श्रीगोंदा | जि. प. प्रा. शाळा, कोकणगाव | ०१ |
| ५१ | | जि. प. प्रा. शाळा, येळपणे | ०१ |
| ५२ | | जि. प. प्रा. शाळा, वेळू | ०१ |
| ५३ | | जि. प. प्रा. शाळा, चिंभळा | ०१ |
| ५४ | | जि. प. प्रा. शाळा, ढोकराई | ०१ |
| ५५ | | जि. प. प्रा. शाळा, घारगांव | ०१ |
| ५६ | | जि. प. प्रा. शाळा, दत्तवाडी | ०१ |
| ५७ | | जि. प. प्रा. शाळा, म्हसे | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५८ | जामखेड | जि. प. प्राथमिक शाळा, सातेफळ | ०१ |
| ५९ | | जि. प. प्राथमिक शाळा, हापटेवाडी | ०१ |
| ६० | | जि. प. प्राथमिक शाळा, फाळकेवाडी | ०१ |
| ६१ | | जि. प. प्राथमिक शाळा, इनामवस्ती | ०१ |
| ६२ | | जि. प. प्राथमिक शाळा, नाहूली | ०१ |
| ६३ | | जि. प. प्राथमिक शाळा, पारेवाडी | ०१ |
| ६४ | | जि. प. प्राथमिक शाळा, कडभनवाडी | ०१ |
| ६५ | | जि. प. प्राथमिक शाळा, जातेगाव | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ६६ | नगर | खांडके | ०१ |
| ६७ | | सारोळा बध्दी | ०१ |
| ६८ | | भोरवाडी | ०१ |
| ६९ | | नेप्ती | ०१ |
| ७० | | चिंचोडी पाटील | ०१ |
| ७१ | | माथणी | ०१ |
| ७२ | | पदमपूरवाडी | ०१ |
| ७३ | | खातगाव टाकळी | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ७४ | श्रीरामपूर | सुतगिरणी | ०१ |
| ७५ | | हरिहरनगर उर्दु | ०१ |
| ७६ | | अशोकनगर उर्दु | ०१ |
| ७७ | | वांगी खुर्द | ०१ |
| ७८ | | खानापूर | ०१ |
| ७९ | | गळनिंब | ०१ |
| ८० | | खोकर | ०१ |
| ८१ | | फत्याबाद | ०१ |
| ८२ | | खंडाळा | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०९ |
| ८३ | शेवगांव | जि. प. प्रा. शाळा क-हे टाकळी | ०१ |
| ८४ | | जि. प. प्रा. शाळा शहरटाकळी | ०१ |
| ८५ | | जि. प. प्रा. शाळा, सामनगांव | ०१ |
| ८६ | | जि. प. प्रा. शाळा, मजलेशहर | ०१ |
| ८७ | | जि. प. प्रा. शाळा खामगांव ऊर्दु | ०१ |
| ८८ | | जि. प. प्रा. शाळा चापडगांव | ०१ |
| ८९ | | जि. प. प्रा. शाळा ढोरजळगांव शे. | ०१ |
| ९० | | जि. प. प्रा. शाळा मुंगी | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| ९१ | अकोले | जि. प. प्राथमिक शाळा, गणोरे | ०१ |
| ९२ | | जि. प. प्राथमिक शाळा, नायकर वाडी | ०१ |
| ९३ | | जि. प. प्राथमिक शाळा, हिवरगांव आंबरे | ०१ |
| ९४ | | जि. प. प्राथमिक शाळा, शेलद | ०१ |
| ९५ | | जि. प. प्राथमिक शाळा, रेडे | ०१ |
| ९६ | | जि. प. प्राथमिक शाळा, पाटीलवाडी धामनवन | ०१ |
| ९७ | | जि. प. प्राथमिक शाळा, देवाचीवाडी शिरपुंजे | ०१ |
| ९८ | | जि. प. प्राथमिक शाळा, तांभोळ | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९९ | पारनेर | जि. प. प्राथमिक शाळा, वाळवणे | ०१ |
| १०० | | जि. प. प्राथमिक शाळा, घाणेगांव | ०१ |
| १०१ | | जि. प. प्राथमिक शाळा, अळकुटी | ०१ |
| १०२ | | जि. प. प्राथमिक शाळा, पवळदरा | ०१ |
| १०३ | | जि. प. प्राथमिक शाळा, पारनेर मुली | ०१ |
| १०४ | | जि. प. प्राथमिक शाळा, वरखेड मळा | ०१ |
| १०५ | | जि. प. प्राथमिक शाळा, गणेशवाडी रायतळे | ०१ |
| १०६ | | जि. प. प्राथमिक शाळा, वडनेर बु. | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| १०७ | राहूरी | जुंदरेवाडी | ०१ |
| १०८ | | लाख | ०१ |
| १०९ | | मालुंजे खु. | ०१ |
| ११० | | गोटुंबे आखाडा | ०१ |
| १११ | | हनुमान वाडी | ०१ |
| ११२ | | करजगांव | ०१ |
| ११३ | | बाभुळगांव | ०१ |
| ११४ | | खडांबे बु. | ०१ |
| ११५ | | महारुख वस्ती | ०१ |
| ११६ | | डुक्रेवाडी | ०१ |
| | | एकूण खोल्या | १० |
| ११७ | राहाता | जाधव वस्ती शिंगवे | ०१ |
| ११८ | | जि. प. प्रा. शाळा पुणतांबा | ०१ |
| ११९ | | जि. प. प्रा. शाळा, कोकणे वस्ती | ०१ |
| १२० | | जि. प. प्रा. शाळा सदाफळ क्लास | ०१ |
| १२१ | | जि. प. प्रा. शाळा वाळकी | ०१ |
| १२२ | | जि. प. प्रा. शाळा, इनामे वस्ती | ०१ |
| १२३ | | जि. प. प्रा. शाळा लक्ष्मीवाडी | ०१ |
| १२४ | | जि. प. प्रा. शाळा केलवड | ०१ |
| | | एकूण खोल्या | ०८ |
| | | एकूण एकंदर | १२४ |

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.०२ शिर्डी शहरातील अहमदनगर - मनमाड महामार्गावरील गेट नं.०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पुल) 'डिझाईन व बिल्ड' तत्वावर उभारणेकामी प्राप्त ई-निविदा रद्द करुन ठेकेदार यांची अनामत रक्कम परत करणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः -

०१. अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व परंपरा प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनिमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवयाचा आहे, ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कमी लावणे, ही समितीची कर्तव्य असतील. अशी तरतूद आहे.

२. अधिनियमाचे कलम २१ (१) मधील खंड (ग) अन्वये, भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे. अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :-

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८९३

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४७

३. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४८(०५)

मा. विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन निर्णय :-

शासन निर्णय क्रसासंवि-१०१७/९२४/प्र.क्र.१००/का.१६,दि.०१/०६/२०१८

प्रस्तावना:शिर्डी शहरातून जाणारा नगर-मनमाड रस्ता आता सिन्नर-अहमदनगर राष्ट्रीय महामार्ग क्र.१६० झालेला आहे. त्याची शिर्डी शहरातील लांबी ही कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां.) विभाग, अहमदनगर यांचे अखत्यारीत आहे. सदर महामार्गावर गेट नं.०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पूल) "डिझाईन व बिल्ड" तत्वावर उभारणेचे कामास मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ निर्णय क्र.८९३ व निर्णय क्र.१४७ दि.२५/०२/२०१७ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता मिळालेनंतर Design and build या तत्वावर उद्वाहक (Lift) चे काम वगळून स्कायवॉक उभारणीसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली आहे. सदरहु स्कायवॉक उभारणेसाठी सन २०१६-१७ चे जिल्हा दरसुचीतील दराने केलल्या प्राथमिक अंदाजपत्रकानुसार रु.१,०३,१९,९०२/- मात्र खर्च येईल.

याकामी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां.) विभाग, अहमदनगर यांचेकडील जा. क्र. नाहदा/रेशा/६८२/सन२०१७ दि.०५/०५/२०१७ रोजीचे पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/९२४/प्र.क्र.१००/का. सोळा दि. ३१/०८/२०१७ अन्वये शिर्डी नगरपंचायत शिर्डी व आवश्यकतेप्रमाणे अन्य स्थानिक प्रशासकीय यंत्रणांची परवानगी घेवून सदरचा पादचारी पूल (Skywalk) "डिझाईन व बिल्ड" तत्वावर बांधण्यासाठी संस्थानमार्फत रु. १,०३,१९,९०२/- मात्र खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे परवानगीसाठी इकडील दि.०५/१०/२०१७ रोजीचे पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावाबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांनी जा.क्र.नप/टे-८१२/२६८७/२०१७ दि.१७/१०/२०१७ अन्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

".. सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे मान्यतेप्रमाणे व त्यांनी मंजूर केलेल्या आराखडयाप्रमाणे स्कायवॉक (पादचारी पुल) उभारण्यास या कार्यालयाची खालील अटीस अधिन राहून हरकत नाही.

१. कोपरगाव-अहमदनगर रस्ता प्र.रा.मा.क्र.८ (नविन रा.म.मा.१६०)(सा.क्र.९०/२००)हा मा. कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां.) विभाग, यांचे अखत्यारीत असल्याने राष्ट्रीय महामार्गाचे नियमानुसार त्यांचे कार्यालयाकडून स्कायवॉक (पादचारी पुल) पुलाचे आराखडयास मंजुरी घेवून बांधकाम करण्यात यावे. त्यात काही फेरबदल करावयाचे झाल्यास त्यास पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२. बांधकाम करतांना कोणाचेही हक्कावर, जागेवर अतिक्रमण करता येणार नाही.

३. सदर पुलाचे बांधकाम पुर्ण झाल्यावर संरचनात्मक समर्थतेबाबत दाखला (Structural stability Certificate) नगरपंचायतकडे सादर करणे बंधनकारक राहील.

४. सदर पादचारी पुलावर साईभक्तांचे सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करणे बंधनकारक राहील.

५. मा. कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सा.बां.) विभाग, अहमदनगरयांचे संदर्भ क्र.१ चे पत्रातील अटी व शर्ती आपणावर बंधनकारक राहतील."

विषयांकीत कामांसाठी वृत्तपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध करून दि.०२/०४/२०१८ ते दि.१२/०४/२०१८ अखेर तिस-यांदा ई-निविदा मागविणेत आल्या होत्या. त्यातील निम्नतम दराचे ठेकेदार आर. एल. भुतडा, कोपरगाव यांचे निविदेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.३४८(०५) खालीलप्रमाणे झाला आहे.

"..शिर्डी शहरातील अहमदनगर-मनमाड महामार्गावर गेट नं. ०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पुल) "डिझाईन व बिल्ड" तत्वावर उभारणेकामी निम्नतम दरधारक यांचेकडून अगोदर स्ट्रक्चरल डिझाईन तयार करून घेवून ते सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून मंजूर करून घेण्यात यावे असे ठरले. "

त्यानुसार ठेकेदार आर. एल. भुतडा. कोपरगाव यांनी दि.२५/०६/२०१८ रोजीचे पत्रान्वये सादर केलेले स्ट्रक्चरल डिझाईन इकडील दि.१५/०७/२०१८ रोजीचे पत्रान्वये कार्यकारी अभियंता, संकल्पचित्र विभाग (सार्वजनिक बांधकाम विभाग) नाशिक यांचे मार्फत अधिक्षक अभियंता, खाडीपुल क्र.१ , कोकण भवन, नवी मुंबई यांचे मंजूरीसाठी पाठविले असता , त्यांनी दि.१२/०८/२०१८ रोजीचे पत्रान्वये अंदाजित किंमतीच्या ०.५% (रु.१०३ लक्ष x०.५% ) रक्कम रु.५१,५००/-मात्र धनादेशाद्वारे जमा करणे व या कामाच्या निविदेत पादचारी पुलाच्या संकल्पनासाठी काही निकष (Design cretieria) नमूद केले असल्यास त्यासंबंधी माहिती देणेबाबत कळविले आहे.

सदर कामाचे Bill of Quantities मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

" ..The rate shall include cost of all design calculations, engineering drawings, structural drawings and slope drawing including approval from competent authority, structural designer, labour, T&P, scaffolding other incidental charges including wastage, enabling temporary service all fitting fixtures complete as per technical specification diversion to road etc. .."

उपरोक्त अटीनुसार ठेकेदार आर. एल. भुतडा. कोपरगाव यांना डिझाइन तपासणी शुल्क भरणेबाबत कळविता येईल. मात्र स्कायवॉक उभारणेसाठी शिर्डी शहरातील अहमदनगर-मनमाड महामार्गावर गेट नं. ०१ जवळ पुर्वेस संस्थानची जागा उपलब्ध असली तरी या ठिकाणी दर्शन रांग इमारतीचे काम सुरु असल्याने भविष्यात या भागात होणारी गर्दी विचारात घेवून सदर रस्त्यावर रस्ता क्र.०५ -नाला रस्ता व लक्ष्मीनगर वसाहतीलगत जागा उपलब्ध करणेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांना इकडील दि.०६/०९/२०१८ चे पत्राने कळविणेत आले होते. त्यावर मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायतयांनी जा.क्र.नप/टे-०८/११२०/२०१९ दि.१२/०६/२०१९ अन्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

उपरोक्त अटीनुसार ठेकेदार आर. एल. भुतडा. कोपरगाव यांना डिझाइन तपासणी शुल्क भरणेबाबत कळविता येईल. मात्र स्कायवॉक उभारणेसाठी शिर्डी शहरातील अहमदनगर-मनमाड महामार्गावर गेट नं. ०१ जवळ पुर्वेस संस्थानची जागा उपलब्ध असली तरी पश्चिमेकडील बाजूस जागा उपलब्ध नाही. तसेच दर्शन रांग इमारतीचे काम सुरु असल्याने भविष्यात या भागात होणारी गर्दी विचारात घेवून सदर रस्त्यावर रस्ता क्र.०५-नाला रस्ता व लक्ष्मीनगर वसाहतीलगत जागा उपलब्ध करणेबाबत मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत यांना इकडील दि.०६/०९/२०१८ वदि.०१/०६/२०१९ चे पत्राने कळविणेत आले होते. त्यावर मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायतयांनी जा.क्र.नप/टे-०८/११२०/२०१९ दि.१२/०६/२०१९ अन्वये खालील प्रमाणे कळविले आहे.

"..अहमदनगर-मनमाड रस्त्यावर श्री साईबाबा मंदिराचे पश्चिमेकडील महाद्वार क्र. ०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पुल) उभारणेस या कार्यालयाकडील संदर्भीय क्र.१ अन्वये अ.क्र.१ ते ५चे अटी शर्तीस अधिन राहून परवानगी दिलेली आहे. त्यानुसार अट क्र.२ अन्वये बांधकाम करतांना कोणाचेही हक्कावर,जागेवर अतिक्रमण करता येणार नाही, असे नमूद केले आहे. यास्तव प्रस्तावीत जागेच्या पश्चिम बाजूने असलेल्या खाजगी मालमत्तेच्या Set back distance मध्ये स्कायवॉक बांधकाम अनुज्ञेय होणार नाही. तसेच रस्त्याच्या पश्चिम बाजूने खाजगी मालकीच्या मिळकती असलेने शिर्डी नगरपंचायतच्या मालकीची अंदाजे १२.००मीटर x ५.०० मीटर जागा उपलब्ध करून देता येत नाही."

प्रस्ताव:- तरी उपरोक्त बाबींचा विचार करता विषयांकीत कामासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने तुर्त याकामी प्राप्त झालेल्या ई-निविदा रद्द करून ठेकेदार यांची अनामत रक्कम परत करणेस मान्यतेस्तव सविनय सादर.

निर्णय क्र.३८४ **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरातील अहमदनगर - मनमाड महामार्गावरील गेट नं.०१ जवळ स्कायवॉक (पादचारी पुल) 'डिझाईन व बिल्ड' तत्वावर उभारणेकामी प्राप्त ई-निविदा रद्द करुन ठेकेदार आर.एल.भुतडा, कोपरगाव यांची अनामत रक्कम रु.५१,५००/- परत करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

विषय नं.०३ **मंदिर परिसरातील गेट नं.१ जवळ व केशव मंदिर येथील मोकळया जागेत साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्डसाठी सिव्हील व टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणे कामाचे ठेकेदार साई इंजिनिअरींग वर्क्स,वैजापुर यांचे अंतिम देयक मंजूर करणे व त्यापैकी उर्वरीत देय रक्कम रु.१,९६,६८४/- मात्र आदा करणेस मंजूरी देणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतूद – अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये " मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे " अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ५२३(१४) अन्वये मंदिर परिसरात गेट नं. ०१ व ०२ चे ठिकाणी साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्ड तयार करणेकामी साई इंजिनिअरींग वर्क्स, श्रीरामपूर यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेली आहे. ठेकेदार यांनी गेट नं. ०१ जवळील चप्पल स्टॅण्ड साठी शेड उभारणेचे काम दि. १५/१०/२०१७ रोजी पूर्ण केलेले आहे. केशव मंदिर येथिल मोकळया जागेत चप्पल स्टॅण्डसाठी शेड उभारणेकामी परवानगी मिळणेकामी

प्रस्ताव शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांचेकडे सादर केला होता. परंतु सदरहू शेड उभारणीस नगरपंचायतीकडून मान्यता प्राप्त झालेली नाही. त्यामुळे केशवमंदिर येथिल मोकळया जागेत शेड उभारणीचे काम करण्यात आलेले नाही. ठेकेदार यांनी गेट नं. ०१ जवळील शेडचे झालेल्या कामाचे पहिले व अंतिम बिल सादर केले आहे. इकडील विभागामार्फत सदर बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली असून सदर कामाचा व अंतिम बिलाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नाव | मंदिर परिसरातील गेट नं. ०१ जवळ व केशव मंदिर येथिल मोकळया जागेत साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्डसाठी सिव्हील व टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणे. |
| २. | ठेकेदाराचे नाव | साई इंजिनिअसरींग वर्क्स, वैजापूर |
| ३. | मंजूर निविदा रक्कम | रु.९,६१,८००/- |
| ४. | काम बहाल करणेबाबत मा. व्यवस्थापन समिती निर्णय क्र.व दि. | निर्णय क्रं. ५२३(१४), दि.२५/०५/२०१७ |
| ५. | ठेकेदार यांना देण्यात आलेला कार्यादेश क्रं. व दिनांक | जा. नं. २९२०/२०१७, दि.३१/०८/२०१७ |
| ६. | प्रत्यक्ष काम सुरु केल्याचा दिनांक | दि.१०/०९/२०१७ |
| ७. | अंतिम बिलानुसार झालेल्या कामाची रक्कम | रु.४,५५,६८४/- |
| ८. | यापुर्वी अदा केलेली रक्कम | रु.२,५९,०००/- |
| ९. | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रु.१,९६,६८४/- |
| १०. | मंजूर निविदेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.०५,०६,११६/- ( ५२.६२१%) कमी |
| ११. | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मुदत | दि.३०/१०/२०१८ |
| १२. | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.१५/१०/२०१८ |

मंदिर परिसरातील गेट नं.०१ जवळील व केशव मंदिर येथिल मोकळया जागेत चप्पल स्टॅण्ड साठी मागविण्यात आलेल्या ई- निविदेतील निम्नतम दरानुसार मंजूर निविदा रक्कम रु.९,६१,८००/- मात्र इतकी आहे. ठेकेदार यांचे ई-निविदेमध्ये गेट नं. ०१ जवळील चप्पल स्टॅण्ड साठी रक्कम रु.५,०१,१११/- इतकी असून केशव मंदिर येथील मोकळया जागेतील चप्पल स्टॅण्ड करीता रु.४,६०,६८९/- मात्र इतकी रक्कम आहे. ठेकेदार यांनी गेट नं. ०१ जवळील शेड उभारणीचे काम विहीत मानकांनुसार समाधान कारक रित्या पूर्ण केले आहे. केशव मंदिर येथील मोकळया जागेत चप्पल स्टॅण्ड साठी शेड उभारणीकामी शिर्डी नगरपंचायतीकडून मान्यता प्राप्त झालेली नसल्याने सदरचे काम करण्यात आलेले नाही. त्यामुळे खर्चात बचत झालेली आहे. याबाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कामाचा तपशिल | निविदा रक्कम (रु) | अंतिम बिल रक्कम (रु) | शिल्लक रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|
| ०१ | गेट नं. ०१ जवळील चप्पल स्टॅण्ड शेड | ५,०१,१११.०० | ४,५५,६८४.०० | ४५,४२७.०० |
| ०२ | केशव मंदिर येथिल मोकळया जागेतील चप्पल स्टॅण्ड शेड | ४,६०,६८९.०० | निरंक | ४,६०,६८९.०० |
| | एकूण - | ९,६१,८००.०० | ४,५५,६८४.०० | ५,०६,११६.०० |

वरील प्रमाणे मंजूर निविदा रकमेपेक्षा रु. ५,०६,११६/- (५२.६२ %) मात्र इतका कमी खर्च झालेला आहे.

विभागाचा अभिप्राय:- ठेकेदार यांनी गेट नं. ०१ जवळील चप्पल स्टॅण्डसाठी शेड उभारणीचे काम विहीत मानकांनुसार समाधानकारक रित्या पूर्ण केलेले असल्याने ठेकेदार यांचे अंतिम बिल मंजूर करणेस हरकत नाही. ठेकेदार यांनी सादर केलेल्या अंतिम बिलाची तपासणी केली असता प्रत्यक्ष झालेल्या मोजमापानुसार सदरहू बिलाची एकूण रक्कम रु.४,५५,६८४/- मात्र इतकी होते.

प्रस्ताव:- तरी ठेकेदार साई इंजिनिअरींग वर्क्स, वैजापूर यांचे मंदिर परिसरातील गेट नं. ०१ जवळ साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्ड शेडचे सिव्हील व टेन्साईल फॅब्रीक शेड उभारणी कामाचे पहिले व अंतिम देयक रक्कम रु.४,५५,६८४/- मात्र मंजूर होऊन उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.१,९६,६८४/- मात्र ठेकेदार यांना अदा करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील गेट नं.१ जवळ व केशव मंदिर येथील मोकळया जागेत साईभक्तांचे सुविधेकरीता चप्पल स्टॅण्डसाठी सिव्हील व टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.४,५५,६८४/- मात्र मंजुर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत निव्वळ देय रक्कम रु.१,९६,६८४/-मात्र सदर कामाचे ठेकेदार साई इंजिनिअरींग वर्क्स,वैजापुर यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०४** **दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीमधील संस्थान कार्यालयाचे नुतनीकरण (Civil Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणे कामाचे अंतिम देयक मंजूर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.१९,१५,६८७/-मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजूरी देणे.**

**प्रस्ताव-** दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीमधील संस्थान कार्यालयाचे नूतनीकरण (Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणेचे काम ठेकेदार जय एंटरप्रायजेस, मुंबई यांनी पूर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या दुसरे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी केलेली आहे. सदर प्रकल्पाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

कामाचे नांव- दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीमधील संस्थान कार्यालयाचे नूतनीकरण (Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | जय एंटरप्रायजेस, मुंबई |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३७८९/२०१८ दि.२५/१०/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | रु.३६,४४,३२७/- |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र ६१३(११) दि.०५/१०/२०१८ |
| दुसरे व अंतिम बिलाची रक्कम (अ) | रु.३२,०८,४२६/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम (ब) | रु.१२,९२,७३९/- |
| **निव्वळ देय्य रक्कम (अ-ब)** | **रु.१९,१५,६८७/-** |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.०४,३५,९०१/- कमी (११.९६% कमी) |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.२१/०३/२०१९ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.१०/०३/२०१९ |

दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीमधील संस्थान कार्यालयाचे नूतनीकरण (Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणेचे काम ठेकेदार जय एंटरप्रायजेस, मुंबईयांनी दि.१०/०३/२०१९ अखेर विहीत मुदतीत पूर्ण केले आहे. ठेकेदार यांनी दि.०८/०४/२०१९ रोजीचे पत्रान्वये सदर कामाचे दुसरे व अंतिम बिल सादर केले आहे. प्रत्यक्षात काम करतेवेळी काही बाबींचे परीमाणात बचत झाली आहे. त्यामुळे निविदा रकमेपेक्षा रु.४,३५,९०१/-(११.९६% कमी)मात्रने प्रत्यक्ष खर्च कमी झालेला आहे. त्यानुसार सदरहू कामाची Gross Value of Work Done रु.३२,०८,४२६/-मात्र होत असून यापुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता अंतिम बिलापोटी निव्वळ रु.१९,१५,६८७/- मात्र इतकी रक्कम देय होत आहे.

प्रस्ताव:- दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीमधील संस्थान कार्यालयाचे नुतनीकरण (Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणे कामाचे अंतिम देयक रक्कम रु.३२,०८,४२६/- मात्र मंजूर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.१९,१५,६८७/- मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३८६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दादर मुंबई येथील संस्थानचे साईनिकेतन इमारतीमधील संस्थान कार्यालयाचे नुतनीकरण (Civil, Furniture, Plumbing, Air Conditioning and Electrical) करणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.३२,०८,४२६/- मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.१९,१५,६८७/- मात्र सदर कामाचे ठेकेदार जय एंटरप्रायजेस, मुंबई यांना आदा करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच साईनिकेतन इमारतीमधील साफसफाई व स्वच्छता चांगल्या प्रकारे ठेवणेबाबत संबधीतांना सुचीत करण्यात यावे, निवासस्थान वापरास देणेबाबत नियमावली तयार करणेत यावी, यामधील दोन रुम विश्वस्तांसाठी राखीव ठेवण्यात यावे,असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग/सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०५** **संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती प्रि कॉस्ट कम्पाऊंड करणे कामाचे दुसरे व अंतिम देयक रु.२८,५७,३८१/-मात्र मंजुर होऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु.५४,५६१/-मात्र ठेकेदार यांना आदा करणेस मंजुरी देणे.**

**प्रस्ताव-** संस्थानमालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनींचे भोवती प्रि कास्ट कम्पांउड करणेचे काम ठेकेदार त्रिमुर्त्री कन्सट्रक्शन, नाशिक यांनी पुर्ण केले असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या दूसरे व अंतिम बिलाची सविस्तर तपासणी करणेत आली आहे. ठेकेदार यांना अंतीम बिल अदा करणेकामी मा. व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव तक्ता स्वरूपात खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.

कामाचे नांव- संस्थानमालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनींचे भोवती प्रि-कास्ट कम्पांउड करणे.

| | |
|---|---|
| ठेकेदाराचे नांव | त्रिमुर्त्री कन्सट्रक्शन, नाशिक |
| कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/६७०८/२०१८ दि.१४/०३/२०१८ |
| मंजूर निविदा रक्कम | रु.३४,९५,०४८/- |
| मा. व्यवस्थापन मंडळ निर्णय क्रमांक व दिनांक | नि.क्र १४०(०४), दि.०७/०३/२०१८ |
| दूसरे व अंतिम बिलाची रक्कम (अ) | रु.२८,५७,३८१/- |
| आजपर्यंत अदा केलेली रक्कम (ब) | रु.२८,०२,८२०/- |
| निव्वळ देय्य रक्कम (अ-ब) | रु.५४,५६१/- |
| मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.६,३७,६६७/- कमी |
| करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | दि.२०/०९/२०१८ |
| प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याचा दिनांक | दि.२०/०९/२०१८ |

संस्थानमालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनींचे भोवती प्रि कास्ट कम्पांउड करणेचे काम ठेकेदार त्रिमुर्त्री कन्सट्रक्शन, नाशिक यांनी दि.२०/०९/२०१८ अखेर विहीत मुदतीत काम पूर्ण केले आहे. मौजे शिर्डी येथील गट नं.१२४/११ व १२४/१२ या दोन लगतच्या क्षेत्रांना एकत्रीत कंपाऊंड केल्याने प्रि कास्ट कम्पांउडच्या बाबी मध्ये बचत झाली आहे. त्यामुळे मंजुर निवीदा रक्कमे पेक्षा अंतिम बिलाची रक्कम कमी झाली आहे.

ठेकेदार यांनी दूसरे व अंतिम बिल दि.२१/०५/२०१९ रोजीचे पत्रान्वये सादर केले आहे. ठेकेदार यांचेमार्फत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संबंधीत कागदपत्रांची अद्याप पुर्तता झालेली नाही. ठेकेदार यांना अंतिम बिल अदा करणेपुर्वी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संबंधीत कागदपत्रांची पुर्तता करून घेता येईल.या बिलाची सविस्तर तपासणी केली असुन कामाची Gross Value of Work Done रु.२८,५७,३८१/- मात्र होत असुन या पुर्वी अदा केलेली रक्कम वजा जाता अंतिम बिलापोटी एकूण रक्कम रु.५४,५६१/- मात्र इतकी रक्कम देय आहे.

तरी संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनींचे भोवती प्रि कास्ट कम्पांउड करणे कामाचे दूसरे व अंतिम देयक रक्कम रु.५४,५६१/- मात्र आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनींचे भोवती प्रि कास्ट कम्पांउड करणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु. २८,५७,३८१/- मात्र मंजुर करण्यात येऊन त्यापैकी निव्वळ देय रक्कम रु. ५४,५६१/-मात्र सदर कामाचे ठेकेदार त्रिमुर्ती कन्सट्रक्शन, नाशिक यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.०६** **अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेसंबधी संस्थानचे धोरण व त्याकरीता संस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्रपणे लागू करावयाच्या नियमावली/तरतुदीबाबत.**

**प्रस्ताव-** अ) संस्थान सेवेत असतांना कर्मचारी / अधिकारी दिवंगत झाल्यास किंवा गंभीर आजार, अपघात यामुळे संस्थान सेवा करण्यास वैद्यकीय दृष्टया कायमचा असमर्थ ठरल्यामुळे सेवा निवृत्त झाल्यास अशा कर्मचा-यांच्या कुटूंबावर ओढावणा-या आर्थिक आपत्तीत कुटूंबियांना तातडीने मदत मिळण्याच्या उद्देशाने, सदर कर्मचा-यांच्या कुटूंबातील एका पात्र नातेवाईकास शैक्षणिक पात्रता व वय यानुसार संस्थान अंतर्गत कोणत्याही गट क व ड

श्रेणीच्या सरळसेवा प्रवेशाने भरल्या जाणाऱ्या पदावर अनुकंपा कारणास्तव मा. शासनाचे धोरणानुसार सेवेत समावून घेतले जाते. त्यानुसार यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने अनुकंपा कारणास्तव ज्या–त्या वेळी मयत झालेल्या कर्मचा-यांच्या एका पात्र नातेवाईकास दि.०७/०८/२००९ अखेर पर्यंत वेळोवेळी कायम पदावर संस्थान सेवेत कामावर घेणेत आलेले आहे.

ब) मा. शासन निर्णय क्रमांक, अंकपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ/ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक-२१ सप्टेंबर, २०१७ अन्वये अनुकंपा तत्त्वावर शासन सेवेत नियुक्ती देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णय / परिपत्रक यांचे एकत्रिकरण करुन सर्वसमावेशक आदेश पारित केलेला आहे.

सदरहू शासन निर्णयानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ अन्वये मा.शासनाचे अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या नियमावलीतील अटी शर्ती संस्थान व्यवस्थापनाकरीता लागु करणेत आलेल्या आहेत.

क) तथापी, मा. शासनाने पारित केलेल्याअनुकंपा नियुक्ती योजनेसंदर्भातील तरतुदी ह्या केवळ शासकीय कर्मचा-यांपूरत्याच सीमीत आहेत. सदर तरतुदी ह्या जिल्हा परिषदा / नगरपालिका / महामंडळे / प्राधिकरणे / व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापनावरील कर्मचा-यांना थेट लागू होणार नाहीत. त्यासाठी संबधीत प्रशासकीय विभागाने स्वतंत्रपणे निर्णय घेणे आवश्यक राहील, असे नमूद केलेले आहे.

त्यामुळे, सदर शासन तरतुदी संस्थान व्यवस्थापनासाठी थेट लागु न करता, त्यासाठी अनुकंपा कारणास्तव नियुक्ती विषयक संस्थानचे धोरण व त्याकरीता संस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्र तरतुदी लागू करणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.२०९ खालीलप्रमाणे पारीत करणेत आलेला आहे.

"..., शासनाने लागु केलेल्या दि.२१ सप्टेंबर, २०१७ च्या अनुकंपा नेमणूकीबाबतचे धोरणामध्ये / निर्णयात, सदर अनुकंपा धोरण स्वतंत्ररित्या राबविणेस प्रशासकीय संस्था त्यांचे स्तरावर स्वतंत्र आहेत, असे नमूद केलेले आहे. त्यास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनामार्फत अनुकंपा धोरण राबविणेस व त्याअनुषंगाने संस्थान प्रशासनामार्फत स्वतंत्ररित्या नियमावली तयार करणेस मान्यता देण्यात आली. सदरचे धोरणात्मक नियमावलीस मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन, मा. शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेत यावी,"असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, मा. शासनाचे दि.२१ सप्टेंबर, २०१७ च्या अनुकंपा नेमणूकीबाबतचे धोरण / निर्णयाचे धर्तीवर अनुकंपा नियुक्ती संदर्भात संस्थान व्यवस्थापनासाठी लागु करावयाच्या स्वतंत्र तरतुदीमध्ये खालील बाबींचा समावेश करता येईल, असे मत आहे.

| अ.क्र. | तरतूदी |
|---|---|
| ०१ | **अनुकंपा नियुक्ती योजनेचा लाभ संस्थानचे स्थायी कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुज्ञेय राहील.** |
| ०२ | **संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना पात्रतेनुसार गट-क व गट-ड संवर्गात अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील.** |
| ०३ | **संस्थानांतर्गत कोणत्याही गट-क आणि गट-ड मधील सरळ सेवेच्या पदांवर त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमातील विहीत शैक्षणिक अर्हता असल्यास अशी नियुक्ती देता येईल.** |
| ०४ | **अनुकंपा नियुक्तीसाठी पात्र कुटूंबिय -** |
| (अ) | अनुकंपा नियुक्तीसाठी खालील नातेवाईक पात्र राहतील व त्यापैकी एका पात्र नातेवाईकास नियुक्ती अनुज्ञेय राहील.<br>०१.**पती/पत्नी** ०२.**मुलगा/मुलगी** (अविवाहीत/विवाहीत), **मृत्यूपर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला मुलगा/मुलगी**(अविवाहीत/विवाहीत) ०३.**दिवंगत शासकीय कर्मचा-याचा मुलगा हयात नसेल किंवा तो नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून** ०४.**घटस्फोटित मुलगी किंवा बहीण, परित्यक्ता मुलगी किंवा बहीण, विधवा मुलगी किंवा बहीण** ०५.केवळ दिवंगत अविवाहीत शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत **त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा बहीण** |
| (आ) | मृत अधिकारी / कर्मचा-यांच्या पति / पत्नीने कोणाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करावी याबाबत नामांकन देणे आवश्यक राहील. मृत अधिकारी / कर्मचा-यांचे पती / पत्नी हयात नसल्यास त्याच्या / तिच्या सर्व पात्र कुटुंबियांनी एकत्रित येऊन कोणाची नियुक्ती करावी याबाबत नामांकन करावे. |
| ०५. | **कुटूंबाची हलाखीची परिस्थिती -** |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरीता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा यापुढे राहणार नाही. |
| (आ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देताना असे प्रस्ताव संस्थान सेवेतील रोजगारावर असलेली मर्यादा, या योजनेच्या |

| | |
|---|---|
| | मागील भूमिका लक्षात घेऊन जो कर्मचारी मृत झाला आहे त्याच्या कुटुंबियांना तात्काळ उदभवणा-या आर्थिक पेचप्रसंगावर मात करण्याच्या उद्देशाने विचारात घ्यावेत. |
| (इ) | दिवंगत संस्थान कर्मचा-याचा नातेवाईक पूर्वीच सेवेत असेल तथापि तो त्याच्या कुटूंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसेल तर अशा प्रकरणात त्या कुटूंबाची आर्थिक परिस्थिती हलाकीची आहे किंवा कसे हे ठरविताना नियुक्ती प्राधिका-यांनी अत्याधिक दक्षता घ्यावी, जेणेकरुन सेवेत असलेला सदस्य कुटूंबाचा उदरनिर्वाह करत नाही या नांवाखाली अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचा दुरुपयोग केला जाणार नाही.<br>यासंदर्भात नियुक्ती प्राधिका-याने मिळणा-या निवृत्तीवेतनाची रक्कम, कुटूंबातील व्यक्तींची संख्या, त्यांची मालमत्ता/दायित्व, गंभीर आजारामुळे अथवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यासाठी करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कूटुंबातील मिळवत्या व्यक्ती इत्यादी बाबी विचारात घेणे अपेक्षित आहे. |
| ०६ | **लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र -** |
| | दिनांक ३१ डिसेंबर २००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा-यांच्या कुटूंबियास अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही. |
| ०७ | **योजनेची माहिती देण्याची जबाबदारी -** |
| (अ) | आस्थापना अधिका-याने अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्या योजनेची माहिती (योजनेचा उद्देश, पात्र नातेवाईक, अर्ज करण्याची मुदत, शैक्षणिक अर्हता, टंकलेखक प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत, अर्ज विहीत नमून्यात भरणे इ.माहिती) संस्थान कर्मचा-यांच्या कुटूंबियांना त्वरीत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच सदर माहिती मिळाल्याबद्दल कुटूंबाकडून पोच घेणे आवश्यक आहे. |
| (आ) | दिवंगत संस्थान कर्मचा-याचा पात्र वारसदार सज्ञान नसेल तर तो सज्ञान झाल्यानंतर एक वर्षाच्या आत अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज करु शकेल मात्र तो सज्ञान झाल्यावर त्याने असा अर्ज करणे अपेक्षित आहे हे देखील कुटूंबनिवृत्तीवेतन धारकाला कुटूंब निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रांची पूर्तता करतेवेळी लेखी कळविणे संबंधित आस्थापना अधिका-यावर बंधनकारक राहील. |
| ०८ | **कुटूंबातील अन्य सदस्यांचा सांभाळ करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र** |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून कुटूंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. |
| (आ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यापूर्वी संबंधिताकडून दिवंगत कर्मचा-यावर अवलंबून असलेल्या कुटूंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे. भविष्यामध्ये सदर तक्रारीची चौकशी संबधित नियुक्ती प्राधिकारी / शिस्तभंगविषयक प्राधिका-याने करावी. चौकशीअंती अनुकंपा नियुक्तीधारकाने प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाल्यास त्याला सेवेतून काढून टाकण्याची देखील शिक्षा देता येईल. |
| ०९ | **कुटूंबातील इतर सदस्यांचे संमतीपत्र -** |
| (अ) | अनुकंपा तत्वावर नियुक्ती ही कुटूंबातील एकाच पात्र नातेवाईकास अनुज्ञेय असल्याने कुटूंबातील इतर सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| (आ) | ज्या संस्थान कर्मचा-यांना वैयक्तिक कायद्यानुसार एकापेक्षा जास्त लग्न करण्यास प्रतिबंध नसेल अशा कर्मचा-याच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास, ज्या पत्नीला किंवा तिच्या मुलाला/ मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यायची आहे त्या व्यतिरिक्त अन्य पत्नीचे देखील ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. |
| १० | **अर्ज करण्यासाठी मुदत -** |
| (अ) | अनुकंपा नियुक्तीसाठी दिवंगत संस्थान कर्मचा-यांच्या कुटूंबातील पात्र नातेवाईकाने संस्थान अधिकारी/कर्मचारी दिवंगत झाल्याच्या दिनांकापासून **एक** वर्षाच्या मुदतीत संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे विहीत नमून्यात परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. |
| (आ) | सेवेत असताना दिवंगत संस्थान कर्मचा-यांच्या कुटूंबातील अज्ञान वारसदाराच्या बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झाल्यावर एक वर्षाच्या आत अनुकंपा नियुक्तीसाठी परिपूर्ण अर्ज सादर करणे आवश्यक आहे. |
| (इ) | पात्र वारसदारास विहीत एक वर्षाच्या मुदतीनंतर दोन वर्ष इतक्या कालावधीपर्यंत (मृत्युच्या दिनांकापासुन तीन वर्षापर्यंत) तसेच दिवंगत संस्थान कर्मचा-याच्या अज्ञान वारसदाराच्याबाबतीत तो उमेदवार सज्ञान झाल्यानंतर विहीत एक वर्षानंतर मुदतीनंतर दोन वर्षापर्यंत (संज्ञान झाल्यानंतर तीन वर्षापर्यंत) अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास असा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येत आहे. |
| ई) | जोपर्यंत अनुकंपा नियुक्ती करता आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे उमेदवाराकडून प्राप्त होत नाहीत तोपर्यंत त्याचे नाव प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करता येणार नाही. ज्या दिवशी संपूर्ण कागदपत्रे प्राप्त होतील त्या दिवशीच त्याचे |

| | |
|---|---|
| | नाव प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ट करावे. |
| **११** | **मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देतांना करावयाच्या कार्यवाहीबाबत -** |
| | मागासवर्गीयांसाठी आरक्षित ठेवलेल्या पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देतांना सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक अकंपा / १२१७ / प्र. क्र. १०२ / आठ, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहीत केलेल्या नियमावलीतील तरतूद क्रमांक २० अन्वये कार्यवाही करणेत यावी. |
| **१२** | **अनुकंपा नियुक्तीसाठी वयोमर्यादा** |
| (अ) | किमान वयोमर्यादा - १८ वर्ष |
| (आ) | कमाल वयोमर्यादा - वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षासूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पूर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतिक्षासूचीतून काढून टाकण्यात यावीत. |
| (इ) | उपरोक्त (आ) मध्ये नमूद केलेप्रमाणे,अनुकंपा नियुक्ती पात्र उमेदवारास ४५ वर्षापर्यन्त जरी अनुज्ञेय असली तरी, संबंधीत पात्र / नामनिर्देशीत उमेदवारास या विहित केलेल्या वयोमर्यादेपर्यन्त नियुक्ती न मिळाल्यास, संबंधीत पात्र उमेदवाराने संमती दिल्यास त्यांचे कुंटूंबातील इतर पात्र व सज्ञान व्यक्तीस नामनिर्देशीत करता येईल, परंतु ही संधी संबंधीतास फक्त एकदाच मिळेल आणि त्याचे नांव प्रतिक्षासूचीत अर्ज प्राप्त झालेल्या दिनांकांस समाविष्ट केले जाईल. |
| **१३** | **अनुकंपा नियुक्तीसाठी शैक्षणिक अर्हता** |
| (अ) | पात्र नातेवाईकाची शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादेनुसार त्याला गट क किंवा गट-ड मधील पदावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय राहील. |
| (आ) | संबंधीत पदांसाठी विहित शैक्षणिक पात्रता आणि निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी या नेमणूकीसाठी कटाक्षाने पाळण्यात येतील. |
| (इ) | तथापी दिवंगत संस्थान कर्मचा-याची पत्नी शैक्षणिक पात्रते व्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करत असल्यास तिच्या बाबतीत गट-ड मध्ये नेमणूकीसाठी शैक्षणिक अर्हतेची अट शथील करण्याची अधिकार संबधीत नियुक्ती प्राधिका-याला असतील. |
| **१४** | **गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी टंकलेखन प्रमाणपत्र सादर करण्यास मुदत** |
| (अ) | अनुकंपा तत्वावर लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्त झालेल्या उमेदवारांना विहीत वेगमर्यादेचे टंकलेखन अर्हता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी शासन निर्णय दि.०६.१२.२०१० अन्वये ०६ महिने असलेली मुदत वाढवून ती ०२ वर्ष इतकी करण्यात येत आहे. |
| (आ) | कोणत्याही कारणास्तव दोन वर्षापेक्षा अधिक मुदतवाढ अनुज्ञेय असणार नाही. हा कालावधी संपताच नियुक्ती संपृष्टात आणावी. |
| **१५** | **अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर विहीत मुदतीत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती** |
| | अनुकंपा तत्वावर गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर टंकलेखनाची विहीत वेगमर्यादेची परिक्षा पास होऊ शकले नाहीत म्हणून त्यांच्या सेवा संपृष्टात आणल्या आहेत, अशा उमेदवारांचा गट-ड मधील नियुक्तीसाठी पदांची उपलब्धता विचारात घेऊन नव्याने नियुक्ती देण्याबाबत विचार करण्यात यावा. मात्र अशा रीतीने गट-ड मधील पदावर नियुक्ती स्विकारल्यानंतर कुठल्याही परिस्थितीत गट-क मधील पदासाठी त्याचा विचार करता येणार नाही, ही बाब त्यांना नियुक्तीपूर्वी स्पष्ट करावी. |
| **१६** | **गट-क मधील लिपीक-टंकलेखक पदावर अनुकंपा नियुक्तीसाठी संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करणे** |
| (अ) | **अ**)D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत 'C.C.C' किंवा 'O' स्तर किंवा 'A' किंवा'B' किंवा 'C' स्तर पैकी कोणतेही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा,<br>**ब**)परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र |
| (आ) | संगणक ज्ञानाची वरील किमान अर्हता अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या वेळी धारण करीत नसलेल्याउमेदवारांना सदर अर्हता गट-क मधील पदावर (वाहन चालक वगळून) अनुकंपा तत्वावर नियुक्ती झाल्याच्यादिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. या दोन वर्षाच्या कालावधीत संबंधितांनी विहीत संगणक अर्हता प्राप्त केल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती अधिका-यांना सादर करावे, अन्यथा हा कालावधी संपताच उमेदवारांची अनुकंपा तत्वावरील नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल, अशी स्पष्ट तरतूद |

| | |
|---|---|
| | उमेदवारांच्या नियुक्तीच्या देशात नियुक्ती प्राधिका-यांनी नमूद करावी. |
| **१७** | **पद उपलब्धते अभावी गट-क मधील पदाऐवजी गट-ड मधील पदावर नियुक्ती देताना अनुसरावयाची कार्यपध्दती** |
| | गट-क मधील पदांवर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र असणा-या कर्मचा-याला पदाच्या उपलब्धतेअभावी गट-ड मधील पदांवर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच गट-क मधील पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी. अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणा-या पदांवरील समजण्यात यावी. मात्र गट-ड मधील पदावर अनुकंपा योजनेन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा, तसे करण्यात आले तरच गट-क मधील पदावर नियुक्ती देता येईल. |
| **१८** | **अनुकंपा नियुक्तीकरीता ठेवण्यात येणारी प्रतीक्षासूची वेबसाईटवर (संकेतस्थळावर) प्रसिध्द करण्याबाबत -** |
| | अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीक्षासूचीवर असलेल्या उमेदवारांची नावे व इतर माहिती कार्यालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी. |
| **१९** | **अनुकंपा नियुक्तीसाठी विहीत पदांची मर्यादा -** |
| | अनुकंपा नियुक्तीसाठी गट-क आणि गट-ड मध्ये प्रती वर्षी रिक्त होणा-या पदांच्या २०% पदे ही अनुकंपा नियुक्तीने भरण्यात यावी. |
| **२०** | **अनुकंपा तत्वावरील प्रतीक्षासूचीवरीलउमेदवाराचे निधन झाल्यास त्याऐवजी कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचा समावेश अनुकंपा नियुक्तीच्या प्रतीक्षासूचीत करणे -** |
| | कर्मचा-याच्या मृत्यूनंतर त्याच्या पात्र कुटूंबियांचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतिक्षासूचीमध्ये समाविष्ठ केलेनंतर त्याचे निधन झाल्यास प्रतीक्षासूचीतील उमेदवाराऐवजी त्याच्या कुटूंबातील अन्य पात्र वारसदाराची नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकाला घेतले जाईल. मात्र नव्या उमेदवाराचे वय सदर दिनांकाला १८ वर्षापेक्षा जास्त असावे. जर नव्या उमेदवाराचे वय मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकास १८ वर्षापेक्षा कमी असेल, नव्या उमेदवाराचे नाव त्याला ज्या दिवशी १८ वर्ष पूर्ण होतील त्या दिनांकास घेण्यात यावे. |
| **२१** | **अनुकंपा नियुक्ती हा कर्मचा-यांच्या कुटूंबाचा "वारसा हक्क"नाही -** |
| | मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या विविध निर्णयानुसार अनुकंपा तत्वावरील नियुक्ती हा कर्मचा-यांच्या कुटूंबाचा "वारसा हक्क" होत नाही. तसेच विशिष्ट कालावधी उलटून गेल्यावर अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय होत नाही. |
| **२२** | **अनुकंपा नियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती शिथील करण्याबाबत -** |
| | अनुकंपा नियुक्तीसाठी संस्थान कर्मचा-यांच्या विधवांना केवळ गट-ड मधील पदावर नियुक्ती करावयाची असल्यास शैक्षणिक अर्हता शिथील करण्याबाबतची तरतूद राहील.<br>अनुकंपा नियुक्तीबाबतचे प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्यांची संपूर्ण शहानिशा संबंधित कार्यालयांने करुन जर अटी व शर्तींची पूर्तता होत असेल तरच तो प्रस्ताव विचारात घ्यावा अन्यथा ते प्रस्ताव कार्यालयाने त्यांचे स्तरावर उचित उत्तर देऊन निकालात काढावेत.त्याकरीता प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्याची आवश्यकता नाही. |

उपरोक्त प्रमाणे अनुकंपा नियुक्ती विषयक संस्थान व्यवस्थापनासाठी स्वतंत्र तरतुदी लागु करावयाच्या झाल्यास, मा. शासन निर्णय क्रमांक, अंकपा १२१७/प्र.क्र.१०२/आठ/ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक - २१ सप्टेंबर, २०१७ अन्वये, यापुर्वी संस्थान व्यवस्थापनासाठी लागु करणे आलेल्या तरतुदीं संदर्भातील मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ निरस्त करावा लागेल.

तसेच, दि.२१ सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयात अनुकंपा धोरण स्वतंत्ररित्या राबविणेस प्रशासकीय संस्था (जिल्हा परिषदा/नगरपालिका/महामंडळे/प्राधिकरणे/व्यापारी उपक्रम व इतर तत्सम आस्थापना) त्यांचे स्तरावर स्वतंत्र आहेत, असे नमूद केलेले आहे.

त्यास अनुसरुन संस्थान व्यवस्थापनामार्फत अनुकंपा धोरण राबविणेसाठी मा. शासनाचे अनुकंपा तरतुदींचा आधार घेऊन, संस्थान प्रशासनामार्फत स्वतंत्र नियमावली तयार करणेत आली आहे. सदर नियमावली मा. शासनाचे अनुकंपा विषयक तरतुदीं विचारात घेऊन तयार करणेत आली असल्याने, सदर नियमावालीस मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी सादर करता येईल.

सबब, मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२०९ अनुसरुन, अनुकंपा नियुक्ती संदर्भात (मा.शासनाचे अनुकंपा धोरणानुसार/त्यांचे धर्तीवर) तयार करणेत आलेली उपरोक्त नियमावली स्वतंत्रपणे संस्थान व्यवस्थापनासाठी लागु करणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३८८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमध्ये अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेसंबधी शासनाचे अनुकंपा धोरणानुसार/त्यांचे धर्तीवर तयार करण्यात आलेल्या उपरोक्त नियमावलीस मान्यता देण्यात आली. तसेच सदरची नियमावली शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावी,असे ठरले.**

**तसेच प्रस्तुत प्रकरणी घेण्यात आलेला मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०९.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ "शासनाचे अनुकंपा कारणास्तव नेमणूक देणेबाबतच्या नियमावलीतील, नियम १ ते २३ अनुसार संस्थान सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट-क व गट-ड संवर्गामधील संस्थान कर्मचा-यांच्या पाल्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच संस्थान सेवेतील गट 'अ' व 'ब' या संवर्गातील कर्मचा-यांच्या पात्र कुटूंबियांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देणेबाबत मार्गदर्शन घेणेकामी शासनाचे विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत यावा." हा निर्णय रद्द करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०७** **सन २०१९ दिपावली निमित्त संस्थान कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** (अ) अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी जा.क्र. श्रीसासंकसं/ ३७/ २०१९, दिनांक १३ जुलै,२०१९ रोजीचे विनंती पत्राने खालीलप्रमाणे विनंती केली आहे -

" .. .. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दरवर्षी संस्थानमधील कार्यरत कायम व कंत्राटी कर्मचा-यांना दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देण्यात येते. दरवर्षी संस्थान कायम व कंत्राटी कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान मिळणेसाठी कर्मचारी संघटनेकडुन संस्थान प्रशासनाकडे मागणी करण्यात येते. मागील दोन ते तीन वर्षापासून पडणारा दुष्काळ, तसेच वाढलेली महागाई लक्षात घेता संस्थानमधील कायम व कंत्राटी कर्मचा-यांची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे. दिपावलीचा कालावधी जवळ आलेला असून संस्थानमधील कायम व कंत्राटी कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानाची रक्कम दिपावलीपुर्वी दिल्यास संस्थान कर्मचा-यांना त्यांचे कुंटबासमवेत आनंदाने दिपावली साजरी करता येईल.

तरी आपणास नम्र विनंती आहे की, संस्थानमधील कायम व कंत्राटी कर्मचा-यांना दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदानाची रक्कम आदा करणेसाठी आपणाकडुन कार्यवाही होवून दिपावलीपुर्वी संस्थानमधील कायम व कंत्राटी कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता द्यावी ही नम्र व कळकळीची विनंती आहे."

उपरोक्त आशयाप्रमाणेच कार्याध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी जा. क्र. १४५ / दिनांक १५ जुलै, २०१९ अन्वये संस्थानचे कायम व कंत्राटी कर्मचा-यांना दोन महिन्याचे पगाराइतके सानुग्रह अनुदान मिळावे, म्हणून विनंती केलेली आहे.

(ब) उपरोक्त संघटनांच्या मागणीस अनुसरुन विवेचन असे की,सन १९७७ पासून तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळ/समितीचे निर्णयानुसार तसेच संस्थानचे व्यवस्थापन पहाणारे मा.कोर्ट रिसीव्हर यांचे अधिकारात व मा.न्यायालयाचे निर्णयानुसार,संस्थान कर्मचा-यांना दिपावली उत्सवानिमित्त दरवर्षी दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देणेत येत आहे. त्यानंतर सन १९८४ मध्ये मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांनी संस्थान व्यवस्थापनासाठी स्किम तयार करुन, मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखाली, तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळानेही संस्थानचे व्यवस्थापन पहात असतांना दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

दरम्यानचे कालावधीत, माहे ऑगस्ट, २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारीत केला आहे. या अधिनियमात संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत प्रामुख्याने खालील तरतुदी करणेत आलेल्याआहेत -

कलम १५-मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) समितीच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

कलम १६-सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखालील "नियत दिवसाच्या लगतपुर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तीला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे

मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.

कलम १७ - समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील पोटकलम (२) (घ) समितीच्या सदस्यांना व मुख्य कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

तसेच या व्यतिरिक्त कलम १५ चे तरतुदीत उल्लेख केलेल्या व्यवस्थापन निधीबाबत, या अधिनियमात कलम २२ - व्यवस्थापन निधी व त्याचा विनियोग या शीर्षाखालील तरतुदीत पोटकलम (३) (ख) मध्ये समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने तसेच महाराष्ट्र शासनाचे मान्यतेने दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीतात्यांच्या प्रती वर्षी माहे ऑक्टोबर ते माहे सप्टेंबर याकालावधीतील एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% इतके सानुग्रह अनुदान देण्यात येत आहे.

मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन पत्र क्र. सासंवि-२०११/५३८/ प्र.क्र.६९ / पुर्नबांधणी-१२/का.१६, दिनांक २३ जानेवारी,२०१३ चे पत्रान्वये, शासनाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार शासकीय कर्मचा-यांना बोनस देण्याचे बंद असतांना संस्थानच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांना शासनाची मान्यता न घेता परस्पर बोनस आदा करणेत आला आहे याबाबत खुलासा करणेत यावा, असे कळविलेले होते.

तथापी, तदनंतर मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक - सासंवि १०१६/१४३२/प्र.क्र.१८२/कार्या-१६, दि. २९ ऑक्टोबर, २०१६, शासन निर्णय क्र. सासंवि-१०१७/ १५३९/प्र.क्र.१६६/कार्या-१६, दि.०५ ऑक्टोबर,२०१७, शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१८/ १९६३/ प्र.क्र.३७/कार्या-१६, दि. २९ मे, २०१८ तसेच आता शासन निर्णय क्रमांक सासंवि-१०१८/१४८१/ प्र.क्र.१६६/ का.१६, दि.२२ ऑक्टोबर, २०१८ अन्वये अनुक्रमे सन २०१६, सन २०१७, सन २०१२ ते २०१५ व सन २०१८ या कालावधीतील संस्थान कर्मचा-यांना एकुण वार्षिक वेतनाच्या ८.३३ % इतके सानुग्रहअनुदानवाटपास मान्यता दिलेली आहे.

सन २०१८ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२ऑगष्ट,२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५१३ नुसार व मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि.२२ ऑक्टोबर,२०१८ चे शासन निर्णयानुसार व मान्यतेनुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सेवेतील पात्र कायम (स्थायी) व कंत्राटी (अस्थायी) कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते दि.३० सप्टेंबर,२०१८ या कालावधीत मिळालेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३% इतके सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले होते. याकामी लेखाशाखा विभागाकडील दिनांक ११जुलै, २०१९ रोजीचे अहवालानुसार,एकूण रुपये८,५७,४६,४५३/- मात्र इतकी रक्कम पात्र कायम (स्थायी) व अस्थायी (कंत्राटी) संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानापोटी आदा करण्यात आलेली आहे.

(क) उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रचलित पध्दतीप्रमाणे श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनांच्या मागणीनुसार, सन २०१९ चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदानाकरीता खाली नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम), अस्थायी (कंत्राटी), एकत्रित मानधन / वेतनावरील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत प्रस्तावीत करणेत येत आहे.

(०१) सन-२०१९ दिपावली उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदानासाठी प्रचलित नियमाप्रमाणे पात्र ठरणा-या स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) संस्थान कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१८ ते दि. ३० सप्टेंबर, २०१९ अखेर या कालावधीत त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने व लेखाशाखेकडील दिनांक ११ जुलै,२०१९ रोजीचे अहवालानुसार अंदाजे रक्कम रुपये १२,१०,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये बारा कोटी दहा लाख मात्र) इतका खर्च येणार आहे.

(०२) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीत संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम) तसेच मानधनावर सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले अधिकारी / कर्मचारी, कंत्राटी सल्लागार / मोजणीदार, डीटीपी ऑपरेटर, ग्रंथपाल, अर्धवेळ सहाय्यक शिक्षक यांना दिलेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या / पगाराच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम आदा करता येईल.

(०३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीत ज्या कर्मचा-यांवर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन, सेवेतून कमी केलेले आहे.तसेच ज्या कर्मचा-यांनी या कालावधीत संस्थान सेवेचा राजीनामा दिला आहे,अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

(०४) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीत संस्थानला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत कामास असलेल्या कंत्राटी कुशल, अकुशल व एकत्रित वेतन / मानधनावरील तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाचे ८.३३ टक्के दराने होणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधीत कंत्राटी कामगार यांना कंत्राटदारामार्फत अदा करता येईल.

(ड) उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे, सन २०१९चे दिपावली उत्सवासाठी अट शर्त क्र.०२ व ०४ नुसार पात्र होणा-या संस्थानचे स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१८ ते ३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीत त्यांच्या एकूण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने अंदाजे रक्कम रुपये १२,१०,००,०००/- मात्र (अक्षरी रुपये बारा कोटी दहा लाख मात्र) इतके सानुग्रह अनुदान वाटप/ आदा करणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने,मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी पाठविता येईल, त्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.३८९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, दिपावली सन-२०१९ करीता उपरोक्त प्रस्तावातील अट-शर्त क्र.०२ व ०४ नुसार पात्र होणाऱ्या संस्थानचे स्थायी (कायम) व अस्थायी (कंत्राटी) कर्मचाऱ्यांना दि.०१ आक्टोंबर.२०१८ ते दि.३० सप्टेंबर,२०१९ या कालावधीतील त्यांच्या एकुण वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली, तत्पुर्वी सदरचा प्रस्ताव मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन यांचेकडे मान्यतेसाठी सादर करणेत यावा, त्यांचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०८ श्री साई प्रसादालय विभागाचे चार्ज देवाण-घेवाण मधील कमी असलेल्या वस्तु / साहित्यांची श्री.विजय भिला सिनकर, तत्कालीन प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय विभाग यांचे पगारातून वसूली करणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईप्रसादालय विभागाचे उपरोक्त संदर्भिय पत्र सामान्य प्रशासन विभागास प्राप्त झाले असून त्यात त्यांनी '' श्री.विजय सिनकर प्र.अधिक्षक प्रसादालय यांचेकडुन श्री सुदाम शेळके प्र.अधिक्षक, श्री. रामराव शेळके प्र.अधिक्षक, प्रसादालय यांना चार्ज देवाण-घेवाणाचे वेळी खालील परिशिष्ट अ व ब मध्ये नमुद केलेप्रमाणे वस्तू/ साहीत्य कमी आढळून आलेले आहे.

तथापी कमी असलेल्या किरकोळ व डेडस्टॉक वस्तू/साहित्यांची श्री सिनकर, प्र.अधिक्षक यांचे व्यतिरिक्त श्री साईप्रसादालयाचे तत्कालीन प्र.अधिक्षक श्री सुदाम शेळके व डेडस्टॉक संबंधित काम सांभाळणारे लिपीक यांनी जवळील असलेल्या लाडू प्रसाद निर्मिती विभागात व इतरत्र शोध घेऊन/खात्री करुन तेथे सापडलेल्या वस्तू/साहित्य यादीतून कमी करुन व उर्वरीत कमी असलेल्या वस्तू/साहीत्यांची घसारा किंमत काढून खालीलप्रमाणे यादी तयार करण्यात आलेली असून श्री.सिनकर यांनी दि.३१/०५/२०१५ अखेर डेडस्टॉक चार्ज देतेवेळी खालील यादीत दर्शविल्याप्रमाणे डेडस्टॉक व किरकोळ साहीत्य कमी असलेबाबत संमतीदर्शक स्वाक्षरी केलेली आहे.

अ) डेडस्टॉक नुसार कमी असलेल्या किरकोळ वस्तूंची यादी

| अ.नं. | वस्तूंचे कोड नंबर | वस्तूंचे नाव वर्णन | रजिस्टर नुसार प्रत्यक्ष संख्या | मुळ किंमत | कमी असलेल्या वस्तूंची संख्या | कमी असलेल्या वस्तूंची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | SUN/P159 | S S Plates | १०० | ४५००.०० | १९ | ८५५.०० |
| ०२ | SUN/P126 | Steel Kawache | ३३ | १३५३०.०० | १७ | ६९७०.०० |
| ०३ | SUN/P058 | S S Chimta Big | ११ | ७९६.०० | ०३ | २१७.०९ |
| ०४ | SUN/P059 | S S Chimta Small | १२ | ८२७.०० | ०२ | १३७.८३ |
| ०५ | SUN/P061 | Plastic Creat | २० | ३२००.०० | २० | ३२००.०० |
| ०६ | SUN/P141 | Plastic Creat | २०० | ५४६००.०० | २०० | ५४६००.०० |
| ०७ | SUN/P099 | Altra Slim Board | ६७ | १९५९७.५० | ११ | ३२१७.५० |
| | | | | | एकुण | ६९,१९७.०० |

| | |
|---|---|
| लाडू विभागाकडे वर्ग करणेत आलेले कॅरेटची किंमत | -५७,८००.०० |
| कमी असलेल्या वस्तूंची एकुण किंमत | ११,३९७.४२ |

आ) डेडस्टॉक नुसार कमी असलेल्या वस्तूंची यादी

| अ.नं. | वस्तूंचे कोड नंबर | वस्तूंचे नाव वर्णन | रजिस्टर नुसार प्रत्यक्ष संख्या | मुळ किंमत | कमी असलेल्या वस्तूंची संख्या | कमी असलेल्या वस्तूंची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | UTE/1094 | Steel Wati | ४००० | ९०१९२.०० | ४३१ | ९७१८.१८ |
| ०२ | UTE/1097 | S S Tate | १००० | ३०४४००.०० | १९ | ५७८३.६० |
| ०३ | UTE/1092 | S S Tate 7 Kappe | २४९७५ | ५२३१४०४.३६ | ३१ | ६४९३.४३ |
| ०४ | UTE/1093 | S S Glass | २४५०० | १०३१८९२.०० | ११५० | ४८४३५.७४ |
| ०५ | SUN/132 | S S Tipale | ४८ | १८२४०.०० | ०६ | २२८०.०० |
| ०६ | UTE/1096 | S S Tray | १०० | ६४९०५.०० | २७ | १७५२४.३५ |
| ०७ | FUR/814 | S S Seating Stool | १४ | ३१५००.०० | ०५ | ११२५०.०० |
| ०८ | FUR/864 | Wooden Planter Box | १३ | २३९४८.६० | ११ | २०२६४.२० |
| ०९ | FUR/867 | Vertical Birds for Windows(Curtain) | १ सेट (३१) | १२८१२२.६८ | ०४ | १६५३१.९५ |
| १० | MCH/827 | Nirmala Make Priclinre Machine | ०१ | १८९००.०० | ०१ | १८९००.०० |
| ११ | FUR/848 | Office Revolving Chairs | ०८ | ३६०००.०० | ०३ | १३५००.०० |
| १२ | UTE/1048 | S S Square Daba | ०६ | १६६६५.९६ | ०३ | ८३३२.९८ |
| एकुण | | | | | | १७९०१४.४३ |
| घसारा वजा जाता रक्कम | | | | | | ३१२१६.०० |
| परिशिष्ट अ व ब ११३९७.४२ + ३१२१६.०० एकुण वसूली पुर्णाकीत रक्कम | | | | | | ४२६१३.०० |

उपरोक्त प्रमाणे कमी असलेल्या डेडस्टॉक व किरकोळ वस्तू/साहीत्यांची यादी यापुर्वी प्रशासन शाखा व अंतर्गत लेखापरीक्षण विभागाकडे सादर करण्यात आलेली आहे. आता दि.०७.०१.२०१८ रोजी साईप्रसादालयाकडील चार्ज देवाण-घेवाण मधील कमी असलेल्या वस्तू/साहीत्यांची श्री.सिनकर प्र.अधिक्षक यांचे पगारातून वसुली करणेबाबतची टिपणी प्रशासकीय मान्यतेकरीता सादर करण्यात आलेली असून त्यावर मा.उपजिल्हाधिकारी श्री.निकम साहेब यांनी प्रथम तफावतीबाबत प्रसादालय विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे अहवाल दयावा त्यानंतर पुढील कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाने करावी असे निर्देश/आदेश दिलेले आहे.'' असे नमूद केलेले आहे.

तरी, याबाबत श्री.विजय भिला सिनकर, प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान व श्री.विष्णु दगडु थोरात, प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय यांना अनुक्रमे संदर्भ क्रं.०२ व ०३ अन्वये पत्र देऊन, उपरोक्त आढळून न आलेले साहित्याबाबत संस्थानचे इतर विभागामध्ये दिलेले नसल्याची खात्री करणे, आढळुन न आलेल्या साहित्याचा पुन्हा गांर्भियाने शोध घेणे, डेडस्टॉकचे यादी मधील नोंदीमध्ये त्रुटी नसल्याबाबत खात्री करणे, सदरचे साहित्यापैकी अभिलेख कक्षामार्फत निरुपयोगी साहित्य म्हणून विक्री करण्यात करुन त्याबाबतच्या नोंदी कमी करण्याचे राहून गेल्याची खात्री करणे इ. बाबींची खात्री करुन घेणेबाबत तसेच यापुर्वी प्रसादालयामध्ये डेडस्टॉकचे कामकाज पहाणारे सर्व संबंधित लिपीक, अधिक्षक यांचेकडून सदरचे साहित्यांबाबत माहिती घेणेबाबत कळविणेत आले होते.

श्री.विजय भिला सिनकर, प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान यांना संदर्भ क्रं.०२ चे पत्र देवुन देखील त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे दिलेले नाही.

त्यास अनुसरुन प्र.अधिक्षक,श्री साईप्रसादालय यांनी संदर्भ क्रं.०४ चे पत्रान्वये उपरोक्त वसुली यादीतील SUN/P126 स्टे.स्टील कवचे एकुण १७ नग कवच्यापैकी ०९ नग कवचे सापडलेले असुन त्यांची किंमत रु.३,६९०/- कमी करुन नव्याने तयार केलेली वसुली यादी पाठविलेली आहे.

[२] संदर्भ ०५ रोजीचे पत्र प्र.लेखाधिकारी यांना पाठविणेत येवुन त्यांना दि.३१.०३.२०१५ अखेर वरील साहित्यांचा घसारा किंमत कळवावी असे कळविणेत आले होते.

त्यानुसार लेखाधिकारी, लेखाशाखा यांनी कमी असलेल्या साहित्याचे घसारा किंमतीबाबत संदर्भ क्रं.०६ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दिलेले आहे. त्यात त्यांनी," संदर्भीय पत्रान्वये आपण मागणी केलेप्रमाणे अचल मालमत्तेच्या (Fixed Asset) व किरकोळ साहित्याची घसारा किंमत काढून मिळणेबाबत मागणी करण्यात आली होती.

त्यानुसार अचल मालमत्तेच्या (Fixed Asset) व किरकोळ साहित्याचा सतत वापर असलेने त्यांचे आयुष्यमान साधारण १ ते २ वर्षे किंवा त्यापेक्षा कमी जास्त असु शकते.त्यामुळे त्यांना घसारा किंमत नसते.

| अ.नं. | वस्तूंचे कोड नंबर | वस्तूंचे नाव वर्णन | कमी असलेल्या वस्तूंची संख्या | दि.३१.०३.२०१९ घसारा किंमत |
|---|---|---|---|---|
| 01. | UTE/1094 | Steel Wati | 431 | 1531.42 |
| 02. | UTE/1097 | S S Tate | 19 | 900.68 |
| 03. | UTE/1092 | S S Tate 7 Kappe | 31 | 1011.23 |
| 04. | UTE/1093 | S S Glass | 1150 | 7542.94 |
| 05. | SUN/132 | S S Tipale | 06 | किरकोळ साहित्य घसारा किंमत नाही. |
| 06. | UTE/1096 | S S Tray | 27 | 2729.04 |
| 07. | FUR/814 | S S Seating Stool | 05 | 3606.49 |
| 08. | FUR/864 | Wooden Planter Box | 11 | 9784.68 |
| 09. | **FUR/867** | **Vertical Birds for Windows(Curtain)** | **01** | **45703.95** याबाबत स्वतंत्र मत नमुद केले आहे. |
| 10. | MCH/827 | Nirmala Make Priclinre Machine | 01 | 449.01 |
| 11. | FUR/848 | Office Revolving Chairs | 03 | 5091.51 |
| 12. | UTE/1048 | S S Square Daba | 03 | 625.68 |

उपरोक्त तक्त्यामध्ये आपण अ.नं.०९ (FUR/867) ची संख्या ०४ नग कळविणेत आली होती.परंतु संगणकात दि.३१.०३.२०१५ अखेर प्रत्यक्षात ०१ नगच दिसतो.त्यामुळे एका नगाचा घसारा किंमत दिलेली आहे असे नमुद आहे.

प्रत्यक्षात मात्र श्री साई प्रसादालय विभागाने वेळोवेळी पत्रान्वये कळविलेले आहे कि FUR/867 Vertical Birds for Windows(Curtain) 01 सेट (31) किंमत रुपये.१,२८,१२२.६८ कळविलेली आहे.एका सेटमध्ये ३१ नग असुन एका नगाची किंमत रु.४,१३२.९८ असुन त्यांनी कळविलेले ०४ नगाची किंमत रु.१६,५३१.९५ इतकी होत आहे. संपुर्ण एक सेटची घसारा किंमत रु.४५,७०३.९५ दिलेली असुन एका नगाची घसारा किंमत रु.१,४७४.३२ इतकी असुन एकुण ०४ नगाची घसारा किंमत रु.५,८९७.२८ इतकी होत आहे.

लेखाशाखेकडुन दि.३१.०३.२०१५ अखेर श्री साई प्रसादालय विभागाकडे कमी असलेल्या साहित्याची घसारा किंमत रु.३९,१५२.०१ (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस हजार एकशे बावण्ण) असुन सदरची रक्कम समान हप्त्यात मासिक पगारातुन वसुल करता येईल.

तदनंतर श्री.सिनकर यांनी दि.२१.०३.२०१९ रोजीचा विनंती अर्ज केलेला असुन त्यात त्यांनी कागदत्रांची मागणी केलेली होती.

[३] श्री.सिनकर यांना जा.नं.एसएसएस/वशी-शिस्त/३८०२/२०१९ दि.२९.०३.२०१९ रोजीचे पत्रासोबत कागदपत्रे देण्यात आलेली आहेत. त्यास अनुसरुन श्री.सिनकर यांनी दि.२१.०४.२०१९ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे.त्यात त्यांनी,वरील प्राप्त दोन्हीही संदर्भांकित पत्रास अनुसरुन खालीलप्रमाणे खुलासा दिला आहे.

**अ** ) दि.२४.०४.२०१४ चे बदली आदेशाने माझी बदली लेखाशाखेत प्रसादालय विभागाकडे झाली असता दि.२५.०४.२०१४ रोजी कामावर हजर झालो आहे. त्यावेळी चार्ज देणार श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर (तत्कालीन प्रशासकिय अधिकारी) यांचेकडुन प्रत्येक्ष कामकाजाचा चार्ज घेतला.सदर चार्ज देवाण-घेवाण पत्रावर दोघांचे स्वाक्षरी खाली (चार्ज देवाण घेवाण यादी नंतर सादर करणेत येईल) असे स्वहस्ताक्षरात मी स्वंत: नोंद केली आहे व फक्त एक पानी चार्ज देवाण-घेवाण पत्र प्रशासन विभागास सादर केले आहे.

तदनंतर मला प्रत्येक्षात डेडस्टॉक मोजुन देण्याची जबाबदारी, श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर यांची होती, याबाबत मी त्यांना वेळोवेळी समक्ष भेट घेतली असता त्यांनी सांगीतले की, तुम्ही डेडस्टॉक यादीप्रमाणे साहित्य चेक करुन घ्या व काही कमी असल्यास तसा निर्णय घेऊ.

त्यानंतर दि.०९.०३.२०१५ चे बदली आदेशान्वये माझी प्रसादालय विभागाकडुन अभिलेख कक्षाकडे बदली झाले नंतर मी प्रसादालयातील वरिष्ठ लिपीक श्री.सुदाम एकनाथ शेळके यांचेकडे चार्ज देणेबाबत आदेशात नमुद असल्याने दि.१९.०४.२०१५ पासून दि.२१.०५.२०१५ अखेर पर्यंत संपुर्ण डेडस्टॉकची दि.३१.०३.२०१५ अखेर लेखाशाखेकडील यादी नुसार मी स्वंत: श्री.शेळके व प्रसादालय विभागातील लिपीक श्री.काटकर तसेच अंतर्गत लेखा परिक्षण विभागाचे श्री.कुसारे असे चौघांनी मिळुन डेडस्टॉक यादीप्रमाणे साहित्य चेक करुन घेतले आहे व तसा अहवाल दि.२३.०५.२०१५ रोजी प्रशासन शाखेकडे सादर केला आहे.त्यावेळेस देखील प्रत्येक्षात मोजदाद झालेल्या वस्तु बाबत परिस्थितीचे अवलोकन केले होते.

**ब)** आस्थापना विभागाकडील दि.०९.०१.२०१९ रोजीचे पत्र प्राप्त झाले असता दि.२१.०३.२०१९ रोजीचे अर्जाने आस्थापना विभागाकडुन प्रसादालया विभागाकडील डेडस्टॉक वस्तु कमी जास्त असलेबाबत सादर केलेल्या अहवालाच्या छायांकित प्रत मिळणेबाबत मागणी केली त्यानुसार दि.२९.०३.२०१९ चे पत्रासोबत खालीलप्रमाणे ०५ पेपर प्राप्त झाले आहे.

१.दि.०९.०१.२०१९ रोजीचे मला प्राप्त झालेल्या पत्राचीच सारखी प्रत श्री.विष्णु दगडू थोरात, प्र.अधिक्षक,प्रसादालय यांना दिलेबाबतची झेरॉक्स प्रत.

२.दि.१४.०१.२०१९ रोजी श्री.औटी, प्रशासकिय अधिकारी यांना प्रसादालयाकडील वरिष्ठ लिपीक श्री.संजय कुंभार व लिपीक टंकलेखक, श्री.कारभारी काटकर यांना एकाच आशयाचा अहवाल सादर करणेबाबत देण्यात आलेल्या पत्राच्या सत्यप्रती.

३.दि.२४.०१.२०१९ रोजी श्री.संजय कुंभार व श्री.काटकर यांनी प्रसादालय अधिक्षक यांना दिलेले सयुक्तींक पत्र.त्या पत्रातील दोन ओळींबाबत उल्लेख करीत आहे.त्यांनी म्हटले आहे की आम्ही ज्यावेळी डेडस्टॉक वस्तुची तपासणी केली त्यापैकी एकाही वेळी मोजणीसाठी श्री.सिनकर उपस्थित राहिलेले नाही हे त्यांचे चुकीचे असुन त्यांनी मला प्रत्येक्ष मोजणीसाठी समक्ष बोलाविण्याचा प्रश्नच येत नाही. कारण मी श्री.सुदाम शेळके यांना दि.२३.०५.२०१५ रोजी प्रत्यक्ष कमी व जास्त असलेल्या वस्तु व साहित्यांची मोजदाद करुन दिलेली आहे.

**क)** वरील प्रकाराबाबत प्रसादालय विभागाने ज्या टिपण्या व वसुलीबाबत मंजुर करुन घेतल्या आहेत त्यांच्या सत्यप्रती मला मिळणे आवश्यक होते. परंतु त्या देण्यात आल्या नाहीत.कारण त्या मंजुर काळता प्रसादालय विभागाचा चार्ज देणारे श्री.गोंदकर हे प्रशासकिय अधिकारी म्हणुन कर्तव्यावर होते व अलीकडे मे २०१८ मध्ये ते संस्थान सेवेतुन सेवा निवृत्त झाले आहेत. ते कर्तव्यावर असतांना प्रसादालय विभागाकडील सर्व नोटस् मान्यतेसाठी त्यांच्या मार्फत पुढे पाठविल्या जात होत्या व सदर वसुली प्रकाराबाबत त्यांनी मला समक्ष वसुली टिपणी दाखविली होती. त्यावेळेस ते स्वंत: म्हटले होते यातील रु.३५,०००/- मी भरतो व उर्वरित रक्कम आपण भरा असे त्यांनी सांगीतले होते.

करीता, सदर मंजुर वसुली प्रकरण प्रसादालय विभागाकडुन कार्यवाहीस्तव आस्थापना विभागाकडे सादर झाले असते तर कदाचित श्री.गोंदकर यांचेकडे मला सदर बाबत प्रत्यक्ष अथवा लेखी कळवून पाठपुरावा करता आला असता परंतु तसे घडुन आल्याचे दिसून आले नाही.

मला वसूली बाबत पत्र प्राप्त झालेनंतर श्री.गोंदकर सेवा निवृत्ती प्रशासकिय अधिकारी यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क केला असता या प्रकरणाशी माझा काहीही संबध नाही असे उत्तर त्यांनी दिले आहे.

ड) स्पष्ट खुलासा- (श्री.सिनकर)

१. प्रसादालय विभागाकडुन डेडस्टॉक संदर्भातील मंजुर टिपण्या पुढील कारवाईसाठी आस्थापना विभागाकडे उशिराने सादर झाल्या आहेत. म्हणजेच श्री.गोंदकर यांचे सेवा निवृत्तीनंतर जवळपास ६ ते ७ महिने उशिराने सादर केल्याचे दिसुन येत आहे. कारण सादर टिपण्या वेळेत आस्थापना विभागाकडे सादर केल्या असत्या तर श्री.गोंदकर यांचेकडुन सेवा निवृत्ती अगोदर प्रशासनाकडे मला माहिती सादर करता आली असती व ख-या गोष्टीस न्याय मिळाला असता.परंतु जाणीवपुर्वक प्रसादालय विभागाकडुन उशिराने कारवाहीस्तव प्रकरण प्रशासन विभागाकडे पाठविणेत आल्याचे दिसून येत आहे असे माझे मत आहे.

२. मी प्रसादालयात चार्ज घेतला असतांना सदर विभागात डेडस्टॉक कामकाज बघणेकामी स्वंतंत्र लिपीक नव्हता व ज्यावेळेस प्रत्येक्ष मोजदाद करुन दिली त्यावेळेस तेथील काही स्टाफने सांगीतले की, साहेब नविन

प्रसादालय सन २००९ पासुन जसे सुरु झाले तसा आज पर्यंत प्रत्यक्ष उपलब्ध असलेल्या स्टॉकची मोजदाद झालेली नाही जी तुम्ही स्वत: उभं राहुन करुन घेत आहांत.

माझा साईबाबांवर पुर्ण विश्वास असुन मी १९८६ पासून आजपर्यंत पुर्ण तनमनधनाने सेवा पार पाडत आहे.याबाबत आपण पर्सनल फाईल बघावी असे नम्र मत आहे.

तरी वरील प्रकाराचे अवलोकन होऊन आपण या बाबतीत योग्य न्याय द्याल अशी अपेक्षा करतो, कारण साईबाबांकडे न्याय मागण्यासाठी साईभक्त येत असतात त्याअनुषंगाने आपण योग्य न्याय द्याल ही नम्र विनंती.” असे म्हटलेले आहे.

[४] श्री.विजय भिला सिनकर,तत्कालीन प्र.अधिक्षक,श्री साई प्रसादालय यांना संदर्भ क्रं.०२ अन्वये एक महिन्याचे कालावधीतही उपरोक्त पैकी जे साहित्य उपलब्ध होणार नाही. त्या कमी असलेल्या वस्तुंची घसारा किंमत वजा जाता नव्याने वसूलीची किंमत सामान्य प्रशासन विभागास कळविणेबाबत, प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय विभाग यांना पत्र देण्यात आले होते. लेखाशाखेकडुन दि.३१.०३.२०१५ अखेर श्री साई प्रसादालयाकडे कमी असलेले साहित्याची घसारा किंमत काढुन दिले बाबत पत्र दिलेले आहे. त्यास अनुसरुन श्री.सिनकर यांचेकडुन श्री साई प्रसादालय विभागाकडे कमी असलेल्या साहित्याची घसारा किंमत रु.३९,१५२.०१ (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस हजार एकशे बावण्ण) इतकी होत आहे.

सदरचे प्रकरण हे सन २००५ पासूनचे आहे. त्यामुळे सन २०१४ ते सन २०१८ या कालावधीत प्रसादालय विभागाचे प्रमुख खालील अधिकारी/कर्मचारी यांनी कामकाज पाहिलेले आहे.

| अ.नं. | अधिका-याचे नाव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | श्री.सुकदेव भटु पाटील | अधिक्षक | दि.२७.१०.२००३ ते दि.१२.०२.२००८ |
| ०२. | श्री.दिलीप त्रिबक उगले | अधिक्षक | दि.१३.०२.२००८ ते दि.२८.०९.२०१२ |
| ०३. | श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर | अधिक्षक | दि.२९.०९.२०१२ ते दि.२०.०३.२०१४ (प्र.अ.नेमणुक) |
| ०४. | श्री.विजय भिला सिनकर | अधिक्षक | दि.२४.०४.२०१४ ते दि.०८.०३.२०१५ |

यात प्रामुख्याने श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर यांचे बदली पासुन प्रसादालय विभागाकडील डेडस्टॉकबाबतचा या प्रकरणाशी सबंध आहे. त्यामुळे त्या त्या वेळेस असलेले खातेप्रमुख व त्यांनी सादर केलेल्या चार्ज देवाण घेवाण यादया अहवाल हे ही महत्वाचे ठरतात. श्री.सिनकर यांनी त्यांचे दि.२१.०४.२०१९ रोजीचे खुलाश्यात श्री.उ.पं.गोंदकर (तत्कालीन प्रशासकीय अधिकारी) यांचेबाबतही उल्लेख केलेला आहे. आज तरी श्री.गोंदकर हे सेवानिवृत्त झाले असतील तरी श्री.सिनकर यांना नैसर्गिक न्याय तत्वानुसार न्याय मिळणेकामी श्री.उ.पं.गोंदकर यांना पत्र वजा नोटीस पाठवून त्यांचाही खुलासा प्राप्त करुन घेणे संयुक्तीक राहील, असे मत आहे.

श्री.उ.पं.गोंदकर यांचा खुलासा प्राप्त झालेनंतर या प्रकरणाबाबत वस्तु:स्थितीदर्शक अहवाल सादर करुन निर्णय घेणे उचित राहील, याबाबत दि.११.०५.२०१९ रोजीची सादर केलेली होती. मंजुर टिपणीस अनुसरुन श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर, सेवानिवृत्त प्रशासकिय अधिकारी यांना जा.नं.एसएसएस/वशी-शिस्त/६९६/२०१९ दि.३१.०५.२०१९ रोजी पत्र पोष्टाने रजिष्टर ए.डी.ने पाठविणे आले आहे.

[५] त्यास अनुसरुन श्री.उत्तम पंढरीनाथ गोंदकर, सेवानिवृत्त प्रशासकिय अधिकारी यांनी दि.१०.०६.२०१९ रोजीचा लेखी खुलासा सादर केलेला आहे. त्यात त्यांनी,”वरील संदर्भीय पत्रान्वये मागीतले प्रमाणे खुलासा खालीलप्रमाणे प्रसादालयातुन प्रमोशन मिळाले नंतर मी प्रशासकिय अधिकारी या पदावर हजर झालेवर माझे जागेवर श्री.सिनकर यांना प्र.अधिक्षक म्हणुन देण्यात आले होते. त्याच वेळेस प्रसादालयाचा चार्ज देवुन त्यांना सांगीतले कि माझेकडे प्रसादालयासह आणखी ८ ते १० विभागाचा कार्यभार असल्याने मला प्रत्यक्ष डेडस्टॉक मोजताना हजर राहता येणार नाही.आपण आपले सहाका-या समवेत डेडस्टॉक मोजुन घेणेत यावा. परंतु श्री.सिनकर यांचेकडुन तो मोजला गेला नसावा. मात्र सन २०१३-२०१४ च्या डेडस्टॉक यादया लेखाशाखेत सादर करतांना सर्व डेडस्टॉक बरोबर असुन तो प्रसादालयाच्या ताब्यात आहे असा शेरा मार्क व स्वाक्षरी करुन यादया सादर केलेल्या आहे.जेव्हा श्री.सिनकर यांची बदली इतर विभागात झाली तेव्हा डेडस्टॉक मोजताना यादीतील पत्रात दाखवलेल्या वस्तु कमी असल्याने प्रसादालयामार्फत प्रस्ताव सादर करुन श्री.सिनकर यांचेकडुन भरुन घेणे बाबत प्रस्तावास मान्यता घेतलेली आहे. सदरचा प्रस्ताव प्रसादालयाच्या किंवा लेखाशाखेच्या दप्तरी आढळुन येईल. त्यामुळे पैसे भरणे बाबत माझे कोणा बरोबर बोलणे किंवा चर्चा झालेली नाही. सदरचा खुलासा आपले अवलोकनार्थ सादर.(डेडस्टॉक मोजणेबाबत सांगीतले आहे हे श्री.सिनकर यांनी पत्रात कबुल केले आहे

श्री.उत्तम पं.गोंदकर यांनी त्यांचे खुलाशा सोबत दि.३१.०३.२०१४ अखेरचे प्रसादालय विभागाकडील डेडस्टॉक यादीचे शेवटचे पानाची छायांकित प्रत जोडली आहे. यादीवर, "उपरोक्त यादीतील सर्व वस्तुंची प्रत्यक्ष पडताळणी केली असुन त्या सर्व वस्तु प्रसादालयाच्या ताब्यात आहे." असा अभिप्राय नमूद केलेला असून, त्याखाली प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय विभाग म्हणून श्री.विजय भिला सिनकर यांची स्वाक्षरी आहे.

[६] विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-सबब,उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता श्री साई प्रसादालय विभागाकडे कमी असलेल्या साहित्याची घसारा किंमत रु.३९,१५२.०१ (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस हजार एकशे बावण्ण) इतकी होत आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (३) नुसार संस्थान कर्मचा-याने कामकाजात हयगय केल्यास किंवा आदेश भंग केल्यास व या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान झाले असल्यास सदरचे नुकसान त्यांच्या वेतनातून वसूल करणे बाबतची तरतुद आहे.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम, २०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,

(२) पदोन्नती रोखणे,

(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.

(४) वेतनावाढी रोखुन धरणे,

(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध असा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्या व्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

सबब,त्यामुळे उपरोक्त अ.नं. [१] ते [६] मध्ये नमुद केलेल्या सर्व तपशिलवार बाबींचा सारासार विचार करुन, श्री साई प्रसादालय विभागाचे तत्कालीन प्र.अधिक्षक, श्री.विजय भिला सिनकर (सध्या प्र.अधिक्षक, साई प्रसाद निवासस्थान) यांचे वेतनातुन पुर्णांकित रक्कम रु.३९,१५२/- (अक्षरी रक्कम रुपये एकोणचाळीस हजार एकशे बावण्ण मात्र) समान हप्त्यात वसुल करणेत यावी किंवा कसे याबाबतचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३९०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालय विभागाचे चार्ज देवाण-घेवाण मधील कमी असलेल्या वस्तु / साहित्यांची रक्कम श्री.विजय भिला सिनकर, तत्कालीन प्र.अधिक्षक, श्री साई प्रसादालय विभाग यांचे पगारातून वसूल न करता याबाबत त्यांना ताकीद देण्यात यावी,असे ठरले. तसेच सर्व प्र.अधिक्षक/विभाग प्रमुख यांनी अंतर्गत विभागामार्फत दर वर्षी डेडस्टॉक याद्या अद्ययावत करुन घ्याव्यात, चार्ज देवाण-घेवाण करतेवेळी योग्य ती काळजी घेण्यात यावी अशा सुचना संबधीतांना देण्यात याव्यात, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०९** **सन २०२० करीता गाईचे शुध्द तुप खरेदी करणेकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधिल तरतूद:- महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील कलम २१(१)(घ) साईभक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे.

प्रास्ताविकः- श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानमार्फत मोफत बुंदीप्रसादाचे वाटप केले जाते व लाडू प्रसादही उपलब्ध करुन दिला जातो. तसेच श्री सत्यव्रत पुजेसाठी प्रसाद वाटप केले जाते. यासाठी शुद्ध तुपाची ई-निविद पद्धतीने वार्षीक खरेदी केली जाते.

सध्या सन २०१९ वर्षासाठी शुद्ध तुप खरेदीसाठी डिसेंबर २०१९ अखेरपर्यत ८,६०० क्विंटल शुद्ध तुप खरेदीचा निर्णय झालेला होता,त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे.

सन २०२० साली शुद्ध तुप खरेदीसाठी ऐणारा अंदाजे खर्च काढणेसाठी पुर्वीचे १४-१५ निविदाधारक व पुरवठाधारक यांना ई-मेल करणेत आले होते. त्यापैकी खालील उत्पादकांनी ई-मेल द्वारे त्यांचे अंदाजे दर कळविलेले आहेत.

| अ.नं. | उत्पादकांचे नांव | सरासरी वार्षीक दर (प्रती क्विंटल) |
|---|---|---|
| ०१ | गंगा डेअरी, आग्रा | ३१,७००/- |
| ०२ | गुड हेल्थ इंडस्ट्रीज, दिल्ली | ४१,८५०/- |
| ०३ | हर्ष फ्रेश डेअरी, हरिद्वार | ३०,६२५/- |
| ०४ | व्ही.एस.पी. डेअरी इंडस्ट्रीज, उमरगांव | ३७,२२५/- |
| ०५ | गोविंद मिल्क डेअरी,फलटण | ४६,९२६/- |
| | सरासरी प्रती क्विंटल दर रुपये- | ३७,६६५/- |

वरील सर्व दरांची सरासरी काढता सन २०२० साठी अंदाजे रुपये ३७,६६५/- प्रती क्विंटल शुद्ध तुप खरेदीसाठी खर्च येईल असा अंदाज आहे.

जानेवारी ते डिसेंबर२०२०यावर्षासाठी संस्थानचे श्री साई प्रसादालय,लाडू निर्मीती व मंदिर या विभागांकडून त्यांची वार्षीक मागणी परिपत्रकाद्वारे मागविणेत आली होती, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे:-

| अ.नं. | विभागांचे नांव | सन २०२० ची वार्षीक मागणी (क्विंटलमध्ये) | अंदाजे दर प्रती क्विंटल (रु) | एकुण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ |
| ०१ | लाडू व बफी प्रसाद निर्मीती विभाग | ८,०८७.५६ | ३७,६६५/- | ३०,४६,१७,९४७.४० |
| ०२ | श्री साई प्रसादालय विभाग | १०.०० | ३७,६६५/- | ३,७६,६५०.०० |
| ०३ | मंदिर विभाग | ११२.२० | ३७,६६५/- | ४२,२६,०१३.०० |
| | एकूण | **८,२०९.७६** | | |
| | पुर्णांकीत एकुण मागणी | ८,४००.०० | ३७,६६५/- | **३१,६३,८६,०००/-** |

माहे जानेवारी २०१९ ते जून २०१९ या कालावधीत ३,६४९ क्विंटल शुद्ध तुपाची खरेदी करणेत आलेली असून त्यासाठी रु. ९,८९,७३,०००/- इतका प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. तसेच माहे जुलै २०१९ ते डिसेंबर २०१९ या कालावधीत अंदाजे ४,३०० क्विंटल शुद्ध तुपाची खरेदी करणेची आवश्यकता आहे, त्यासाठी रु. ११,६१,००,०००/- इतका खर्चअपेक्षित आहे.

सन २०२० करीता (माहे जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२०) श्री साई प्रसादालय, लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती व मंदिर या विभागांकडून शुद्ध तुप खरेदीचे प्रस्ताव भांडार विभागास प्राप्त झालेले आहेत,त्यानुसार एकुण ८,४००क्विंटल शुद्ध तुप खरेदी करणेची आवश्यकता आहे. सदर शुद्ध तुपासाठी वरील रु. ३७,६६५/- प्रती क्विंटल दराप्रमाणे सन २०२० साठी शुद्ध तुपाचे खरेदीकरीता अंदाजे रु. ३१,६३,८६,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र राज्य विधानसभेची निवडणूक पुढील २-३ महिन्याचे काळात अपेक्षित असल्यामुळे आचार संहितेमध्ये काही कालावधी खर्च होईल म्हणून सदरचा प्रस्ताव लवकर सादर करणेत आला आहे.

प्रस्ताव:- तरी सन २०२० करीता (माहे जानेवारी २०२० ते डिसेंबर२०२०) संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदिर या विभागांसाठी वार्षीक ८,४०० क्विंटल गाईचे शुद्ध तुप खरेदी विभागामार्फत

विहीत पध्दतीने खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. ३१,६३,८६,०००/- (अक्षरी एकतीस कोटी त्रेसष्ठ लाख शहाऐंशी हजारमात्र) पर्यंतचे खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे श्री साई प्रसादालय, लाडू निर्मीती व मंदिर या विभागांसाठी माहे जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीसाठी ८,४०० क्विंटल गाईचे शुद्ध तुप खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ३१,६३,८६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.१०** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना श्री साई प्रसादालयाचे पश्चिम आऊट गेटलगत मिनरल वॉटर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर सुरु करण्यास परवानगी मिळणेबाबत मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्पालॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील पत्र क्र.श्रीसासंएक्रेसो/३३५/२०१९ दि.११.०३.२०१९.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.श्रीसासंएक्रेसो/३३५/२०१९ दि.११/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये "संस्थानमार्फत नव्याने श्री साई प्रसादालयासाठी पश्चिम बाजूस आऊट गेट सुरु करण्यात आले असून सदर गेटलगत साईभक्तांना मिनरल वॉटर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय व प्रसाद मिळण्याची सोय व्हावी यासाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी ही श्री साईप्रसादालयाचे पश्चिम बाजूचे आऊट गेटलगत मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर चालवू इच्छित आहे. तरी साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थेस श्री साई प्रसादालयाचे पश्चिम बाजूचे आऊट गेटलगत मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर चालविणेस परवानगी मिळावी," असे बाबत विनंती केलेली आहे.

साईप्रसादालयाचे गर्दीचे नियोजनाचे दृष्टिकोनातून व जागेच्या आवश्यकतेच्या व उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना त्यांचे विनंतीप्रमाणे साईप्रसादालयाचे पश्चिम बाजूस असलेल्या आऊट गेटजवळ मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअरसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल किंवा कसे? याबाबतचे प्र.अधिक्षक,साईप्रसादालय विभाग व संरक्षण अधिकारी,संरक्षण विभाग यांचेकडून इकडील पत्र क्रं.एसएसएसटी/मालमत्ता/३९०/२०१९ दि.१८/०५/२०१९ अन्वये स्वयंस्पष्ट अभिप्राय मागविणेत आले.

त्यास अनुसरुन प्र.अधिक्षक,साईप्रसादालय विभाग यांनी त्यांचेकडील जा.नं.एसएसएस/वशी-प्रसाद/ ३८/२०१९ दि.२०/०५/२०१९ अन्वये "श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना श्री साई प्रसादालयाच्या पश्चिम बाजूस असलेल्या आऊट गेटजवळ मिनरल वॉटर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय व प्रसाद स्टोअरसाठी जागा उपलब्ध करुन देता येईल," असेबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

तसेच संरक्षण अधिकारी,संरक्षण विभाग यांनी त्यांचेकडील जा.नं.१५८/२०१९ दि.२२/०५/२०१९ अन्वये "साईभक्तांचे सोयीचे दृष्टिने सदर नमूद ठिकपणी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना संस्थान नियमाप्रमाणे श्री साईप्रसादालयाचे पश्चिम आऊट गेटजवळ मिनरल वॉटर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर सुरु करण्यास परवानगी देणेस हरकत नाही," असेबाबतचे अभिप्राय दिलेले आहेत.

चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे उपरोक्त दि.११/०३/२०१९ रोजीच्या पत्रात साईप्रसादालयाचे पश्चिम बाजूचे आऊट गेटलगत मिनरल वॉटर,दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर चालविण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तथापि त्यात सदर विक्री केंद्राचा स्टॉल ठेवण्यासाठी किती जागेची आवश्यकता आहे याबाबतचे मोजमाप सदर पत्रात नमूद केलेले नसलेने आज दि.२२/०६/२०१९ रोजी उक्त सोसायटीस दुरध्वनीद्वारे विचारणा केली असता त्यांनी

त्यांचेकडील पत्र जा.क्रं.श्रीसासंएक्रेसो/५४/२०१९ दि.२२/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये उक्त ठिकाणच्या मोकळ्या जागेत १५ फुट x८ फुट या आकाराचा एक विक्री स्टॉल ठेवण्यासाठी १५ फुट x८ फुट इतकी जागा वापरास मिळावी असेबाबत इकडेस कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना, त्यांचेकडील उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या विनंतीप्रमाणे संस्थान मालकीच्या मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० पै. व ८५ पै. चे क्षेत्रातील साईप्रसादालयाचे पश्चिम आऊट गेटलगत मोकळया जागेत मिनरल वॉटर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर सुरु करणेकामी १५ फुट x८ फुट या आकाराचा एक विक्री स्टॉल ठेवण्यासाठी १५ फुट x८ फुट या आकाराची जागा,शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करीत त्या भाडेदराने अथवा श्री साईबाबा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे भाडे कराराने वापरास देता येईल व त्याप्रमाणे भाडे करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना,त्यांचेकडील उपरोक्त पत्रात नमूद केलेल्या विनंतीप्रमाणे संस्थान मालकीच्या मौजे निमगाव-को-हाळे येथील गट नं.८० पै. व ८५ पै. चे क्षेत्रातील साईप्रसादालयाचे पश्चिम आऊट गेटलगत मोकळया जागेत मिनरल वॉटर, दुग्धजन्य पदार्थ, थंडपेय व प्रसाद विक्री स्टोअर सुरु करणेकामी १५ फुट x८ फुट या आकाराचा एक विक्री स्टॉल ठेवण्यासाठी १५ फुट x८ फुट या आकाराची जागा, शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभाग निश्चित करीत त्या भाडेदराने अथवा श्री साईबाबा संस्थान निश्चित करील त्या भाडेदराने यापैकी जे जास्त असेल त्या भाडेदराने व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन ११ महिन्यांचे भाडे कराराने वापरास देता येईल व त्याप्रमाणे भाडे करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९२** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. तसेच आवश्यक त्याठिकाणी साईभक्तांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था संस्थानमार्फत मोफत करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग/पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.११** **दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड, मुंबई यांना श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट, शिर्डीचे परिसरात नोगा ब्रॅण्ड फुड प्रॉडक्टस विक्री केंद्राकरीता वापरास दिलेल्या जागेच्या वापराची मुदत वाढवून देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे दि.०२/०५/२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३१० नुसार मॅनेजिंग डायरेक्टर, दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,मुंबई यांना संस्थान मालकीचे साईआश्रम भक्तनिवासस्थान-१ येथील स्वागतकक्षाचे लगत दक्षिणेकडील गाळा नं.४ आकारमान सुमारे १५IIx१० फूट असलेला गाळा दि.०१/०८/२०१८ ते दि.३०/०६/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यांचेकडील दि.२६/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये निश्चित केलेले मासिक भाडे दर रक्कम रु.३,४४७/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन नोटराईज करुन घेवून वापरास देणेत आलेला आहे.

उक्त गाळा वापराची मुदत दि.३०/०६/२०१९ रोजी संपुष्टात येत असल्याकारणाने पुढील दि.०१/०७/२०१९ ते दि.३०/०५/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठीची मुदत वाढवून मिळणेकामी मा.विभागीय व्यवस्थापक,दि महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,मुंबई विभागीय कार्यालय,नाशिक यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.विकाना/नोगा/२०१९-२०/१९९ दि.२४/०४/२०१९ अन्वये तसेच मा.अध्यक्ष,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना उद्येशून लिहीलेल्या पत्र जा.क्रं.विकाना/नोगा/२०१९-२०/४२१ दि.०१/०६/२०१९ अन्वये इकडेस विनंती केलेली आहे. सदर पत्रावर मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील मिटींगमध्ये सादर करणेबाबत सुचित केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- मा.विभागीय व्यवस्थापक,महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.मुंबई विभागीय कार्यालय,नाशिक यांचे उपरोक्त विनंती पत्राप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे साईआश्रम भक्तनिवासस्थान-१ येथील स्वागतकक्षाचे लगत दक्षिणेकडील गाळा नं.४ आकारमान सुमारे १५IIx१० फूट असलेला गाळा दि.०१/०८/२०१८ ते दि.३०/०६/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वीच्या भाडेदरात १०% वाढ करुन म्हणजेच रु.३,४४७/-+१०% रु.३४५/-असे एकूण दरमहा भाडे रक्कम रु.३,७९२/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर भाडेतत्वाने वापरास मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- मा.विभागीय व्यवस्थापक,महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.मुंबई विभागीय कार्यालय,नाशिक यांना वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे साईआश्रम भक्तनिवासस्थान-१ येथील स्वागतकक्षाचे लगत दक्षिणेकडील गाळा नं.४ आकारमान सुमारे १५IIx१० फूट असलेला गाळा दि.०१/०७/२०१९ ते दि.३०/०५/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वीच्या भाडेदरात १०% वाढ करुन म्हणजेच रु.३,४४७/-+१०% रु.३४५/-असे एकूण दरमहा भाडे रक्कम रु.३,७९२/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर भाडेतत्वाने वापरास मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.विभागीय व्यवस्थापक,महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.मुंबई विभागीय कार्यालय, नाशिक यांना वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे साईआश्रम भक्तनिवासस्थान-१ येथील स्वागतकक्षाचे लगत दक्षिणेकडील गाळा नं.४ आकारमान सुमारे १५IIx१० फूट असलेला गाळा दि.०१/०७/२०१९ ते दि.३०/०५/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वीच्या भाडेदरात १०% वाढ करुन म्हणजेच रु.३,४४७/-+१०% रु.३४५/-असे एकूण दरमहा भाडे रक्कम रु.३,७९२/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर भाडेतत्वाने वापरास मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१२** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १२ कियॉस्क/ गाळे यांचे मुदतवाढबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं.श्रीसासंएक्रेसो/५७/२०१९ दि.१५/०६/२०१९ अन्वये,"संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी संस्थानचे साईआश्रम भाग - १ परिसरात-४, साईआश्रम भाग -२ परिसरात-१,साईप्रसादालय परिसरात - १, द्वारावती निवासस्थान परिसरात- २, साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरात १, साईउद्यान परिसरात २ व साईप्रसाद निवासस्थान परिसरात १ असे एकुण १२ कियॉस्क/गाळे दिलेले असून सदर कियॉस्क/ गाळे यांची मुदत दि.०६/०९/२०१९ रोजी पुर्ण होत असुन संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर कियॉस्क/ गाळे हे पुढील ११ महिन्यांसाठी चालविण्यास परवानगी मिळावी," असे बाबत इकडेस कळविले आहे.

यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.७८७ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६९७ (३) अन्वये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १४ कियॉस्क/गाळे वापरासाठी मुदतवाढ देणेसंबंधी सदर सोसायटीचे चेअरमन व सदस्य यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविण्यात यावे व तोपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा असे ठरले होते.

त्यानुसार आजचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. शिर्डीचे चेअरमन, व्हा चेअरमन व सचिव हे उपस्थित होते.समिती सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना

त्यांनी समर्पक उत्तरे दिली. त्यानुसार श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १४ कियॉस्क/गाळे वापरासाठी दि.०७/१०/२०१८ ते दि.०६/०९/२०१९ या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रति कियॉस्क मागील मासिक भाडे रु.४,३९२/- मध्ये १० %वाढ करुन रक्कम रु.४,३९२/-+१० % रक्कम रु.४३९/-=रु.४,८३१/-) रक्कम रु ४,८३१/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

सदर निर्णयानुसार उक्त सोसायटी बरोबर करावयाचा करारनामा नोटरी यांचेसमोर दि.०७/०२/२०१९ रोजी नोंदवून घेण्यात आलेला आहे. सदर जागा वापराची मुदत दि.०६/०९/२०१९ रोजी पुर्ण होत असून पुढील ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ मिळणेबाबत चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि. शिर्डी यांनी उक्त संदर्भीय पत्रान्वये इकडेस कळविले आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१३/१२/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.६९७(३) अन्वये १४ कियॉस्क/गाळेच्या जागा वापरास मुदतवाढ देण्यात आलेली होती.परंतु त्यानंतर चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.क्रं.श्रीसासंएक्रेसो/१९४/२०१८ दि.१९/११/२०१८ रोजीचे पत्रान्वये १४ कियॉस्क/गाळेपैकी साईबाबा भक्तनिवासस्थान (५००) रुम परिसरातील मुख्य गेटलगत असलेले प्रसाद स्टोअर (कियॉस्क) व जनरल स्टोअर (कियॉस्क) हे दोन कियॉस्क बंद करणेस मान्यता मिळणेबाबत विनंती केलेली होती. त्यास अनुसरुन इकडील जा.क्रं.४११५/२०१८ दि.१९/११/२०१८ रोजीचे पत्रान्वये त्यांनी मागणी केलेले दोन कियॉस्क बंद करणेस परवानगी देण्यात आलेली आहे. यास्तव उर्वरीत १२ कियॉस्क/गाळे जागा वापरास मुदतवाढ मिळणेबाबत त्यांनी संदर्भीय पत्रात नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय- साईभक्तांना संस्थान परिसरात सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी १२ कियॉस्क/गाळयांचे जागा वापरास पुर्वीचेच अटी व शर्तीवर म्हणजेच मागील मुदतवाढ कालावधीचे मासिक भाडे रकमेत १० % वाढ करुन (रु.४,८३१/- मध्ये १०% वाढ रु.४८३/-=रु.५,३१४/-) रक्कम रु.५,३१४/- (अक्षरी रु.पाच हजार तीनशे चौदा मात्र) प्रति कियॉस्क/गाळेचे मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन व त्याप्रमाणे करारनामा करुन उक्त सोसायटीस पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०८/२०२० या कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे करारनामा नोटराईज करुन घेता येईल.

प्रस्ताव- साईभक्तांना संस्थान परिसरात सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी १२ कियॉस्क/गाळयांचे जागा वापरास पुर्वीचेच अटी व शर्तीवर म्हणजेच मागील मुदतवाढ कालावधीचे मासिक भाडे रकमेत १० % वाढ करुन (रु.४,८३१/- मध्ये १०% वाढ रु.४८३/-=रु.५,३१४/-) रक्कम रु.५,३१४/- (अक्षरी रु.पाच हजार तीनशे चौदा मात्र) प्रति कियॉस्क/गाळेचे मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन व त्याप्रमाणे करारनामा करुन उक्त सोसायटीस पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०८/२०२० या कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३९४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेले १२ कियॉस्क/ गाळे जागा वापरास पुर्वीचेच अटी व शर्तीवर मागील मासिक भाडे रकमेत १० % वाढ करुन (रु.४,८३१/- मध्ये १०% वाढ रु.४८३/-=रु.५,३१४/-) रक्कम रु.५,३१४/-मात्र प्रति कियॉस्क/गाळा मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० या सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**सदर १२ कियॉस्क/गाळयांमध्ये विक्री करण्यात येणाऱ्या वस्तु साईभक्तांना माफक दरात उपलब्ध करुन देणेबाबतच्या अटी करारनाम्यामध्ये टाकण्यात याव्यात. साईभक्तांना व्रिकी करण्यात येणारे साहित्य व वस्तु यांचा दर्जा व किंमत तपासणीकामी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व संबधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती नेमण्यात येऊन पाहणी करण्यात यावी, तसेच सदरचे व्यवसाय संस्थानमार्फत ना-नफा ना-तोटा या तत्वावर चालविता येतील काय? या बाबत पडताळणी करुन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१३** **गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम चालविणेस श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं. श्रीसासंएक्रसो/५६/२०१९ दि.२४/०६/२०१९रोजीचे पत्रान्वये, "श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवर काम करत असलेल्या कायम कर्मचा-यांची नोंदणीकृत सहकारी संस्था असुन संस्था संस्थेच्या सभासदांना कर्ज पुरवठयाबरोबरच संस्थान परिसरात संस्थान मान्यतेने श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी मोफत पादत्राणेगृह व बॅग क्लोकरुम सुविधा चालवत आहे. त्याचप्रमाणे मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवस्था,प्रसाद विक्री स्टोअर,नॉव्हेल्टी स्टोअर,दुग्धजन्य पदार्थ व थंडपेय विक्री स्टोअर,शालेय साहित्य विक्री केंद्र चालवत असुन त्या माध्यमातून श्री साईभक्तांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना वाजवी दरात चांगली सेवा पुरवित आहे. संस्थेस सदर व्यवसायांचे माध्यमातून मिळणा-या उत्पन्नातून संस्था संस्थेच्या सभासदांना म्हणजेच संस्थान कर्मचा-यांना कमी व्याजदराने कर्ज पुरवठयाबरोबरच अनेक सुविधा पुरवत आहे त्यामुळे संस्था ही संस्थान कर्मचा-यांची कामधेनू ठरत आहे. संस्था साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी गुरुस्थान मंदिरालगत चालवत असलेल्या मोबाईल कॅमेरा क्लोकरुम या व्यवसायाची मुदत दि.०६/०८/२०१९ रोजी पुर्ण होत असुन संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी सदर मोबाईल कमेरा क्लोकरुम व्यवसाय पुढील ११ महिण्यांसाठी चालविण्यास परवानगी मिळावी,ही विनंती,"असेबाबत इकडेस कळविले आहे.

यापुर्वी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०९/२०१८ रोजीच्या सभेत उक्त विषयाबाबत निर्णय क्रं.५४३ हा खालीलप्रमाणे झालेला आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत नं.७०६ मध्ये मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायास दि.०७/०९/२०१८ ते दि.०६/०८/२०१९ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.८,५७५/-+१०% रु.८५८/- एकुण रक्कम रु.९,४३३/- इतकी निश्चित करुन व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन मुदतवाढ देण्यास व याकामी पूर्वीप्रमाणे करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आली.

सदर निर्णयाच्या अनुषंगाने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांचेशी उक्त कालावधीसाठीचा करारनामा दि.२९/१०/२०१८ रोजी नोटराईज करण्यात आलेला आहे. सदर जागा वापराची मुदत दि.०६/०८/२०१९ रोजी संपुष्टात येत असल्याने पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ मिळणेबाबत संदर्भीय पत्राने मा.चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांनी इकडेस विनंती केलेली आहे.

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी मंजुर आकृतीबंधामध्ये वरिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ (Senior Pathologists) ची दोन पदे मंजुर असुन एक पद रिक्त आहे तसेच दुस-या पदावर डॉ. अशोक अनंत न्यायाधिश हे कार्यरत होते मात्र जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४६६७/२०१८ दि.०७/०३/२०१८ नुसार डॉ न्यायाधिश यांचे वयास ६० वर्षे पुर्ण होत असल्याने प्रचलित सेवानियमानुसार त्यांना दि. ३१/०५/२०१८ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त करण्यात आले आहे. डॉ न्यायाधिश यांना संबंधीत पदाचे वेतन व मा व्यवस्थापन समिती दि. ०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ मध्ये नमुद केलेप्रमाणे संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता देण्यात येत होते.

डॉ अशोक अनंत न्यायाधिश दि. ३१/०५/२०१८ चे माध्यान्होत्तर संस्थान सेवेतून निवृत्त होत असल्याने सदर पदाचे अतिरीक्त कामकाज मिळणेकामी डॉ मधुरा निहार जोशी, वैद्यकीय अधिकारी (पॅथॉलॉजीस्ट), श्री साईनाथ रूग्णालय व डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल मागणी अर्ज केले होते.

उपरोक्त अर्जास अनुसरून श्री साईबाबा हॉस्पिटल मधील वरिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ (Senior Pathologists) पदाचे कार्यभाराबाबत दि. १९/०५/२०१८ रोजी टिपणी सादर करणेत आली होती त्यावर तत्कालीन उपजिल्हाधिकारी यांनी, १) श्रीमती जोशी यांची नियुक्ती श्री साईनाथ रूग्णालयातील आहे. २) त्यांना Sr Pathologist पदाचा Charge देताना श्री साईनाथ रूग्णालयातील पदावर दुस-या Pathologist ची बदली करावी, असे वैद्यकीय अधिक्षीका यांनी कळविले आहे. मात्र हे शक्य होणार नाही. तूर्त श्रीमती सरवर यांचेकडे

मूळ पदाचे काम कायम ठेऊन Sr Pathologist पदाचा अतिरिक्त कार्यभार द्यावा, असे मत आहे. अतिरिक्त कार्यभार हाताळताना श्रीमती सरवर यांना मूळ पदाचे वेतन मिळेल व संस्थानच्या वेतन नियमातील नियम क्र २३(ब) अन्वये अतिरिक्त वेतन देय होईल मात्र Sr Pathologist पदाचे incentives त्यांना देय होणार नाहीत. याप्रमाणे श्रीमती सरवर यांचेकडे अतिरिक्त कार्यभार देण्यास हरकत नाही. त्यास तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजूरी दिली. सदर मंजुरीस अनुसरून जा.नं.एसएसएस/एसएसबीएच/एचआर/११६/२०१८ दि.३१/०५/२०१८ अन्वये श्री साईबाबा हॉस्पिटल मधील वरिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ पदाचे कार्यभाराबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत आलेला आहे.

"डॉ अशोक अनंत न्यायाधिश, सिनीअर पॅथॉलॉजीस्ट यांचे वयास दि. ३०/०५/२०१८ रोजी ६० वर्ष पुर्ण होत आहेत. सबब, प्रचलित सेवाविनियमानुसार त्यांना दि. ३१/०५/२०१८ चे मध्यान्नोत्तर संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त करणेत येत आहे. संस्थान व्यवस्थापनाचे कामाचे सोईचे दृष्टीने व प्रशासकीय कारणास्तव डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचेकडे मुळ पदाचे काम कायम ठेवुन सिनीअर पॅथॉलॉजीस्ट या पदाचा अतिरिक्त कार्यभार दि. ३१/०५/२०१८ चे मध्यान्नोत्तर पासुन पुढील आदेश होईपावेतो देणेत येत आहे. त्यांना सिनीअर पॅथॉलॉजीस्ट या पदाचे प्रोत्साहनपर भत्ता (इन्सेंटीव) देय होणार नाही. संबंधीतांनी सदर पदाचा चार्ज देवाण-घेवाण करून चार्जयादीची एक प्रत इकडील कार्यालयाकडे सादर करावी. सदरचे आदेशामुळे संबंधीतांची पदावनती / पदोन्नती झाली आहे असे समजणेत येऊ नये. सदर आदेशाची कार्यवाही तात्काळ करणेत यावी."

उपरोक्त आदेशानुसार डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजीस्ट यांनी दि. १९/०७/२०१८ रोजीचे अर्जान्वये वरिष्ठ शरीर विकृती शास्त्रज्ञ या पदाचे अतिरीक्त कामकाज संभाळत असल्याने या पदाचा प्रोत्साहन भत्ता मिळणेची मागणी केली होती. सदर अर्जास अनुसरून दि. २३/०८/२०१८ रोजी टिपणी सादर केली होती. त्यावर तत्कालीन उपजिल्हाधिकारी यांनी, वरिष्ठ पदाचे Incentive मिळणार नाही, या अटीच्या अधीन राहून श्रीमती सरवर यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे. त्यामुळे Incentive देय नाही, असे मत आहे. असे निर्देश दिले होते. सदर निर्देशास तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजुरी दिली आहे. डॉ सरवार ह्या त्यांचे अर्जावर केलेल्या कार्यवाहीची विचारणा करीत असल्याने दि. २१/०९/२०१८ रोजीचे मंजुर टिपणीस अनुसरून डॉ सरवार यांचा अर्ज नस्तिबंद केलेबाबत त्यांना दि. २६/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे.

डॉ सरवार या तज्ञ वैद्यकीय अधिकारी असुन त्यांची शैक्षणिक पात्रता एम.डी. पॅथोलॉजी असुन त्यांची हिस्टोपॅथोलॉजीस्ट या पदावर नेमणूक असुन त्यांना वरीष्ठ पॅथॉलॉजीस्ट या पदाचा तात्पुरत्या स्वरूपात पुढील आदेश होईपावेतो अतिरीक्त कार्यभार देणेत आलेला आहे.

आता डॉ सरवार यांनी दि. ०१/०५/२०१९ (प्रत्यक्षात प्राप्त दि. ०३/०७/२०१९) रोजीचे अर्जान्वये खालीलप्रमाणे मागणी केली आहे.

मी दि. ०१/०९/२०१५ पासुन संस्थानच्या साईबाबा हॉसिपटल मध्ये कायम कर्मचारी कार्यरत आहे. मी माझे मुळ पद हिस्टोपॅथोलॉजिस्ट ह्याचा भार सांभाळुन दि. ०१/०६/२०१८ पासुन प्रभारी पद सिनिअर पॅथोलॉजिस्ट या पदाचा अतिरिक्त कार्यभारही सांभाळत आहे. माझे मुळपदाला इंन्सेंटीव्हज मान्यता नसून माझे प्रभारी पदाला इंन्सेंटिव्हज मान्यता असल्याकारणाने प्रभारी पदाचे इंन्सेटिव्हज मला देण्यात यावे ही विनंती ते पद धारण केल्याच्या दिनांकापासुन म्हणजेच ०१ जून २०१८ पासुन मिळावे. संस्थानचे सभा क्र ११/२०१७ विषय नं २२ मधील प्रोत्साहन भत्ता नियमावली मुद्दा क्र १५ नुसार केवळ प्रशासकीय पदातील अधिका-यांना (वै.संचालक, वै.उपसंचालक, वै.अधिक्षक) प्रभारी पदाचा इंन्सेंटिव्हज मिळु शकतो त्यांच्या मुळ पदाला इंन्सेंटिव्हज मिळत असले तरी सुध्दा मात्र माझ्या मुळपदाला इंन्सेंटीव्हज नसतानाही माझ्या प्रभारी पदाचा इंन्सेंटिव्हज मला मिळत नाहीये. त्यासंबंधी मी यापुर्वी दोनदा अर्ज केलेला आहे. त्यामुळे संस्थान नियमावलीत बदल करून केवळ प्रशासकीय पदांतील अधिका-यांना प्रभारी पदाचे इंन्सेंटिव्हज देय असुन शकतो याऐवजी प्रशासकीय तसेच वैद्यकीय अधिका-यांना ते सांभाळत असणा-या प्रभारी पदाचा इंन्सेंटिव्ह देय असु शकतो असा नियम करण्यात यावा ही नम्र विनंती.

विभागाचे स्पष्ट अभिप्राय-

१. मा व्यवस्थापन समिती दि. ०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ नुसार, साईबाबा हॉस्पिटलमधील तज्ञ वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता देण्यात येत आहे. सदर निर्णयामध्ये अतिरिक्त / प्रभारी पदावर काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत तरतुद नाही.

२. मा व्यवस्थापन समिती दि. २२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ५२५ नुसार, साईबाबा व साईनाथ रूग्णालयाकडील वैद्यकीय अधिकारी अतिरिक्त / प्रभारी प्रशासकीय पदांवर कार्यरत आहेत व त्यांच्या मूळ पदाला प्रोत्साहन भत्ता लागू असेल तर कोणत्याही एकाच पदाचा (मुळ किंवा प्रभारी / अतिरिक्त) प्रोत्साहन भत्ता देणेत येत असुन कोणत्याही एकाच पदाचा प्रोत्साहन भत्ता लागू करणेचा संपुर्ण अधिकार मा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणेत आलेला आहे. सदर निर्णयामध्ये अतिरिक्त / प्रभारी पदावर काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत तरतुद नाही.

३. डॉ अशोक अनंत न्यायाधीश, सिनीअर पॅथोलॉजीस्ट सध्या सेवानिवृत्त यांना दि. ०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ नुसार प्रोत्साहन भत्ता देणेत येत होता. डॉ न्यायाधीश हे सेवानिवृत्त झालेनंतर त्यांचे पदाचा अतिरीक्त कार्यभार डॉ. कविता सरवार यांचेकडे दि. ३१/०५/२०१८ मध्यान्नोत्तर पासून देणेत आलेला आहे. मात्र दि. ०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ मध्ये अतिरिक्त / प्रभारी पदावर काम करणा-या वैद्यकीय अधिका-यांना प्रोत्साहन भत्ता देणेबाबत तरतुद नसल्याने डॉ सरवार यांना सिनीअर पॅथोलॉजीस्ट या पदाचा प्रोत्साहन भत्ता देणेत आलेला नाही.

तरी, डॉ कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजी, श्री साईबाबा हॉस्पीटल यांचा प्रभारी पदाचा प्रोत्साहन भत्ता ते पद धारण केल्याच्या दिनांकापासुन मिळणेबाबतच्या दि. ०१/०५/२०१९ रोजीचे अर्जावर निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.४०१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.कविता शंतनु सरवार, हिस्टोपॅथोलॉजी, श्री साईबाबा हॉस्पीटल यांना प्रभारी सिनीअर पॅथोलॉजीस्ट पदाचा प्रोत्साहन भत्ता दि.०१/०६/२०१८ पासून पुढील आदेश होईपर्यंत देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

विषय नं.२० **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन-२०१९ महिन्यात वैद्यकिय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९८,११,५४८/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे जुन२०१९ मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण १५,३०१ व १,०६० आयपीडी रुग्णांपैकी ३,४१७ओपीडी व ५४७ आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण रु.९२,१७,२९८/- इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **३९७** रुग्णाना रक्कम **रु.५,९४,२५०/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

**(अ) श्री साईबाबा हॉस्पिटल**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १७६ | १९,९८,९६६/- | - | १९,९८,९६६/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील | ३७० | ३२,९०,९०४/- | १४,६०,३२२/- | १८,३०,५८२/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | | | | |
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | २ | १,४००/- | - | १,४००/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | ५९२ | ४७,३६,५०७/- | २८,०१,६१६/- | १९,३४,८९१/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २३० | १,०७,८३,५५४/- | ९२,२५,६३५/- | १५,५७,९१९/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २,५९४ | १८,९३,५४०/- | - | १८,९३,५४०/- |
| | **एकुण** | **३,९६४** | **२,२७,०४,८७१/-** | **१,३४,८७,५७३/-** | **९२,१७,२९८/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| अ.नं. | रुग्णांची गटवारी | लाभार्थी संख्या | एकुण बिल रक्कम | बिलापोटी मिळालेली रक्कम | बिलात दिलेली सवलत |
|---|---|---|---|---|---|
| १ | थॅलॅसिमिया | ४४ | ६०,६००/- | - | ६०,६००/- |
| २ | हिमोफिलीया | १ | ६००/- | - | ६००/- |
| ३ | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| ४ | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | १७ | १४,४००/- | - | १४,४००/- |
| ५ | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | ५५ | ६,६००/- | - | ६,६००/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना | १२८ | २,९९,४५०/- | - | २,९९,४५०/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ८ | ७,२००/- | - | ७,२००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | ७ | १४,८००/- | - | १४,८००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | १३७ | १,९०,६००/- | - | १,९०,६००/- |
| | **एकुण** | ३९७ | ५,९४,२५०/- | - | ५,९४,२५०/- |
| | **एकुण अ+ब** | **४,३६१** | **२,३२,९९,१२१/-** | **१,३४,८७,५७३/-** | **९८,११,५४८/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये जुन २०१९ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९८,११,५४८/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

निर्णय क्र.४०२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे जुन- २०१९ मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.९८,११,५४८/-मात्रची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.२१ श्री साईनाथ रुग्णालयातील लॉन्ड्री विभागाकरीता लागणारी नविन मशिनरी खरेदीकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम-२००४ मधील तरतूदः- कलम १७ (१) व १७ (२) (ण) मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

प्रस्ताविकः- समाजातील सर्व स्तरातील गरीब वृद्ध व गरजू रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उद्देशाने श्री साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करणेत आलेले आहे. या रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तेथे येणा-या प्रत्येक रुग्णास मोफत उपचार पुरविले जात असल्यामुळे गरीब व गरजू रुग्णांसाठी श्री साईनाथ रुग्णालय हे ५३ वर्षापासून मोठे वरदान ठरले आहे. श्री साईनाथ रुग्णालयात सध्या ॲलोपॅथी, होमिओपॅथी, व आयुर्वेदिक असे विविध उपचार पध्दतीने रुग्णांना उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये विविध वॉर्डमध्ये विविध प्रकारचे रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय रुग्णालय आहे. सदर रुग्णालयाची दैनंदिन ओपीडीची रुग्णसंख्या ही साधारण ७०० ते ८०० होती. परंतू मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र. ९४४ दि. २२/१२/२०१६ अन्वये श्री साईबाबांनी सुरु केलेले रुग्णसेवेचे कार्य पुढे सुरु ठेवून, त्याची व्याप्ती वाढविणेसाठी दि. ०१/०१/२०१७ पासून श्री साईनाथ रुग्णालयामध्ये होत असलेले वैद्यक‍िय उपचार सर्व स्तरातील रुग्णांना मोफत करणेत आलेले असून, सदर बाबत रुग्णालयामार्फत कार्यवाही चालू आहे. त्यानुसार रुग्णालयातील केसपेपर विभागातून केसपेपरसाठी रु, १०/- इतके शुल्क आकारुन रुग्णांस मोफत आरोग्य सेवा पुरविणेत येतात. रुग्णालय मोफत केलेमुळे दैनंदिन ओपीडीची संख्या ही १००० ते १२०० इतकी झालेली आहे.त्यामुळे आयपीडी रुग्णांच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे. रुग्णालयात असणारे बेड (३०० बेड) हे देखील पुर्ण क्षमतेने भरलेले असतात. तसेच श्री साईबाबा रुग्णालयाची देखील दैनंदिन ओपीडी ही साधारणपणे ५०० ते ५५० रुग्ण अशी आहे. व कार्यरत असणारे २५० बेड हे देखील पुर्ण क्षमतेने भरलेले असतात.

याबाबतचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाकडील सन २०१६ ते नोव्हेंबर २०१८ अखेर रुग्ण संख्या-

| सन | ओपीडी रुग्ण | आयपीडी रुग्ण | ऑपरेशन रुग्ण |
|---|---|---|---|
| जानेवारी ते डिसेंबर २०१६ | २९४८६४ | १२९५० | ८२३० |
| जानेवारी ते डिसेंबर २०१७ | ३४०४५७ | १५९४५ | १०९३१ |
| जानेवारी ते डिसेंबर २०१८ | ३२९१५० | १४६०२ | १०६४० |
| एकुण | ९६४४७१ | ४३४९७ | २९८०१ |

श्री साईबाबा हॉस्पीटलकडील सन २०१६ ते नोव्हेंबर २०१८ अखेर रुग्ण संख्या-

| सन | ओपीडी रुग्ण | आयपीडी रुग्ण | ऑपरेशन रुग्ण |
|---|---|---|---|
| जानेवारी ते डिसेंबर २०१६ | २३२९९२ | १२४०१ | ९६१९ |
| जानेवारी ते डिसेंबर २०१७ | १५९०४८ | १३४६६ | १०१५७ |
| जानेवारी ते डिसेंबर २०१८ | १७०२९३ | १२४५३ | ९७०३ |
| एकुण | ५६२३३३ | ३८३२० | २९४७९ |

दोनही रुग्णालयामधील रुग्णांचे कपडे धुणेविषयी उपरोक्त संदर्भ क्र. ०१ चे मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२३ जुलै २००९ विषय नं.१२ निर्णय क्र.५१७ अन्वये रॅम्सन गारमेंट लि. बॅगलोर यांच्या मशिनरी संस्थानच्या लॉन्ड्रीमध्ये असून त्यांची विक्रीनंतरची सेवा चांगल्या दर्जाची आहे. शिवाय सदर मशिनरी व्यवस्थीत काम देत आहे. तेव्हा त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. व दोन वर्षाचा वारंटी कालावधी संपलेनंतर त्यांचेकडे दरवर्षी रुपये १० हजार प्रमाणे सीएमसी करणेत यावे. असे ठरले.

त्यानुषंगाने दि.२३/१०/२००९ साली रॅमसन फर्निशिंग, बॅगलोर या कंपनीला रु.२१,१४,४५१.७५/- चा लॉन्ड्री मशिन पुरवठा करणेबाबत आदेश देणेत आला होता.

प्रस्तावः-सदरचे लॉन्ड्री व बॉयलर मशिन रुग्णालयाचे बायोमेडिकल विभागामार्फत दि.१०/०३/२०११ रोजी श्री साईनाथ रुग्णालयामध्ये कार्यान्वीत करणेत आले. तदनंतर दि.१०/०३/२०११ ते १०/०३/२०१३ अखेर दोन वर्षाचा वॉरंटी कालावधी पिरीयड कंपनीमार्फत दिलेला होता.

सदर लॉन्ड्री मशिन विभागात कार्यान्वीत झालेली मशिनरी खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कार्यरत मशिन | कंपनीचे नांव |
|---|---|---|
| ०१ | वॉशिंग मशिन ३० कि.लो. ग्रॅम | रामसन्स गारमेंन्टस प्रा.लि. |
| ०२ | वॉशिंग मशिन ५० कि.लो.ग्रॅम | |
| ०३ | वॉशिंग मशिन ५० कि.लो.ग्रॅम | |
| ०४ | कलेंडर मशिन | |
| ०५ | ड्रायर मशिन | |
| ०६ | हायड्रो मशिन ३० कि.लो. ग्रॅम | |

| | | |
|---|---|---|
| ०७ | हायड्रो मशिन ३० कि.लो. ग्रॅम | |
| ०८ | बॉयलर मशिन | मॅक्सीमा बॉयलर प्रा.लि. |

सन-२०११ पासून संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये लॉन्ड्री विभाग कार्यरत आहेत. श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालयाकडे जे रुग्ण रुग्णालयामध्ये भरती होतात, त्यांचे लिनन धुणेकामी श्री साईनाथ रुग्णालयाचे लॉन्ड्री विभागाकडे येतात. सदर विभागामध्ये रुग्णांचे कपडे धुणे, पिळणे, प्रेस करणे, यासाठी वेगवेगळया अद्ययावत मशिनरी उपलब्ध आहेत. सदर मशिनवर दोनही रुग्णालयाचे कपडे धुणेकामी येतात.

श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागांचे लॉन्ड्री विभागाकडून **सन २०१६ -२०१७-२०१८** अखेर धुवून प्रेस केलेले कपडयांचा वार्षिक तक्ता खालीलप्रमाणे-

| सन | श्री साईबाबा हॉस्पीटल विभाग (धुवून घेतलेले नग ) | श्री साईनाथ रुग्णालय विभाग (धुवून घेतलेले नग) |
|---|---|---|
| २०१६ | ०१,१२,००२ | ०१,६१,१३३ |
| २०१७ | ०१,१९,४३१ | ०१,६५,२३५ |
| २०१८ | ०१,१९,६२७ | ०१,६१,३३० |
| एकुण | ०३,५१,०६० | ०४,८७,६९८ |

परंतू, २०११ पासून सदर लॉन्ड्री मशिनचे कायमच दुरुस्ती व देखभाल आजअखेर चालू आहे. तसेच रॅमसन कंपनीने देखील वेळोवेळी दुरुस्ती व देखभाल करीता मोफत सेवा दिलेली आहे. याबाबत खालील नमूद केलेप्रमाणे मशिनचा वारंवार होणा-या दुरुस्ती व देखभालीबाबतचा अहवाल व खर्च सोबतच्या तक्त्याप्रमाणे-

| अ.नं. | मशिन खर्च | झालेला खर्च, रक्कम रु.पै. |
|---|---|---|
| ०१ | दि. ३०/०४/२०११ रोजी वॉशिंग मशिन ब्रेकडाऊन | दि.२१/०१/२०१२ रोजी रिले बदलला. १,३९५/- |
| ०२ | दि.१७/१२/२०११ रोजी कलेंडर मशिन ब्रेकडाऊन | दि.८०/०६/२०१२ रोजी बेल्ट बदलला. ४,१०४/- |
| ०३ | दि.२९/१२/२०११ रोजी बॉयलर मशिन ब्रेकडाऊन | दि.२०/११/२०१२ रोजी बेल्ट बदलला. ३,३००/- |
| ०४ | दि.३०/०१/२०१२ रोजी बॉयलर मशिन ब्रेकडाऊन | बॉयलर मशिन देखभाल व दुरुस्ती खर्च २०,०००/- |
| ०५ | दि.१७/०२/२०१२ रोजी लहान वॉशिंग मशिन ब्रेकडाऊन | दि.०६/१२/२०१३ रोजी स्टीम वॉल चेंज ४,०५०/- |
| ०६ | दि.०६/०४/२०१२ रोजी बॉयलर प्रोब्लेम | दि.१८/०४/२०१४ रोजी बेल्ट बदलला. ३,६०२/- |
| ०७ | दि.१२/०५/२०१२ रोजी वॉशिंग मशिन बेल्ट ब्रेकडाऊन | -- |
| ०८ | दि.०७/०६/२०१२ रोजी ड्रायर मशिन ब्रेकडाऊन | -- |
| ०९ | दि.२३/१०/२०१२ रोजी ब्रेकडाऊन, एसटीपी मोटार प्रोब्लेम. | -- |
| १० | दि.२९/०४/२०१३ रोजी बेल्ट प्रोब्लेम, डिझेल पंप, व कलेंडर मशिन व वॉल ब्रेकडाऊन | -- |
| ११ | दि.११/०३/२०१४ रोजी वॉशिंग मशिन ब्रेकडाऊन | ४,०००/- |
| १२ | दि.२०/०६/२०१४ रोजी बॉयलर ब्रेकडाऊन | ७५,३८३/- |
| १३ | दि.०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५ सीएमसी. | ७१,७७७/- |
| १४ | दि.०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१४ सीएमसी. | १०,०००/- |
| १५ | दि.२५/०३/२०१४ रोजी बॉयलर मशिन ब्रेकडाऊन | २४,१५७/- |
| १६ | दि.११/११/२०१४ रोजी बॉयलर मशिन ब्रेकडाऊन | ६६,३८७/- |
| १७ | दि.०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१६ मोफत दुरुस्ती व देखभाल खर्च | -- |
| १८ | दि. ०१/०४/२०१६ ते ३१/०३/२०१७ मोफत दुरुस्ती व देखभाल खर्च | -- |
| १९ | दि.०१/०४/२०१७ ते ३०/०३/२०१८ दुरुस्ती व देखभाल खर्च | ३८,००९/- |
| २० | दि.०१/०४/२०१८ ते ३०/१२/२०१८दुरुस्ती व देखभाल खर्च | २४,००२/- |
| | **एकुण खर्च** | **३,५०,१६६/-** |

याच दरम्यान दि.२४/११/२०१४ रोजीचे मंजूर प्रस्तावानुसार सदरच्या लॉन्ड्री विभागाचे दुरुस्ती व देखभालीचे कामकाज मेकॅनिकल विभागाकडे वर्ग करणेत आले आहे.

सद्यस्थितीला उपरोक्त मशिनचा आढावा घेतलेनंतर असे निर्दशनास आले की वारंवार होत असलेला ब्रेकडाऊन व बिघाडामुळे दैनंदिन कामकाजामध्ये अडथळा निर्माण होत आहे. परिणामी श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ॲडमीट असलेल्या रुग्णांना स्वच्छ कपडे मिळणेस विलंब होतो. त्यामुळे पेशंट व रुग्णांकडून तक्रार येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याबाबत सन २०१६-२०१७ या वर्षात लॉन्ड्री विभागाचा कायम व कंत्राटी कामगार वेतन खर्च, देखभाल व दुरुस्ती, विजबील, घसारा, रुमभाडे (संभाव्य) इत्यादी वर्षानिहाय याबाबतचा सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे-

| सन | कायम कर्मचारी खर्च | कंत्राटी कर्मचारी खर्च | देखभाल व दुरुस्ती | वि ज बी ल | मशिनचे नांव व झालेला घसारा | | केमिकल + मिठ | रुम भाडे संभाव्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ | ०९ |
| २०१६-१७ | १२,९६,०००/- | २,४०,०००/- | निरंक | -- | रॅमसन वॉशिंग मशिन, स्मॉल(व्ही)<br>रॅमसन फ्लॅट वर्क अयर्णव एक्सेसरिज<br>रॅमसन ड्रम ड्रायर बीग व असेसरिज रॅमसन<br>पोर्टेबल बॉयलर बीग व असेसरिज रॅमसन<br>वॉशिंग मशिन स्मॉल व असेसरिज<br>रॅमसन हायड्रो एक्ट्राक्टर मेडी व असेसरिज | २५७९७.९६<br>५८६९७.५८<br>२९७११.१८<br>९७३९४.४५<br>६९८५७.४४<br>३५९४३.०७ | ४,३४,७७०/- | -- |
| २०१७-१८ | १२,९६,०००/- | २,४०,०००/- | ३८,००९/ | -- | रॅमसन वॉशिंग मशिन, स्मॉल(व्ही)<br>रॅमसन फ्लॅट वर्क अयर्णव एक्सेसरिज<br>रॅमसन ड्रम ड्रायर बीग व असेसरिज<br>रॅमसन पोर्टेबल बॉयलर बीग व असेसरिज<br>रॅमसन वॉशिंग मशिन स्मॉल व असेसरिज<br>रॅमसन हायड्रो एक्ट्राक्टर मेडी व असेसरिज | १९३४८.४७<br>४४०२३.१९<br>२२२८३.३८<br>७३०४५.८४<br>५२३९३.०८<br>२६९५७.३० | ४,३४,७७०/- | -- |

उपरोक्त तक्त्यामधील अ.नं.०५ (विजबील) व अ.नं.०९ (रुमभाडे) याबाबत लॉन्ड्री विभागाचे विजबील हे एकत्रितरित्या रुग्णालयाच्याच लाईट बील मध्ये समाविष्ट आहे. व सदरचा लॉन्ड्री विभाग हा रुग्णालयाचे इमारतीमध्येच समाविष्ट आहे.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील तिस-या मजल्याचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून काही विभाग नव्याने तसेच काही विभागांचे स्थलांतर करणेत येणार आहेत. नव्याने सुरु होणा-या विभागाकरीता लागणारे लिनन हे देखील धुलाई कामी देणेत येणार असलेमुळे पुर्वीच्या कपडयांच्या धुलाई संख्येमध्ये वाढ होणार आहे. तसेच सदरचे रुग्णालयातील कपडे बाहेरिल लॉन्ड्रीमधून धुवून घेणेकामी चौकशी केली असता, श्री साईनाथ रुग्णालयातील लॉड्रीमध्ये रुग्णांचे अनेक प्रकारचे कपडे धुण्याचे काम चालू असते, यात प्रामुख्याने रक्ताचे डाग, ऑपरेशन थिएटरमधील कपडे ज्यांचे डाग न निघणारे असतात. अशा कपडयांची संख्या जास्त असते. अशा प्रकारचे कपडे इतर लॉन्ड्रीमध्ये धूवून देणे शक्य नसल्याचे पुरवठा धारकांनी प्रत्यक्षदर्शी सांगितले आहे. याकरीता सदरचे कपडे धुण्यास स्वतंत्र लॉन्ड्री युनिट रुग्णालयात असणे गरजेचे आहे. तसेच रुग्णालयाच्या Maharashtra pollution Control Board, नुतनीकरण कामी रुग्णालयातील सांडपाण्यावर STP (Sewage Treatment Plant) व ETP Effiuent Treatment Plant हे प्लॅन्ट आवश्यक असतात. या अनुषंगाने रुग्णालयात STP Plant पुर्वीपासूनच कार्यरत आहे व सद्यस्थितीला नवीन ETP Plant देखील मॅकेनिकल विभागाकडून नुकताच कार्यान्वीत झालेला आहे. सदरचा ETP Plant हा लॉन्ड्रीचा वेस्ट वॉटर (Waste Water) वरच बसविलेला आहे.

मॅकेनिकल विभागाने १३/०५/२०१९ रोजी लॉन्ड्री विभागाकडील मशिनरींची प्रत्यक्ष पहाणी केली असता, सदर मशिनरींबाबत तांत्रिक अहवाल इकडील कार्यालयाकडे दि.२१/०६/२०१९ रोजी सादर आहे.

| अ.नं. | कार्यरत मशिनरींचा तपशिल | कंपनीचे नांव | मेकॅनिकल विभागाचा अभिप्राय |
|---|---|---|---|
| ०१ | वॉशिंग मशिन ३० किलो ग्रॅम | रामसन्स गारमेंन्ट प्रा.लि. | स्पेअरपार्ट अभावी बंद |
| ०२ | वॉशिंग मशिन ५० किलो ग्रॅम | रामसन्स गारमेंन्ट प्रा.लि. | स्पेअरपार्ट अभावी बंद |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३ | वॉशिंग मशिन ५० किलो ग्रॅम | रामसन्स गारमेंन्ट प्रा.लि. | चालू स्थितीत आहे. |
| ०४ | कॅलेंडर मशिन | रामसन्स गारमेंन्ट प्रा.लि. | चालू स्थितीत आहे. |
| ०५ | ड्रायर मशिन | रामसन्स गारमेंन्ट प्रा.लि. | चालू स्थितीत आहे. |
| ०६ | हायड्रो मशिन ३० किलो ग्रॅम | रामसन्स गारमेंन्ट प्रा.लि. | स्पेअरपार्ट अभावी बंद |
| ०७ | हायड्रो मशिन ३० किलो ग्रॅम | रामसन्स गारमेंन्ट प्रा.लि. | चालू स्थितीत आहे. |
| ०८ | स्टीम बॉयलर | मक्झिमो बॉयलर प्रा.लि. | स्पेअरपार्ट अभावी बंद |

उपरोक्त एक ते आठ मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रुपये-४०,००,०००/-+ जी.एस.टी (अक्षरी रु. चाळीस लाख+जी.एस.टी) एवढ खर्च अपेक्षित असल्याचे कळविणेत आलेले आहे.

विभागाचा स्पष्ठ अभिप्राय:- उपरोक्त प्रमाणे वारंवार होणा-या मशिनचा ब्रेकडाऊन व दुरुस्ती व देखभालीचा झालेला खर्च तसेच मशिनची घसारा किंमतीचा विचार केल्यास सद्यस्थितीला लॉन्ड्री विभागाकडील सर्व मशिनरी बदलून अद्यायावत नवीन मशिन खरेदी करणे गरजेचे असून त्यासाठी अंदाजे ४०,००,०००/-+ जी.एस.टी. (चाळीस लाख रुपये) इतका खर्च अपेक्षीत आहे.

तरी उपरोक्त सर्व गोष्टीचा विचार करता, श्री साईनाथ रुग्णालयाकडील लॉन्ड्री विभागातील सर्व मशिनरी बदलून नवीन मशिन खरेदी करणेकामीचा प्रस्तावास व अपेक्षित खर्चास तसेच पुढील खरेदी प्रक्रीया मेकॅनिकल विभागामार्फत होणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.४०३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकडील लॉन्ड्री विभागातील सर्व जुनी मशिनरी बदलून नविन मशिनरी खरेदी करणेकामी मॅकेनिकल विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४०,००,०००/-+ जी.एस.टी.चे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दि.२३.०७.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.**

निर्णय क्र.४०४ **दिनांक २३.०७.२०१९ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.**

१ **संस्थानचे विविध विभागासाठी झेरॉक्स पेपर खरेदीकामी ई-निविदेत प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे विविध विभागासाठी लागणाऱ्या झेरॉक्स पेपर खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | संस्थानचे विविध विभागासाठी झेरॉक्स पेपर खरेदी |
| ०२ | मागणी | झेरॉक्स पेपर |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. १४.०६.२०१९ ते दि. २७.०६.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ०४ निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ०४ ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १४.०६.२०१९<br>टेक्निकल बीड – ०३.०७.२०१९<br>कमर्शियल बीड – ११.०७.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०७ (सात) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०६ (सहा) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | नमुने मागविलेले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ०२ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे. तर ०५ निविदाधारकांना MSME अंतर्गत सुट आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | Rate Per Packet in Rs |

| Sl. | Description of Item(s)/ Supplier Name | झेरॉक्स पेपर | झेरॉक्स पेपर | स्टेंटमेंट |
|---|---|---|---|---|

| No | | लिगल १३x८ (F/S) | छोटे-११x८ (A4) | साईज झेरॉक्स पेपर- (A3) |
|---|---|---|---|---|
| 01 | Mital Stationery and Printers, Mumbai | 237.41 | 197.74 | 375.20 |
| 02 | LAXMI MARKETING, Nasik | 241.49 | 202.49 | 259.49 |
| 03 | OM SAI ENTERPRISES, Mumbai | 239.89 | 201.07 | 402.86 |
| 04 | P P BAFNA VENTURES PRIVATE LIMITED, Aurangabad | 242.33 | 201.96 | 395.50 |
| 05 | SHRI KRISHNA SALES CORPORATION, Ahmednagar | 246 | 207 | 525 |
| 06 | Poona envelope mfg company, Pune | 269 | 222 | 400 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – मागील २०१८-१९ मधील पुरवठादार मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांनी पुरवठा केलेला नसल्यामुळे त्यांची सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात आलेली असुन मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर यांना ०३ वर्षासाठी काळया यादीत समाविष्ट केले आहे. | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | |
| १७ | मागील पुरवठादार | मे. श्रीनाथ जनरल स्टोअर्स, अहमदनगर |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे. मितल स्टेशनरी & प्रिंटर्स, मुंबई आणि<br>मे. लक्ष्मी मार्केटींग, नासिक |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर -करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | मागील खरेदी    सध्याचे प्राप्त दर    फरक    % ने कमी/जास्त | |
| | ----    ---    ----    ---- | |

२३. संक्षिप्त टीप (प्रस्ताव) –संस्थानचे विविध विभागासाठी झेरॉक्स पेपर खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. त्याची मुदत दि. २७.०६.२०१९ रोजी संपलेली होती. या ई- निविदेत ०७ निविदाकारांनी भाग घेतला होता. दि. ०३.०७.२०१९ रोजी या निविदेचे तांत्रिक बीड उघडण्यात आले आहेत. तसेच तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या ०६ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि. ११.०७.२०१९ रोजीचे मा. खरेदी समिती सभेत उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे. मितल स्टेशनरी & प्रिंटर्स, मुंबई यांचे दर A4 आणि Legal (F/S) झेरॉक्स पेपरसाठी तर मे. लक्ष्मी मार्केटींग, नासिक यांचे स्टेटमेंट साईज झेरॉक्स पेपरसाठी itemwise न्युनतम आहेत.

तरी संस्थानचे विविध विभागासाठी झेरॉक्स पेपर खरेदीसाठी न्युनतम निविदाधारक मे. मितल स्टेशनरी & प्रिंटर्स, मुंबई आणि मे. लक्ष्मी मार्केटींग, नासिक यांचेशी त्यांनी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन सदरचा विषय मा. स्थानिक उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे विविध विभागासाठी झेरॉक्स पेपर खरेदी करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक मे.मितल स्टेशनरी ॲन्ड प्रिंटर्स, मुंबई आणि मे.लक्ष्मी मार्केटींग,नाशिक यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**मे. मितल स्टेशनरी & प्रिंटर्स, मुंबई**

| Sr. No | Description of Item(s) | Qty. In Packets. | निविदेतील L1 दर रुपये प्रती पॅकेटस |
|---|---|---|---|
| 1.00 | **झेरॉक्स पेपर लिगल-१३x८ F/S)- कंपनी-जे.के/रजत/स्पॅक्ट्रो/तत्सम ८० जीएसएम, (५०० शीट्स=१ पॅकेट)** | 4000 | 237.41 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2.00 | झेरॉक्स पेपर छोटे-११x८ (A4)- कंपनी-जे.के/रजत/स्पॅक्ट्रो/तत्सम ८० जीएसएम, (५०० शीट्स=१ पॅकेट) | 5000 | 197.74 |

मे. लक्ष्मी मार्केटींग, नासिक

| Sr. No | Description of Item(s) | Qty In Packets. | निविदेतील L1 दर रुपये प्रती पॅकेटस |
|---|---|---|---|
| 3.00 | स्टेंटमेंट साईज झेरॉक्स पेपर- (A3)- कंपनी-जे.के/रजत/स्पॅक्ट्रो/तत्सम ८० जीएसएम, (५०० शीट्स=१ पॅकेट) | 40.00 | 259.49 |

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

२ **प्रसादालय विभागासाठी खाद्यतेल खरेदीकामी फेर ई-निविदेत प्राप्त न्युनत्तम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे प्रसादालय विभागासाठी खादयतेल खरेदीकामी ऑनलाईन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | खादयतेल खरेदी |
| ०२ | मागणी | खादयतेल |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. १९.०६.२०१९ ते दि. ०१.०७.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व १५निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | १५ ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १९.०६.२०१९<br>टेक्निकल बीड – ११.०७.२०१९<br>कमर्शियल बीड – १८.०७.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ४ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ४ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | होय |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

Period of July-2019 to September-2019

| Sr. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind kirana stores | M/S PRAMOD SUPPLIERS | Ramnath Jagannath and company | Kailas Food And Kirana General Stores |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate |
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg.Tin | 750.50 | Quintal | 9286.00 | 9481.50 | 9590.00 | 9150.00 |

Period of October-2019 to December-2019

| Sr. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind kirana stores | M/S PRAMOD SUPPLIERS | Ramnath Jagannath and company | Kailas Food And Kirana General Stores |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark/FSSAI, New 15Kg. Tin | 750.50 | Quintal | 9389.00 | 9544.50 | 9590.00 | 9190.00 |

Period of January-2020 to March-2020

| Sr No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind kirana stores | M/S PRAMOD SUPPLIERS | Ramnath Jagannath and company | Kailas Food And Kirana General Stores |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate |
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark / FSSAI, New 15Kg.Tin | 750.50 | Quintal | 9432.00 | 9744.00 | 9930.00 | 9250.00 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर –

मागील वर्षीचे दर-

| अ.नं | कालावधी | दर |
|---|---|---|
| १ | एप्रिल ते जून १८ | ८,८७५ |
| २ | जुलै ते सप्टेंबर १८ | ८,८७५ |
| ३ | ऑक्टोबर ते डिसेंबर १८ | ८,८७५ |
| ४ | जानेवारी ते मार्च १९ | ८,८७५ |

या वर्षी प्रथम निविदेत आलेले दर-

| अ.नं | कालावधी | दर |
|---|---|---|
| १ | एप्रिल ते जून १९ | ८,८६५ |
| २ | जुलै ते सप्टेंबर १९ | ८,८६५ |
| ३ | ऑक्टोबर ते डिसेंबर १९ | ८,८७५ |
| ४ | जानेवारी ते मार्च २० | ८,८७५ |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | वरील अ.नं १३ मध्ये नमुद केले आहेत. |
| १७ | मागील पुरवठादार | मे.कैलास फुड ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे.कैलास फुड ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |

| | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| २२ | ---- | --- | ---- | ---- |

२३. संक्षिप्त टीप (प्रस्ताव)– संस्थानचे प्रसादालय विभागासाठी खादयतेल खरेदीकामी सदर फेर ई-निविदा राबविण्यात आलेली असुन या ई-निविदेमध्ये ०४ निविदाधारकांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये ४ ही निविदाधारक पात्र ठरले होते. तसेच नमुने निवडीमध्ये ०४ निविदाधारक पात्र ठरले आहेत. सदर पात्र ०४ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.१८.०७.२०१९ रोजी उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये

मे.कैलास फुड ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा निविदाधारक यांचे न्युनतम दर वर सादर केलेल्या तक्त्यामध्ये अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आहेत.

तरी न्युनतम निविदाधारक मे.कैलास फुड ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.कैलास फुड ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालय विभागासाठी खाद्यतेल खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.कैलास फुड ॲण्ड किराणा जनरल स्टोअर्स, सातारा यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

Kailas Food and Kirana General Stores, Satara

| Supply Period- July to September-2019 | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. No | Description | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark / FSSAI, New 15Kg.Tin | 750.50 | Quintal | 9,150.00 |

| Supply Period- Octomber to December-2019 | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. No | Description | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark / FSSAI, New 15Kg.Tin | 750.50 | Quintal | 9,190.00 |

| Supply Period- January to March-2020 | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. No | Description | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
| 1 | Edible Oil (Khadya Tel) Sunflower, Refined, Agmark / FSSAI, New 15Kg.Tin | 750.50 | Quintal | 9,250.00 |

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

३ **प्रसादालय विभागासाठी पत्रावळ खरेदीकामी फेर ई-निविदेत प्राप्त न्युनत्तम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे प्रसादालय विभागासाठी पत्रावळ खरेदीकामी ऑनलाईन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | पत्रावळ खरेदी |
| ०२ | मागणी | पत्रावळ |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. १४.०६.२०१९ ते दि. २७.०६.२०१९<br>प्रथम मुदतवाढ दि.०५.०७.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ६ निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | ६ ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १४.०६.२०१९ |

| | | |
|---|---|---|
| | | टेक्निकल बीड – ११.०७.२०१९<br>कमर्शियल बीड – १८.०७.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ५ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ३ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ५ पैकी २ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे तर ३ निविदाधारकांना MSME अंतर्गत सुट होती. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर – | |

| Sr. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | SAMADHAN RAJARAM CHAVAN | Ganesha Packaging | SAI PLASTO INDUSTRIES |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Plain disposable leaf plates (Patraval Plain) Cutting, Kacchi Badam | 12000 | Nos. | 1.20 | 1.00 | 1.00 |
| 2 | Leaf Patraval- Four Block, १४ इंच, पळसाच्या अथवा तत्सम पानापासून बनविलेली पर्यावरण पुरक पत्रावळी सपोर्ट पेपर- 80 GSM पॉली पेपर- पर्यावरण पुरक/विघटण होणारा (To be supplied as per Schedule given in Tender documents.) | 2500000 | Nos. | 2.05 | 1.85 | 1.96 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – प्रथम खरेदी | |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |
| १६ | मागील खरेदी दर | प्रथम खरेदी |
| १७ | मागील पुरवठादार | ----- |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | मे.गणेशा पॅकेजींग, सिन्नर व मे. साई प्लास्टो इंडस्ट्रीज, संगमनेर |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |

| | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
|---|---|---|---|---|
| २२ | ---- | --- | ---- | ---- |

२३. संक्षिप्त टीप (प्रस्ताव) - संस्थानचे प्रसादालय विभागासाठी प्लेन व चार कप्प्यांची पत्रावळ खरेदीकामी ई-निविदा राबविण्यात आलेली असुन या ई-निविदेमध्ये ०५ निविदाधारकांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये ३ निविदाधारक पात्र ठरले होते. सदर पात्र ०३ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.१८.०७.२०१९ रोजी उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये प्लेन पत्रावळसाठी मे.गणेशा पॅकेजींग, सिन्नर व मे. साई प्लास्टो इंडस्ट्रीज, संगमनेर यांचे दर सादर केलेल्या तक्त्यामध्ये अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम व समान आहेत. तर पत्रावळ चार कप्प्यांसाठी मे.गणेशा पॅकेजींग, सिन्नर यांचे दर न्युनतम आहेत.

तरी न्युनतम निविदाधारक मे.गणेशा पॅकेजींग, सिन्नर व मे. साई प्लास्टो इंडस्ट्रीज, संगमनेर यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. उपसमितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.गणेशा पॅकेजींग, सिन्नर हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली. तर मे. साई प्लास्टो इंडस्ट्रीज, संगमनेर हे चर्चेसाठी अनुपस्थित होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालय विभागासाठी पत्रावळ खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे.गणेशा पॅकेजींग, सिन्नर व मे. साई प्लास्टो इंडस्ट्रीज, संगमनेर यांचे खालील प्रमाणे निम्नतम दर स्विकारणे येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच Plain disposable leaf plates (Patraval Plain) Cutting, Kacchi Badam यासाठी मे.गणेशा पॅकेजींग, सिन्नर व मे. साई प्लास्टो इंडस्ट्रीज, संगमनेर यांचे दर समान असल्याने त्यांना विभागुन पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

Ganesha Packaging, Sinnar

| Supply Period July 19 to March-2020 | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. No | Description | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
| 1 | Plain disposable leaf plates ( Patraval plain) Kacchi Badam | 6,000 | Nos | 1.00 |
| 2 | Leaf Patraval - Four Block, 14 इंच पळसाच्या अथवा तत्सम पानापासून बनवलेली पर्यावरण पुरक पत्रावळी सपोर्टपेपर- ८०जी.एस.एम पॉलीपेपर पर्यावरण पुरक/ विघटण होणारा ( To be supplied as per Schedule given in Tender documents. | 25,00,000 | Nos | 1.85 |

SAI PLASTO INDUSTRIES, SANGAMNER

| Supply Period July 19 to March-2020 | | | | |
|---|---|---|---|---|
| Sr. No | Description | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs |
| 1 | Plain disposable leaf plates ( Patraval plain) Kacchi Badam | 6,000.00 | Nos | 1.00 |

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

४ **प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन विभागासाठी हरबरा डाळ खरेदीकामी नमुने निवडलेल्या निविदाधारकातुन प्राप्त झालेल्या न्युनत्तम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती विभागांसाठी हरबराडाळ खरेदीकामी ऑनलाईन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/वस्तुचा तपशिल | हरबरा डाळ खरेदी |
| ०२ | मागणी | हरबराडाळ |
| ०३ | ई-निविदा प्रसिद्धी | दि. १९.०६.२०१९ ते दि. ०१.०७.२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व १५ निविदाधारकांना ई-मेल व्दारे |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले? | १५ ईमेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | दिनांक – १९.०६.२०१९<br>टेक्निकल बीड – ११.०७.२०१९<br>कमर्शियल बीड – १८.०७.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ८ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ८ |

| | | |
|---|---|---|
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | होय. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली आहे का ? | ८ पैकी ७ निविदाधारकांनी बयाणा रक्कम भरलेली आहे तर १ निविदाधारकाला MSME अंतर्गत सुट होती. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | --- |

१२ निविदाकारांनी सादर केलेले दर –

July-2019 to September-2019

| Sr. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind kirana stores | M/S Santosh Trading Company | M/S PRAMOD SUPPLIERS | S S T Udyog |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate |
| 1 | Split gram (Harbaradal) UnPolished, Dry, Stoneless | 1900 | Quintal | 5648 | 5771 | 5490 | 7700 |

Octomber-2019 to December-2019

| Sr. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind Kirana stores | M/S Santosh Trading Company | M/S PRAMOD SUPPLIERS | S S T Udyog |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate |
| 1 | Split gram (Harbaradal) UnPolished, Dry, Stoneless | 1900 | Quintal | 5888 | 5991 | 5780 | 7700 |

January 2020 to March 2020

| Sr. No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | jaihind kirana stores | M/S Santosh Trading Company | M/S PRAMOD SUPPLIERS | S S T Udyog |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate |
| 1 | Split gram (Harbaradal) UnPolished, Dry, Stoneless | 1900 | Quintal | 5827 | 6200 | 5870 | 7700 |

१३ यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि खरेदी दर – मागील वर्षीचे दर-

| अ.नं | कालावधी | दर |
|---|---|---|
| १ | एप्रिल ते जून १८ | ४,८९९ |
| २ | जुलै ते सप्टेंबर १८ | ४,९२५ |
| ३ | ऑक्टोबर ते डिसेंबर १८ | ५,१८५ |
| ४ | जानेवारी ते मार्च १९ | ५,०४१ |

या वर्षी प्रथम निविदेत आलेले दर-

| अ.नं | कालावधी | दर |
|---|---|---|
| १ | एप्रिल ते जून १९ | ५,३५० |
| २ | जुलै ते सप्टेंबर १९ | ५,४०० |
| ३ | ऑक्टोबर ते डिसेंबर १९ | ५,५०० |
| ४ | जानेवारी ते मार्च २० | ५,३७५ |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल - --- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | --- |

| | | |
|---|---|---|
| १६ | मागील खरेदी दर | वरील अ.नं १३ मध्ये नमुद केले आहेत. |
| १७ | मागील पुरवठादार | हिरालाल चुन्नीलाल भराडिया, नांदेड व रामनाथ जगन्नाथ अॅण्ड कंपनी, नाशिक |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं १२ मध्ये नमुद केले आहेत. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाकाराचे नाव | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर - करण्यात आला आहे का ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपजिल्हाधिकारी, मा. उपकार्यकारी अधिकारी, मा.मुख्यलेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, प्र.अधिक्षक, खरेदी |
| २२ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त | |
| | ---- --- ---- ---- | |

२३. संक्षिप्त टीप (प्रस्ताव) –संस्थानचे प्रसादालय, लाडू निर्मिती विभागांसाठी हरबराडाळ खरेदीकामी सदर फेर ई-निविदा राबविण्यात आलेली असुन या ई-निविदेमध्ये ०८ निविदाधारकांनी भाग घेतला होता. याकामी तांत्रिक निविदेमध्ये ८ ही निविदाधारक पात्र ठरले होते. तसेच नमुने निवडीमध्ये ०४ निविदाधारक पात्र ठरले आहेत. सदर पात्र ०४ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.१८.०७.२०१९ रोजी उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये जुलै ते सप्टेंबर २०१९ व ऑक्टोबर ते डिसेंबर २०१९ या कालावधीसाठी मे.प्रमोद सप्लायर्स,मुंबई यांचे तर जानेवारी ते मार्च-२० या कालावधीसाठी मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचे न्युनतम दर वर सादर केलेल्या तक्त्यामध्ये अधोरेखित केलेप्रमाणे न्युनतम आहेत.

तरी न्युनतम निविदाधारक मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई व मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक यांचेशी निविदेत दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा. स्थानिक उप समितीचे सभेत निर्णयार्थ सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील माहे जुलै ते सप्टेंबर-२०१९ व ऑक्टोंबर ते डिसेंबर-२०१९ या कालावधीसाठी निम्नतम दर असलेले मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले.**

Pramod Suppliers , Mumbai

| Supply Period- July to September-2019 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Description | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs | चर्चेअंती देऊ केलेले दर |
| 1 | Split gram (Harbaradal) UnPolished, Dry, Stoneless | 1900.00 | Quintal | 5,490.00 | 5,470.00 |

| Supply Period- October to December-2019 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Description | No.of Qty | Units | L1 Rate in Tender Rs | चर्चेअंती देऊ केलेले दर |
| 1 | Split gram (Harbaradal) UnPolished, Dry, Stoneless | 1900.00 | Quintal | 5,780.00 | 5,770.00 |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसादालय, लाडू निर्मिती, कॅन्टीन विभागासाठी हरबरा डाळ खरेदीकामी माहे जुलै ते सप्टेंबर-२०१९ व ऑक्टोंबर ते डिसेंबर-२०१९ या कालावधीसाठी निम्नतम दर असलेले मे.प्रमोद सप्लायर्स, मुंबई यांनी चर्चेअंती देऊ केलेले वरील प्रमाणे अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, तसेच माहे जानेवारी ते मार्च-२०२० या कालावधीसाठीचे निम्नतम दरधारक मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिक हे चर्चेसाठी अनुपस्थित होते, तथापी त्यांनी नमुद केलेले दर जास्त असल्याने माहे जानेवारी ते मार्च-२०२० या कालावधीसाठी हरबरा डाळ खरेदी करणेकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**५ श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता CAMC देणेकामी प्राप्त ई-निविदेतील निम्नत्तम दरधारकाशी चर्चा वाटाघाटी करणेबाबत.**

| | | |
|---|---|---|
| ०१ | कामाचे नांव | श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता CAMC देणेकामी |
| ०२ | प्रशासकीय मान्यता | दिनांक १७/०५/२०१९ रोजीची मंजुर टिपणी |
| ०३ | अंदाजे खर्च | रु. ४,०८,९७५/- + GST |
| ०४ | प्रस्तावाची थोडक्यात माहिती. | श्री साई प्रसादालयातील मुख्य किचन, लाडु किचन, बुंदी किचन व चपाती किचन येथील कर्मचा-यांना उष्णतेचा त्रास कमी होणेसाठी बसविणेत आलेल्या वायुविजन यंत्रणेचे एक वर्षासाठी कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता ई-निविदा मागविणेस व याकामी येणा-या रुपये ४,०८,९७५/- (GST अतिरीक्त) मात्रचे अपेक्षित खर्चास दिनांक १७.०५.२०१९ रोजीचे टिपणी अन्वये मान्यता घेणेत आलेली आहे. |
| ०५ | ई-निविदा तपशिल - | ई निविदा नोटीस महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर अपलोड करण्यात आली होती. ई निविदा अपलोड करण्याची मुदत दि. १०.०६.२०१९ ते दि. १८.०६.२०१९ पर्यत देण्यात आली होती. मात्र मुदतीत एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने दिनांक २५.०६.२०१९ पर्यंत मुदतवाढ देणेत आली. सदर मुदतीत दोनच निविदा प्राप्त झालेल्या असल्याने दिनांक ०२.०७.२०१९ पर्यत दुस-यांदा मुदतवाढ देणेत आली होती |
| | I. कामाची मुदत | ३६५ दिवस |
| | II. तांत्रिक निविदा उघडण्याची दिनांक व वेळा | दिनांक ०५/०७/२०१९ सकाळी ११ : ०० वाजता |
| | III. प्राप्त ई-निविदा | ०२ |
| | IV. प्राप्त ई-विदाधारकांनी सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन जमाकेले आहेत का ? | होय |
| | V. सर्व निविदाधारकांनी EMD भरलेले कागदपत्रे जमा केले आहेत का ? | होय |
| | VI. मागील वर्षाकरीता निम्नत्तम दर रूपये | -<br>,८९,५००/- + GST |
| | VII. मागील निम्नत्तम दर धारक | - मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई |

ई-निविदा प्रक्रियातील तांत्रिकदृष्टया पात्र निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तपशील.

| **अ.नं.** | **निविदाधारकांचे नाव** | **ई-निविदेतील प्राप्त दर रक्कम (GST वगळता)** | **शेरा** |
|---|---|---|---|
| १. | मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई | ३,४९,२००/- | L 1 |
| २. | मे. हेरंब एंटरप्राईजस, जळगाव | ३,६९,८००/- | L 2 |

उपरोक्त तपशिला नुसार,श्री साई प्रसादालयातील मुख्य किचन, लाडु किचन, बुंदी किचन व चपाती किचन येथील कर्मचा-यांना उष्णतेचा त्रास कमी होणेसाठी बसविणेत आलेल्या वायुविजन यंत्रणेचे एक वर्षासाठी कॉम्प्रेसिव्ह वार्षिक सर्व्हिस कॉन्ट्रक्ट (CAMC) देणेकरीता मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे दर रक्कम रूपये - ३,४९,२००/- + GST (अक्षरी रक्कम रूपये - तीन लाख एकोणपन्नास हजार, दोनशे + GST) मात्र निम्नत्तम असुन त्यांचेशी प्राप्त दराबाबत चर्चा / वाटा घाटी करून पुढील कार्यवाही करणे करीता मा. व्यवस्थापन समिती सभेस शिफारस करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. उपसमितीचे सभेपुढे सादर.

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते, तथापी त्यांनी ई-निविदेमध्ये नमुद केलेले दर अंतिम असल्याचे ई-मेल व्दारे कळविले आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयातील वायुविजन यंत्रणेचे एक वर्षाकरीता CAMC देणेकामी निम्नतम निविदाधारक मे. कैलास रेफ्रिजरेशन वर्क्स, मुंबई यांचे निम्नतम दर रक्कम रु.३,४९,२००/- मात्र (GST वगळता) स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)

---

**६ सन २०१९-२०२० करीता दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० या कालावधीसाठी साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंन्ट्रोल करणेकामी निम्नतम दरधारकास वाटाघाटीसाठी उपस्थित रहाणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम- (१)१४/२ घ- भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्ती काम किंवा उपाययोजना हाती घेणे.(२) पोट कलम (१) (ख) भक्तांना राहण्याकरीता व वापर करण्याकरीता विश्रामगृह बांधणे व त्यांची देखभाल करणे.

व्यवस्थापन समितीचा ठराव :- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ रोजीचे विषय नं.३१ व निर्णय क्र.१२६ नुसार यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.०१/०५/२०१९ ते दि. ३०/०४/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या दोन्ही विभागांकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा विभागासाठी एकत्रित अंदाजे खर्च रक्कम रु.८,९३,५८३/- + रु.१,६०,८४५/-(१८ % GST) अशी एकुण रक्कम रु.१०,५४,४२८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रस्ताविक:- श्रींच्या दशर्नासाठी येणा-या साईभक्तांचे निवासासाठी साईआश्रम भक्तनिवास या विभागाकडे १२ इमारती असुन, १ इमारतीमध्ये १२८ रुम याप्रमाणे एकुण १२ इमारती मध्ये १५३६ रुम्स आहेत.

तसेच साईधर्मशाळा विभागाकडे एकुण ४ इमारती असुन एका इमारतीत ३२ हॉल या प्रमाणे ४ इमारतीमधील १२८ हॉलमध्ये सहली, ग्रुपने येणारे साईभक्त,अंध/अपंग इत्यादींची निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

मे. पेस्ट कंट्रोल एम. वॉल्श, मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/८१८/२०१८ दि.१८/०५/२०१८ अन्वये दि.०१/०५/२०१८ ते दि. ३०/०४/२०१९ या एक वर्ष कालावधीत दोन्ही निवासस्थानामध्ये वार्षिक सहा औषध फवारणी करणे कामी कार्यादेश देण्यात आलेला होता. कार्यदेशाची मुदत ३०/०४/२०१९ अखेर सपुंष्ठात आली आहे.

लोकसभा निवडणुक आदर्श आचार सहिता लागु असल्याने निविदा प्रक्रीया करता आली नाही. तसेच ई-निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने याकालावधीत औषध फवारणी करणे आवश्यक आहे. साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा दोन्ही विभागाकडील पेस्ट कंट्रोल करणे कामी नविन ठेकेदार नेमणुक होई पर्यंत सध्याचे मे. पेस्ट कंट्रोल एम. वॉल्श, मुंबई यांचे कडुन दि.०१/०६/२०१९ ते दि.३०/०९/२०१९ याकालावधीत दोन औषध फवारणी कामी जा.नं.एसएसएस/वशी-साईधर्मशाळा/६८३/२०१९ दि.३०/०५/२०१९ अन्वये दि.०१/०६/२०१९ ते दि.३०/०९/२०१९ या कालावधीसाठी मुदतवाढीचा कार्यादेश देण्यात आलेला आहे.

दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करुन घेणे साईभक्तांचे सुविधेसाठी आवश्यक आहे. सन २०१९-२० करीता दि. ०१/१०/२०१९ ते दि. ३०/०९/२०२० या एक वर्ष कालावधीसाठी दैनिक वर्तमान पत्रात सूचना जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत दि. १९/०६/२०१९ रोजी प्रसिध्द करणेत आली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या व संस्थानच्या अधिकृत संकेतस्थळावर ई-निविदा दि. १९/०६/२०१९ रोजी अपलोड करणेत आली.

ई-निविदाधारकांना निविदा भरणेपूर्वी निविदा संदर्भात काही अडचणी असल्यास त्यांचे निरसन करणेकामी दि. २६/०६/२०१९ रोजी प्री-बीड मिटींग ठेवण्यात आली होती. सदर मिटींगचे इतिवृत्त माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे संकेतस्थळावर व ई.डी.पी. विभागामार्फत महाराष्ट्र शासनाचे

www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करुन, ई – निविदा ऑनलाईन सादर करण्याची अंतिम मुदत दि.०४/०७/२०१९ अखेर होती.

सदर ई-निविदे प्रक्रियेमध्ये मुदतीत सात निविदाधारकांच्या निविदा प्राप्त झाल्या. ऑनलाईन प्राप्त तांत्रिक बीड (Technical Bid) दि. ११/०७/२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेसमोर उघडण्यात येवून, कागदपत्रांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन लेखाशाखा विभागाकडुन तपासुन घेण्यात आलेला आहे. त्यामधील पात्र / अपात्र निविदांचा तपशिल खालील प्रमाणे –

| अ.नं | निविदाधारकांचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| १ | APS Agro Trading, Nashik | अपात्र |
| २ | **Central Warehousing Corporation, Navi Mumbai** | **पात्र** |
| ३ | IPM and Fumigation,Chunabhatti , Mumbai | अपात्र |
| ४ | National Pest Management Techniques, Nagapur, Ahmadnagar | अपात्र |
| ५ | Pepcopp pest Control Services Pvt., Mumabi | अपात्र |
| ६ | **Pest Control M.Walshe, Mumbai** | **पात्र** |
| ७ | Pest Terminators, Pune | अपात्र |

अ.नं. ०२ व अ.नं. ०६ यांचे प्राईज बीड उघडणे कामी शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका मधील नियम क्र.४.४.३.१ निविदा कालावधीस मुदतवाढ मधील (ब) दोन निविदा तांत्रिकदृष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-) २० टक्के ते (+)१० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहिल. या किंमत श्रेणीमध्ये (Price Band) किंमती न आल्यास फेरनिविदा काढावी.

उपरोक्त नमुद शासन नियमावली नुसार अ.नं. २ व ६ क्रमांकाचे पात्र झालेले निविदाधारकांचे प्राईज बिड (बीड ऑफ कोटेशन) दि.१८/०७/२०१९ रोजीचे स्थानिक खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आले.

**मागणी-** साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा येथे पेस्ट कंट्रोल करणेकामीचा तपशिल खालील प्रमाणे -

| **अ.नं.** | **पात्र ई- निविदाधारकांची नावे** | **साईआश्रम भक्तनिवास** १२ इमारती (१५३६ खोल्या) ३४९७३५.०० चौ.फुट **साईधर्मशाळा** ०४ इमारती ( १२८ हॉल करीता) १०५३९९.६८ चौ.फुट तसेच इमारती मधील खोल्या, टॉयलेट, बाथरुम व स्टोअर रुम यांचे एकुण क्षेत्रफळ | **फवारणीचा चौ. फुट दर** Exclusive of All Taxes **दर प्रति चौ. फुट रुपये पैसे** | **वार्षिक दर (एकुण सहा फवारणी ) रुपये पैसे** |
|---|---|---|---|---|
| 1 | Central Warehousing Corporation, Navi Mumbai | ४५५१३४.६८ चौ. फुट. | 2.04 | 9,28,474.75 |
| 2 | Pest Control M.Walshe, Mumbai | | 1.50 | 6,82,702.02 |
| Note – Rate of GST as applicable by Govt, time to time | | | | |

उपरोक्त तक्त्यात दर्शविलेप्रमाणे अ.नं. ०२ मधील Pest Control M.Walshe, Mumbai हे निम्नतम दरधारक आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मतः- सन २०१९-२० करीता दि. ०१/१०/२०१९ ते दि.३०/०९/२०२० या वर्ष कालावधीसाठी साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणे कामी ई-निविदा प्रक्रिया राबवितांना निविदाधारकांकडुन GST वगळुन दर मागविण्यात आले आहेत.

शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची सुधारित नियमपुस्तिका मधील नियम क्र.४.४.३.१ निविदा कालावधीस मुदतवाढ मधील (ब) दोन निविदा तांत्रिकदुष्टया पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-)२० टक्के ते (+)१० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहिल. त्यानुसार अगोदरची अंदाजित रक्कम

रु.१०,५४,४२८/- या रकमेची (-)२० टक्के रक्कम रु.२,१०,८८५.६० वजा करुन रु. ८,४३,५४२.४० रक्कम येत असुन पात्र ठरलेल्या Pest Control M.Walshe, Mumbai यांचे निम्नतम वार्षिक दर रु. ६,८२,७०२.०२ असे आहेत.

शासकीय नियमावली नियम क्र.४.४.३.१ मधील (ब) - (-)२० टक्के ते (+)१० टक्के तफावत चार्ट

| (-)२० टक्के | | | (+) १० टक्के | | | ई- निविदेत प्राप्त निम्नतम दर Pest Control M. Walshe रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| किटकनाशक औषध फवारणीकामी **अगोदरची अंदाजित किमंत** कॉलम १ | या रक्कमेवर (-)२० टक्के रक्कम रुपये कॉलम २ | कॉलम १ (वजा) कॉलम २ रक्कम रुपये | कॉलम न. ०१ | कॉलम न. ०१ चे १० टक्के | एकुण रक्कम | |
| १०,५४,४२८/- | २,१०,८८५.६० | ८,४३,५४५.४० | १०,५४,४२८/- | १,०५,४४२.८० | ११,५९,८७०.८० | ६,८२,७०२.२० |

त्यानुसार पात्र निविदाधारकांचे वाणिज्यिक बीड (Financial Bid) खरेदी समितीचे दि. १८/०७/२०१९ रोजीचे सभेत उघडुन त्यामध्ये अ.नं क्र.०२ मधील Pest Control M.Walshe, Mumbai यांचे निम्नतम वार्षिक दर रु.६,८२,७०२/- (अक्षरी रु. सहा लाख ब्याऐंशी हजार सातशे दोन मात्र) प्राप्त झालेले आहेत.

पात्र निविदाधारकांपैकी निम्नतम दर आलेले Pest Control M.Walshe, Mumabi, हे मागील सन २०१७-१८ व २०१८-१९ या दोन वर्षापासुन दोन्ही विभागाकडे पेस्ट कंट्रोलचे काम करीत आहे. त्यांचे कामाचा दर्जा चांगला असुन काम समाधानकारक आहे. त्यांचे कामाबाबत साई भक्तांची कुठलिही तक्रार नाही. तरी पेस्ट कंट्रोलचे काम Pest Control M.Walshe, Mumbai यांना देण्यास हरकत नाही, असे नम्र मत आहे.

**विभागवार वर्गीकरण**

| किटक नाशक फवारणी करणे कामी कंत्राट कालावधी | निम्नतम दर असलेले ई -निविदधारकाचे नाव | अ.नं. | विभागाचे नाव | फवारणीचा चौ. फुट दर Exclusive of All Taxes दर प्रति चौ. फुट रुपये पैसे | वार्षिक दर (एकुण सहा फवारणी ) रुपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| दि.०१/१०/२०१९ ते दि.३०/०९/२०२० एक वर्ष कालावधी करीता | पेस्ट कंट्रोल एम वॉल्श, मुंबई | १ | **साईआश्रम भक्तनिवास** १२ इमारती (१५३६ खोल्या) ३४९७३५.०० चौ.फुट | १.५० | ५,२४,६०२.५० |
| | | २ | **साईधर्मशाळा** ०४ इमारती (१२८ हॉल करीता) १०५३९९.६८ चौ.फुट | | १,५८,०९९.५२ |
| | | **एकूण रक्कम रुपये** | | | ६,८२,७०२.०२ |
| | | **पुर्णांकित रक्कम रु.** | | | ६,८२,७०२/- |
| | | | | | **अक्षरी रुपये – (सहा लाख ब्यऐंशी हजार सातशे दोन मात्र)** |

साईआश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंट्रोल करणेकामी दि. ०१/१०/२०१९ ते दि.३०/०९/२०२० अखेर निम्नतम दरधारक Pest Control M.Walshe, Mumbai यांना वाटाघाटीसाठी बोलविणेस सदरचा विषय मा.स्थानिक उपसमितीचे सभेसमोर सादर.

**प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक Pest Control M.Walshe, Mumbai हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी दर कमी करणेस असमर्थता दर्शविली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२०२० करीता दि.०१.१०.२०१९ ते दि.३०.०९.२०२० या कालावधीसाठी साई आश्रम भक्तनिवास व साई धर्मशाळा या दोन्ही विभागाकडील इमारतीमध्ये व परिसरात पेस्ट कंन्ट्रोल करणेकामी निम्नतम दरधारक Pest Control M.Walshe, Mumbai यांचे रक्कम रु.१.५० प्रति चौ.फुट या प्रमाणे वार्षिक सहा फवारणीकरीता एकुण रक्कम रु.६,८२,७०२/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- साई धर्मशाळा)**

---

७ **साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागाकडील सन २०१९-२० मधील दि.०१.०९.२०१९ ते दि.३१.०८.२०२० या कालावधीसाठी निम्नतम दरधारकास लॉन्ड्री कामाचा चर्चा वाटाघाटी करुन कार्यादेश देणेस मान्यता मिळणेबाबत.**

संस्थानचे साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा विभागाकडील बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व भक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करुन घेणेकामी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती.

| | | |
|---|---|---|
| १ | करावयाचे कामाचा तपशील | बेडशीट, उशी कव्हर धुणे/इस्त्री करणे, टॉवेल धुवून ड्रायर करणे, चादर धुणे व भक्तांचे कपडे भक्तांकडून शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे. |
| २ | मागणी | प्रति नगासाठीचे दर सर्व करासह |
| ३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.२७/०६/२०१९ |
| ४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.inवरुन संस्थानचे संकेतस्थळावरुन व पुरवठाधारकांना दुरध्वनी व ई-मेलव्दारे |
| ५ | तर तसे कोणाला पाठविले. | - |
| ६ | निविदा सुरु झालेची दिनांक व वेळ | २८/०६/२०१९ वेळ – सकाळी ११.०० वाजेपासून |
| ७ | प्राप्त निविदाधारकांची संख्या | ०३ |
| ८ | पात्र निविदाधारकांची संख्या | ०३ |
| ९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का ? | नाही |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का? | होय |
| ११ | जर नमुने दिले नाही तर का ? | लॉण्ड्री धुणे व इस्त्री करणेचे काम असल्याने नमुने मागणी केली नाही. |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर | |

अ) संस्थानचे सन २०१९-२० साठीचे कपड्यांसाठी दर

| अ.नं | कपडयांचा तपशील | लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था, सिडको औरंगाबाद प्रती नग दर रु.(सर्वकरासह) | विजय अशोक चव्हाण साईश्रध्दा लॉण्ड्री सावळीविहीर प्रती नग दर रु.(सर्वकरासह) | गुरुकृपा लॉन्ड्री,शिर्डी प्रती नग दर रु. (सर्वकरासह) |
|---|---|---|---|---|
| १ | बेड्शीट धुवून इस्त्री करणे | २८.०० | ४.४८ | ४.४० |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | १३.०० | २.२० | २.०० |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | १७.०० | ११.८० | ३.८० |
| ४ | सोलापूर चादर धुणे | २९.०० | १४.२० | ११.८० |
| ५ | चादर धुणे | २७.०० | १०.२० | ८.२५ |
| ६ | गादीच्या खोळी धुणे | २४.०० | १०.०० | ८.२५ |

आ) **ब)** भक्तांचे सन २०१९-२० चे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे कामासाठीचे दर

| अ.नं | कपड्यांचा तपशील | लोकसेवा सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था, सिडको औरंगाबाद प्रती नग दर (सर्वकरासह) | विजय अशोक चव्हाण साईश्रध्दा लॉण्ड्री सावळीविहीर प्रती नग दर (सर्वकरासह) | गुरुकृपा लॉन्ड्री,शिर्डी प्रती नग दर (सर्वकरासह) |
|---|---|---|---|---|
| | **पुरुषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | ३४ | ३० | २५ |
| २ | शर्ट/टी शर्ट | १६ | १५ | १५ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | १६ | १५ | १५ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ४ | जाकेट/स्वेटर | १९ | २० | १२ | |
| | | **पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | | |
| | १ | सफारी सुट | १५ | १५ | १३ | |
| | २ | शर्ट/टी शर्ट | ७ | ८ | ७ | |
| | ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ८ | ८ | ७ | |
| | ४ | जाकेट/स्वेटर | १० | १० | ७ | |
| | | **महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | | |
| | १ | साडी | २७ | ३० | २५ | |
| | २ | ब्लाऊज | १२ | १० | ८ | |
| | ३ | टी-शर्ट | १७ | १५ | १५ | |
| | ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | १७ | १५ | १५ | |
| | ५ | पॅन्ट/जीन्स | १९ | १५ | १५ | |
| | ६ | नाईट सुट | २६ | २५ | २५ | |
| | ७ | जाकेट/स्वेटर | १९ | २० | १५ | |
| | ८ | पेटीकोट/गाऊन | १९ | २० | १५ | |
| | | **महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | | |
| | १ | साडी | २० | १५ | २० | |
| | २ | ब्लाऊज | ७ | ६ | ७ | |
| | ३ | टी-शर्ट | ८ | ८ | ७ | |
| | ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ८ | ८ | ७ | |
| | ५ | पॅन्ट/जीन्स | ८ | ८ | ७ | |
| | ६ | नाईट सुट | १० | १० | ७ | |
| | ७ | जाकेट/स्वेटर | १० | १० | ७ | |
| | ८ | पेटीकोट/गाऊन | १० | १० | ७ | |
| | | **मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | | |
| | १ | सफारी सुट | २५ | ३० | १५ | |
| | २ | शर्ट/टी शर्ट | १२ | १५ | १५ | |
| | ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | १६ | १५ | १५ | |
| | ४ | जाकेट/स्वेटर | १६ | २० | १५ | |
| | ५ | शॉर्ट पॅन्ट | १६ | १० | १५ | |
| | | **मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | | |
| | १ | सफारी सुट | १२ | १५ | ७ | |
| | २ | शर्ट/टी शर्ट | ८ | ८ | ७ | |
| | ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ८ | ८ | ७ | |
| | ४ | जाकेट/स्वेटर | ८ | १० | ७ | |
| | ५ | शॉर्ट पॅन्ट | ७ | ८ | ७ | |
| १३ | **संस्थानचे सन २०१८-१९ साठीचे कपडे धुवून इस्त्री करणेकामाचे दर** | | | | | |

**१) द लॉण्ड्री सेंटर नाशिक**

आ) संस्थानचे कपडे धुणे इस्त्री करणे कामासाठीचे दर.

| अ.नं | कपड्यांचा तपशील | मुळ प्रती नग दर | GST 18% | प्रती नग दर (सर्वकरांसह) |
|---|---|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ४.०० | ०.७२ | ४.७२ |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | २.०० | ०.३६ | २.३६ |
| ३ | सोलापूर चादर धुणे | ७.०० | १.२६ | ८.२६ |
| ४ | चादर धुणे | ६.०० | १.०८ | ७.०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | गादीच्या खोळी धुणे | ६.०० | १.०८ | ७.०८ |

**२) साईश्रध्दा लॉन्ड्री अॅन्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर.**

अ) संस्थानचे कपड्यासाठी दर

| अ नं. | कपड्यांचा तपशील | मुळ प्रती नग दर रुपये पैसे | GST 18% रुपये पैसे | प्रती नग दर रुपये (सर्वकरासह) |
|---|---|---|---|---|
| १ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ४.०० | ०.७२ | ४.७२ |
| २ | चादर धुणे | ६.०० | १.०८ | ७.०८ |
| ३ | गादीच्या खोळी धुणे | ६.०० | १.०८ | ७.०८ |

ब) साईभक्तांचे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे .

| अ.नं | कपड्यांचा तपशील | मुळ प्रती नग दर रुपये पैसे | GST 18% रुपये पैसे | प्रती नग दर रु. (सर्व करांसह) |
|---|---|---|---|---|
| | **पुरुषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | २५.४२ | ४.५८ | ३० |
| २ | शर्ट /टी-शर्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ४ | जाकेट/स्वेटर | १२.७१ | २.२९ | १५ |
| | **पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | १२.७१ | २.२९ | १५ |
| २ | शर्ट /टी-शर्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ५.९३ | १.०७ | ७ |
| | **महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | साडी | २५.४२ | ४.५८ | ३० |
| २ | ब्लाऊज | ८.४७ | १.५३ | १० |
| ३ | टी-शर्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ४ | स्लॅक्स/ शॉर्ट पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ५ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ६ | नाईट सुट | २१.१८ | ३.८२ | २५ |
| ७ | जाकेट /स्वेटर | १२.७१ | २.२९ | १५ |
| ८ | पेटीकोट/गाऊन | १२.७१ | २.२९ | १५ |
| | **महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| १ | साडी | १६.९४ | ३.०६ | २० |
| २ | ब्लाऊज | ५.९३ | १.०७ | ७ |
| ३ | टी-शर्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ५ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ६ | नाईट सुट | ५.९३ | १.०७ | ७ |
| ७ | जाकेट/स्वेटर | ५.९३ | १.०७ | ७ |
| ८ | पेटीकोट/गाऊन | ५.९३ | १.०७ | ७ |
| | **मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | | |
| १ | सफारी सुट | १२.७१ | २.२९ | १५ |
| २ | शर्ट/ टी-शर्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ३ | पॅन्ट / जिन्स पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| ४ | जाकेट/ स्वेटर | १२.७१ | २.२९ | १५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ५ | शॉर्ट पॅन्ट | १२.७१ | २.२९ | १५ |
| | | **मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | | |
| | १ | सफारी सुट | ५.९३ | १.०७ | ७ |
| | २ | शर्ट/ टी-शर्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| | ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |
| | ४ | जकेट/स्वेटर | ५.९३ | १.०७ | ७ |
| | ५ | शॉर्ट पॅन्ट | ५.९३ | १.०७ | ७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशील | साईभक्तनिवास क्षमता व वापरात येणा-या खोल्यानुसार | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | दि.३१/०८/२०१९ रोजी कार्यादेश संपुष्टात येत आहे. | |
| १६ | मागील खरेदी दर | अ.नं.१३ मध्ये दर्शविले प्रमाणे | |
| १७ | मागील पुरवठादार | १) साईश्रध्दा लॉण्ड्री ॲण्ड सर्व्हिसेस, सावळीविहीर<br>२) द लॉण्ड्री सेंटर,नाशिक | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाकाराने सादर केलेले दर | अ.नं.१२ मध्ये दर्शविले प्रमाणे | |
| १९ | सन २०१९-२० साठीचे न्युनतम निविदाकाराचे नाव | गुरुकृपा लॉण्ड्री, शिर्डी | |
| २० | सदर कामाचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का? | होय. | |
| २१ | सदर कामाचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी, संबंधीत प्रभारी अधिक्षक. | |
| २२ | घाऊक व किरकोळ दर यांचे तपशील - मागविण्यात आलेला नाही. | | |
| २३ | सन २०१८-१९ चे दर | सन २०१९-२० चे प्राप्त दर | फरक |
| | १) बेटशीट रु.४.७२ | रु.४.४० | रु.०.३२ कमी |
| | २) उशी कव्हर रु.२.३६ | रु.२.०० | रु.०.३६ कमी |
| | ३) टॉवेल रु.४.७२ | रु.३.८० | रु.०.९२ कमी |
| | ४) सोलापूर चादर रु.८.२६ | रु.११.८० | रु.३.५४ जास्त |
| | ५) चादर रु.७.०८ | रु.८.२५ | रु.१.१७ जास्त |
| | ६) गादीच्या खोळी रु.७.०८ | रु.८.२५ | रु.१.१७ जास्त |

संक्षिप्त टिप- साईआश्रम व साईधर्मशाळा विभागाकडील लॉण्ड्री कामासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती त्यामध्ये तीन निविदाधारकांनी भाग घेतला होता. त्यांचे तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या तीनही निविदाधारकांचे वाणिज्यिक निविदा दि.१८/०७/२०१९ रोजी खरेदी समितीमध्ये उघण्यात येऊन त्यामध्ये

**अ) संस्थानचे सन २०१९-२० साठीचे कपड्यांसाठी दर**

| अ.नं | कपडयांचा तपशील | गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी **प्रती नग दर रु. (सर्वकरासह)** |
|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ४.४० |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | २.०० |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ३.८० |
| ४ | सोलापूर चादर धुणे | ११.८० |
| ५ | चादर धुणे | ८.२५ |
| ६ | गादीच्या खोळी धुणे | ८.२५ |

गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी यांचेसंस्थानचे कपडे व साईभक्तांचे कपडे धुणे/इस्त्री करणे कामाचे दर निम्नतम असल्याने त्यांना मा उपसमिती सभेसमोर.चर्चेसाठी बोलविणेस व निम्नतम दरधारक गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी यांना

लॉन्ड्री कामाचा कार्यादेश देणे कामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समिती सभेकडे शिफारस करणेसाठी सदर प्रस्ताव मा.उपसमिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी दर कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी खालील प्रमाणे अंतिम दर देऊ केले.

अ) संस्थानचे सन २०१९-२० साठीचे कपडयांसाठी दर

| अ.नं | कपडयांचा तपशील | गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी<br>प्रती नग दर रु. (सर्व करासह) |
|---|---|---|
| १ | बेडशीट धुवून इस्त्री करणे | ४.४० |
| २ | उशी कव्हर धुवून इस्त्री करणे | २.०० |
| ३ | टॉवेल धुवून ड्रायर करणे | ३.८० |
| ४ | सोलापूर चादर धुणे | १०.०० |
| ५ | चादर धुणे | ८.२५ |
| ६ | गादीच्या खोळी धुणे | ८.२५ |

ब) भक्तांचे सन २०१९-२० चे कपडे शुल्क आकारुन धुणे/इस्त्री करणे कामासाठीचे दर

| अ.नं | कपड्यांचा तपशील | गुरुकृपा लॉन्ड्री,शिर्डी<br>प्रती नग दर रु. (सर्वकरासह) |
|---|---|---|
| पुरुषांचे कपडे धुणे/इस्त्री करणे | | |
| १ | सफारी सुट | २४ |
| २ | शर्ट/टी शर्ट | १४ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | १४ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ११ |
| पुरुषांचे कपडे फक्त इस्त्री करणे | | |
| १ | सफारी सुट | १२ |
| २ | शर्ट/टी शर्ट | ६ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ६ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ६ |
| महिलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे | | |
| १ | साडी | २४ |
| २ | ब्लाऊज | ७ |
| ३ | टी-शर्ट | १४ |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | १४ |
| ५ | पॅन्ट/जीन्स | १४ |
| ६ | नाईट सुट | २४ |
| ७ | जाकेट/स्वेटर | १४ |
| ८ | पेटीकोट/गाऊन | १४ |
| महिलांचे कपडे फक्त इस्त्री करणे | | |
| १ | साडी | १४ |
| २ | ब्लाऊज | ५ |
| ३ | टी-शर्ट | ६ |
| ४ | स्लॅक्स/शॉर्ट पॅन्ट | ६ |
| ५ | पॅन्ट/जीन्स | ६ |
| ६ | नाईट सुट | ६ |

| | | |
|---|---|---|
| ७ | जाकेट/स्वेटर | ६ |
| ८ | पेटीकोट/गाऊन | ६ |
| **मुलांचे कपडे धुणे/इस्त्री करणे** | | |
| १ | सफारी सुट | १४ |
| २ | शर्ट/टी शर्ट | ११ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | १४ |
| ४ | जाकेट/स्वेटर | १४ |
| ५ | शॉर्ट पॅन्ट | ०९ |
| **मुलांचे कपडे फक्त इस्त्री करणे** | | |
| १ | सफारी सुट | ६ |
| २ | शर्ट/टी शर्ट | ६ |
| ३ | पॅन्ट/जीन्स पॅन्ट | ६ |
| ४ | जाकेट/स्वेटर | ६ |
| | | ६ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साई आश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा या विभागाकडील सन २०१९-२० मधील दि.०१.०९.२०१९ ते दि.३१.०८.२०२० या कालावधीतील लॉन्ड्री कामासाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम दरधारक गुरुकृपा लॉन्ड्री, शिर्डी यांची चर्चेअंती देऊ केलेले वरील प्रमाणे अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा,अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**(कार्यवाही- साई आश्रम भक्तनिवास)**

---

८ **सन-२०१९-२० या आर्थिक वर्षात निरूपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी प्राप्त ई-निविदातील उच्चत्तम दरासंदर्भात निर्णय होणेबाबत.**

मा.व्यवस्थापन समिती दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८ नुसार सन-२०१९-२० या वर्षात संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्याची विहीत पध्दतीने विक्री करणेसाठी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ऑनलाईन व्यापा-यांकडून भंगार साहित्य विक्रीकामी ई-निविदा मागविणेत आलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| ०१ | विक्री करावयाचे साहित्य/वस्तूचा तपशिल | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०२ | मागणी | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि. २०/०६/२०१९ ते ०२/०७/२०१९ |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in<br>संस्थान वेबसाईटवर व मागिल वर्षाच्या व्यापा-यांना दुरध्वनीवरुन |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले | -- |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि. २०/०६/२०१९, टेक्नीकल बीड – ११/०७/२०१९,<br>कमर्शियल बीड – १८/०७/२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०७ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | - |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का | होय . |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का | - |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| Sl. No | Description of Work / Item(s) | No .of Qty | Units | akbar sandekha pathan | MAHAKALI INDUSTRIES | Shafik Shaikh | New india scrap center | VIVEK TIN SUPPLY | Tulsidas Velji And Co | Jalaram Trading Company |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या ) | 1 | प्रति नग | 39.00 | 53.10 | 0.00 | 7.50 | 0.00 | 15.52 | 15.51 |
| 2 | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या ) | 1 | प्रति नग | 37.00 | 41.30 | 0.00 | 5.50 | 0.00 | 10.32 | 10.20 |
| 3 | रिकामे तेलातूपाचे लहान / मोठे तोंडाचे चांगले डबे | 1 | प्रति नग | 29.24 | 30.68 | 0.00 | 25.50 | 53.51 | 0.00 | 0.00 |
| 4 | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले / चेपलेले खराब डबे | 1 | प्रति नग | 22.25 | 21.24 | 0.00 | 18.50 | 43.60 | 0.00 | 0.00 |
| 5 | रिकामे तेला-तूपाचे गंजलेले / फुटलेले चांगले प्रकारचे डबे | 1 | प्रति नग | 13.00 | 0.00 | 0.00 | 16.50 | 32.55 | 0.00 | 0.00 |
| 6 | रिकामे तेला-तूपाचे गंजलेले / फुटलेले/जाळलेले खराब डबे | 1 | प्रति नग | 13.50 | 0.00 | 0.00 | 13.50 | 23.55 | 0.00 | 0.00 |
| 7 | रिकामे काजूचे डबे (आहे त्या स्थितीत) | 1 | प्रति नग | 11.20 | 14.16 | 0.00 | 12.25 | 8.10 | 0.00 | 0.00 |
| 8 | प्लॉस्टिक गोण्या | 1 | प्रति किलो | 10.00 | 0.00 | 6.00 | 6.25 | 0.00 | 8.54 | 8.53 |
| 9 | प्लॉस्टिक वस्तू (उदा. कचरा कुंडया /बादल्या/मग,छोटे/मोठे फुटलेले ड्रम, फुटलेल्या पाण्याच्या फायबर टाक्या इ.) | 1 | प्रति किलो | 26.25 | 0.00 | 27.00 | 22.25 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 10 | प्लॉस्टिक ड्रम २० लि. ते ५० लि.चे आतील सर्व कलर ( चांगले) | 1 | प्रति नग | 45.00 | 0.00 | 30.00 | 51.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 11 | प्लॉस्टिक ड्रम ५१ लि. ते १०० लि. पर्यंतचे सर्व कलरचे (चांगले) | 1 | प्रति नग | 55.00 | 0.00 | 95.00 | 78.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 12 | दुधाच्या रिकाम्या प्लॉस्टिक पिशव्या (भरलेल्या बारदान /गोणीसह) | 1 | प्रति किलो | 20.35 | 0.00 | 16.50 | 11.25 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 13 | रिकामा खोक्याचा चांगला पुठ्ठा (कार्टून) | 1 | प्रति किलो | 8.35 | 0.00 | 9.50 | 8.25 | 0.00 | 10.15 | 9.75 |
| 14 | रिकामा खोक्याचा तेलकट / खराब पुठ्ठा | 1 | प्रति किलो | 7.65 | 0.00 | 7.50 | 7.50 | 0.00 | 8.52 | 8.51 |
| 15 | उत्तर पत्रिका व इतर तत्सम रद्दी (भरलेल्या बारदान गोणीसह) | 1 | प्रति किलो | 15.65 | 0.00 | 18.50 | 16.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 16 | निरूपयोगी लोखंडी भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 26.65 | 0.00 | 27.00 | 23.75 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 17 | लोखंडी कीस | 1 | प्रति किलो | 8.65 | 0.00 | 16.00 | 9.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 18 | निरूपयोगी लोखंडी पत्र्याचे भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 21.80 | 0.00 | 21.50 | 16.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 19 | निकामी तांब्याचे भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 355.00 | 0.00 | 400.00 | 331.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 20 | निकामी स्टीलचे भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 37.60 | 0.00 | 40.00 | 41.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 21 | निकामी ॲल्युमिनिअम भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 91.25 | 0.00 | 98.50 | 98.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 22 | जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. | 1 | प्रति किलो | 50.00 | 0.00 | 0.00 | 1.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 23 | इले.टयुबचे जळालेले कॉपर चोक | 1 | प्रति नग | 19.25 | 0.00 | 30.00 | 20.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 24 | इले.टयुबचे जळालेले इलेक्ट्रॉनिक चोक | 1 | प्रति नग | 3.00 | 0.00 | 1.00 | 1.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 25 | सोडीयम लाईटचे जळालेले चोक | 1 | प्रति नग | 100.00 | 0.00 | 100.00 | 107.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 26 | वापरलेले काळे ऑईल | 1 | प्रति लिटर | 16.65 | 28.32 | 5.00 | 16.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 27 | मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल | 1 | प्रति लिटर | 30.85 | 29.50 | 0.00 | 15.50 | 35.10 | 0.00 | 0.00 |
| 28 | विटलेल्या,फाटलेल्या,जीर्ण झालेल्या कापडी वस्तू (उदा.चादर,बेडशीट,ब्लॅन्केट,खराब झालेल्या गादया,गादीच्या/ उशीच्या खोळी, टॉवेल, रूग्णालयाकडील लिनन इ.) | 1 | प्रति किलो | 13.60 | 0.00 | 4.00 | 7.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 29 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या कापूस गादया (रूग्णालय सोडून फक्त निवासस्थान विभागाकडील) | 1 | प्रति नग | 70.55 | 0.00 | 30.00 | 61.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 30 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या फोम गादया (रूग्णालय सोडून फक्त निवासस्थान विभागाकडील) | 1 | प्रति नग | 41.30 | 0.00 | 40.00 | 20.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 31 | नारळाच्या शेंडया | 1 | प्रति किलो | 0.50 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 32 | निरूपयोगी /अनावश्यक लाकडी भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 6.00 | 0.00 | 3.00 | 3.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 33 | निरूपयोगी जनरेटरच्या पांढ-या बॅट-या मोठी साईज | 1 | प्रति नग | 27.35 | 0.00 | 2000.00 | 2386.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 34 | निरूपयोगी जनरेटरच्या काळया बॅट-या मोठी साईज | 1 | प्रति नग | 21.25 | 0.00 | 1500.00 | 1933.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 35 | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 1 | प्रति नग | 150.00 | 0.00 | 2000.00 | 75.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 36 | संगणकाच्या वापरून खराब झालेले प्रिन्टर,रिबन, टोनर,टेलीफोन,घडयाळे इ. | 1 | प्रति किलो | 11.00 | 0.00 | 12.00 | 8.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 37 | रिकाम्या पाण्याच्या प्लॅास्टिक बाटल्या | 1 | प्रति किलो | 21.25 | 0.00 | 23.00 | 21.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 38 | कागदाची चूर केलेली रद्दी | 1 | प्रति किलो | 3.00 | 0.00 | 0.00 | 3.50 | 0.00 | 6.02 | 0.00 |
| 39 | रंगीत कागदाची रद्दी | 1 | प्रति किलो | 11.85 | 0.00 | 7.00 | 7.75 | 0.00 | 5.75 | 0.00 |
| 40 | टाईम दर्शनपास फाडलेली रंगीत जाड पेपर रद्दी (प्लॉस्टीक कव्हर आहे त्या स्थितीत ) | 1 | प्रति किलो | 5.00 | 0.00 | 2.00 | 8.25 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 41 | निरूपयोगी पितळी भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 235.00 | 0.00 | 300.00 | 286.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 42 | संगणकाच्या निकामी छोटया बॅट-या | 1 | प्रति किलो | 65.25 | 0.00 | 65.00 | 65.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 43 | निरूपयोगी खराब झालेले कारपेट | 1 | प्रति किलो | 2.00 | 0.00 | 1.00 | 3.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 44 | पावती पुस्तके, कुपन बुके, रजिष्टर वगैरेचा बाईडींग पुठ्ठा | 1 | प्रति किलो | 6.00 | 0.00 | 2.00 | 3.25 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 45 | बीडाचे भंगार | 1 | प्रति किलो | 18.65 | 0.00 | 27.00 | 21.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |
| 46 | भटूर | 1 | प्रति किलो | 150.00 | 0.00 | 270.00 | 261.50 | 0.00 | 0.00 | 0.00 |

१३ यापूर्वी केलेल्या खरेदीचा तपशिल आणि खरेदी दर–

| अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रती नग रू. |
|---|---|---|---|
| अ.नं.२३ मध्ये नमूद केलेप्रमाणे. | | | |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल–

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | -- | -- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | - |
| १६ | मागील खरेदी दर | - |
| १७ | मागील पुरवठादार | - |
| १८ | सध्याचे न्युनत्तम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| १९ | सध्याचे न्युनत्तम निविदाकाराचे नांव | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नांवे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.मुख्य लेखाधिकारी,<br>मा.प्रशासकीय अधिकारी,<br>प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष विभाग |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशिल अंदाजे रू –/––––.प्रती | |

२३

| अ.नं. | तपशिल | मागील वर्षीचे खरेदी दर | सध्याचे प्राप्त दर | फरक | कमी/जास्त |
|---|---|---|---|---|---|
| 1 | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या ) | 15.12 | 53.10 | 37.98 | 37.98 ने जास्त |
| 2 | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या ) | 10.13 | 41.30 | 31.17 | 31.17 ने जास्त |
| 3 | रिकामे तेला तूपाचे लहान / मोठे तोंडाचे चांगले डबे | 51.92 | 53.51 | 1.59 | 1.59 ने जास्त |
| 4 | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले / चेपलेले खराब डबे | 40.12 | 43.60 | 3.48 | 3.48 ने जास्त |
| 5 | रिकामे तेला-तूपाचे गंजलेले / फुटलेले चांगले प्रकारचे डबे | 29.50 | 32.55 | 3.05 | 3.05 ने जास्त |
| 6 | रिकामे तेला-तूपाचे गंजलेले / फुटलेले/जाळलेले खराब डबे | 20.06 | 23.55 | 3.49 | 3.49 ने जास्त |
| 7 | रिकामे काजूचे डबे (आहे त्या स्थितीत) | 13.25 | 14.16 | 0.91 | 0.91 ने जास्त |
| 8 | प्लॉस्टिक गोण्या | 14.51 | 10.00 | -4.51 | 4.51 ने कमी |
| 9 | प्लॉस्टिक वस्तू (उदा. कचरा कुंडया /बादल्या/मग,छोटे/मोठे फुटलेले ड्रम, फुटलेल्या पाण्याच्या फायबर टाक्या इ.) | 20.25 | 26.25 | 6.00 | 6 ने जास्त |
| 10 | प्लॉस्टिक ड्रम २० लि. ते ५० लि.चे आतील सर्व कलर ( चांगले) | 35.50 | 51.50 | 16.00 | 16 ने जास्त |
| 11 | प्लॉस्टिक ड्रम ५१ लि. ते १०० लि. पर्यंतचे सर्व कलरचे (चांगले) | 40.50 | 78.50 | 38.00 | 38 ने जास्त |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 12 | दुधाच्या रिकाम्या प्लॉस्टिक पिशव्या (भरलेल्या बारदान /गोणीसह) | 16.25 | 20.35 | 4.10 | 4.1 ने जास्त |
| 13 | रिकामा खोक्याचा चांगला पुठ्ठा (कार्टून) | 10.25 | 10.15 | -0.10 | 0.1 ने कमी |
| 14 | रिकामा खोक्याचा तेलकट / खराब पुठ्ठा | 9.10 | 8.25 | -0.85 | 0.85 ने कमी |
| 15 | उत्तर पत्रिका व इतर तत्सम रद्दी (भरलेल्या बारदान गोणीसह) | 13.25 | 18.50 | 5.25 | 5.25 ने जास्त |
| 16 | निरूपयोगी लोखंडी भंगार साहित्य | 20.50 | 27.00 | 6.50 | 6.5 ने जास्त |
| 17 | लोखंडी कीस | 6.25 | 16.00 | 9.75 | 9.75 ने जास्त |
| 18 | निरूपयोगी लोखंडी पत्र्याचे भंगार साहित्य | 16.25 | 21.80 | 5.55 | 5.55 ने जास्त |
| 19 | निकामी तांब्याचे भंगार साहित्य | 310.25 | 400.00 | 89.75 | 89.75 ने जास्त |
| 20 | निकामी स्टीलचे भंगार साहित्य | 32.75 | 41.50 | 8.75 | 8.75 ने जास्त |
| 21 | निकामी ॲल्युमिनिअम भंगार साहित्य | 85.50 | 98.50 | 13.00 | 13 ने जास्त |
| 22 | जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. | 2.10 | 50.00 | 47.90 | 47.9 ने जास्त |
| 23 | इले.टयुबचे जळालेले कॉपर चोक | 18.25 | 30.00 | 11.75 | 11.75 ने जास्त |
| 24 | इले.टयुबचे जळालेले इलेक्ट्रॉनिक चोक | 2.10 | 3.00 | 0.90 | 0.9 ने जास्त |
| 25 | सोडीयम लाईटचे जळालेले चोक | 100.00 | 107.50 | 7.50 | 7.5 ने जास्त |
| 26 | वापरलेले काळे ऑईल | 12.50 | 28.32 | 15.82 | 15.82 ने जास्त |
| 27 | मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल | 32.50 | 35.10 | 2.60 | 2.6 ने जास्त |
| 28 | विटलेल्या,फाटलेल्या,जीर्ण झालेल्या कापडी वस्तू (उदा.चादर,बेडशीट,ब्लॅन्केट,खराब झालेल्या गादया,गादीच्या/उशीच्या खोळी, टॉवेल, रूग्णालया कडील लिनन इ.) | 7.00 | 13.60 | 6.60 | 6.6 ने जास्त |
| 29 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या कापूस गादया (रूग्णालय सोडून फक्त निवासस्थान विभागाकडील) | 32.00 | 70.55 | 38.55 | 38.55 ने जास्त |
| 30 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या फोम गादया (रूग्णालय सोडून फक्त निवासस्थान विभागाकडील) | 20.25 | 41.30 | 21.05 | 21.05 ने जास्त |
| 31 | नारळाच्या शेंडया | 35.00 | 0.50 | -34.50 | 34.5 ने कमी |
| 32 | निरूपयोगी /अनावश्यक लाकडी भंगार साहित्य | 4.25 | 6.00 | 1.75 | 1.75 ने जास्त |
| 33 | निरूपयोगी जनरेटरच्या पांढ-या बॅट-या मोठी साईज | 2,125.00 | 2,386.50 | 261.50 | 261.5 ने जास्त |
| 34 | निरूपयोगी जनरेटरच्या काळया बॅट-या मोठी साईज | 1,701.00 | 1,933.50 | 232.50 | 232.5 ने जास्त |
| 35 | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 105.00 | 2,000.00 | 1,895.00 | 1895 ने जास्त |
| 36 | संगणकाच्या वापरून खराब झालेले प्रिंन्टर,रिबन, टोनर, टेलीफोन,घडयाळे इ. | 7.50 | 12.00 | 4.50 | 4.5 ने जास्त |
| 37 | रिकाम्या पाण्याच्या प्लॉस्टिक बाटल्या | 26.25 | 23.00 | -3.25 | 3.25 ने कमी |
| 38 | कागदाची चूर केलेली रद्दी | 3.50 | 6.20 | 2.70 | 2.7 ने जास्त |
| 39 | रंगीत कागदाची रद्दी | 8.25 | 11.85 | 3.60 | 3.6 ने जास्त |
| 40 | टाईम दर्शनपास फाडलेली रंगीत जाड पेपर रद्दी (प्लॉस्टीक कव्हर आहे त्या स्थितीत ) | 3.25 | 8.25 | 5.00 | 5 ने जास्त |
| 41 | निरूपयोगी पितळी भंगार साहित्य | 201.25 | 300.00 | 98.75 | 98.75 ने जास्त |
| 42 | संगणकाच्या निकामी छोटया बॅट-या | 61.50 | 65.50 | 4.00 | 4 ने जास्त |
| 43 | निरूपयोगी खराब झालेले कारपेट | 3.25 | 3.50 | 0.25 | 0.25 ने जास्त |
| 44 | पावती पुस्तके, कुपन बुके, रजिष्टर वगैरेचा बाईंडींग पुठ्ठा | 4.00 | 6.00 | 2.00 | 2 ने जास्त |
| 45 | बीडाचे भंगार | 17.50 | 27.00 | 9.50 | 9.5 ने जास्त |
| 46 | भटूर | 185.50 | 270.00 | 84.50 | 84.5 ने जास्त |

| | |
|---|---|
| २४ | सदर खरेदीसाठी विभागाने निश्चित केलेला अंदाजे खर्च रू. – निरंक |

प्रस्ताव- १) ऑनलाईन प्राप्त झालेल्या ०७ निविदाधारकापैंकी अ.नं.१२ मधील क्रं.२१.निकामी ॲल्युमिनियम भंगार साहित्याचे शफिक शेख व न्यु इंडिया स्कॅप सेंटर यांचे दर सारखे आलेले असल्याने दोघांनाही समान कालावधीसाठी विभागुन विक्री करता येईल.

२) अ.नं २२ जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. चे उच्चतम दर अकबर पठाण यांनी रु. ५०.०० इतका भरलेला असुन त्यांना तो ०.५० इतका भरावयाचा होता, सदर दर नजर चुकीने भरलेला असल्याचे त्यांनी संस्थानकडे केलेल्या दि.०३/०७/२०१९ रोजीच्या विनंती अर्जात म्हटलेले आहे. तरी याबाबत क्रं. दोनच्या उच्चतम दर धारकास सदर भंगार वस्तुचे दर (रु.१.००) मंजुर करावेत, याबाबत विनंती केलेली आहे.

तरी उपरोक्त Online प्राप्त झालेल्या ०७ निविदाधारकांचे अ.नं.१२ मध्ये दर्शविलेले उच्चत्तम दराबाबत निर्णय होऊन उच्चतम दरधारकास कार्यादेश देणेस, मा.उपसमितीची शिफारस मा. व्यवस्थापन समिती सभेत मान्यतेसाठी सदरचा विषय मा. उपसमिती सभेपुढे सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निरूपयोगी भंगार साहित्य विक्री करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील खालील प्रमाणे उच्चतम दरधारकांचे दर मान्य करण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, तसेच ज्या साहित्यांसाठी समान दर प्राप्त झालेले आहेत त्या साहित्यांची विभागुन विक्री करण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

१. श्री.अकबरखॉ सांडेखॉ पठाण, कोपरगांव,

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | परिमाण | उच्चतम दर |
|---|---|---|---|
| १. | रिकाम्या प्लास्टिक गोण्या | प्रति किलो | १०.०० |
| २. | दुधाच्या रिकाम्या प्लॉस्टिक पिशव्या (भरलेल्या बारदान गोणीसह) | प्रति किलो | २०.३५ |
| ३. | निरुपयोगी लोखंडी पत्र्याचे भंगार साहित्य | प्रति किलो | २१.८० |
| ४. | इले. टयुबचे जळालेले इलेक्ट्रॉनिक चोक | प्रति नग | ३.०० |
| ५. | विटलेल्या, फाटलेल्या, जीर्ण झालेल्या कापडी वस्तु (उदा.चादर,बेडशीट,ब्लॅन्केट, खराब झालेल्या गादया/गादीच्या, उशीच्या खोळी, टॉवेल, रूग्णालयाकडील लिनन इ.) | प्रति किलो | १३.६० |
| ६. | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या कापूस गादया (रूग्णालय सोडून फक्त भक्त निवासस्थान कडील) | प्रति नग | ७०.५५ |
| ७. | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या फोम गादया (रूग्णालय सोडून फक्त भक्त निवासस्थान कडील) | प्रति नग | ४१.३० |
| ०८. | नारळाच्या शेंडया | प्रति किलो | ०.५० |
| ०९. | निरुपयोगी / अनावश्यक लाकडी भंगार साहित्य | प्रति किलो | ६.०० |
| १०. | रंगीत कागदाची रद्दी | प्रति किलो | ११.८५ |
| ११. | पावती पुस्तके, कुपन बुके, रजिष्टर इ. बाईडींग पुठ्ठा | प्रति किलो | ६.०० |

२. महाकाली इंडस्ट्रीज, जळगाव.

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | परिमाण | उच्चतम दर |
|---|---|---|---|
| १. | रिकामे काजूचे डबे (आहे त्या स्थितीत) | प्रति नग | १४.१६ |
| २. | वापरलेले काळे ऑईल | प्रति लिटर | २८.३२ |

३. शफिक शेख, कोपरगांव,

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | परिमाण | उच्चतम दर |
|---|---|---|---|
| १. | उत्तरपत्रिका व इतर तत्सम रद्दी (भरलेल्या बारदान गोणीसह) | प्रति किलो | १८.५० |
| २. | प्लॉस्टिक वस्तू, (उदा.कचराकुंडया,बादल्या,मग,छोटेमोठे फुटलेले ड्रम,बरण्या,फायबर,टाक्या,घडयाळे वगैरे) | प्रति किलो | २७.०० |
| ३. | निरूपयोगी लोखंडी भंगार साहित्य | प्रति किलो | २७.०० |
| ४. | लोखंडी कीस | प्रति किलो | १६.०० |
| ५. | निकामी तांब्याचे भंगार साहित्य | प्रति किलो | ४००.०० |
| ६. | निकामी अॅल्युमिनियम भंगार साहित्य | प्रति किलो | ९८.५० |
| ७. | इले.टयुबचे जळालेले कॉपर चोक | प्रति नग | ३०.०० |
| ८. | संगणकाचे वापरून खराब झालेले प्रिन्टर, रिबन,टोनर,टेलीफोन, घडयाळे वगैरे. | प्रति किलो | १२.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ९. | रिकाम्या प्लास्टिक बाटल्या | प्रति किलो | २३.०० |
| १०. | निरुपयोगी पितळी भंगार साहित्य | प्रति किलो | ३००.०० |
| ११. | बीडाचे भंगार | प्रति किलो | २७.०० |
| १२ | भटुर | प्रति किलो | २७०.०० |

४. न्यु इंडिया स्क्रॅप सेंटर, कोपरगांव,

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | परिमाण | उच्चतम दर |
|---|---|---|---|
| १. | प्लॉस्टिक ड्रम २० लि. ते ५० लि.चे आतील सर्व कलर (चांगले) | प्रति नग | ५१.५० |
| २. | प्लॉस्टिक ड्रम ५१ लि. ते १०० लि.पर्यंतचे सर्व कलर (चांगले) | प्रति नग | ७८.५० |
| ३. | निकामी स्टिलचे भंगार साहित्य | प्रति किलो | ४१.५० |
| ४. | निकामी ॲल्युमिनियम भंगार साहित्य | प्रति किलो | ९८.५० |
| ५. | सोडीयम लाईटचे जळालेले चोक | प्रति नग | १०७.५० |
| ६. | निरूपयोगी जनरेटरच्या पांढ-या बॅट-या मोठी साईज | प्रति नग | २३८६.५० |
| ७. | निरुपयोगी जनरेटरच्या काळया बॅट-या मोठी साईज | प्रति नग | १९३३.५० |
| ०८. | टाईम दर्शनपास फाडलेली रंगीत जाड पेपर रद्दी ( प्लास्टीक कव्हर आहे त्या स्थितीत) | प्रति किलो | ०८.२५ |
| ०९. | संगणकाच्या निकामी छोटया बॅट-या | प्रति किलो | ६५.५० |
| १०. | निरुपयोगी खराब झालेले कारपेट | प्रति किलो | ०३.५० |

५) विवेक टिन सप्लाय, नाशिक,

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | परिमाण | उच्चतम दर |
|---|---|---|---|
| १. | रिकामे तेलातुपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे | प्रति नग | ५३.५१ |
| २. | रिकामे तेलातुपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले/चेपलेले खराब डबे | प्रति नग | ४३.६० |
| ३. | रिकामे तेलातुपाचे गंजलेले/फुटलेले चांगले प्रकारचे डबे | प्रति नग | ३२.५५ |
| ४. | रिकामे तेलातुपाचे गंजलेले/फुटलेले जळालेले खराब डबे | प्रति नग | २३.५५ |
| ५. | मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल | प्रति लिटर | ३५.१० |

६) तुलसीदास वेलजी ॲन्ड कंपनी, कोपरगाव,

| अ.नं. | साहित्याचा तपशिल | परिमाण | उच्चतम दर |
|---|---|---|---|
| १. | रिकामा खोक्याचा चांगला पुठ्ठा (कार्टुन) | प्रति किलो | १०.१५ |
| २. | रिकाम्या खोक्याचा तेलकट/खराब पुठ्ठा | प्रति किलो | ०८.५२ |
| ३. | कागदाची चुर केलेली रद्दी | प्रति किलो | ०६.०२ |

उपरोक्त प्रस्तावातील अ.नं.१ व २ निरुपयोगी गोण्या (कलतान,५० किलो भरतीच्या) चांगले/ खराब यासाठी महाकाली इंडस्ट्रीज, जळगाव यांनी दिलेले उच्चतम दर अनुक्रमे रक्कम रु.५३.१० व रु.४१.३० हे दर नजरचुकीने दिलेले असल्याचे, अ.नं.२२ जळालेले इले.बल्ब, टयुबबार इत्यादीसाठी अकबरखॉं सांडेखॉं पठाण, कोपरगांव यांनी दिलेले उच्चतम दर रक्कम रु.५०/- हे दर नजरचुकीने दिलेले असल्याचे तसेच ३५ संगणकाच्या निकामी बॅटऱ्या मोठी साईज यासाठी शफीक शेख, कोपरगांव यांनी दिलेले उच्चतम दर रक्कम रु.२०००/- हे दर नजरचुकीने दिलेले असल्याचे तिघांनीही लेखी कळविलेले आहे. त्यामुळे अ.नं.१,२, २२ व ३५ या साहित्यांची विक्री करणेकामी दरपत्रके मागविण्यात यावी, दरपत्रकातील उच्चतम दर व ई-निविदेतील दुसऱ्या क्रमांकाचे उच्चतम दर याबाबतचा प्रस्ताव स्थानिक उपसमितीसमोर सादर करण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अभिलेख कक्ष)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०२ **नियोजीत शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता फर्निचर वर्क आणि ऑडीटोरीअम करीता फर्निचर, ॲकॉस्टिक वर्क व एच.व्ही.ए.सी. यंत्रणा तसेच विविध खेळाचे साहित्य, मैदाने विकसीत करणे व लॅन्डस्केपिंग करणे याकामी येणारे अंदाजपत्रकिय रक्कम रु.३९.५४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद-अधिनियमाच्या कलम १७ मधील पोट कलम (१) च्या खंड (ढ) अन्वये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना दईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच, शिर्डी येथे व अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील, अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समिती निर्णय-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०.०१.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४

२) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४६

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेमार्फत कार्यरत असलेल्या श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, शिर्डी, श्री साईबाबा कन्या विद्या मंदीर, शिर्डीव श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या शैक्षणिक संस्थांकरीता मौजे निमगांव-को-हाळे येथील गट नं.१८३ मधील ५ हेक्टर ४० आर जागेत नियोजीत शैक्षणिक संकुल उभारणेकामी निम्नतम दराचे निविदाधारक मे.न्याती इंजिनियर्स अँन्ड कन्सलटंट, पुणे यांना जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम/ ५९३६/२०१८, दि.०८/०३/२०१९ अन्वये रक्कम रु.२१८ कोटीचा कार्यादेश देणेत आलेला आहे. ठेकेदार यांचेमार्फत सिव्हील काम प्रगतीपथावर आहे.

सदरहू कामाच्या निविदेमध्ये शैक्षणिक संकुलातील इमारतींचे व ऑडीओटोरीयमचे अंतर्गत फर्निचरचे कामाचा समावेश नसल्यामुळे आर्किटेक्टयांनी रु.७९.३५/- कोटी मात्रचे अंदाजपत्रक सादर केलेले होते. त्यावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता फर्निचर वर्क, सीसीटीव्ही, ई-लर्निंग सुविधा आणि ऑडीटोरीअम करीता फर्निचर, ॲकॉस्टिक वर्क व एच.व्ही.ए.सी.यंत्रणा तसेच विविध खेळांचे साहित्य, मैदाने विकसीत करणे व लॅण्डस्केपिंक करणे याकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेली अंदाजपत्रकीय रक्कम अवास्तव स्वरुपाची असल्याचे तसेच नमुद करण्यात आलेल्या कामांपैकी काही कामांची शैक्षणिक संकुलासाठी आवश्यकता नसल्याचे समिती सदस्यांचे मत झाले. याबाबत आवश्यक असणाऱ्या कामांसह अंदाजपत्रकिय खर्चाचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले."

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार आर्किटेक्ट डी.ओ.निकम, पुणे यांनी सुधारित अंदाजपत्रक तयार केले असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| SR NO. | BUILDING TYPE | TOTAL COST |
|---|---|---|
| A] | English Medium School (Furniture Work) | 29607378.00 |
| B] | KanyaVidyaMandir(Furniture Work) | 19982268.00 |
| C] | Jr. Sr. BBA & BCA College (Furniture Work) | 19915068.00 |
| D] | Sport Complex | |
| | 1. Furniture Work | 149420.00 |
| | 2. Indoor & Outdoor Sport Field | 120054870.00 |
| | Total of Sport Complex | 120204290.00 |
| E] | Auditorium. | |
| | 1. Furniture Work | 4579924.00 |
| | 2.Acoustic Work | 41394204.00 |
| | 3.Stagecraft | 6466615.00 |
| | 4.Stage lighting | 6173818.00 |
| | 5. HVAC Work | 51641296.00 |
| | Total of Auditorium | 110255857.00 |
| F] | Swimming Pool(Furniture Work) | 250880.00 |
| G] | Landscape Work | 11151217.00 |

| | | |
|---|---|---|
| | TOTAL COST | 311366958.00 |
| | Add 10% Escalation | 31136695.80 |
| | Add GST 12% | 37364034.96 |
| | Add Contingencies 5% | 15568347.90 |
| | TOTAL PROJECT COST | 395436037.00 |

उपरोक्त अंदाजपत्रकात श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदीरव श्री साईबाबा महाविद्यालय इमारतींसाठी फर्निचर मध्ये प्रामुख्याने बेंचेस, टेबल्स, क्युबिकल व फाईल्स स्टोरेज युनिटयांचा समावेश केलेला आहे तसेच ऑडीटोरिअम करीता आवश्यक खुर्च्या, ऑकॉस्टीक व स्टेज क्राफ्ट वर्क व एच.व्ही.ए.सी. वर्क यांचा समावेश करुन सुधारित अंदाजपत्रक सादर केले आहे. याशिवाय स्पोर्ट कॉम्प्लेक्स मध्ये आवश्यक फर्निचर सह विविध खेळांचे साहित्यांचा समावेश आहे. तसेच लॅण्ड स्केप व विविध खेळांची मैदाने विकसीत करणे कामाचा समावेश अंदाजपत्रकात करणेत आलेला आहे.

विभागाचा अभिप्राय – संस्थानचे श्री साईबाबा इंग्लिश मेडीअम स्कूल, श्री साईबाबा कन्या विद्या मंदीरव श्री साईबाबा महाविद्यालय यांचेकडे सध्या उपलब्ध असलेले व सुस्थितीत असलेले वापरण्यायोग्य फर्निचर नव्याने खरेदी करण्याची आवश्यकता नाही त्यामुळे याबाबत संबंधीतांकडून माहीती घेता येईल तसेच यांना नव्याने तयार होणा-या इमारतींमध्ये कोणत्या सुविधा आवश्यक आहे याचा विस्तृत तपशिल घेऊन त्याप्रमाणे अंदाजपत्रकात बदल करुन त्यानुसार ई निविदा मागविता येतील.आर्किटेक्ट डी.ओ.निकम, पुणे यांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकात वर्ग खोल्यांमध्ये डिजीटल बोर्ड (इंटरॲक्टीव डिस्प्ले), ऑडीओ सिस्टीम, इंटरनेट सुविधा (वायफाय) व सि.सी.टी.व्ही या तरतुदींचा समावेश करणेत आलेला नाही. यासाठी संस्थानचे माहीती तंत्रज्ञान व सि.सी.टी.व्ही विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करता येईल.

प्रस्ताव– तरी प्रकल्पाचे आर्कीटेक्ट डी.ओ.निकम, पुणे यांनी शैक्षणिक संकुलातील इमारतींचे फर्निचर वर्क आणि ऑडीटोरीअम करीता फर्निचर, ॲकॉस्टिक वर्क व एच.व्ही.ए.सी यंत्रणा तसेच विविध खेळांचे साहित्य, मैदाने विकसीत करणे व लॅण्डस्केपिंग करणे या कामांसाठी सादर केलेल्या रक्कम रु.३९.५४ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेसाठी तसेच नियोजीत शैक्षणिक संकुलातील वर्ग खोल्यांमध्ये डिजीटल बोर्ड (इंटरॲक्टीव डिस्प्ले), ऑडीओ सिस्टीम, इंटरनेट सुविधा (वायफाय) व सि.सी.टी.व्ही या तरतुदींचा समावेश करणेसाठी संस्थानचे माहीती तंत्रज्ञान व सि.सी.टी.व्ही विभागामार्फत स्वतंत्रपणे कार्यवाही करणेस मान्यतेसाठी निर्णयार्थसादर.

निर्णय क्र.४०५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, नियोजीत शैक्षणिक संकुल प्रकल्पातील शालेय इमारतीकरीता फर्निचर वर्क आणि ऑडीटोरीअम करीता फर्निचर, ॲकॉस्टिक वर्क व एच.व्ही.ए.सी. यंत्रणा तसेच विविध खेळाचे साहित्य, मैदाने विकसीत करणे व लॅन्डस्केपिंग करणे याकामी येणाऱ्या अंदाजपत्रकिय रक्कम रु.३९.५४ कोटी मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली. तसेच सदरचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा,असे ठरले.**

**तसेच संस्थानचे शाळा व महाविद्यालयाकरीता अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०३ **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेसाठी अपेक्षीत रु.३४.०७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास व सदरहु प्रस्ताव राज्य शासनाचे मान्यतेकरीता सादर करणेस, तसेच राज्य शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद- अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय -

१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतींचे बांधकाम करणेसाठी ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/ २५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३११ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"…..साईभक्तांचे दर्शनासाठी दर्शनरांगेचे काम भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू बांधकामात भविष्यात ०१ मजल्याचे बांधकाम प्रस्तावित आहे. दर्शनरांग भक्तांचे वापरासाठी खुली झालेनंतर भविष्यात वरच्या मजल्याचे बांधकाम करणे अडचणीचे होईल. भक्तांच्या गर्दीचा विचार करता तिस-या मजल्याचे बांधकाम भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेकडून करणेस किती खर्च अपेक्षित आहे. याकरीता आर्किटेक्ट माथुर अॅन्ड काप्रे यांचेकडून खर्चाचा तपशिल मागवून पुढील बैठकीत सादर करावे, असे ठरले."

३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३४५ खालील प्रमाणे संमत झालेला आहे.

"…..श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे बांधकाम हे सदर कामाचे ठेकदार भानू कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांना बांधकामाचे एकूण क्षेत्रफळानुसार (Lumpsum) दिलेले असून Item wise दिलेले नाही. त्यामुळे दर्शन रांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करावयाचे असल्यास त्यासाठी स्वतंत्र ई-निविदा प्रक्रिया राबबावी लागेल. तथापी सध्या दर्शन रांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याची आवश्यकता नाही, असे ठरले."

प्रस्तावना – श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेमार्फत सुरु आहे.सदरहू इमारतीचे बांधकाम सध्या निविदेप्रमाणे G+2 असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुविधा आहेत.

तळमजला - नियोजित दर्शनांग इमारतीमध्ये ०३ भव्य प्रवेश हॉल आहेत, त्यामध्ये भक्तांना मोबाईल व चप्पल लॉकर्स, बायोमेट्रीक पास काऊंटर – ४८, पेड पास काउंटर -२०, लाडू काउंटर – १०, उदी व कापडकोठी काऊंटर – १०, बुक स्टॉल, डोनेशन ऑफिस,चहा / कॉफी काउंटर, सिक्युरिटी चेक एकाच ठिकाणी व एकाच वेळी – ४० व्यक्तींची, जीने – ११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था इ.

पहिला व दुसरा मजला - भक्तांकरीता बसण्याची व्यवस्था असेलेले एकूण १२ मोठे हॉल (एक हॉल साईज - १५.१० मी. x ३१.१५ मी.), चहा / कॉफी काउंटर, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, वायुविजन व्यवस्था, उदवाहक / लिफ्ट व्यवस्था - १०, जीने - ११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था, आर.ओ प्रक्रियेव्दारे शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था, फायर फायटींग व्यवस्था इ.

या व्यतिरिक्त या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, रॅम्प, प्रथमोपचार केंद्र, संपूर्ण इंटेरीअर वर्क, सायनेजेस, अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, इलेक्ट्रीकल सबस्टेशन, जनरेटर व्यवस्था, वायुविजन व्यवथा, लॅण्डस्केपींग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पिंपळवाडी रस्त्यावरुन मंदिर परिसरातील जुन्या दर्शनरांगेला जोडण्यासाठी कनेक्टींग ब्रिज, संरक्षण भिंत इत्यादी सुविधांचा समावेश करणेत आला आहे.

सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव** | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| **आर्किटेक्ट** | माथूर अॅण्ड काप्रे असो. नवी दिल्ली. |
| **ठेकेदार** | भानू कन्स्ट्रक्शन,मुंबई. |
| **कार्यादेश** | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८. |
| **मंजूर निविदा रक्कम** | रु.१०९.५० कोटी. |
| **करारनामा दिनांक** | दि.२२/१०/२०१८. |
| **कामाचा कालावधी** | १२ महिने (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९.) |
| **एकूण कामाचे बांधकाम क्षेत्रफळ** | निविदेत नमूद एकूण बांधकाम क्षेत्रफळ–२२,२१४ चौ.मी. (FSI Area.) |
| **कामाची सद्यस्थिती** | सदर प्रकल्पातील मुख्य इमारतीचे फुटींग व आरसीसी कॉलमचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे.<br>प्लिंथ लेव्हलचे ग्रेड स्लॅबचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे.<br>तळमजला स्लॅबचे सुमारे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे.<br>पहिला मजला स्लॅबचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे.<br>दुसरा मजला स्लॅबचे ३० टक्के काम पूर्ण.<br>कनेक्टींग कॉरीडॉरपैकी मंदिर परिसरातील पी.आर.ओ चे समोरील कारंजाचे भागातील आरसीसी फुटींग, प्लिंथ बीम, कॉलम, ग्रेड स्लॅब व पहिला मजला फ्लोअर स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. |

विषयांकित इमारतीवर तिस-या मजल्याचे वाढीव बांधकाम करणेसाठी येणा-या अपेक्षित खर्चाचे सविस्तर अंदाजपत्रक आर्किटेक्ट उदय काप्रे, नवी दिल्ली यांचेकडून मागविणेतबाबत प्राप्त निर्देशान्वये दि.२०/०७/२०१९ रोजीचे ई-मेल व पत्राव्दारे आर्किटेक्ट यांना सदर अंदाजपत्रक सादर करणेविषयी कळविणेत आले. त्यानुसार आर्किटेक्ट यांनी दि.२४/०७/२०१९ रोजीचे पत्राव्दारे रु.३४.०७ कोटी इतक्या अपेक्षित खर्चाचे अंदाजपत्रक सादर केले आहे. तसेच याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस भरणे, विकसन शुल्क, छाननी शुल्क अदा करणेसाठी अतिरिक्त खर्च येईल.

वरील विषयांकित वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामासाठी प्रथमतः खालील बाबींना मंजुरी घेणे आवश्यक आहे.

१. वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामासाठी ५५९८ चौ.मीटर इतक्या अधिकच्या FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क, छाननी शुल्क जमा करणे.

२. इमारतीचे लांबी, रुंदी व उंचीनुसार इमारतीचे समासिक अंतरास शिथिलता घेणेकामी मा.सहसंचालक, नगर रचना नाशिक व मा.संचालक, नगर रचना, पुणे यांची मान्यता घेणे.

३. वाढीव तिस-या मजला बांधकामास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची परवानगी घेणे.

४. वाढीव तिस-या मजल्याचे बांधकामास येणा-या अतिरिक्त खर्चास मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांची मंजुरी घेणे.

५. राज्य शासनाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करतेवेळी त्यांचेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे तांत्रिक मान्यतेकरीता विहीत नमुन्यातील सविस्तर अंदाजपत्रक सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी आर्किटेक्ट यांचेकडून सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन घेता येईल. सविस्तर अंदाजपत्रकानुसार वर नमूद अपेक्षित अंदाजपत्रकीय रक्कम कमी अथवा जास्त होऊ शकते.

६. प्रस्तावित तिसरा मजला बांधकाम करणेसाठी येऊ शकणा-या संभाव्य अडचणी -

सद्या सुरु असलेल्या कामाचे स्कोपमधील ममटी रुम, लिफ्ट मशीन रुम, पॅरापेट,स्टोन क्लॅडींग, टेरेस वॉटरप्रुफींग, खु-हा, ओव्हर हेड वॉटर टॅंक, फायर फायटींग पाईपलाईन, वॉटरसप्लाय पाईप लाईन, लिफ्ट बसविणे इत्यादी कामे स्थगित करावी लागतील.

वरील कामे ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचे स्कोपमध्ये आहेत. ते तिस-या मजल्याचे नविन ठेकेदाराचे स्कोपमध्ये समाविष्ट करावी लागतील. सदर कॉन्ट्रॅक्ट हे लमसम स्वरुपाचे कॉन्ट्रॅक्ट असल्याने वर नमूद बाबींचे दर कोणत्या आधारे कमी करावयाचे याबाबत अडचण निर्माण होईल व भविष्यात सदरहू मुद्दा वादग्रस्त होऊ शकतो.

प्रस्ताव– तरी श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणेसाठी प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांनी काळविलेल्या रकक्म रु.३४.०७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास मंजुरी देणे तसेच त्याकामी नियमानुसार आवश्यक ते प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क, छाननी शुल्क शासकीय खजिन्यात भरणा करणे, नियमानुसार आवश्यक त्या परवानग्या घेणे, राज्य शासनाची मंजुरी घेणे व त्यानंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे याप्रमाणे कार्यवाही करणेसाठी मंजुरी देणे या प्रमाणे बाबींवर तसेच सद्यस्थितीत वाढीव तिसरा मजला बांधकामाची आवश्यकता आहे काय, येणा-या संभाव्य अडचणी या बाबीं विषयी चर्चा व विचार विनयमय होऊन निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीवर वाढीव तिसऱ्या मजल्याचे बांधकाम करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत रक्कम रु.३४.०७ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास तसेच त्याव्यतिरिक्त अधिकचे FSI करीता प्रिमियम चार्जेस, विकसन शुल्क व छाननी शुल्क आदा करणेसाठी नियमानुसार येणाऱ्या अतिरिक्त खर्चास मान्यता देण्यात आली. सदरहु प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, व शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०४ **मौजे निमगाव कोऱ्हाळे,ता.राहाता येथील गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मधील संस्थान मालकीचे जागेत साईसृष्टी,म्युझीयम,तारांगण व बॉटनिकल गार्डन यासह "साई नॉलेज पार्क" प्रकल्प 'Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)' तत्वावर उभारणीसाठी करण्यात आलेल्या ई-प्रस्ताव मागणीस प्रतिसाद न मिळाल्याने सदर प्रकल्पाचे पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेणे.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था(शिर्डी) अधिनियम २००४ मधील तरतूद :-

अ) कलम १७ (समितीची कर्तव्ये व अधिकार) पोटकलम (२)खंड (ठ)- समिती श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्यालीला व शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील;

ब ) कलम २१ (समितीकडून विश्वस्त निधीचा विनियोग) –

१. पोटकलम(१) खंड(ङ) - श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे;

२. पोटकलम(१)खंड(झ)-विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठीस्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे;

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय :

१) दिनांक ०७/०३/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२२. –" साईसृष्टी, प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझियम (Sai Knowledge Park) प्रकल्पासाठी सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांचे प्रतिनीधींनी आजचे सभेत सदरहु प्रकल्पाचे सादरीकरण केले.यावर चर्चा होवून असे ठरले की, सल्लागार संदीप शिक्रे ॲन्ड असोशिएट्स, मुंबई यांनी शिर्डी येथे येवून, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमोर सदर प्रकल्पाचे सविस्तर सादरीकरण करावे व त्यानंतर या प्रकल्पासाठी विहीत पद्धतीने ई-निविदा मागविणेबाबत पुढील कार्यवाही करणेत यावी."

२) दिनांक ०४/०४/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७१. -सदहु प्रकल्पास येणारे अंदाजे रु.१४१.०० कोटीचे कामास शासनाचे विधी व न्याय विभागाचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस तसेच शासन मान्यतेनंतर "Design, Build, Finance, Operation & Transfer (DBFOT)" तत्वावर ई-निविदा मागविणेबाबतचे प्रस्तावावर"...सविस्तरचर्चाहोऊन, उपरोक्तप्रस्तावासमान्यतादेण्यातआली."

३) दिनांक ०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५६. -"..यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं. १९८, १९९, २०० व २०१ मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावर राबविणेकामी एकुण रक्कम रु.१६६.३९ कोटी इतके सुधारीत प्रकल्प अहवालास मान्यता देण्यात आली. व सदरचा प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी शासनाकडे पाठविण्यात यावा, असे ठरले."

४) दिनांक ०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६४७.-" साई नॉलेजपार्क प्रकल्प 'Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)'तत्वावर राबविणेकामीच्या प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांचे प्रतिनिधी आजचे सभेपुढे उपस्थित होते. सदस्यांनी सदरच्या प्रकल्पा संदर्भात विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे देता आली नाही. तरी साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना चर्चेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेसमोर बोलविण्यात यावे, असे ठरले."

५) दिनांक २०/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७१५.-" साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲड असोशिएट्स, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. प्रसाद सावंत व श्री. सागर रांगणेकर यांनी आजचे सभेपुढे सदरहू प्रकल्पासाठी "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्वावरील Request for Proposal च्या मसुद्याचे सादरीकरण केले. यावेळी खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या.

1. सदरचा ई-प्रस्ताव DBFOT तत्वावरील असल्याने प्रकल्पाचे किंमतीत सल्लागार फी, कॉटिन्जन्सीज,WCE व २वर्षातील भाववाढ इ. बाबी समाविष्ट न करता प्रकल्पाची निव्वळ किंमत रु.१४१.००कोटी गृहीत धरणेत यावी.

2. संस्थानला प्रती दिवस ३०० तिकीटे विनामुल्य देण्यात यावे.

3. e-RFP फी व bid security चे पेमेंट online करणेबाबत e-RFP मध्ये नमूद करावे.

4. तिकिटाचे दर खालीलप्रमाणे असावेत.

फक्त साईसृष्टी साठी रु.१५०/ प्रती व्यक्ती
सायन्स प्लॅनेटोरियम व वॅक्स म्युझियमसाठी एकत्रित रु.२०० / प्रती व्यक्ती
सर्व समावेशक एकत्रित रु.२५०/ प्रती व्यक्ती
शैक्षणिक सहली व १२ वर्षाखालील मुलांसाठी ५०% सुट असावी.

5. निविदा सादरकर्त्याचे पुर्वपात्रतेचे निकषामध्ये खालील अटींचा समावेश करावा.

Experience of having successfully completed similar works during last 10 years ending 31st March, 2017 should be either of the following.

a. One similar completed work costing not less than the amount equal to Rs.85crores. Or

b. Two similar completed works each costing not less than the amount equal to Rs.71 crores.Or

6. Three similar completed works each costing not less than the amount equal to Rs.57 crores.
7. Bidder should have average annual financial turnover of value not less than Rs.85 Crores.
8. Bidder should have a solvency of value not less than Rs.71 Crores. The bidder will be required to submit the bank certificate.
9. Mandatory Concession fee रु.1.00 कोटी करावी.
10. यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील बाबींचा व आवश्यक अटीशर्तीचा समावेश करून सल्लागार यांनी जाहिरात व ई-निविदांच्या सुधारीत प्रस्तावाच्या मसुद्याचे सल्लागार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादरीकरण करावे व त्यानंतर सदरचा मसुदा मान्यतेसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा असे ठरले."
11. ६) दिनांक ३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७.-"यावर सविस्तर चचा होऊन, मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९,२०० व २०१मधील जागेत साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)" तत्त्वावर उभारणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद अटी-शर्तीनुसार e-RFP प्रस्ताव मागविणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी इंग्रजी व मराठी वृत्तपत्रांमध्ये व्यापक स्वरूपात तसेच संस्थानचे वेबसाईटवरजाहिरातप्रसिद्ध करण्यास व याकामी येणा-याअपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली."
12. शासन मान्यता:- महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग, निर्णय क्र.सासवि-१०१८/१०४७/ प्र.क्र.११२/का.१६ दि.१६/१०/२०१८ अन्वयेखालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे.
13. "... श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)(सुधारणा) अधिनियम २००४ च्या कलम १७(३) मधील तरतुदीनुसारश्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यामौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.१९८,१९९, २०० व २०१ मधिल सुमारे २० एकर जागेत साई नॉलेज पार्क (DBFOT) तत्वावर राबविण्यास या शासन निर्णयान्वये खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.
14. साई नॉलेज पार्क उभारण्यासाठी विहित तरतूदींनुसार निविदा मागविण्यात याव्यात.
15. संस्थानाच्या जमीनीव्यतिरिक्त संस्थानाच्या अन्य कोणत्याही संसाधनांचा वापर केला जाणार नाही.
16. साई नॉलेज पार्क (DBFOT) तत्वावर उभारण्यासाठी विहित पद्धतीने निवड करण्यात आलेली संस्था व साईबाबा संस्थान यांच्यामधील करारनामा शासनमान्यतेने करण्यात यावा..."
17. प्रस्तावना:-मौजे निमगांव को-हाळे येथील उपरोक्त जागेतील प्रस्तावित साई नॉलेज पार्क प्रकल्पासाठी प्रकल्प सल्लागार म्हणून संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांना इकडील दि. ०९/१०/२०१७ अन्वये नेमणूकपत्र देण्यात आले आहे. सल्लागार यांनी दि.०९/०५/२०१८ रोजीचे पत्रान्वये प्रकल्पाचा रु.१६६.३९ कोटी मात्र रकमेचा DPR सादर केला आहे. त्यास मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५६ अन्वये मान्यता देणेत आली आहे. सदर मान्यतेनुसार साई नॉलेज पार्क प्रकल्प "Design, Build, Finance, Operate& Transfer

(DBFOT)" तत्वावर राबविणेकामी शासन मान्यता मिळणेसाठी दि.११/०६/२०१८ अन्वये सादर केलल्या प्रस्तावास वर नमुद दि.१६/१०/२०१८ रोजीचे शासन निर्णयान्वये मान्यता देणेत आली आहे. या प्रकल्पासाठी सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांनी सादर केलेला e-RFP Document चा मसुदा मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष व मा. सदस्यांना दि.१९/११/२०१८ चे ई-मेलद्वारे पाठविण्यात आला आहे. दि.०१/११/२०१८ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त निर्णय क्र.६४७ अन्वये ठरलेनुसार साईनॉलेजपार्कप्रकल्पाचेसल्लागारसंदीप शिक्रे, मुंबई यांनी दि.२०/११/२०१८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे सादरीकरण केले आहे. त्यावर सदरहु सभेत वरीलप्रमाणे निर्णय क्र.७१५ संमत झाला आहे.

18. मा. व्यवस्थापन समितीचे सभेतीलउपरोक्त निर्णयानुसार सल्लागार यांचे प्रतिनिधी श्री. संदिप शिक्रे, श्री. प्रसाद सावंत व श्री. सागर रांगणेकर यांनी दि.०५/०१/२०१९ रोजी शिर्डी येथे येऊन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे प्रकल्पाचे ई-निविदेबाबत सादरीकरण केले आहे.त्यावेळी देण्यात आलेल्या सूचना व मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे सभेतील उपरोक्त निर्णय विचारात घेऊन सल्लागार यांनी दि.०५/०१/२०१९ चे ई-मेलद्वारेe-RFP Document चा सुधारीत मसुदा सादर केला.

19. "साई नॉलेज पार्क प्रकल्प"उभारणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.३०/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४७ अन्वये देणेत आलेल्या मान्यतेनुसार वृत्तपत्रांमध्ये तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात प्रसिद्ध करून दिनांक०८/०३/२०१९ ते दिनांक २२/०४/२०१९ या कालावधीत ई-आरएफपी प्रस्ताव मागविण्यात आले होते.सदरहु प्रस्ताव मागणीबाबत दिनांक २७/०३/२०१९ रोजी सकाळी ११ वा. संस्थानचे शिर्डी येथील सभागृहात निविदापूर्व बैठक (Pre-bid Conference) आयोजित करण्यात आली होती. सदर ई-आरएफपी प्रस्ताव मागणीबाबत आयकॉनिक चंद्रकांत प्रॉडक्शन्स प्रा.लि., मुंबई व द व्हाईट आर्ट एन्टरप्राईजेस, मुंबई या दोन इच्छुक निविदा सादरकर्त्यांनी दि.२७/०३/२०१९ चे ई-मलद्वारे ई-प्रस्ताव सादर करणेसाठी जुन महिन्याच्या पहिल्याआठवडयापर्यंत मूदतवाढ मिळणेबाबत विनंती केली होती.

20. त्यानुसार दिनांक ०२/०५/२०१९ रोजीचे कार्यालयीन टिपणीवरील मान्यतेनुसार साई नॉलेज पार्क प्रकल्पाचे e-RFP प्रस्ताव सादर करणेसाठी Common Set of Deviationsमध्ये अ.क्र.१५ मध्ये नमूद केलेप्रमाणे दूस-यांदा दिनांक २७/०५/२०१९ अखेर मुदतवाढ देणेत आली होती.

21. विहीत मुदतीत दि.२७/०५/२०१९ अखेर ई-निविदा पोर्टलवरएकही ई-प्रस्ताव सादर करण्यात आलेला नसल्याने व सदरहु प्रकल्प मोठया स्वरूपाचा असून DBFOT तत्त्वावरील असल्याने इच्छुक ई-प्रस्ताव सादरकर्त्यांना त्यांचे परिपूर्णई-प्रस्ताव तयार करणेस जास्त कालावधी लागण्याची शक्यता असल्यामुळे स्पर्धात्मक प्रस्ताव प्राप्त होणेचे दृष्टीने ई-प्रस्ताव सादर करणेसाठी दिनांक१५/०७/२०१९ अखेर मूदतवाढ देणेत आली. मात्र सदरचे वाढीव मुदतीत देखील एकही ई-प्रस्ताव प्राप्त झालेला नाही. याबाबत मा. डॉ. सुरेश हावरे, अध्यक्ष महोदय यांना माहिती देण्यात आली असता त्यांनी उद्योजकांचा प्रतिसाद मिळालेला नसल्याने सदरहु प्रकल्प संस्थान निधीतून उभारणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे प्रस्ताव विचारार्थसादर करणेबाबत मौखिकनिर्देश दिले आहेत.

22. प्रस्ताव: विषयांकीत "साई नॉलेज पार्क" प्रकल्पाचे ई-प्रस्ताव मागणीस दिलेल्या वाढीव मुदतीत एकाही ठेकेदार अथवा उद्योजकाचा प्रतिसाद मिळालेला नसल्याने सदरहु प्रकल्पाचे उभारणीविषयी पुढील कार्यवाहीबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील दोन पर्यायांचा विचार करता येईल.

23. अ) प्रकल्पाची उभारणी "Design, Build, Finance, Operate& Transfer (DBFOT)" तत्वावर करणेसाठी RFP Document मधिल पुर्वपात्रता अटी तसेच इतर अटी शर्तींमध्ये शिथिलता देणे अथवा आवश्यक त्या सुधारणा करणे व त्यानुसार नव्याने ई-प्रस्ताव मागविणे.

24. ब) प्रकल्पाची उभारणी पूर्णपणे संस्थानचे निधीतून करावयाची झाल्यास त्याबाबत कार्यवाहीची रुपरेषा ठरविणे.

25. तरी प्रकल्पाचे सल्लागार संदीप शिक्रे ॲण्ड असोशिएटस्, मुंबई यांचे समवेत वरील पर्यायांबाबत चर्चा करून निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव कोऱ्हाळे,ता.राहाता येथील गट नं.१९८,१९९,२०० व २०१ मधील संस्थान मालकीचे जागेत साईसृष्टी,म्युझीयम,तारांगण व बॉटनिकल गार्डन यासह "साई नॉलेज पार्क" प्रकल्प 'Design, Build, Finance, Operate & Transfer (DBFOT)' तत्वावर उभारणीसाठी करण्यात आलेल्या ई-प्रस्ताव मागणीस प्रतिसाद न मिळाल्याने सदर प्रकल्प पुर्णपणे संस्थानचे निधीतून उभारणीसाठीचा सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५** **श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव कोल्हार रस्ता प्रारामा ०८ वर तात्पुरत्या स्वरुपातील स्वागत कमानीचे Structural Stability चे तपासणी अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः- अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

प्रस्तावनाः- शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव कोल्हार रस्ता प्रारामा ०८ यावर शिर्डी शहराचे उत्तर बाजूस कि.मी.९१/५०० या साखळी क्रमांकामध्ये बांधकाम करणेस कार्यकारी अभियंता, जागतिक बॅक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांनी दि.२१/०६/२०१८ रोजीचे पत्राने ना-हरकत दाखला दिलेला आहे. त्यामधे खालीलप्रमाणे अटी नमूद केलेल्या आहेत.

१. स्वागत कमानीची Structural Stability व Safety ची जबाबदारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील.

२. भविष्यात सदर रस्त्याचे रुंदीकरण झाल्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी स्वखर्चाने कमानीचे रुंदीकरण करतील अथवा कमान काढुन घेतील.

३. स्वागत कमानीचे बांधकाम करतेवेळी रस्ता वाहतूकीस अडथळा होणार नाही तसेच अपघात होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांची राहील.

४. स्वागत कमानीची देखभाल दुरूस्ती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मार्फत करण्यात येईल.

स्वागत कमान उभारणी करीता साईभक्त डॉ. सुमनजी, चेअरमन साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांनी दि.०४/०७/२०१८ रोजीचे व्हॉटस् ॲप व्दारे प्राप्त झालेल्या पत्राने देणगीदाखल स्वागत कमान उभारणेबाबत इच्छा प्रगट केली होती. त्यानुसार त्यांना देणगीदाखल कमानीचे काम सुरु करणेसाठी दि.११/०७/२०१८ रोजीचे पत्राने कळविण्यात आले होते. साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत सदरहू कमानीचे कामातील सिव्हील व फॅब्रीकेशनचे काम करणेसाठी अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स, औरंगाबाद यांना रु.१० लक्ष + १८ % जीएसटी या दराने काम दिलेले होते. तसेच दरवर्षी रामनवमी उत्सवात भव्य देखावे उभारणारे श्री अमन विधातेव विलास महाडिक,व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत स्वागत कमानीवर एफआरपी शिटमध्ये सजावट करणेचे काम करण्यात आले आहे.

तथापि साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत झालेल्या कामाचे बिल अदा केले जात नसल्याने व शताब्दी महोत्सव समारोप कार्यक्रमापुर्वी स्वागत कमान उभारणे आवश्यक असल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.०५/१०/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६३१ अन्वये खालील प्रमाणे निर्णय पारीत झालेला आहे.

" संस्थान मार्फत नगर – मनमाड हायवेवर देणगीदारामार्फत तात्पुरत्या स्वागत कमानी तयार करण्याचे काम चालु आहे. सदर कमानी उभारणेकामी देणगीदाराने रक्कम न दिल्यास ती संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली."

त्यानुसार ठेकेदार अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स यांचेमार्फत स्वागत कमानीचे काम पूर्ण करुन घेण्यात आले आहे. ठेकेदार यांनी त्यांचे दि.२४/१०/२०१८ रोजीचे पत्रान्वये साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांचेमार्फत बिल अदा करणेत येत नसल्यामुळे संस्थानमार्फत बिल अदा होणेबाबत विनंती केली. संस्थानमार्फत साईधाम फाऊंडेशन, मुंबई यांना ठेकेदार यांचे उर्वरीत बिलाची रक्कम अदा करणेबाबत विनंती करणेत आली. तथापि साईधाम फाऊंडेशन यांनी सदरची रक्कम न दिल्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/११/२०१८ रोजीचे

सभेतील निर्णय क्रं. ७१९ अन्वये ठेकेदार यांना देय रक्कम संस्थानमार्फत अदा करणेस मान्यता देण्यात आली. त्यानुसार ठेकेदार अरिहंत इंजिनिअरींग वर्क्स यांना रक्कम रु.८,८०,०००/- मात्र रक्कम अदा करणेत आली.

आता, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, अहमदनगर यांचे दि.२१/०२/२०१९ रोजीचे पत्राव्दारे तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेली स्वागत कमान काढुन घेणेबाबत कळविले आहे. त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ रोजीचे सभेत प्रस्ताव सादर करणेत आला असता, सदर प्रस्तावावर निर्णय क्रं.१९२ खालील प्रमाणे पारीत झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव कोल्हार रस्ता प्रामा ०८ वर तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेल्या स्वागत कमान बांधकामाचे तीन खाजगी सक्षम एजन्सी कडून Structural Stability ची तपासणी करुन प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे व त्यानुसार स्वागत कमान आहे त्याच ठिकाणी राहू देणेबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठविणेत यावा, असे ठरले."

त्यानंतर कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेशित केलेल्या दि.११/०६/२०१९ रोजीचे पत्रान्वये,"श्री साईबाबा शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव कोल्हार(प्रामा ०८) रस्त्यावर वर उभारलेल्या कमानीस तात्पुरत्या स्वरुपात परवानगी दिलेली होती. रस्ता सुरक्षेच्या दृष्टीने सदरची कमान रस्त्यास अडथळा ठरत आहे. सदर कमानीच्या कामाचा दर्जा व पहाणी केली असता कमानीच्या Stability बाबत या कार्यालयास निश्चितच शंका आहे. कमानीच्या प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामाचा दर्जा, उंची, हवेचा दाब, बाजूस असलेल्या विद्युत तारा, मनमाड महामार्गावरुन होणारी प्रवाशांची वाहतुक इ. यांचा सखोल विचार करता सदरची कमान तातडीने काढुन घेण्याचे कळविले आहे. अद्याप आपण कमान काढुन घेणे बाबतची कुठलीही कार्यवाही केलेली नाही. तरी याबाबत तात्काळ कार्यवाही न झाल्यास पुढील जबाबदारी सर्वस्वी आपलीच राहील,"असे कळविलेले आहे.

तसेच पोलीस निरिक्षक, शहर वाहतुक नियंत्रण, शाखा शिर्डी यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अग्रेशित केलेल्या दि.२१/०६/२०१९ रोजीचे पत्रात,"नगर-मनमाड रोडवर भाविकांना आकर्षणासाठी प्लॅष्टर ऑफ पॅरिसची भव्य कमान तात्पुरती उभारण्यात आलेली आहे. परंतु सध्या पावासाळयाचा हंगाम चालु असल्याने पाऊस पाण्यामुळे सदर प्लास्टर ऑफ पॅरीसची कमान भिजून ठिसुळ होऊन भविष्यात गंभीर स्वरुपाची दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर कमान तात्काळ काढुन घेणेबाबत आपले अखत्यारीत असलेल्या सबंधित विभागाला आदेश होणेस विनंती,"असे कळविलेले आहे. श्री अमन विधाते, स्वागत कमान फायबर क्लॅडींग काम करणारे ठेकेदार यांचा दि.२२/०६/२०१९ रोजीचे ईमेल व्दारे कमानीचे केलेल्या कामानुसार आता सदर कमानीस परत डागडूजी करण्याची गरज आहे, असे कळविलेले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०६/०६/२०१९ सभेतील निर्णयानुसार स्वागत कमान बांधकामाची तीन खाजगी सक्षम एजन्सी कडून Structural Stability ची तपासणी करुन घेणेसाठी १) श्री.आर. आर. कुलकर्णी, पूणे २) श्री. मधूकर डि. बाल्टे, अहमदनगर ३)श्री. मिलींद राठी, जळगाव या ०३ सल्लागारांना दि.२९/०६/२०१९ रोजीचे पत्राने कळविणेत आले होते. याबाबत तिनही एजन्सीने खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

१) श्री.आर. आर. कुलकर्णी, पूणे यांनी दिलेला अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

Structural Opinion about stability

१. The truss portal which is main structural supporting system for super structure is eccentric compared to the foundation and pedestal by 0.5m without having any robust force mechanism to the foundation and pedestals.

२. As the portal is lifted by 0.6m to match height requirement, the frame below is not well designed to transfer the superstructure load to foundation / pedestal. The base frame is not braced. Also the vertical members of base frame are not collinear with vertical members of columns.

३. Thus the load transfer mechanism from superstructure to foundation through the base frame is not a well-engineered system and is weak link in whole system and may not perform as desired in case of extreme load (wind) condition.

Conclusion:- In present condition the welcome portal structure may not perform as desired in case of extreme load (wind) condition and is not advised to continue as it is from

safety point of view unless it is retrofitted to have well engineered load path system to resist the loads for which it is intended.

२) श्री. मधूकर डि. बाल्टे, अहमदनगर यांनी दिलेला अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

Remark & Conclusion:

Beam – Column Frame is strong enough to resist the forces coming on it including wind forces. Connections to be strengthened.

Steel column is not concentric with R.C.C. Column.

Connection of steel column to RCC Column is faulty. But can be repaired and strengthened keeping the frame in Position.

R.C.C. Foundation shall be checked by excavating surrounding ground to check dimensions like base dimensions, depth of footing from ground, soil strata on which foundation rests.

Conclusion:- I am of the opinion that structural frame work is safe. Check the RCC Structure and soil strata below ground. Repair and strengthen the connection of steel frame to RCC structure.

३) श्री. मिलींद राठी, जळगाव यांनी दिलेला अभिप्राय खालीलप्रमाणे आहे.

Conclusion:

In present condition the welcome portal design id OK to withstand all dead & live lads. However to withstand lateral loads of winds and seismic forces. Bracings are needed to be added in the top horizontal member of 25m length. Also bracing to be provided to the cladding frame in all directions.

Also the bottom base is needed to be strengthened using ISMC200 / ISMC100. All gaps between base plate and concrete to be filled with high strength grout GP2.

If the above minor changes / strengthening is done to the welcome portal (Structure) will be sufficiently strong and stable to withstand all forces and stisfy the IS codes.

विभागाचा अभिप्राय:- स्वागत कमान Structural Stability संबंधी अहवाल विचारात घेता स्वागत कमान आहे त्या स्वरुपात ठेवल्यास वादळी वा-यामुळे कमानीला धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कमानीचे सुदृढीकरणाचे काम करणेची आवश्यकता आहे.

करीता, सदर कमानीचे फायबर क्लॅडींग व स्टिल स्ट्रक्चर काढून कमानीचे आर.सी.सी. फुटींग, कॉलम व फॅब्रीकेशन मधील मेंबर्सचे योग्य प्रकारे सुदृढीकरण करुन पुन्हा उभारणी करता येईल. तसेच कमानीचे सुधारीत नकाशे कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांचेकडे सादर करून कमानीचे कामास मान्यता घेता येईल. यासाठी उपरोक्त नमूद सल्लागारांकडून फीचे प्रस्ताव घेऊन निम्नतम फी घेणा-या सल्लागारांकडून सदरचे काम करुन घेता येईल.

प्रस्तावः- उपरोक्तप्रमाणे तीनही एजन्सीमार्फत प्राप्त झालेला अभिप्राय विचारात घेता शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव-कोल्हार रस्ता प्ररामा ०८ या रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेल्या स्वागत कमानीबाबत खालील बाबींवर निर्णय होणेस विनंती.

शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव-कोल्हार रस्ता प्ररामा ०८ वर तात्पुरत्या स्वरुपात उभारणेत आलेली स्वागत कमान कायमस्वरुपी काढून घेणे.

अथवा

स्वागत कमानीचे सदृढीकरणासाठी नव्याने सुधारीत स्ट्रक्चरल डिझाईन तयार करुन त्यास कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प विभाग,अहमदनगर यांचे मान्यतेने पुन्हा उभारणी करणे तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळयानिमित्त कोपरगाव कोल्हार रस्ता प्रारामा ०८ वर तात्पुरत्या स्वरुपातील स्वागत कमान कायम स्वरुपी राहु देण्याचे दृष्टीने सदर स्वागत कमानीचे सदृढीकरणासाठी तीन स्टक्चरल सल्लागार यांनी सादर केलेल्या अभिप्रायानुसार सुधारीत स्ट्रक्चरल डिझाईन वरील पैकी एकाकडून तयार करुन घेण्यात यावे, व कार्यकारी अभियंता, जागतिक बँक प्रकल्प विभाग, अहमदनगर यांचेकडून त्यास मान्यता घेण्यात यावी,असे ठरले. त्यानुसार स्ट्रक्चरल डिझाईन व कमानीची दुरुस्ती करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०६ **मा.ना.देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे संभाव्य दौऱ्याचे बंदोबस्ताकामी येणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची निवास व्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** पोलीस निरीक्षक, शिर्डी पोलीस स्टेशन यांचे जा.क्र.११४/२०१९ चे पत्र प्राप्त असुन सदरचे पत्रामध्ये, मा.ना. श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई हे दि.३१/०७/२०१९ शिर्डी येथे शेती महामंडळाचे जागेत निमगांव कोऱ्हाळे, ता.राहाता, जि.अहमदनगर येथे महाराष्ट्र राज्य सरपंच परिषद करीता संभाव्य दौरा असुन सदर सरपंच परिषद घेण्यात येणार आहे. तरी मा.मुख्यमंत्री साहेब यांना **"झेड प्लस"** वर्गवारीची सुरक्षा असल्याने त्यांचे सुरक्षिततेच्या दृष्टीकोणातुन सुमारे ३५० पोलीस कर्मचारी व सुमारे ५० अधिकारी येणार असल्याने आपलेकडील ५०० रुम येथील २० रुम व फेज ०२ येथील २० हॉल त्यात महिला व पुरुष कर्मचारी असे ३५० पोलीस कर्मचारी यांची राहण्याची सोय होईल असे निशुल्क दि.२९/०७/२०१९ रोजीचे १५.०० ते दि.३१/०७/२०१९ रोजीचे २०.०० वाजेपर्यंत मिळणेस विनंती केलेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.१२/१२/२०१२ चे सभेतील विषय क्र.०२ वरील निर्णय क्र.११०५/९ नुसार, शिर्डीमध्ये गर्दीच्या काळात साईभक्तांचे सुरक्षीतेकरीता येणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना संस्थानमार्फत मोफत भोजन देण्यात यावे. तसेच निवासाकरीता कर्मचाऱ्यासाठी हॉल आणी पोलीस अधिकाऱ्यांसाठी साध्या खोल्या देण्यात याव्यात असे ठरलेले आहे. त्यानुसार संस्थान आयोजीत प्रमुख तिन उत्सव, नाताळ व नववर्ष निमीत्ताने येणारे भाविकांचे गर्दीचे नियोजनकामी येणारे अधिकारी व कर्मचारी यांची मोफत निवास व्यवस्था करण्यात येते.

तसेच मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०७/२०१८ चे सभेतील निर्णय क.५९० अन्वाये मंदिर सुरक्षेकरीता नियुक्त पोलीस कर्मचाऱ्यांना शासनामार्फत भत्ते मिळत असल्याने संस्थानमार्फत त्यांची निवास व्यवस्था करणेची आवश्यकता नाही, असे ठरले आहे. त्यानुसार मंदिर सुरक्षेकरीता नियुक्त पोलीस कर्मचारी यांची साईआश्रम धर्मशाळा येथे सशुल्क निवास व्यवस्था करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे आयोजीत सरपंच परिषदेचे वेळी मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दौऱ्याचे बंदोबस्ताकामी येणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना शासनामार्फत भत्ते मिळणार असल्याने मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०७/२०१८ चे सभेतील निर्णय क्र.५९० नुसार संबंधीतांची संस्थानमार्फत निशुल्क निवास व्यवस्था करणेची आवश्यकता नाही, असे नम्र मत आहे.

तरी मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे संभाव्य दौरा बंदोबस्तकामी येणारे अधिकारी व कर्मचारी यांची सशुल्क अथवा निशुल्क निवास व्यवस्था करणेबाबतचे विषयावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४०९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.ना.श्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे दौऱ्याचे बंदोबस्ताकामी येणारे ३५० पोलीस कर्मचारी व सुमारे ५० अधिकारी यांना साईबाबा भक्तनिवास (५०० रुम) येथील २० रुम व साईधर्मशाळा येथील २० हॉल दि.२९/०७/२०१९ रोजीचे १५.०० ते दि.३१/०७/२०१९ रोजीचे २०.०० वाजेपर्यंत संस्थानमार्फत निशुल्क देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-संरक्षण विभाग)**

---

आयत्या वेळेचा

**विषय नं.०७** **सन २०१९-२० करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदांमधील न्युनतम दरधारकासोबत (L1) चर्चा वाटाघाटी करुन अंतीम कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ) - सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

प्रस्ताविक- श्री साईभक्तांना प्रसादरुपी वितरण करण्यात येणारे मोतीचुर लाडु, मंदिर दर्शन रांगेत वाटप करण्यात येणारी सुटी बुंदी तसेच प्रसादालयात भोजनात व अन्नपाकीटामध्ये मिष्ठान्न म्हणुन देण्यात येणारी बर्फी प्रसाद बनविणेकामी सन २०१९-२० करीता ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. श्री साईबाबा संस्थानचे लाडु, बुंदी व बर्फी प्रसाद तयार करुन पॅकींग करुन देणेकामी दि.०४/०२/२०१९ ते दि.२२/०२/२०१९ पर्यंत ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यामध्ये एकुण ०४ निविदा प्राप्त झाल्या होत्या, मात्र ०४ पैकी केवळ एकच निविदा पात्र ठरल्याने नव्याने फेर ई-निविदा दि.०७/०६/२०१९ ते दि.२८/०६/२०१९ पर्यंत प्रसिध्द करण्यात आली होती. सदरचे कालावधीत ०२ निविदा प्राप्त झाल्यामुळे दि.०६/०७/२०१९ पर्यंत प्रथम मुदतवाढ देवुनही केवळ दोनच निविदा प्राप्त झाल्याने सदरचे ई-निविदेस दुस-या वेळेस दि.१५/०७/२०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. दुस-या मुदतवाढीत एकुण ०३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. दि.०१ डिसेंबर २०१६ रोजीचे खरेदी नियमावलीतील ४.४.३.१ मध्ये " कामाची पुर्तता वेळेवर करण्यास महत्व देण्यात आले तर, खरेदी अधिकारी (०२ वेळा मुदतवाढ दिल्यानंतर देखील) ०३ निविदा पेक्षा कमी प्रतीसाद मिळाला तरी त्यासह पुढे जाण्याचा निर्णय घेवु शकेल" असे नमुद आहे. त्यानुसार प्राप्त झालेल्या ई-निविदांचा तपशील खालीलप्रमाणे-

१) दि यशोधरा महीला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्या, नाशिक व्दारा सौ.संगिता अनिल दशपुते
शिवसाई एन्टरप्राईजेस शिर्डी, - द्वारा श्री सोन्याबापु शेळके

१) पिनाकेश्वर मागासवर्गीय स्वंयरोजगार सेवा सहकारी संस्था मर्या, नाशिक- द्वारा श्री सागर खिराडकर

उपरोक्तप्रमाणे संस्थानला प्राप्त झालेल्या तीनही निविदाधारकांच्या ई निविदांचे तांत्रिक लिफाफे (Technical Bid) दि.१८/०७/२०१९ रोजीचे खरेदी समितीच्या सभेत उघडण्यात आले होते. त्यामध्ये प्राप्त झालेल्या तीनही ई- निविदाधारकांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता, उपरोक्तप्रमाणे प्राप्त निविदांपैकी दोन निविदा तांत्रिक दृष्टया पात्र ठरल्या आहेत.

सदरहु पात्र झालेल्या दोन निविदाधारकांची व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) दि.२४/०७/२०१९ रोजीचे खरेदी समितीच्या सभेत उघडण्यात येऊन न्युनतम दर असलेल्या निविदाधारकास सन २०१९ -२० करीता अंतिम कार्यादेश देता येईल.

उपरोक्तप्रमाणे पात्र निविदाधारकांची व्यापारी दरपत्रके (Commercial Bid) दि.२४/०७/२०१९ रोजीचे खरेदी समितीचे सभेसमोर व उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आली असुन, त्यामधील मुळ दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे—

| अनं. | तपशील | सध्याचे दर | दि यशोधरा महीला सह. औद्यो. उत्पा. संस्था, नाशिक | शिवसाई एन्टरप्राईजेस शिर्डी. |
|---|---|---|---|---|
| | | | निविदेमधील दर रूपये | |
| १ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचा एक लाडु) हाताने पॅकींग करणे. | २७१/- | २९६/- | <u>२६७/-</u> |
| २ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचा एक लाडु) मशिनने पॅकींग करणे. | २२१/- | २५१/- | <u>२२०/-</u> |
| ३ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे , पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) हाताने पॅकींग करणे | २८८/- | ३०५/- | <u>२८५/-</u> |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे , पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) मशिनने पॅकींग करणे. | २२१/- | २५१/- | २२०/- |
| ५ | वनस्पती तुपातील रवा, खोबरा बर्फी तयार करणे (०१ क्विंटल साखरेचे) | २७८/- | ३१०/- | १५७/- |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय- सन २०१९-२० मध्ये साईभक्तांना प्रसादरूपी वितरीत करण्यात येणारे मोतीचुर बुंदीचे लाडू, दर्शन रांगेतील साईभक्तांना मोफत वाटप करण्यात येणारी सुटी बुंदी तसेच प्रसादालयात भोजनात मिष्ठान्न म्हणुन बनवुन देण्यात येणारी बर्फी बनविणेकामी उपरोक्तप्रमाणे नमुद केलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील गडद व आधोरेखीत केलेल्या शिवसाई एन्टरप्राईजेस शिर्डी या न्युनतम दरधारकांबरोबर चर्चा-वाटाघाटी करून त्यावर निर्णय होऊन, संबंधीत न्युनतम दरधारकांस अंतीम कार्यादेश देणेकामी मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४१०** **सन २०१९-२० करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदांमधील न्युनतम दरधारक शिवसाई एन्टरप्राईजेस शिर्डी हे आजचे व्यवस्थापन समितीसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. समितीने त्यांचेशी दरकमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी खालील प्रमाणे दर देऊ केले.**

**शिवसाई एन्टरप्राईजेस शिर्डी.**

| अनं. | तपशील | ई-निविदेतील प्राप्त दर | चर्चेअंती देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| १ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचा एक लाडु) हाताने पॅकींग करणे. | २६७/- | २६६/- |
| २ | गावरान तुपातील मोतीचुर बुंदीचे प्रसाद लाडू तयार करुन सुकविणे, पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग लाडुस (५० ग्रॅम वजनाचा एक लाडु) मशिनने पॅकींग करणे. | २२०/- | २१९/- |
| ३ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे , पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) हाताने पॅकींग करणे | २८५/- | २८४/- |
| ४ | गावरान तुपातील सुट्टी बुंदी प्रसाद तयार करुन सुकविणे , पॅकिंग करणे इ. चा दर प्रती १००० नग पाकीटांस (अंदाजे ५० ग्रॅम वजनाचे एक पाकीट) मशिनने पॅकींग करणे. | २२०/- | २१९/- |
| ५ | वनस्पती तुपातील रवा, खोबरा बर्फी तयार करणे (०१ क्विंटल साखरेचे) | १५७/- | १५६/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१९-२० करीता मोतीचुर लाडू, सुटी बुंदी व बर्फी प्रसाद बनविणेकामी मागविण्यात आलेल्या ई-निविदांमधील न्युनतम दरधारक शिवसाई एन्टरप्राईजेस, शिर्डी यांनी चर्चेअंती देऊ केलेले वरील प्रमाणे अंतीम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- लाडू व बर्फी प्रसाद निर्मीती विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **कॅन्टीन विभागासाठी माहे जुलै ते मार्च-२०२० अखेर फिल्टर कॉफी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी माहे जुलै २०१९ ते मार्च २०२० अखेर फिल्टर कॉफी खरेदीसाठी ऑनलाईन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तुचा तपशिल | फिल्टर कॉफी खरेदी |
| ०२ | मागणी | फिल्टर कॉफी |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.१९.०६.२०१९ ते १.०७.२०१९ |

| | | |
|---|---|---|
| | | प्रथम मुदतवाढदि.२.७.२०१९ दि.१०.०७.२०१९ पर्यंत |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ०६ निविदाधारकांना ई-मेलव्दारे |
| ०५ | तर तसे कोणाला पाठविले ? | 06 ई-मेल आय डी वर |
| ०६ | निविदा सुरु झाल्याची दिनांक व वेळ | दि.१९.०६.२०१९<br>टेक्निकल बीड -१८.०७.२०१९<br>कमर्शियल बीड- २४.०७.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०५ (पाच) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०३ (तीन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिले आहेत का. | होय |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली का ? | होय |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | - |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| Sl. No | Description | Quantity in Quintal | NileshMohanraoGawali | LAXMI MARKETING | ShivsaiEnterprises |
|---|---|---|---|---|---|
| | | | Rate per quintal | Rate per quintal | Rate per quintal |
| 1 | Coffee - Filter, Branded | 12.00 | 31,800.00 | 32,600.00 | 31,100.00 |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि दर- | |

| अ.नं | तपशिल | कालावधी | मागील वर्षीचे दर |
|---|---|---|---|
| १ | फिल्टर कॉफी | सन २०१८-२०१९ | २९,७००/- |

| | | |
|---|---|---|
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल-- | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | ---- |
| १६ | मागील खरेदी दर | वरील अ.नं.१३ मध्ये नमुद केला आहे. |
| १७ | मागील पुरवठादार | मे.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगांव |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाधारकाने सादर कलेले दर | वरील अ.नं.१२ मध्ये नमुद केले आहे. |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाधारकाचे नाव- | शिव साई इंटरप्रायजेस, निमगांव को-हाळे |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे काय ? | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. मुख्य लेखाधिकारी, मा. प्रशासकीय अधिकारी, मा. अधीक्षक, खरेदी विभाग |
| २२ | मागील खरेदी सध्याचे प्राप्त दर फरक % ने कमी/जास्त | |
| ---------- ----------- ---- ----------- | | |

२३. संक्षिप्त टीप (प्रस्ताव) -संस्थानचे कॅन्टीन विभागासाठी फिल्टर कॉफी खरेदीकामी फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून या ई-निविदेमध्ये ०५ निविदाधारकांनी भाग घेतला होता. तथापि याकामी तांत्रिक निविदेमध्ये ०३ निविदाधारक पात्र ठरले होते. पात्र ठरलेल्या ०३ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.२४.०७.२०१९ रोजी उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे.शिवसाई एंटरप्रायजेस, निमगांव-को-हाळे यांचे दर न्युनतम आलेले आहेत.

तरी न्युनतम दरधारक मे.शिवसाई एंटरप्रायजेस, निमगांव-को-हाळे यांचेशी फेर ई-निविदेमध्ये दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा-वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

निर्णय क्र.४११ प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक मे.शिवसाई एंटरप्रायजेस, निमगांव-को-हाळे हे आजचे व्यवसथापन समितीसभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. तथापी त्यांनी पत्राव्दारे खालील प्रमाणे दर देऊ केले आहे.

मे.शिवसाई एंटरप्रायजेस, निमगांव-को-हाळे

| अ.नं. | तपशील | प्रमाण Quantity | ई-निविदेतील दर प्रति क्विंटल | चर्चेअंती देऊ केलेले दर प्रति क्विंटल |
|---|---|---|---|---|
| 1 | Coffee - Filter, Branded | 12.00 Quintal | 31,100.00 | 31,000.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभागासाठी माहे जुलै ते मार्च-२०२० अखेर फिल्टर कॉफी खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम निविदाधारक मे.शिवसाई एंटरप्रायजेस, निमगांव-को-हाळे यांनी वरील प्रमाणे देऊ केलेले अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- खरेदी विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.०९ मंदिर विभागासाठी माहे ऑगस्ट ते जुलै-२०२०अखेर रानशेणी गोवरी खरेदीकामी ई-निविदा प्राप्त न्युनतम दराबाबत निर्णय होणेबाबत.

प्रस्ताव- संस्थानचे मंदिर विभागासाठी माहे ऑगस्ट २०१९ ते जुलै २०२० अखेर रानशेणी गोवरी खरेदीसाठी ऑनलाईन ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| ०१ | खरेदी करावयाचे साहित्य/ वस्तुचा तपशिल | मंदिर विभागासाठी रानशेणी गोवरी खरेदी |
| ०२ | मागणी | रानशेणी गोवरी |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि.१४.०६.२०१९ ते २७.०६.२०१९<br>प्रथम मुदतवाढ दि.२७.०६.२०१९ दि.०५.०७.२०१९ पर्यंत<br>व्दितीय मुदतवाढ दि. ०५.०७.२०१९ ते दि. १२.०७.२०१९ अखेर |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसुचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठविली जाते | www.mahatenders.gov.in, संस्थान वेबसाईट व ०४ निविदाधारकांना दुरध्वनीव्दारे |
| ०५ | तर तसे कोणाला पाठविले ? | ०४ निविदाधारकांना दुरध्वनीव्दारे |
| ०६ | निविदा सुरु झाल्याची दिनांक व वेळ | दि.१४.०६.२०१९<br>टेक्निकल बीड –दि. १८.०७.२०१९<br>कमर्शियल बीड- २४.०७.२०१९ |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०३ (तीन) |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०३ (तीन) |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिले आहेत का. | नमुने मागविले नाहीत. |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम आदा केली का ? | ०१ निविदाधारकाने बयाणा रक्कम भरलेली असुन उर्वरीत ०२ निविदाधारकांना सुट आहे. |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का ? | - |
| १२ | निविदाकारांनी सादर केलेले दर- | |

| अ.नं | तपशील | परिमाण किलो ग्रॅम मध्ये | मे. विजय धोडींबा गवळी, धुळे | मे. नाकोफ इंडीया लिमिटेड, नागपुर | मे. हिमालया एक्जिम &ट्रेड, मुंबई |
|---|---|---|---|---|---|
| | | | दर रुपये प्रती किलो ग्रॅम मध्ये | | |
| 1 | रानशेणी गोवरी-वाळलेली | २५००००० | ५.७० | ८१.०० | १५.०० |

| | | |
|---|---|---|
| १३ | यापुर्वी केलेल्या खरेदीचा तपशील आणि दर- | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अ.नं | तपशिल | कालावधी | मागील वर्षीचे दर रुपये प्रती किलो ग्रॅम |
| | १ | रानशेणी गोवरी- वाळलेली | सन २०१८-२०१९ | ५.०० |
| १४ | मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल-- | | | |
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | ---- | | |
| १६ | मागील खरेदी दर | ५/- रुपये प्रती किलो ग्रॅम | | |
| १७ | मागील पुरवठादार | मे. विजय धोडींबा गवळी, धुळे | | |
| १८ | सध्याचे न्युनतम निविदाधारकाने सादर कलेले दर | वरील अ.नं.१२ मध्ये नमुद केले आहे. | | |
| १९ | सध्याचे न्युनतम निविदाधारकाचे नाव- | मे. विजय धोडींबा गवळी, धुळे | | |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे काय ? | होय | | |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नावे. | मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मा. मुख्य लेखाधिकारी, मा. प्रशासकीय अधिकारी, मा. अधीक्षक, खरेदी विभाग | | |
| २२ | मागील खरेदी | सध्याचे प्राप्त दर | फरक | % ने कमी/जास्त |
| | ---------- | ----------- | ---- | ----------- |

२३. संक्षिप्त टीप (प्रस्ताव)-संस्थानचे मंदिर विभागासाठी रानशेणी गोवरी खरेदीकामी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली असून या ई-निविदेमध्ये ०३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. तथापि याकामी तांत्रिक निविदेमध्ये ०३ निविदाधारक पात्र ठरले होते. पात्र ठरलेल्या ०३ निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा दि.२४.०७.२०१९ रोजी उघडण्यात आल्या आहेत. यामध्ये मे.विजय धोडींबा गवळी, धुळे यांचे दर न्युनतम आलेले आहेत.

तरी न्युनतम दरधारक मे. विजय धोडींबा गवळी, धुळे यांचेशी ई-निविदेमध्ये दिलेल्या न्युनतम दरांबाबत चर्चा-वाटाघाटी होऊन निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर.

**निर्णय क्र.४१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर विभागासाठी माहे ऑगस्ट ते जुलै-२०२० अखेर रानशेणी गोवरी खरेदीकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदेतील निम्नतम निविदाधारक मे. विजय धोडींबा गवळी, धुळे यांनी देऊ केलेले प्रती किलो रु.५.७० मात्र दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- खरेदी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक प्रिंटर्स खरेदी करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करुन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्रं.:- ०१. दि.०७.११.२००९ निर्णय क्रं.७९९, ०२. दि.२३.०५.२०१७ निर्णय क्रं. ४३२, ०३. दि.०४.०४.२०१८ निर्णय क्र. २४१, ०४. दि.०४.०४.२०१८ निर्णय क्र. २७५

प्रास्ताविक:- साईटेक प्रकल्पअंतर्गत करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचा प्रकल्प देखभालीचा कालावधी माहे एप्रिल-२०१७ मध्ये संपुष्टात आलेला होता. सबब, साईटेक प्रकल्प दुरुस्ती व देखभालीसाठी नविन कंपनीची नेमणूक होईपर्यंत सदरहू प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत करणेत आलेली कार्यप्रणाली सुरळीत चालू राहून साईभक्तांची गैरसोय होऊ नये व संस्थानचे कामकाजात अडथळा येऊ नये याकरीता साईटेक प्रकल्प दुरुस्ती देखभालीसाठी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना कार्यादेश देणेस तसेच त्यांचेमार्फत भाडेतत्वावर वापरात असलेले प्रिंटरचे मासिक भाडे अंदाजे रक्कम १,७०,०००/- + कर संस्थानमार्फत अदा करणेस मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ४३२ तसेच दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२४१ अन्वये मान्यता घेणेत आलेली होती. सदर निर्देशान्वये, प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत प्रिंटर वापराचे मासिक भाडे संस्थानमार्फत M/s Printech Infotech Services Pvt. Ltd., Mumbai यांना अदा करणेत येत असून सदरचे प्रिंटर्स आजपावेतो कार्यान्वीत आहेत.

मे.टाटा सन्स यांनी तयारी दर्शविलीप्रमाणे त्यांचेमार्फत "साईटेक प्रकल्प-०२" अंतर्गत कार्यप्रणाली बाबतची सर्व कार्यवाही व डेटा सेंटर, नेटवर्क, हार्डवेअर इ. संदर्भात मार्गदर्शन व व्यवस्थापनबाबतची सर्व कार्यवाही मोफत स्वरूपात करुन घेणेस मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२७५ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे. तसेच, प्रकल्पाअंतर्गत करावयाची सर्व खरेदी संस्थानला करावी लागणार असल्याने सदर निर्णयान्वये, "साईटेक प्रकल्प-०२" अंतर्गत हार्डवेअर करीता मे.टाटा सन्स यांचे सल्यानुसार व संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी, असे निर्देश देणेत आलेले आहेत.

मे.प्रिंटेक यांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या प्रिंटरबरोबरच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत खरेदी करणेत आलेले प्रिंटर्सही विविध विभागांमध्ये कार्यान्वीत आहेत. मे.प्रिंटेक यांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या प्रिंटर्सबाबत मा.वरिष्ठांनी सदरचे प्रिंटर्स संस्थानने खरेदी करुन कार्यान्वीत करणेबाबत निर्देशीत केलेले आहे.

मे.प्रिंटेक यांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या प्रिंटर्सचे ऐवजी सदर ठिकाणी संस्थानमार्फत प्रिंटर्स कार्यान्वीत करणे व विभागांचे मागणीनुसार कार्यालयीन कामकाजासाठी प्रिंटर्स उपलब्ध करणे याकामी खरेदी करावयाचे प्रिंटर्सबाबत मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय क्र.२७५ अन्वये, मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांचा अभिप्राय घेणेत येऊन, त्यानुसार नविन प्रिंटर्स खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये २४,७८,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेकामी इकडील विभागाचे दि.०१.०२.२०१९ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, मान्यता घेणेत आलेली होती.

उपरोक्तप्रमाणे नविन प्रिंटर्स खरेदी करणेकामी दि.०५.०२.२०१९ ते दि.०२.०३.२०१९ अखेर ई-निविदा प्रसिद्ध करणेत आलेल्या होत्या. सदर ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त ई-निविदांच्या तांत्रिक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.०७.०३.२०१९ रोजीचे सभेसमोर उघडणेत आलेल्या असून पात्र ई-निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.३०.०५.२०१९ रोजी उघडणेत आलेल्या आहेत. उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांप्रमाणे निम्नत्तम दरधारक निविदाधारक यांनी देऊ केलेल्या दराप्रमाणे निविदेमध्ये मागणी केलेले प्रिंटर्स व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी एकूण रक्कम रुपये ४०,५७,७४१/- इतका खर्च येणार होता. ई-निविदेमध्ये मागणी केलेले साहित्य खरेदी करणेकामी मान्यता घेणेत आलेला अंदाजे खर्च रक्कम रुपये २४,७८,०००/- हा फक्त साहित्यांचा अंदाजे मुळ किंमतीप्रमाणे ग्राह्य धरणेत आलेला होता. परंतू याकामी प्रसिद्ध करणेत आलेल्या निविदेमध्ये इकडील विभागाकडे उपलब्ध असलेल्या तांत्रिक मनुष्यबळाचा विचार करता, सदर साहित्यांसाठी दोन वर्षाकरीता देखभालीची कार्यवाही संबंधीत कंपनीने करणे आवश्यक असल्याचे व साहित्यांचे दर हे करासह असावे, असे नमुद करणेत आलेले होते. सबब, सदर बाबींमुळे उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांप्रमाणे सदर प्रिंटर्स व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी येणा-या अपेक्षीत खर्चामध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास येते.

माहिती तंत्रज्ञान विभागाचे दि.२४.०६.२०१९ रोजीचे टिपणीअन्वये निविदा प्रक्रियेअंतर्गत निम्नत्तम दरधारकांना चर्चेसाठी बोलविणेस व याकामी यापुर्वी घेणेत आलेल्या अंदाजे रक्कम रुपये २४,७८,०००/- चे खर्चाऐवजी प्रत्यक्ष येणा-या रक्कम रुपये ४०,५७,७४१/- मात्रचे खर्चास (०२ वर्षाच्या देखभालीसह) मान्यता मिळणेकामी मा.उपसमितीचे सभेसमोर सादर करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदरचे टिपणीवर पुढीलप्रमाणे निर्देश देणेत आलेले आहेत.

१. खरेदी नियमावलीतील तरतुदीनुसार खरेदीसाठी निश्चित केलेल्या अंदाजे किंमतीच्या १०% जास्त दर येत असेल तर नव्याने निविदा काढणे आवश्यक आहे.

२. खरेदीची अंदाजे किंमत काढताना जीएसटी व इतर संभाव्य खर्च जे पुरवठादार वस्तूच्या किंमतीमध्ये अंतर्भूत करतो ते गृहीत धरुन परिगणित करणे आवश्यक आहे.

३. प्रस्तूत प्रकरणात मा.व्यवस्थापन समितीची मान्यता रक्कम रुपये २४,७८,०००/- चे खर्चास आहे व ई-निविदेनुसार निम्नत्तम दर रक्कम रुपये ४०,५७,७४१/- म्हणजे १०% पेक्षा खुपच जास्त असल्याने नव्याने खरेदीची अंदाजे किंमत परिगणित करुन मा.व्यवस्थापन समितीकडून त्या अंदाजे खर्चास प्रशासकीय मान्यता घेऊन ई-निविदा प्रक्रिया राबवावी.

उपरोक्त निर्देशाप्रमाणे नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी इकडील विभागामार्फत मे.टिसीएस यांचेकडून पुनश्च आवश्यक प्रिंटर्स् व साहित्य खरेदी करणेसाठी त्यांचा अभिप्राय देणेबाबत कळविलेले होते. त्यानुसार त्यांनी त्यांचे दि. ११.०७.२०१९ रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे प्रिंटर्स व अनुषंगिक साहित्य खरेदी करणे आवश्यक असल्याचे कळविलेले आहे. ई-मेलमध्ये नमुद केलेप्रमाणे ई-निविदेमध्ये मागणी करावयाचे प्रिंटर्स व अनुषंगिक साहित्य यांचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| Sr. No. | Printer Specification | Qty | Approx Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01 | Dot Matrix Printer Epson LQ 590 with 2 years comprehensive warranty | 60 | 30,102.88 | 18,06,172.80 |
| 02 | LaserJet Cannon 2900B with 2 years comprehensive warranty | 60 | 12,293.67 | 7,37,620.00 |
| 03 | Multi-function Printer HP M1005 MFP with 2 years comprehensive warranty | 15 | 19,500.13 | 2,92,502.00 |
| 04 | Line printer LIPI 6815 with 2 years comprehensive warranty | 3 | 4,83,361.40 | 14,50,084.20 |
| 05 | LaserJet A3 size Cannon CLASS LBP8100n with 2 years comprehensive warranty | 2 | 60,539.60 | 1,21,079.20 |
| 06 | Epson Color inkjet L1800 with 2 years comprehensive warranty | 1 | 36,847.16 | 36,847.16 |
| 07 | Ribbon Cartridge for Epson LQ 590 | 500 | 568.33 | 2,84,166.67 |
| 08 | Ribbon for Line Printer LIPI 6815 | 50 | 3,000.00 | 1,50,000.00 |
| | | | Total | **48,78,471.00** |

उपरोक्त तपशीलाप्रमाणे प्रिंटर्स व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी येणारे रक्कम रुपये ४८,७८,४७१/- मात्रचे अंदाजे खर्चास व याकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच याकामी यापुर्वी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे, M/s Printech Infotech Services Pvt. Ltd., Mumbai यांचेमार्फत भाडेतत्वावर कार्यान्वीत असलेल्या प्रिंटर्सचे ऐवजी सदर ठिकाणी संस्थानमार्फत नविन प्रिंटर्स खरेदी करून कार्यान्वीत करणे व विभागांचे मागणीनुसार कार्यालयीन कामकाजासाठी नविन प्रिंटर्स खरेदी करुन उपलब्ध करणे यासाठी नविन प्रिंटर्स व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४८,७८,४७१/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच याकामी यापुर्वी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रीक/प्रशासकीय/आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- M/s Printech Infotech Services Pvt. Ltd., Mumbai यांचेमार्फत भाडेतत्वावर कार्यान्वीत असलेल्या प्रिंटर्सचे ऐवजी सदर ठिकाणी संस्थानमार्फत नविन प्रिंटर्स खरेदी करुन कार्यान्वीत करणे व विभागांचे मागणीनुसार कार्यालयीन कामकाजासाठी नविन प्रिंटर्स खरेदी करुन उपलब्ध करणे यासाठी नविन प्रिंटर्स व अनुषंगिक साहित्य खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ४८,७८,४७१/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस तसेच याकामी यापुर्वी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.४१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक प्रिंटर्स खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रु.२४,७८,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आलेली असुन याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियमध्ये निम्नतम दर रक्कम रु.४०,५७,७४१/-मात्र प्राप्त झालेले असल्याने सदरची ई-निविदा प्रक्रिया रद्द करण्यात येऊन याकामी विहीत पध्दतीने फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.४८,७८,४७१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती व तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.११** **आजारी किंवा इतर कारणाने सलग १ वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी गैरहजर असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कंत्राटदारामार्फत पुर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानचे विविध विभागात कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कर्मचारी काम करीत असून, सदर कर्मचा-यांपैकी जर काही कंत्राटी कर्मचारी हे आजारी किंवा इतर कारणाने ३ महिनेपेक्षा जास्त कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहिले तर अशा कंत्राटी कर्मचा-यांना संबंधित ठेकेदारामार्फत कामावरुन कमी करण्यात येते. अशा कारणास्तव कामावरुन कमी करण्यात आलेल्या संबंधित कंत्राटी कर्मचारी यांनी पुन्हा कामावर हजर

करुन घेणेबाबत अर्ज केलेले असून, सदर कर्मचारी दररोज कामगार विभागामध्ये येऊन पुन्हा कामावर घेणेबाबत आग्रह धरत आहेत.

एक वर्षापेक्षा कमी कालावधीत गैरहजर असलेले कंत्राटी कर्मचारी यांनी ते कामावर गैरहजर राहिलेबाबतचे कारण म्हणून ते आजारी असलेबाबत खाजगी वैद्यकिय अधिकारी, रुग्णालये तसेच संस्थान रुग्णालयामध्ये उपचार घेतलेबाबत वैद्यकिय अधिकारी यांचे मेडिकल सर्टिफिकेट / केसपेपर सोबत जोडलेली आहेत. संबंधित कंत्राटी कर्मचारी यांची कंत्राटदारामार्फत संस्थानकडे झालेली सेवा व गैरहजर कालावधी, त्यांनी उपचार घेतलेल्या रुग्णालयाचे प्रमाणपत्र याबाबत तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे देणेत आली आहे.

| अ. नं | कर्मचारी नांव | झालेली एकूण सेवा | अर्ज दिले ल्या दिनांकास गैरहजर कालावधी | आजचे दिनाकांस गैरहजर कालावधी | कामावर हजर / गैरहजर बाबत तपशील | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री सर्जेराव तानाजी शेळके | १६ वर्ष | ०४ – ०५ महिने | १० महिने | संरक्षणकडून हॉस्पीटलमध्ये बदली झालेपासून | मणक्याचे आजाराने त्रस्त असल्याने खाजगी रुग्णालयाचे, कमलनयन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, अहमदनगर यांचे फिटनेस सर्टिफिकेट |
| ०२ | श्री किसन दगडू पवार | १५ वर्ष | ०४ महिने | ११ महिने | बदली झालेली नाही. | मणक्याचा आजार असल्याने, सोबत श्री साईबाबा हॉस्पिटल येथील एम आर आय रिपोर्ट व उपचाराबाबतची कागदपत्रे. तसेच डॉ.राहुल मोदगी, नासिक यांचे केसपेपर सादर केले आहे. |
| ०३ | श्री राजेंद्र चंद्रभान डांगे | ११ वर्षे | ०५ महिने | ०८ महिने | बदली झालेली नाही. | हाताला मुंग्या व ॲसिडीटीचा त्रास असल्यामुळे खाजगी रुग्णालयाचे डॉ. भोंगळे, राहाता यांचे सर्टिफिकेट |
| ०४ | श्री रविंद्र निवृत्ती बनसोडे | १८ वर्षे | ०३ महिने | ०६ महिने | बदली झालेली नाही. | १.लेंडीबागेत कामावर असताना भक्तांची भांडणे सोडविणेकामी पळत असताना पाय घसरून पडले. २.ऑगस्ट–२०१८ मध्ये प्रसादालय विभागात कामावर असताना पायाचे ऑपरेशन झाले,तसेच नविन भक्तनिवासस्थान येथे रसोडयात काम करत असताना परत त्याच पायावर पडल्याने खाजगी हॉस्पीटल डॉ.जपे, व श्री साईबाबा हॉस्पिटल येथे उपचार घेतले आहे.. ३. ऑक्टोबर-२०१८ दसरा उत्सव असल्याने पाय दुखत असतांनांही ०३ दिवस प्रसादालयात काम केले आहे.४.दि.११.०१.२०१९ रोजी तब्बेत बरी झालेने प्रसादालय विभागात कामावर हजर होणेकामी गेलो असता, वरिष्ठांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांना भेटणेस सांगितले. |
| ०५ | श्री सचिन रामदास काळे | १३ वर्षे | ०४ महिने | ७ महिने | बदली झालेली नाही. | श्री साईप्रसादालय विभागात कामावर असताना आजारी पडल्याने दि.०५.१०.२०१८ पासून ते दि.०७.०२.२०१९ अखेर पर्यंत गैरहजर आहे. आजाराबाबत डॉ. अनंत एच. भोंगळे यांचेकडे उपचार घेतलेबाबतचे सर्टिफिकेट सादर केलेले आहे. तसेच डॉ. संदीप काळोखे, अहमदनगर यांचेकडे व डॉ. मुरादे ॲक्सीडेंट हॉस्पीटल श्रीरामपूर तसेच माधवबाग हॉस्पीटल, संगमनेर यांचेकडे उपचार घेतलेबाबतचे कागदपत्र सादर केलेले आहे. |
| ०६ | श्रीमती सारीका नंदलाल कोडेले | १३ वर्षे | ०४ महिने | ०९ महिने | संरक्षणकडून प्रसादालयात बदली झालेपासून | सलग ३ महिन्यापासून स्वतः आजारी असल्यामुळे श्री साईबाबा हॉस्पीटल येथे उपचार घेतल्याचे सर्टिफिकेट |
| ०७ | श्री नसीन सुभाण पठाण | १५ वर्षे | ०४ महिने | ०९ महिने | संरक्षणकडून साईप्रसादालयात बदली झालेपासून | डायबेटीसचा त्रास असल्यामुळे व चक्कर येत असल्यामुळे सोबत उपचार घेतलेबाबत डॉ.घोरपडे, अहमदनगर यांचे मेडीकल सर्टिफिकेट |
| ०८ | श्री राजू भिमराज जाधव | ११ वर्षे | ०६ महिने | ११ महिने | संरक्षणकडून साईप्रसादालयात बदली पासून | पाठीच्या मनक्याचा त्रास व स्पॉन्डीलायसीसचा त्रास होत असल्यामुळे |
| ०९ | श्री शिवाजी यमाजी कनगरे | १२ वर्षे | ०३ महिने | ११ महिने | बदली झालेली नाही. | अ) डॉ.शिंदे यांचे सर्टिफिकेटवर St.Luke's हॉस्पीटल, श्रीरामपुर, माजी वैद्यकिय अधिक्षक असे नमुद असल्याने St.Luke's हॉस्पीटलमध्ये संपर्क साधला असता सदर नावाचे वैद्यकिय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | अधिकारी कधीही कार्यरत नसलेचे तेथील अधिकारी यांनी सांगीतले. **ब)** तसेच श्री साईनाथ रुग्णालयामध्ये बाह्यरुग्ण विभागात उपचार घेतलेला होता. सदर उपचार घेतल्याची नोंद ओ.पी.डी.पेपरवरुन निदर्शनास येत आहे. तसेच कनगरे यांना ब्रॉन्कीयल अस्थमा हा आजार आहे. सदर आजार हा दिर्घकालीन असु शकतो असे नमूद आहे. |
| १० | श्री आण्णासो. धर्माजी माकुणे | १३ वर्षे | ०५ महिने | १० महिने | बदली झालेली नाही. | स्वतःला चिकणगुणिया हा आजार झाल्यामुळे, सोबत खाजगी रुग्णालय – टिळेकर हॉस्पीटल, श्रीरामपूर यांचे सर्टिफिकेट |
| ११ | श्री शिवाजी उत्तम कराड | १५ वर्षे | २ महिने | ३ महिने | बदली झालेली नाही. | टायफाईड झाल्याने आजारी, सोबत कुठलेली कागदपत्रे नाहीत. (माहे मे–२०१८ पासून प्रत्येक महिन्यात १-२ डयुटी करतात.) |
| १२ | श्री पांडूरंग रावबा आहिरे | १४ वर्षे | ६ महिने | १० महिने | बदली झालेली नाही. | आजारी असल्यामुळे, सोबत खाजगी डॉ. समदडिया यांचे सर्टिफिकेट |
| १३ | श्री महेश चंद्रकांत गायकवाड | १० वर्षे | ५ महिने | ७ महिने | बदली झालेली नाही. | आजारी असल्यामुळे कामावर येऊ शकले नाही. सोबत उपजिल्हा रुग्णालय, मनमाड येथील डॉक्टरांचे सर्टिफिकेट |
| १४ | श्री राजेंद्र दत्तात्रय दिवेकर | १९ वर्षे | १५ दिवस | ५ महिने २५ दिवस | बदली झालेली नाही. | स्वतःच्या हाताचा दुखापत झाल्यामुळे कामावर येऊ शकले नाही. |

**ब) १ वर्षे पेक्षा जास्त कालावधीत गैरहजर असलेले कंत्राटी कर्मचारी तक्ता-**

| **अ. नं** | **कर्मचारी नांव** | **झालेली एकूण सेवा** | **अर्ज दिले ल्या दिनांकास गैरहजर कालावधी** | **आजचे दिनाकांस गैरहजर कालावधी** | **कामावर हजर / गैरहजर बाबत तपशील** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री नितीन चंद्रभान चिकणे | **१२ वर्षे** | **०४ महिने** | १ वर्ष ०९ महिने | बदली होणेचे पूर्वीपासून गैरहजर आहेत. | मा.विश्वस्त, श्री वाकचौरे सो.यांचे शिफारस पत्र. खाजगी रुग्णालयाचे डॉ.भोंगळे, राहाता यांचे सर्टिफिकेट व सेवा कॉम्प्युटराईज्ड, राहाता यांचा लॅब रिपोर्ट सादर केलेला आहे. |
| ०२ | श्री नितिन संभाजी आहिरे | **१४ वर्षे** | **१८ महिने** | २१ महिने | बदली होणेचे पूर्वीपासून गैरहजर आहेत. | उजव्या हात व पायाच्या दुखापतीमुळे खाजगी रुग्णालयाचे कमलनयन मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, अहमदनगर यांचे फिटनेस सर्टिफिकेट |
| ०३ | श्री अमोल इंद्रभान देशमुख | ------- | -- | ०३ वर्ष ५ महिने | ----- | कावीळ, टायफाईड व रक्तपेशी कमी झाल्यामुळे तथापि उपचाराबाबत कुठल्याही रुग्णालयाचे कागदपत्रे सादर केलेली नाहीत. |
| ०४ | श्री विनायक शाहूल मकासरे | ११ वर्षे | २७ महिने | ०३ वर्षे ५ महिने | बदली झालेली नाही. | खाजगी रुग्णालयाचे डॉ.भोंगळे, राहाता यांचे सर्टिफिकेट सादर केलेला आहे. |
| ०५ | श्री दिलीप नानासाहेब चौधरी | १२ वर्षे | ०५ महिने | १ वर्ष ०९ महिने | बदली झालेली नाही. | मा.विश्वस्त, श्री वाकचौरे सो.यांचे शिफारस पत्र. खाजगी रुग्णालयाचे डॉ.भोंगळे, राहाता यांचे सर्टिफिकेट व सेवा कॉम्प्युटराईज्ड, राहाता यांचा लॅब रिपोर्ट सादर केलेला आहे. |
| ०६ | श्री सलीम शेखलाल शेख | २२ वर्षे | ०६ महिने | १ वर्ष ०९ महिने | बदली झालेली नाही. | श्री शेख यांना लंबर स्पॉन्डीलायसेसचा आजार झालेला असल्याने डॉ.प्रितम जपे, रेणुका अर्थोपेडीक क्लिनीक, कोपरगाव येथे उपचार घेतलेला असून, सोबत श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी येथील रेडिओ लॉजिस्ट, सि.टी.स्कॅन रिपोर्ट जोडलेला असून, डॉ.जपे यांचे रुग्णालयात उपचार घेतलेबाबतचे कागदपत्रेही जोडलेली आहेत. |
| ०७ | श्री प्रल्हाद बाळासो टेके | १६ वर्षे | ०२ वर्षे | १ वर्ष ०९ महिने | बदली झालेली नाही. | पत्नीचे आजारपणामुळे कामावर येऊ शकले नाही. सोबत खाजगी डॉ.संजय व-हाडे, सोपान हॉस्पीटल, नाशिक यांचे सर्टिफिकेट |
| ०८ | श्री अक्षय संजय सुपेकर | ०२ वर्षे | १३ महिने | २ वर्षे | बदली झालेली नाही. | स्वतःला हृदयविकाराचा आजार असल्याने तसेच हार्टअॅटॅक आल्याने बरेच दिवस गैरहजर, सोबत श्री साईबाबा हॉस्पी.यांचे पत्र. |
| ०९ | श्री सुनिल सिताराम मरसाळे | ११ वर्षे | ३ वर्षे | ३ वर्षे | बदली झालेली नाही. | एका पायाने अपंग तसेच टी.बी. आजार असल्यामुळे कामावर येऊ शकलो नाही. सोबत श्री साईबाबा हॉस्पी. येथील उपचार घेतलेबाबतचे सर्टिफिकेट. |
| १० | श्री भाऊसाहेब बाजीराव बनसोडे | --- | २ वर्षे | २ वर्षे ३ महिने | बदली झालेली नाही. | पॅरालेसेस चा आजार, व्हॉल्व्हचे ऑपरेशन झाल्यामुळे कामावर येऊ शकले नाही. सोबत श्री साईबाबा हॉस्पीटल व आशा केंद्र, पुणतांबा येथील डॉक्टरांचे सर्टिफिकेट |
| ११ | सौ.जयश्री रविंद्र सागर | १० वर्षे | ७ महिने | २ वर्षे | बदली झालेली नाही. | पायाची शिर चोकअप झाल्यामुळे उभे राहण्यास त्रासदायक होत असल्यामुळे गैरहजर. सोबत खाजगी डॉ. यांचे ९ महिन्यांचे सर्टिफिकेट सादर केलेले आहेत. |

विभागाचा अभिप्रायः- उपरोक्त नमूद अ व ब मधील सर्व कंत्राटी कर्मचारी संस्थानमध्ये दिर्घ कालावधीपासून कंत्राटदारामार्फत काम करत होते. सदर सर्व कंत्राटी कर्मचारी स्वतः आजारी असल्यामुळे कामावर गैरहजर राहिलेले होते. सदर कंत्राटी कर्मचारी यांनी उपचार घेतलेनंतर व त्यांना बरे वाटलेनंतर परत कामावर हजर होणेकामी आले असता, त्यांना कामावर हजर करुन न घेतलेने त्यांची आता जादा गैरहजेरी दिसत आहे. सबब त्यांच्या संस्थानमध्ये झालेल्या सेवेचा व त्यांचेबाबत वैद्यकिय संचालक व खाजगी वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत घेतलेल्या वैद्यकिय उपचारांचे कागदपत्रांचा विचार करता, संबंधित कंत्राटी कर्मचा-यांना ते काम करत असलेल्या ठेकेदारामार्फत संबंधित विभागाकडे कामावर हजर करुन घेणे बाबत व वैद्यकिय कारणास्तव गैरहजर असलेने व कामावरुन कमी केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना पुर्ववत कामावर घेणेबाबत वेळोवेळी तसेच दि.२४.०१.२०१९ व दि.०६.०२.२०१९ रोजी फेर प्रस्ताव सादर केला असता, सदर टिपणीवर मा.उपजिल्हाधिकारी सो. यांनी ''मागील ५ वर्षात अनेक कर्मचारी संस्थान सेवा सोडून गेले आहेत. त्यामुळे ठराविक कर्मचा-यांचे बाबतीत निर्णय घेतल्यास उर्वरित सेवा सोडून गेलेले कर्मचारी ही मागणी करतील. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये धोरणात्मक निर्णयासाठी व्य.स.समोर प्रस्ताव सादर करावा, असे मत आहे'' असे निर्देश दिलेले आहे. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी '' सर्व अर्ज नस्तीबध्द करा आता कायम करण्याचा विषय सुरु आहे. त्यामुळे अशी अर्ज आली आणि येतील '' असे निर्देश दिलेले आहेत.

तसेच त्यानंतर दि.०१.०६.२०१९ रोजी फेरप्रस्ताव सादर करणेत आलेला होता सदर टिपणीवर दि.२६.०६.२०१९ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी सो. यांचेशी झालेल्या चर्चेनुसार प्रशासकीय अधिकारी यांना ''ज्या कंत्राटी कर्मचा-यांना काम सोडून १ वर्ष पेक्षा कमी कालावधी झालेला असेल अशा कंत्राटी कर्मचा-यांचा फेर प्रस्ताव सादर करणेबाबतचे निर्देश देण्यात आलेले होते. सदर निर्देशानुसार उपरोक्त अ) तक्त्यात नमूद अ.नं.०१ ते १४ कंत्राटी कर्मचारी यांना १ वर्षे पेक्षा कमी गैरहजर कालावधी झालेला आहे. तसेच उपरोक्त ब) तक्त्यात नमूद अ.नं.०१ ते ११ कंत्राटी कर्मचारी यांना १ वर्षे पेक्षा जास्त कालावधी झालेला आहे

ठेकेदारामार्फत कामावरुन कमी करण्यात आलेले कंत्राटी कर्मचारी पुर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबत वारंवार इकडील कार्यालयास अर्ज करतात. तसेच वेळोवेळी इकडील व वरिष्ठ कार्यालयातही समक्ष येवून कामावर हजर करुन घेणे बाबत तगादा करत असल्याने, कंत्राटदाराने कंत्राटदाराकडून कमी केलेल्या व १ वर्षापेक्षा कमी कालावधीत गैरहजर राहिलेल्या कर्मचा-यांबाबत त्यांना पुन्हा कामावर घेणेसंदर्भात सहानुभुतीपुर्वक विचार होणेस विनंती आहे.

करीता उपरोक्त नमूद अ) व ब) तक्त्यातील एकूण २५ गैरहजर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना संबंधित ठेकेदारामार्फत पुर्ववत कामावर हजर करुन घेणेबाबतचा निर्णय हा धोरणात्मक असल्याने त्यांना पुर्ववत कामावर हजर करुन घ्यावे किंवा कसे? बाबत सदर प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.४१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी व संबधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती गठीत करण्यात यावी, या समितीने सलग १ वर्षापेक्षा कमी कालावधीसाठी गैरहजर असलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याचे गैरहजेरीचे कारणाचे अवलोकन करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव स्थानिक उपसमितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **साई पालखी निवारा येथील बी बिल्डींगमधील पहिला माळा शिर्डी पोलीस स्टेशन व उप विभागीय अधिकारी कार्यालयाकरीता मिळणेबाबत मा.उपविभागीय पोलीस अधिकारी, शिर्डी विभाग, शिर्डी यांचेकडील पत्र जा.नं.शि.वि./इमारत/स्थलांतर/जा.क्र.२४६२/२०१९ दि.१२.०७.२०१९.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- मा.उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी विभाग,शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त पत्र जा.नं.शि.वि./इमारत/स्थलांतर/जा.क्रं.२४६२/२०१९ दि.१२/०७/२०१९ अन्वये मौजे निमगाव-को-हाळे,

ता.राहाता येथील गट नं.८०/ब मध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय व पोलीस स्टेशन व रहिवासी इमारत प्रयोजनार्थ बांधकाम सुरु करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर बांधकाम पूर्ण होईपावेतो शिर्डी पोलीस स्टेशन तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालय तात्पुरते स्वरुपात नवीन जागेत स्थलांतरीत करावयाचे आहे. तरी सदर बांधकाम पूर्ण होईपावेतो साई पालखी निवारामधील बी बिल्डींगमधील पहिला माळा उपरोक्त कार्यालयाकरीता मिळणेस विनंती आहे,असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

मौजे निघोज,ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भुखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी साईबाबा संस्थानला विनामोबदला हस्तांतर करणेकामी श्री.काशिनाथ गोविंद पाटील, रा.कोपरी, ता.वसई यांनी दि.११/११/२०१६ रोजीच्या अर्जान्वये प्रस्ताव सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रं.९४७ प्रमाणे खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

श्री.काशिनाथ गोविंद पाटील,कोपरी,ता.वसई-विरार (पूर्व),जि.ठाणे यांची मौजे निघोज,ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/२८४/२८८/६ मधील भुखंड क्रं.१ मधील इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतरण करणेस मान्यता देण्यात आली.

तसेच या इमारतीमध्ये राज्यातील गोरगरीब,आदिवासी,वंचित,दुर्लभ विद्यार्थ्यांसाठी राज्य लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करुन घेणे व त्यांना प्रशासकीय सेवेचा लाभ मिळवून देणेकामी निवृत्त राजपत्रितअधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करणेचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा,असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे प्रस्तुत इमारत बी व डी यांचे दि.११/०५/२०१७ रोजी नोंदणीकृत दानपत्राचा दस्त करणेत आलेला असून तत्सम तारखेपासून सदर मिळकती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे ताबे वहिवाटीस आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५/०६/२०१७ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.५११ प्रमाणे "मौजे निघोज,ता.राहाता येथील देणगी मिळालेल्या बी व डी इमारतीमध्ये आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करणे व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच या ॲकॅडमीच्या गव्हर्नर कौन्सिलमध्ये सदस्य म्हणून मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष यांचेबरोबरच मा.ॲड.मोहन जयकर,मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले या समिती सदस्यांचा समावेश करणेत यावा,असे ठरले."असेबाबत निर्णय झालेला आहे.

प्रस्तुत मिळकतींची देखभाल सध्यस्थितीत संस्थानचे साईप्रसाद निवासस्थान विभागामार्फत करणेत येत असलेने मा.उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचेकडील उपरोक्त दि.१२/०७/२०१९ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने प्र.अधिक्षक,साईप्रसाद निवासस्थान विभाग यांचे अभिप्राय मागविणेत आले. त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडील दि.२२/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये"सध्यस्थितीत श्री साईबाबा संस्थानला साईपालखी निवारा,निघोज-निमगाव,शिर्डी येथील बी व डी या दोन इमारती देणगी स्वरुपात मिळालेल्या आहेत. त्यापैकी बी इमारतीमधील रुम्स वापरायोग्य असून सदर इमारत दि.२१/०६/२०१७ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागाच्या ताब्यात आहे व डी इमारतीचे काम अपूर्ण असल्याने सदर इमारत बांधकाम विभागाचे ताब्यात आहे.

बी इमारतीचे चार मजले असून प्रत्येक मजल्यावर १६ रुम्स याप्रमाणे एकूण ६४ रुम्स आहेत. या सर्व ६४ रुम्स वातानुकुलित असून प्रति रुममध्ये ४ कॉटस,प्रति रुममध्ये टि.व्ही. (सध्या बंद स्थितीत),फॅन,फोम गाद्या,फोम ऊशा,बेडशीट,ब्लँकेट,ऊशी कव्हर,टी-पॉय,जग,ग्लास,आरसा,पडदे,डस्टबीन,पायपुसणे इ.सर्व वस्तू उपलब्ध आहेत. मात्र,सदर इमारती करीता संस्थानची लाईट व पाण्याची व्यवस्था उपलब्ध नाही.

दि.१५/०६/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्रं.५११ मध्ये सदर ठिकाणी संस्थानचे आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करण्याचे प्रयोजन असल्याने अद्यापपर्यंत तेथील रुम भक्तांना वास्तव्यासाठी देणेबाबत कुठलेही प्रयोजन अथवा सेवा आकार निश्चिती बाबत धोरणात्मक निर्णय झालेला नाही." असेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त निर्णय क्रं.९४७,५११ व संस्थानचे प्र.अधिक्षक,साईप्रसाद निवासस्थान विभाग यांचे अभिप्रायाचे अवलोकन केले असता मौजे निघोज,ता.राहाता येथील गट नं.१७७/१७८/२८२/१/ २८४/२८८/६ मधील भुखंड क्रं.१ मधील संस्थानने दान म्हणून स्विकारलेल्या इमारत बी व डी या राज्यातील गोरगरीब,आदिवासी,वंचित,दुर्लभ विद्यार्थ्यांसाठी राज्य लोकसेवा आयोगाच्यापरीक्षेची तयारी करुन घेणे व त्यांना प्रशासकीय सेवेचा लाभ मिळवून देणेकामी निवृत्त राजपत्रित अधिका-यांच्या मार्गदर्शना खालील फक्त आय.ए.एस.ॲकॅडमी साठीच वापर करावयाचा आहे,असे स्पष्ट दिसून येत आहे.

त्यासाठी सदर मिळकतीत आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करणेसाठी कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मा.व्यवस्थापन समितीने अलाहिदा मान्यता दिलेली आहे. शिवाय ॲकॅडमीच्या गव्हर्नर कौन्सिलमध्ये सदस्य म्हणून संस्थानचे मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष यांचेबरोबरच समिती सदस्यांचा समावेश देखील करणेत आलेला आहे.

सध्यस्थितीत उक्त मिळकतीत आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करणेचे कामकाज प्रगतीपथावर आहे. अशा परिस्थितीत सदरच्या मिळकती त्रयस्थ संस्थेस,व्यक्तीस,विभागास वापरास देणे विधीग्राहय ठरणार नाहीआणि तसे करणे संस्थानच्या दृष्टिने हितावह ठरणार नाही. याशिवाय उक्त मिळकत पोलीस स्टेशनसाठी व उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालयासाठी वापरास दिल्यास अन्य सरकारी कार्यालये देखील सदर मिळकती वापरास मागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. पोलीस स्टेशन व उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे बांधकामास विलंब लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. परिणामी संस्थानची उक्त मिळकत जास्त काळ पावेतो पोलीस विभागाचे ताब्यात राहणार असलेने भविष्यात पोलीस विभागाकडून सदरची मिळकत भविष्यात खाली करुन घेणे दुरापास्त होईल. या सर्व कारणास्तव मा.उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे विनंतीप्रमाणे उक्त मिळकत पोलीस स्टेशनसाठी व उपविभागीय पोलीस कार्यालयासाठी वापरास देणे उचित होणार नाही.

प्रस्ताव– मौजे निघोज,ता.राहाता (साईपालखी निवारा) येथील गट नं.१७७/१७८/२८२/ १/ २८४/ २८८/६ मधील भुखंड क्रं.१ मधील संस्थान मालकीच्या इमारत बी व डी पैकी इमारत बी बिल्डींगमधील पहिला माळा शिर्डी पोलीस स्टेशनसाठी व उपविभागीय पोलीस अधिकारी,शिर्डी यांचे कार्यालयासाठी वापरास न देणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१५** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला. तसेच सदरहु ठिकाणी प्रस्तावीत असलेले आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करणेबाबत नियमानुसार कार्यवाही सुरु करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग/सामान्य प्रशासन)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **औरंगाबाद-जळगाव रोड लगत अंजिठा टाऊन या ठिकाणची जागा हॉस्पिटलसाठी भाडेतत्वार देणेबाबत सचिव, लोटस सेवाभावी ट्रस्ट,औरंगाबाद यांचे दि.३०.०५.२०१९ व दि.१९.०६.२०१९ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद - श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना– मा.सचिव,लोटस सेवाभावी ट्रस्ट,औरंगाबाद यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.३०/०५/२०१९ रोजीच्या पत्रान्वये "जळगाव-औरंगाबाद (अजिंठा टाऊन) के पास ४५००० चौ.फुट जमीन है. स्थानिक जमीन के पास से जळगाव तथा औरंगाबाद १०० या १२० किमी. है. लोटस सेवाभावी ट्रस्ट की इच्छा है की साई संस्थानद्वारा स्थानिक जमीन पर गरीब तथा जनसुविधावोंको ध्यान मे रखते हुए अस्पताल जैसे सुविधाये प्राप्त करे,ट्रस्ट कम से कम long term, land ledge पर संस्थान को जमीन देने के लिए तैयार है. कृपया विचार-विमर्श करा कर हमे जवाब दे. आपके जवाब का इंतजार रहेगा" असेबाबत इकडेस विनंती केलेली आहे.

अर्जदार यांनी दि.१९/०६/२०१९ रोजी अर्जासोबत सादर केलेल्या ७/१२ उता-याचे अवलोकन केले असता मौजे पानस,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद येथील जमीन गट नं.१४ क्षेत्र १३.०२ हेक्टर खराबा ०.०९ पैकी क्षेत्र ०.४० आर इतके श्री.राजेंद्र किसनराव लाड यांचे नावे असून ७/१२ उतारा सामाईकमध्ये आहे.

अर्जदार यांनी सदरचा अर्ज सचिव,लोटस बहुउद्येशीय सेवाभावी संस्था,पडेगाव,औरंगाबाद या नावाने केला असून त्यात त्यांनी "लोटस सेवाभावी ट्रस्ट मार्फत श्री.राजेंद्र किसनराव लाड यांच्या मालकीची ४५००० चौरस फुट आहे. यापैकी ४०००० चौरस फुट भुखंड श्री साई संस्थानला भाडेतत्वावर देण्यासाठी इच्छुक आहे. श्री साई संस्थानच्या अनुशासनमध्ये राहून काही एक मागणी आहे. आशा करतो की,ती पूर्ण करण्यास संस्थान सहानुभूती दर्शवेल.

१) भुखंड हा फक्त जन सुविधेकरीता उपलब्ध राहील आणि भाडेतत्वावरच देण्यात येईल.

२) साई संस्थानमार्फत दरवर्षी १० टक्के भाडेवाढ करण्यात यावे.

३) राजेंद्र किसनराव लाड परिवार किंवा रक्ताच्या नात्यातूनशिक्षण आणि योग्यता पाहूनच शोभनीय असे दोन पद कायमस्वरुपी देण्यात यावे.

तरी अंतिम निर्णय हा श्री साई संस्थान शिर्डी यांचा गृहीत धरुन आम्हास मान्य राहील. आशा करतो की, श्री साई संस्थान ट्रस्ट योग्य तो निर्णय घेईल आणि लोटस सेवाभावी ट्रस्टला योग्य तो निर्णय देईल,"असेबाबत नमूद केलेले आहे.

विभागाचा अभिप्राय– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी यापूर्वी अशा प्रकारे भुखंड भाडेतत्वावर घेतलेले नाहीत. तसेच औरंगाबाद शहराच्या परिसरात संस्थानमार्फत हॉस्पिटल सुविधा उपलब्ध करणेचा संस्थानचा सध्यस्थितीत कोणताही प्रस्ताव नाही. तथापि औरंगाबाद परिसरात जनसुविधेच्या दृष्टिने संस्थानमार्फत हॉस्पिटल अथवा अन्य प्रकल्प राबवावयाचा झाल्यास अर्जदार यांचे अर्जाचा विचार करता येईल.

प्रस्ताव - अर्जदार यांचे विनंती अर्जाप्रमाणे मौजे पानस,ता.सिल्लोड,जि.औरंगाबाद येथील जमीन गट नं.१४ क्षेत्र १३.०२ हेक्टर खराबा ०.०९ पैकी श्री.राजेंद्र किसनराव लाड यांचे नावावर असलेले क्षेत्र ०.४० आर इतके श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांनी,अर्जदार यांचे अर्जात नमूद केलेल्या १) भुखंड हा फक्त जन सुविधेकरीता उपलब्ध राहील आणि भाडेतत्वावरच देण्यात येईल. २) साई संस्थानमार्फत दरवर्षी १० टक्के भाडेवाढ करण्यात यावे.३) राजेंद्र किसनराव लाड परिवार किंवा रक्ताच्या नात्यातूनशिक्षण आणि योग्यता पाहूनच शोभनीय असे दोन पद कायमस्वरुपी देण्यात यावे. या

अटींच्या अधीन राहून भाडेतत्वावर घेणे अथवा न घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४१६** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **हाताळून खराब झालेल्या निरुपयोगी प्लास्टिक/कापडी वस्तु किरकोळ डेडस्टॉक मधुन कमी करुन अभिलेख कक्ष विभागामार्फत पारीत झालेल्या आदेशातील कोटेशनच्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमः- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी २००४ मधील २१ (१) (ग) " भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. " व (२) पोट-कलम (१) (ख)"भक्तांना राहण्यासाठी व वापर करण्याकरीता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रास्ताविकः- संस्थान अधिनियमातील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत भक्तांची निवासव्यवस्था व त्यामध्ये विविध सुविधा पुरविणेत येते. त्या अनुषंगाने साईआश्रम भक्तनिवास साईभक्तांच्या निवास व्यवस्थेसाठी दि.११/०४/२०१३ पासुन सुरु करण्यात आलेले असुन या विभागामध्ये ३८४ एसी व ११५२ नॉनएसी अशा एकुण १२ इमारतीमध्ये १५३६ खोल्यांची सुविधा करणेत आलेली आहे.

साईआश्रम भक्तनिवास विभागामध्ये भक्तांची गर्दी वर्षभर कायम असते. त्यामुळे इकडील विभागातील निवासव्यवस्थेचा पुर्ण क्षमतेने वापर होत असल्याने खोल्यांमध्ये साईभक्तांच्या वापरासाठी दिलेले किरकोळ डेडस्टॉक मधील बेडशिट, उशिकव्हर, उशी तसेच खोलीमधील प्लॅस्टिक साहित्य सततच्या वापरामुळे तुटफुट व खराब होऊन वापरास अयोग्य झालेले आहे.

साईआश्रम भक्तनिवास विभाग सुरु होऊन ०६ वर्ष झाले आहेत. त्यामुळे साईभक्तांच्या नियमीतच्या वापराने खराब, तुटफूट/जीर्ण झालेल्या वस्तु खालील प्रमाणे आहेत.

| अ.नं | वस्तुचे नाव | संगणक कोड नं. | Asset Type | खराब झालेले नग | खरेदी दर प्रति नग रु. | एकुण रक्कम रु. | खरेदी दिनांक | वापर झालेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बेडशिट विथ पिलोकव्हर | SUN/A062 | MISC | ४,२९८ | ३५६/- | १५,३०,०८८/- | ०४/१२/२०१५ | ०३ वर्ष |
| २ | बेडशिट पिलोकव्हर विथ ब्लॅकैट सेट | SUN/A064 | MISC | ५३ | ७४३.६७/- | ३९,४१४.५१/- | २९/०२/२०१६ | ०३ वर्ष |
| ३ | पिलो (सफेद रंगाचे) | PLO/A001 | MISC | ७१२ | १३६.९८ | ९७,५२९.७६ | २५/१०/२०११ | ०७ वर्ष |
| ४ | पिलो | PLO/A022 | MISC | ४८० | २०५/- | ९८,४००/- | २९/०२/२०१६ | ०३ वर्ष |
| ५ | प्लॅस्टिक डस्टबीन | SUN/A005 | MISC | ३१५ | ४७/- | १४,८०५/- | ०६/०५/२०११ | ०७ वर्ष |
| ६ | प्लॅस्टिक ट्रे | SUN/A056 | MISC | २५७ | १२९/- | ३३,१५३/- | ०७/०३/२०१४ | ०५ वर्ष |
| ७ | बाथ रोमन स्टुल | SUN/A003 | MISC | २३६ | ९१/- | २१,४७६/- | २७/०४/२०११ | ०८ वर्ष |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | लिंक लॉक | SUN/A008 | MISC | २७ | १६५/- | ४,४५५/- | १०/१०/२०११ | ०७ वर्ष |
| ९ | टॉवेल | SUN/A041 | MISC | ५९२ | १६०/- | ९४,७२०/- | १२/०६/२०१३ | ०४ वर्ष |
| १० | स्टिल कि-चेन प्लेट | SUN/A009 | MISC | ७७ | ३२/- | २,४६४/- | ३०/०९/२०११ | ०७ वर्ष |

मागणी:- उपरोक्त तक्त्यात नमुद वस्तु नियमीतच्या वापरामुळे खराब/निरुपयोगी झालेल्या असुन काही तुटफूट/जीर्ण झालेल्या आहेत. त्यामुळे अशा वस्तु साईभक्तांच्या सुविधेसाठी खोल्यांमध्ये ठेवणे योग्य नाहीत.

दिनांक २७/०४/२०१३ रोजी झालेल्या व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय क्र.५८ निर्णय क्र. ४०१ नुसार संस्थान भक्तनिवासस्थाना मधील बेडशिट उशीकव्हर व गादीकव्हर दीड वर्षानी (१८ महिने) नंतर बदलणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच नवीन बेडशीट उशीकव्हर व गादीकव्हर खरेदी करते वेळी निविदेमध्ये पुरवठाधारकांकडुन सध्याचे व दुस-या दीड वर्षानी आवश्यक असलेल्यांची संख्या निश्चित करुन त्यासाठी त्यांचा निविदेमध्ये समावेश करण्यात येऊन निविदा मागविण्यात याव्यात व त्यांचे दोनही वेळचे दर व नमुने निश्चित करणेत यावे. यानुसार दीड वर्षानी त्या मंजुर दराने त्यांचेकडुन दुस-या टप्यातील बेडशीट, उशीकव्हर व गादीकव्हर यांची खरेदी करुन घेण्यात यावी. पुर्वीचे बदललेले बेडशीट, उशीकव्हरव गादीकव्हर यांचा लिलाव/वार्षीक निश्चित केलेल्या दराने विक्री करणेत यावी, असे ठरले.

संस्थान अधिनियम/ठराव नुसार अनुमान :- मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेनुसार कार्यवाही करता येईल.

विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय :-

१) अधिनियम २००४ कलम १७ (४) नुसार विश्‍वस्त व्यवस्थेमध्ये विहीत केलेल्या रु.५०,०००/- (अक्षरी रुपये पन्नास हजार मात्र) पेक्षा अधिक किंमतीचे कोणतेही जड जवाहीत दागिणे व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पुर्व मंजुरी असेल त्याखेरीज समितीकडुन विकण्यात येणार नाही, तारण म्हणुन ठेवता येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमीत करण्यात येणार नाही असे निर्देश केलेले आहे.

२) उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे किरकोळ डेडस्टॉकच्या वस्तु/साहीत्य नियमीत वापराने खराब झालेले असुन काहींची तुटफूट झालेली असल्याने अशा वस्तु/साहीत्य साईभक्तांच्या सुविधेसाठी खोल्यांमध्ये ठेवणे योग्य नाही. सदरच्या वस्तु जड जवाहीत दागिणे व इतर मौल्यवान जंगम मालमत्ता नाही.

वरील ०१ व ०२ बाबी विचारत घेता खराब/निरुपयोगी झालेल्या वस्तु/साहीत्य किरकोळ डेडस्टॉक मधुन एकुण किंमतीसह कमी करण्यास व संदर्भ क्र.०२ चे आदेशानुसार अभिलेख कक्ष विभागामार्फत सदरच्या सर्व वस्तु/साहीत्य विक्री करण्यास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती सभेसमोर निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.४१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील हाताळून खराब झालेल्या निरुपयोगी प्लास्टिक/कापडी वस्तु किरकोळ डेडस्टॉक मधुन कमी करुन अभिलेख कक्ष विभागामार्फत पारीत झालेल्या आदेशातील कोटेशनच्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **'श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९' मध्ये दि.७.१०.२०१९ ते दि.१०.१०.२०१९ अखेरी श्री साई मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करणेस व येणाऱ्या खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल :-

प्रस्तावना:- २१. (१) समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करण्यात येईल.

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन ;

(ख) रुढीनुसार व प्रथेनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे ;

(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनसाठी व प्राथनेसाठी किंवा कोणतीही धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

वरील अधिनियम २१ (१) (ख) व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेमार्फत सन १९७९ पासून श्री रामनवमी उत्सवात आजपावेतो गेली ४० वर्ष व श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवात सन १९९२ पासून आजपावेतो गेली २६ वर्षे अशा ह्या दोन्ही उत्सवात मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई सोबत देखावा उभा केला जातो. तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सवात साईराज डेकोरेटर्स, मुंबई यांचेमार्फत मंदिर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई केली जाते.

श्री रामनवमी उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव या दोन्ही उत्सवात विद्युत रोषणाई व देखावा उभा करण्यासाठी (ट्रान्सपोर्ट + मटेरियल भाडे + भाडोत्री जनसेट + इंधन वगैरे ) प्रत्येक उत्सवात मिळून रु. ८ ते ९ लाख खर्च संस्थानमार्फत केला जातो.  परंतु उत्सवात उभारण्यात येणा-या देखाव्यासाठी यापेक्षा जास्त खर्च येत असतो व त्याचा खर्च श्री व्दारकामाई मंडळाचे सहकारी स्वत: सहन करत असतात.

श्री व्दारकामाई मंडळ हे हौशी साईभक्तांचे मंडळ आहे. या मंडळामार्फत कोणत्याही स्वरुपाचा व्यवसाय केला जात नाही. तसेच हे मंडळ श्री साईंची सेवा घडावी म्हणून फक्त शिर्डी येथील उत्सवाचे वेळी मुंबईच्या विविध भागातील डेकोरेटर्सशी प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, फोनव्दारे संपर्क साधून त्यांना शिर्डी येथील उत्सवाचे वेळी एकत्र आणून उत्सवातील तीन दिवस विद्युत रोषणाई करतात यापेक्षा जास्त दिवस ते विद्युत रोषणाई करु शकत नाही. कारण त्यांचेमार्फत येणारे डेकोरेटर्स यांची रोजी रोटी ही ते मुंबई येथे विविध कार्यक्रमांमधून करत असलेल्या लाईटींग डेकोरेशनवर अवलंबून असते. नवरात्र उत्सव, गणपती उत्सव, विविध सांस्कृतिक कार्यक्रम अशा वेगवेगळया उत्सवात ते मुंबई येथे डेकोरेशनची कामे करत असतात.

श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी आता दि.१६-०७-२०१९ व दि.२०-०७-२०१९ रोजी अशी दोन पत्रे संस्थानकडे सादर केली असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

१) दि.१६-०७-२०१९ रोजीचे पत्र.

विषय :- "श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९" मध्ये विद्युत रोषणाई आणि सजावट करण्याबाबत . . . .

मा.महोदय,

गेल्या २६ वर्षापासून श्री पुण्यतिथी उत्सवा मध्ये विद्युत रोषणाई व सजावट करण्याच्या निमित्ताने श्री साईबाबांची सेवा करण्याची संधी आम्हाला श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी ने दिली. याबद्दल श्री व्दारकामाई मंडळ आपले शतशः ऋणी आहे. प्रतिवर्षाप्रमाणे आम्ही, याहीवर्षी श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ दि.०७-१०-२०१९ ते दि.१०-१०-२०१९ या चार दिवसांचे कालावधीत विद्युत रोषणाई व सजावट करण्यास येत आहोत.

श्री साईबाबांचे मंदीर आणि संस्थान परिसर इ.ठिकाणी विद्युत रोषणाई व सजावट करण्याकरीता व साहित्याची ने-आण करण्याकरीता हूड असलेल्या भाडोत्री ०६ (सहा) ट्रक आणि श्री साईबाबा संस्थानचा मोठा ट्रक तसेच उत्सव काळात ०३ नग भाडोत्री जनसेट (१२५ केव्हीएचे)-०४ दिवसाकरीता संस्थानमार्फत व्यवस्था करण्याची आम्ही आपणास विनंती करीत आहोत.

मटेरिअल मुंबईहून आणतेवेळी दोन टप्प्यात आणावे लागणार आहे. यासाठी ट्रका पाठविण्यासाठी तपशीलवार तारीख व उत्सवातील विद्युत रोषणाई तसेच देखाव्यासाठी येणा-या खर्चाचा तपशील नंतर कळवित आहोत.

श्री साईबाबा संस्थानचे मा.अध्यक्ष साहेब, मा.सर्व विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे गेल्या अनेक वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळाला उत्तम प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे आणि श्री साईच्छेनुसार यापुढेही मिळत राहो, ही श्रींचे चरणी प्रार्थना.

०२). दि.२०-०७-२०१९ रोजीचे पत्र.

विषय :- " श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९" मध्ये विद्युत रोषणाई आणि सजावट करण्याबाबत....

मा.महोदय,

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ मध्ये विद्युत रोषणाई व सजावट करण्याच्या निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे आम्ही याहीवर्षी विद्युत रोषणाई व सजावट करण्यास दि.२३-०९-२०१९ रोजी व दि.०३-१०-२०१९ रोजी असे दोन टप्यांमध्ये येत आहोत.

श्री साईबाबांचे मंदीर आणि संस्थान परिसर इ. ठिकाणी विद्युत रोषणाई व सजावट करण्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत खालीलप्रमाणे व्यवस्था करण्याची आम्ही आपणास विनंती करीत आहोत व लागणा-या खर्चाचा तपशिल देत आहोत.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २०५ कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४३० x २०५ x २ | १,७६,३००/- |
| २ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरीअल, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, लाकडी फ्रेम, सीरींज, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड वगैरे फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई मुंबई व शिर्डी (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यावर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | ३,००,०००/- |
| ३ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह ( रु. ४३० x रु. ४० x २ ) | ०,३४,४००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्याकाळातील फळयांचे, लॉगचे व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम. | ०,३५,०००/- |
| | **एकुण रक्कम रु. :-** | ५,४५,७००/- |

(०१). गोल्टे-१० फूटी ४० नग, १२ फूटी ४० नग, १४ फूटी ४० नग, १६ फूटी ४० नग, १८ फूटी ४० नग.

(०२). कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी ५०० रुम येथे २० खोल्या व व्दारावती येथे ०२ नॉन ए.सी.खोल्या व उत्सव कालावधीत ५०० रुम येथे २० ऐवजी फक्त १५ खोल्या व व्दारावती येथे ०२ नॉन ए.सी.खोल्या विनामुल्य मिळाव्यात.

(०३). रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरात विनामुल्य मिळावा.

(०४). प्रतीवर्षाप्रमाणे सर्व कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची विनामुल्य सोय व्हावी.

(०५). दि.२२-०९-२०१९ रोजी फळयांसाठी ०२ भाडोत्री ट्रक्स गोरेगांव येथे व संस्थानचा ट्रक लालबाग येथे पाठविण्याची व्यवस्था करावी.

(०६). दि.०२-१०-२०१९ रोजी विद्युत रोषणाईचे साहित्य आणणेसाठी भाडोत्री ०४ ट्रक्स व संस्थानचा ट्रक लालबाग येथे पाठविण्याची व्यवस्था करावी.

तसेच वरील खर्चाची रक्कम ही श्री व्दारकामाई मंडळाचे संचालक, श्री.सतिष राव यांचे बॅंक खातेवर मिळणेस विनंती.

श्री साईबाबा संस्थानचे मा.अध्यक्ष साहेब, मा.सर्व विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय, मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांचे गेल्या अनेक वर्षापासून श्री व्दारकामाई मंडळाला उत्तम प्रकारे मार्गदर्शन व सहकार्य मिळत आहे आणि श्री साईच्छेनुसार यापुढेही मिळत राहो, ही श्रींचे चरणी प्रार्थना.

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये विद्युत रोषणाई व उभारण्यात आलेल्या देखावा करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना रक्कम रु. ८,१४,८००/- इतकी संस्थानमार्फत अदा करण्यात आलेली आहे. तसेच मटेरियल वाहतुकीसाठी प्रती ट्रक रु.३३,५००/- (रु.तेहतीस हजार पाचशे) मात्र प्रमाणे ८ (आठ) ट्रक्सचे भाडे रु.२,६८,०००/- इतका खर्च आलेला आहे. विद्युत रोषणाईचे विद्युतपुरवठयासाठी १२ नग भाडोत्री जनसेटसाठी रक्कम रु. १,९१,१६०/- इतका खर्च आलेला आहे. उत्सव कालावधीतील डिझेल जनसेट इंधनकामी रक्कम रु. २,४२,१९१/- इतका खर्च आलेला आहे. श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ करीता (विद्युत रोषणाई व देखावा खर्च

+ मटेरियल वाहतुक खर्च + भाडोत्री जनसेट + इंधन खर्च) सर्व मिळून एकत्रित खर्च रक्कम रु. १५,१६,१५१/- झालेला आहे.

प्रत्येक उत्सवाचे खर्चाबाबत प्रशासन शाखेच्या शताब्दी विभागामार्फत संस्थानच्या सर्व विभागांकडून अपेक्षित खर्चाचा व मागील वर्षी झालेल्या खर्चाचा तपशिल मागवून घेऊन तो एकत्रित करुन शताब्दी विभागा मार्फत मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे तो मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला जात असतो.

यावर्षी शताब्दी विभागाकडे (शताब्दी विभागाकडील पत्र क्र.एसएसएस/शताब्दी/५३५/२०१९ दि.११-०६-२०१९) विद्युत विभागामार्फत दि.१४-०६-२०१९ रोजी खालीलप्रमाणे खर्चाचा तपशिल कळविण्यात आला होता.

| अ. क्र. | तपशील | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ साठी अपेक्षित खर्च | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये झालेला खर्च | श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ साठी अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | विद्युत रोषणाई | रु. २०,००,०००/- | रु. ८,१४,८००/- | रु. ९,००,०००/- |
| २ | भाडोत्री जनसेट खर्च + त्यासाठी इंधन खर्च | रु. ४,००,०००/- | रु. ४,३३,३५१/- | रु. ३,००,०००/- |
| ३ | वाहतुक खर्च | रु. ३,००,०००/- | रु. २,६८,०००/- | रु. ३,००,०००/- |
| | एकुण :- | रु. २७,००,०००/- | रु. १५,१६,१५१/- | रु. १५,००,०००/- |

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ मध्ये करावयाच्या विद्युत रोषणाईच्या अंदाजित खर्चाबाबत श्री व्दारकामाई मंडळ यांनी खालीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

**अ) श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ करीता कळविलेला खर्च :-**

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | २०५ कलाकारांचे जाणे येणे सह एस.टी.प्रवास भाडे (येणे व जाणेसह) रु. ४३०x२०५ x २ | १,७६,३००/- |
| २ | उत्सवाचे शेवटचे दिवसापर्यंत भाडोत्री लाकडी फळयांचे भाडे, फ्रेम कपडा, फायबर मटेरीअल, प्लॅस्टर ऑफ पॅरीस, लाकडी फ्रेम, सीरींज, वायर, स्पॉटलाईट, हॅलोजन, मेटल हॅलाईड वगैरे फळया, पीओपी, मोल्डींग्ज व इतर साहित्य हमाली, उतराई, भराई, चढाई मुंबई व शिर्डी (येतेवेळेस सामान मुंबई येथून भरणे, शिरडीला खाली करणे, उत्सव संपल्यावर सामान शिरडी येथून भरणे, मुंबईला खाली करणे.) | ३,००,०००/- |
| ३ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो,त्यानंतर देखावा काढणेसाठी आणाव्या लागणा-या कलाकारांचे गाडी भाडे परतीसह (रु.४३०xरु. ४०x२) | ०,३४,४००/- |
| ४ | मुख्य देखावा उत्सवानंतर काही दिवस भक्तांना पाहण्यासाठी ठेवावा लागतो, त्याकाळातील फळयांचे, लॉगचे व इतर फोकस लाईटचे एकुण भाडे रु. ७०,०००/- होते. त्यापैकी निम्मी ५० टक्के रक्कम. | ०,३५,०००/- |
| | **एकुण रक्कम रु. :-** | **५,४५,७००/-** |

ब) याव्यतिरिक्त श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केल्याप्रमाणे ०६ नग भाडोत्री ट्रक, १२५ केव्हीए क्षमतेचे ०३ नग भाडोत्री जनसेट तसेच जनरेटरसाठी लागणारे इंधन, संस्थानचे टेम्पोसाठी मुंबई येथे जाणे व येणेसाठी लागणारे इंधन, टोल व भाडोत्री २०० नग गोल्टे यासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १ | ६ नग भाडोत्री ट्रकसाठी अपेक्षित खर्च (रु. ३४,०००/- x ६ भाडोत्री ट्रक) | रु. २,०४,०००/- |
| २ | ०३ नग भाडोत्री जनरेटरसाठी अपेक्षित खर्च ४ दिवस (रु. ९,५००/- x ४ दिवस x ३ जनसेट) | रु. १,१४,०००/- |
| ३ | भाडोत्री जनरेटरसेट करीता अपेक्षित इंधन खर्च (४ दिवसाकरीता) | रु. ७५,०००/- |
| ४ | संस्थानचे टेम्पोकरीता मुंबई येथे जाणे व येणेसाठी अपेक्षित इंधन खर्च (प्रति फेरी रु.५,५२५/- x ४ फे-या = रु. २२,१००/-) + टोलचा खर्च (प्रति फेरी रु.५००/- x ४ फे-या = रु. २,०००/-) | रु. २४,१००/- |
| ५ | भाडोत्री गोल्टे साठी लागणारा अपेक्षित खर्च | रु. १८,०००/- |

| | | |
|---|---|---|
| | (गोल्टे संख्या २०० नग x दर रु. २.५० x ३६ दिवस) | |
| | **एकुण अपेक्षित खर्च रक्कम :-** | रु.४,३५,१००/- |

क) संस्थानमार्फत श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांना विनामुल्य पुरविणेकामी निवासस्थान, नाष्टा व चहा यासाठी अपेक्षित खर्च खालीलप्रमाणे:-

| अ.क्र. | तपशील | अपेक्षित खर्च |
|---|---|---|
| १) | (अ). उत्सवाचे अगोदर साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.२३-०९-२०१९ ते दि.०६-१०-२०१९ अखेर २० रुम्स् (२० रुम्स् x१४ दिवस x भाडे रु.१५०/-प्रतिदिन=रु.४२,०००/-)<br>(ब). उत्सव काळात साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.०७-१०-२०१९ ते दि.११-१०-२०१९ अखेर १५ रुम्स् (१५ रुम्स् x५ दिवस xभाडे रु.१५०/-प्रतिदिन = रु.११,२५०/-)<br>(क). उत्सवाचे अगोदर व्दारावती भक्तनिवास येथे निवासव्यवस्थेसाठी लागणारा अपेक्षित खर्च कालावधी दि.२३-०९-२०१९ ते दि.११-१०-२०१९ अखेर ०२ रुम्स् (०२ रुम्स् x१९ दिवस x भाडे रु.५००/-प्रतिदिन=रु.१९,०००/-) | रु. ७२,२५०/- |
| २) | (अ). दि.२३-०९-२०१९ ते दि.०६-१०-२०१९ अखेर नाष्टा पाकिटे साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या १२५ x१४ दिवस x दर रु.५/-= रु.८,७५०/-)<br>(ब). दि.०७-१०-२०१९ ते दि.११-१०-२०१९ अखेर नाष्टा पाकिटे साठी येणारा अपेक्षित खर्च.(कलाकार संख्या ८०x ५ दिवस x दर रु. ५/- =रु.२,०००/-) | रु. १०,७५०/- |
| ३) | (अ). दि.२३-०९-२०१९ ते दि.०६-१०-२०१९ अखेर चहा साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या १२५ x १४ दिवस x ०३ वेळा x दर रु. २/- = रु.१०,५००/-)<br>(ब). दि.०७-१०-२०१९ ते दि.११-१०-२०१९ अखेर चहा साठी येणारा अपेक्षित खर्च. (कलाकार संख्या ८० x ५ दिवस x०३ वेळा x दर रु. २/-= रु.२,४००/-) | रु. १२,९००/- |
| | **एकुण अपेक्षित खर्च रक्कम :-** | **रु. ९५,९००/-** |

श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्तप्रमाणे (अ) रक्कम रुपये ५,४५,७००/- + (ब) रक्कम रुपये ४,३५,१००/- (क) रक्कम रु.९५,९००/- अशी एकुण रक्कम रु. १०,७६,७००/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

संस्थानचा ०१ मोठा ट्रक ०४ वेळेस मुंबई येथे वेगवेगळया दिवशी विद्युत रोषणाईचे साहित्य आणणे व पोहोच करणेकामी पाठवावा लागणार आहे. तसेच संस्थानमार्फत देखावा उभारणीकामी गोल्टे-१० फूटी ४० नग, १२ फूटी ४० नग, १४ फूटी ४० नग, १६ फूटी ४० नग, १८ फूटी ४० नग पुरवावे लागणार आहे. तसेच कलाकारांना राहण्यासाठी उत्सव चालू होण्यापुर्वी (काम चालू असताना) देखावा उभे करणारे कलाकार तसेच विद्युत रोषणाई करणारे यांच्यासाठी ५०० रुम येथे २० खोल्या व उत्सव कालावधीत २० ऐवजी फक्त १५ खोल्या तसेच व्दारावती भक्तनिवास येथे ०२ नॉन ए.सी.खोल्या व रोषणाईचे साहित्य ठेवण्यासाठी अंदाजे ४० फूट x २० फूटाचा एक हॉल मंदीराचे परीसरामध्ये विनामुल्य मिळावा अशी श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी मागणी केलेली आहे. तसेच प्रतीवर्षाप्रमाणे २०५ कलाकारांना तीन वेळचा चहा, सकाळचा नाष्टा, व दोन वेळचे जेवण याची सोय संस्थानमार्फत विनामुल्य करावी असे कळविले आहे.

विभागाचा अभिप्राय :-श्री पुण्यतिथी उत्सव-२०१८ मध्ये ( विद्युत रोषणाई + देखाव्यासाठी लागणारे सर्व साहित्य+मटेरियल वाहतुक+भाडोत्री जनसेट+भाडोत्री जनसेटसाठी इंधन खर्च) सर्व मिळून एकत्रित खर्च रक्कम रु. १५,१६,१५१/- इतका झालेला आहे. श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ मध्ये ४ दिवसांकरीता विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांनी दि.१६-०७-२०१९ व दि.२०-०७-२०१९ रोजीचे पत्रान्वये खर्चाचा प्रस्ताव संस्थानकडे सादर केलेला आहे. सदर उत्सवामध्ये विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकरीता प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) रक्कम रुपये ५,४५,७००/- + (ब) रक्कम रुपये ४,३५,१००/- (क) रक्कम रु.९५,९००/- अशी एकुण रक्कम रु. १०,७६,७००/- इतका अंदाजे खर्च येणे अपेक्षित आहे.

प्रस्ताव:- (०१) श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ मध्ये दि. ०७-१०-२०१९ ते दि.१०-१०-२०१९ अखेर ०४ दिवसाकरीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन

घेणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे (अ) रक्कम रुपये ५,४५,७००/- + (ब) रक्कम रुपये ४,३५,१००/- (क) रक्कम रु.९५,९००/- अशी एकुण रक्कम रु. १०,७६,७००/- इतका खर्च येणे अपेक्षित आहे. यावर निर्णय होणेस विनंती.

(०२) श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीचे काम करुन घेणेसाठी त्यांनी त्यांचे पत्रात मागणी केलेप्रमाणे ०४ दिवसाकरीता ०३ नग भाडोत्री जनसेटकरीता व ०६ नग भाडोत्री ट्रक्स करीता विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

(०३) श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ साठी विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४१८ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव-२०१९ करीता श्री व्दारकामाई मंडळ, मुंबई यांचेकडून विद्युत रोषणाई व देखावा उभारणीकामी प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१०,७६,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.१६ **व्दारावती भक्तनिवास ३ रा माळा प्रत्येक रुममध्ये ए.सी. व टि.व्ही.करीता वायरींगचे काम बाहेरील विद्युत ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागवून करणेबाबत.**

**प्रस्ताव-** व्दारावती भक्तनिवास विभागाने तिस-या माळयावरील ८० नॉन ए.सी.खोल्यांमध्ये ए.सी.व टि.व्ही.संच बसविले जाणार असल्याने अनुषंगिक कामांची यथायोग्य कार्यवाही करुन मिळणेबाबत विद्युत विभागास कळविण्यात आले आहे.

सदरील इमारतीचे तिस-या माळयावरील रुममध्ये ए.सी.करीता लागणारे पॉवर पॉईंट व टि.व्ही.संचाकरीता लागणारे प्लग स्वीच बोर्ड इमारत बांधकामाचे वेळेस बसविण्यात आलेले नाहीत.

**मागणी:-** याकरीता सदरील सर्व ८० रुममध्ये ए.सी.व टि.व्ही.करीता वायरींग काम करुन ए.सी.करीता पॉवर पॉईंट व टि.व्ही.संचांकरीता प्लग स्वीच बोर्ड बसवून दयावे लागणार आहेत. त्यानुसार उपरोक्त ए.सी.व टि.व्ही.संचकरीता कराव्या लागणा-या विद्युतीकरण कामाचा खर्च हा शासनमान्य सी.एस.आर.२०१७-२०१८ प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1) | 1-3-6 | Supplying & erecting mains with 2x4 sq.mm FRLSH copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WGMA / BW | 2400 Mtrs. | 94.50 | 02,26,800.00 |
| 2) | 1-3-4 Note | Supplying & erecting mains with 1x2.5 sq.mm FRLSH copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole/Bus bars or any other places. as per specification No: WGMA / BW Please refer bottom note in Chapter of CSR Section No.1.3 (Bunch of Wires) on Page no. 18). | 2400 Mtrs. | 33.52 | 00,80,448.00 |
| 3) | 1-3-12 | Supplying & erecting mains with 3x2.5 sq.mm FRLHS copper PVC insulated wire laid in provided conduit / trunking / inside pole/Bus bars or any other places as per specification No: WGMA / BW | 1500 Mtrs | 92.90 | 01,39,350.00 |
| 4) | 1-2-11 | Supplying and erecting PVC trunking (PVC casing-ncapping) of size 32 mm with accessories on wall / ceiling as per specification No: WG-MA/CON. | 2000 Mtrs | 49.39 | 00,98,780.00 |
| 5) | 1-8-1 | Supplying and erecting ISI mark modular type switch 6A / 10A duly erected on provided plate and box with wiring connections complete | 80 Nos. | 76.44 | 00,06,115.20 |
| 6) | 1-8-6 | Supplying and erecting ISI mark modular type switch 16 / 20 A with indicator, duly erected on provided plate and box with wiring connections complete. | 80 Nos. | 148.18 | 00,11,854.40 |
| 7) | 1-8-10 | Supplying and erecting ISI mark modular type 3 pin 6A multi sockets with safety shutter, duly erected on provided plate and box with wiring connections complete | 80 Nos. | 124.66 | 00,09,972.80 |
| 8) | 1-8-11 | Supplying and erecting ISI mark modular type 3 pin 6 / 16A multi socket with safety shutter, duly erected on provided plate and box with wiring connections complete | 80 Nos. | 184.63 | 00,14,770.40 |
| 9) | 1-8-26 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with | 80 | 135.24 | 00,10,819.20 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | double mounting plate for 1 module complete duly erected. | Nos. | | |
| 10) | 1-8-27 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 2 modules duly erected. | 80 Nos. | 141.12 | 00,11,289.60 |
| 11) | 1-8-28 | Supplying and erecting PVC Surface modular switch box with double mounting plate for 3 modules duly erected. | 80 Nos. | 165.82 | 00,13,265.60 |
| | **Amount Rs.:-** | | | | **6,23,465.20** |
| | **Less 20% Amount Rs.:-** | | | | **1,24,693.04** |
| | **Net Amount Rs.:-** | | | | **4,98,772.16** |
| | **Round Up Rs.:-** | | | | **4,98,772.00** |

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत- उपरोक्तप्रमाणे ए.सी.व टि.व्ही.संचकरीता वायरींगचे काम बाहेरील विद्युत ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागवून करुन घेणेस व त्याकामी येणा-या रक्कम करणेकरीता रक्कम रु.४,९८,७७२/-इतक्या खर्चास मान्यता मिळणेसाठी तसेच बाहेरील विद्युत ठेकेदार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**निर्णय क्र.४१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवासमधील तिसऱ्या माळयावरील प्रत्येक रुममध्ये ए.सी. व टि.व्ही.करीता वायरींगचे काम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.४,९८,७७२/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१७** **साई धर्मशाळेकडील जनरेटरसेट नादुरुस्त झाल्याने दुरुस्त करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईधर्मशाळा येथील इमारती व परिसर तसेच नविन स्टाफ क्वॉर्टर इमारतीचा परिसर येथील विद्युत पुरवठयाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून ११ के.व्ही.उच्चदाब वीजपुरवठा जोडणी करुन घेण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या पर्यायी विद्युतपुरवठयाकरीता दि.२८-०२-२०१२ रोजी ५०० केव्हीए क्षमतेचे दोन जनरेटरसेट बसविण्यात आलेले आहेत. सदरील दोन जनरेटर पैकी एक जनरेटर (जी-२) दि.०८-०१-२०१९ रोजी चालू असतांना इंजिनचा आवाज येऊ लागल्याने सदरील जनरेटरसेट बंद करुन दुसरा जनरेटर (जी-१) चालू करुन त्यावर लोड देण्यात आला.

जनरेटरसेटचे इंजिनचा आवाज येत असल्याने याबाबत संस्थान जनरेटरचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट देण्यात आलेले मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस यांचे कॉन्ट्रॅक्टचे इंजिनिअर, श्री.श्रीकांत शिरसाठ यांना जनरेटरसेट इंजिन चेक करुन घेणेबाबत कळविले. श्री.श्रीकांत शिरसाठ यांनी दि.०९-०१-२०१९ रोजी साईधर्मशाळा येथे येऊन जनरेटरसेट चालू करुन ट्रायल घेतली असता जनरेटरसेटच्या इंजिनमधून नेहमी पेक्षा वेगळा आवाज येऊ लागल्याचे लक्षात आले. त्यामुळे श्री.श्रीकांत शिरसाठ यांनी जनरेटरसेट विषयी मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, नाशिक यांचे कार्यालयास याविषयी कळविले व जनरेटर सेटचे इंजिनचे ओव्हरहॉलींग एक्सपर्ट करणारे इंजिनिअर श्री.सचिन रणशिंग यांना शिर्डी येथे येऊन जनरेटर चेक करुन घेणेविषयी सुचित केले. त्यानुसार इंजिनिअर श्री.सचिन रणशिंग व श्री.के.बी.चौधरी यांनी दि.११-०१-२०१९ रोजी शिर्डी येथे येऊन जनरेटरसेट चालू करुन पुन्हा एकदा ट्रायल घेतली असता त्यांना जनरेटरसेटचे इंजिन मधील सिलेंडर हेड, इंजेक्टर,पम्प व टर्बो चार्जर चा आवाज येत असल्याचे लक्षात आले. त्यामुळे सदरील जनरेटरसेट इंजिनचे हेड खोलून त्यातील सिलेंडर हेड, इंजेक्टर,पम्प व टर्बो चार्जर खोलून चेक केले असता त्यांनी सांगितले की सदर इंजिनचे संबंधित सिलेंडर हेड, इंजेक्टर, पम्प व टर्बो हे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस यांचे औरंगाबाद येथील वर्कशॉपमध्ये नेऊन कॅलीब्रेशन करावे लागणार आहे.

याकामी विद्युत विभागामार्फत दि.०१-०३-२०१९ रोजी टिपणी सादर केली होती व अंदाजे रक्कम रुपये ४,५०,०००/- + ट्रान्सपोर्ट चार्जेस खर्चास मान्यता घेण्यात आली होती. नविन ५०० केव्हीए जनसेटची किंमत ही अंदाजे रु. २५ ते रु. २७ लाख इतकी आहे.

संस्थानचे सर्व जनरेटरसेटचे इंजिन हे कमिन्स मेक आहेत. कमिन्स कंपनीच्या वेबसाईटवर दिलेली माहिती नुसार फक्त डिलर्स ओरीजनल पार्टस् पुरवू शकत असल्याचे तसेच त्यांचे नाशिक, अहमदनगर जिल्ह्याकरीता कमिन्स कंपनीचे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस हे एकमेव डिलर असल्याचे नमूद

आहे. त्यामुळे इंजिन करीता लागणारे कमिन्स कंपनीचे ओरीजनल स्पेअरपार्ट हे मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस यांचेकडूनच मिळू शकतील. स्पेअरपार्ट ओरीजनल बसविल्यास जनरेटरसेट मध्ये वारंवार बिघाड न होता दिर्घकाळ चालू शकेल. इतर सर्व्हीस सेंटरकडून कोटेशन मागविल्यास त्यांचेकडील स्पेअरपार्ट ओरीजनल मिळतील याची खात्री देता येणार नाही. स्पेअरपार्ट ओरीजनल न वापरल्यास इंजिनची Efficiency व इंजिनचे लाईफ कमी होऊन वारंवार बिघाड होण्याचे धोके निर्माण होऊ शकतील.

मे.ट्रिनिटी म्हाळसा दुर्गा सेल्स ॲण्ड सर्व्हीसेस, नाशिक यांचे इंजिनिअर्सनी इंजिनचे हेड प्रत्यक्ष खोलून पाहिल्यानंतर त्यांनी आता प्रत्यक्ष कराव्या लागणा-या कामाचे कोटेशन पत्र सादर केले आहे. कराव्या लागणा-या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

Quotation No. : 030-Q-2019-SP-000237 Dt.15-05-2019

| SR.NO. | PART NO. | HSN / SAC CODE | DETAILS | QTY | RATE IN RS. | COST IN RS. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 4352578 | 84841090 | KIT, UPPER ENGINE GASKET | 01 | 47,984.50 | 47,984.50 |
| 2 | 201048 | 40169390 | GASKET, CONNECTION | 01 | 20.09 | 20.09 |
| 3 | 206576 | 40169390 | GASKET, TURBOCHAGER | 01 | 303.99 | 303.99 |
| 4 | 3069103 | 40169390 | GASKET, FUEL PUMP | 01 | 124.33 | 124.33 |
| 5 | 207058 | 40169390 | GASKET, THERMOSTAT HOUSING | 01 | 59.07 | 59.07 |
| 6 | 70624 | 40169390 | SEAL, O RING | 01 | 35.94 | 35.34 |
| 7 | 207056 | 40169390 | GASKET, CONNECTION | 01 | 9.92 | 9.92 |
| 8 | 135675 | 90321090 | THEROSTAT | 02 | 1,573.48 | 3,146.96 |
| 9 | 186780 | 40169390 | SEAL, THEROSTAT | 02 | 343.82 | 687.64 |
| 10 | 3922794 | 40169390 | SEAL, O RING | 02 | 260.77 | 521.54 |
| 11 | 131026 | 40169390 | SEAL, O RING | 06 | 41.28 | 247.68 |
| 12 | 3023095 | 73181500 | WASHER, SEALING | 12 | 22.63 | 271.56 |
| 13 | 207244 | 40169330 | SEAL, INJECTOR | 06 | 75.17 | 451.02 |
| 14 | 193736 | 40169330 | SEAL, O RING | 18 | 53.14 | 956.52 |
| 15 | 3016142 | 40091100 | HOSE, PLAIN | 01 | 1,063.31 | 1,063.31 |
| 16 | 3001305 | 40169390 | GASKET, CONNECTION | 02 | 106.53 | 213.06 |
| 17 | 3001301 | 40169390 | RETAINER, SEAL | 02 | 765.00 | 1,530.00 |
| 18 | KITBM68356 | 40169390 | GASKET GOVERNOR SET | 01 | 2,515.00 | 2,515.00 |
| 19 | 143255 | 73202000 | SPRING, COMPRESSION | 01 | 1,625.17 | 1,625.17 |
| 20 | 146483 | 84219900 | SCREEN, FILTER | 01 | 192.97 | 192.97 |
| 21 | BM28854 | 84831010 | SHAFT, THROTTLE | 01 | 2,342.12 | 2,342.12 |
| 22 | 167157 | 84829900 | BALL, CHECK | 06 | 179.41 | 1,076.46 |
| 23 | 205091 | 84819090 | COLLET, VALUE | 24 | 24.33 | 583.92 |
| 24 | 205094 | 73202000 | RETAINER, VALVE SPRING | 06 | 496.36 | 2,978.16 |
| 25 | 3052820 | 84811000 | VALVE, INTAKE | 06 | 2,602.29 | 15,613.74 |
| 26 | 3088389 | 84818030 | VALVE, EXHAUST | 06 | 3,934.50 | 23,607.00 |
| 27 | 3643725 | 73202000 | SPRING, VALVE | 06 | 1,501.44 | 9,008.64 |
| 28 | 3086192 | 84819090 | INSERT, VALVE | 06 | 870.09 | 5,220.54 |
| 29 | 3086193 | 84819090 | INSERT, VALVE | 06 | 2,752.29 | 16,513.74 |
| 30 | 3202210 | 84819090 | GUIDE, VALVE STEM | 06 | 1,251.44 | 7,508.64 |
| 31 | 3879346 | 84099990 | GOVERNOR BARREL & PLUNGER | 01 | 4,621.63 | 4,621.63 |
| 32 | 154461 | 84138190 | PLUNGER, GOVERNOR | 01 | 1,124.75 | 1,124.75 |
| 33 | BM28848 | 84099990 | DRIVE TACHOMETER | 01 | 1,752.88 | 1,752.88 |
| 34 | KIT3238196 | 84099990 | KIT BARREL PLUNGER & CUP | 06 | 29,924.75 | 1,79,548.50 |
| 35 | 3045000 | 84099990 | PLUG, INJECTOR ORIFICE | 06 | 96.63 | 579.78 |
| | TOTAL BASIC AMOUNT | | | | | 3,34,040.17 |
| | ADD :SGST 9% ON SR.NO.01 TO 39 | | | | | 13,177.14 |
| | ADD CGST 9% IB SR.NO.01 TO 30 | | | | | 13,177.14 |
| | ADD :SGST 14% ON SR.NO31 TO 35 | | | | | 26,267.86 |
| | ADD CGST 14% IB SR.NO.31 TO 35 | | | | | 26,267.86 |
| | TOTAL BASIC + GST AMOUNT | | | | | 4,12,930.17 |
| | ROUND OFF | | | | | 0.17 |
| | **TOTAL AMOUNT** | | | | | **4,12,930.00** |
| (IN WORD RS. FOUR LAC TWELVE THOUSAND NINE HUNDRED THIRTY ONLY) | | | | | | |

**Quotation No. JW /030006349 / 17 Dt.15.05.2019**

| SR.NO. | PART NO. | DETAILS | QTY | RATE IN RS. | COST IN RS. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dismantling of Components from engine for calibration and testing | Removal of the cylinder head assly, injectors, fuel, pump, at Shirdi site reconnection for the repairs and necessary calibration of the engine at Service centre Workshop) of TMDSS, Aurangabad | 01 | 17,500.00 | 17,500.00 |
| 3 | Transportation charges | Transportation charges of cylinder heads, pump fuel, injectors turbocharger form Shirdi to Service | 02 | 10,000.00 | 20,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | centre Workshop) of TMDSS. Aurangabad And after repairing and calibration work again back to Shirdi site. | | | |
| 4 | After the calibration and tesing Assembly of Components on the engine | After repairs and calibration – Installation of the cylinder head assly, injectors, fuel pump, and it connection at Shirdi site with microsetting | 01 | 17,500.00 | 17,500.00 |
| 5 | CYLINDER HEADS | Chemical Cleaning, Acid washing, servicing, and parts assly, and testing with SPECIAL tools and computerised machinaries and Final calibration in Service centre ( Workshop) of TMDSS, Aurangabad | 06 | 2,500.00 | 15,000.00 |
| 7 | PT PUMP | Chemical cleaning, Acid washing, servicing, and parts assly, and testing with SPECIAL tools and computerised machinaries and Final calibration in Service centre ( Workshop) of TMDSS, Aurangabad | 01 | 5,500.00 | 5,500.00 |
| 8 | INJECTORS | Chemical cleaning, Acid washing, servicing, and parts assly, and testing with SPECIAL tools and computerised machinaries and Final calibration in Service centre ( Workshop) of TMDSS, Aurangabad | 06 | 3,200.00 | 19,200.00 |
| | Total Basic Amount | | | | 94,700.00 |
| | Add : SGST 9% | | | | 8,523.00 |
| | Add : CGST 9% | | | | 8,523.00 |
| | **Total Amount** | | | | **1,11,746.00** |
| (IN WORD RS. ONE LAC ELEVEN THOUSAND SEVEN HUNDRED FORTY SIX ONLY) | | | | | |

मागणी:- साईधर्मशाळेकडील जनरेटरसेट दुरुस्त करणेकामी रक्कम रु.४,१२,९३०/- + रु. १,११,७४६/- = रु. ५,२४,६७६/- इतका खर्च येणार आहे. सदरील खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**निर्णय क्र.४२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई धर्मशाळेकडील जनरेटरसेट दुरुस्त करुन घेण्यास व याकामी येणाऱ्या रक्कम रु.५,२४,६७६/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१८** **श्री साईनाथ हॉस्पिटल तसेच व्दारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोड करीता ट्रान्सफॉर्मर, जनरेटर व क्युबिकल इलेक्ट्रिकल पॅनल व केबल खरेदी करुन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही एका प्रयोजनासाठी करण्यात येईल:-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

वरील अधिनियमास व शासन निर्णयास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

साईभक्तांचे सोयी सुविधेकरीता निवासव्यवस्थेसाठी संस्थानमार्फत सन १९९९ मध्ये धर्मशाळेच्या दोन प्रशस्त इमारती बांधून साईभक्तांना निवासाकरीता चालू करुन देण्यात आलेल्या होत्या. त्या वेळेचा धर्मशाळेचा इलेक्ट्रीकल लोड लक्षात घेऊन धर्मशाळा परीसरामध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून ११ के.व्ही. एच.टी.सप्लाय घेऊन सबस्टेशन मध्ये ५०० के.व्ही.ए.चा एक ट्रान्सफॉर्मर व २५० केव्हीए क्षमतेचे ०२ नग जनरेटरसेट बसविण्यात आलेले होते. त्यावेळी (सन १९९९साली) धर्मशाळेच्या दोन्ही इमारतींचा व परीसराचा साधारण लोड १५० KW इतका होता.

सन-२००५ मध्ये मा.व्यवस्थापन समितीने श्री साईनाथ हॉस्पीटलचे नुतनीकरण व विस्तारीकरण करण्याचे ठरविल्याने श्री साईनाथ हॉस्पीटल हे धर्मशाळेच्या दोन्ही इमारतींमध्ये स्थलांतरीत करण्यात आले होते.

श्री साईनाथ हॉस्पीटलचे जुन्या (सध्या श्री साईबाबा हॉस्पीटल असलेल्या ) इमारतीचे नुतनीकरण व विस्तारीकरण काम पुर्ण झाल्यानंतर त्याठिकाणी नव्याने श्री साईबाबा हॉस्पीटल चालू करण्यात आले. परंतू धर्मशाळा इमारतीमध्ये तात्पुरते स्थलांतरीत झालेले श्री साईनाथ हॉस्पीटल कायमस्वरुपी धर्मशाळा इमारतीमध्येच ठेवण्यात आले. श्री साईनाथ हॉस्पीटल मधील विविध मशिनरी व वातानुकुलीत यंत्रे तसेच लाईटींग लोड मिळून एकुण २४० KW इतका आहे. तसेच श्री साईनाथ हॉस्पीटलमार्फत नविन ए.सी.बसविण्याची मागणी होत आहे. त्यामुळे साईनाथ हॉस्पीटलचा इलेक्ट्रीकल लोड यापुढेही वाढणार आहे.

तसेच सन-२०११ मध्ये धर्मशाळा परीसरामध्ये व्दारावती इमारतीचे बांधकाम पूर्ण होऊन सदरील इमारत साईभक्तांना निवासव्यवस्थेकरीता देण्याचे चालू करण्यात आले. व्दारावती इमारतीचा लाईटींग लोड व वातानुकुलीत यंत्राचा लोड मिळून २९५ KW इतका लोड आहे.

दि.०५-१२-२०१३ रोजीचे तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचे मिटींगमध्ये झालेल्या चर्चेनुसार तसेच व्दारावती विभागाने व्दारावती इमारतीवरील सोलर सिस्टिमचे हिटर चालू करुन देणेबाबत कळविले आहे. सोलर सिस्टिमच्या एकुण सर्व गिझर बॅकअप सिस्टिमचा लोड १९२ के.डब्ल्यु. इतका आहे.

सध्या साईनाथ हॉस्पीटल इमारतीवर वाढीव तिस-या मजल्याचे काम चालू असल्याने या मजल्याचा इलेक्ट्रीकल लोड हा अंदाजे १५० के.डब्ल्यु.इतका वाढणार आहे. तसेच व्दारावती इमारतीमध्ये तिस-या मजल्यावरील ८० रुममध्ये ८० नग ए.सी.तसेच ८० नग टि.व्ही.संच बसविण्यात येणार असल्याने सदरील उपकरणांचा २०० KW इतका लोड वाढणार आहे. त्याचप्रमाणे भविष्यातश्री साईनाथ हॉस्पीटलचे पश्चिम बाजूस नविन बांधण्यात येणार असल्याने या इमारतीचा इलेक्ट्रीकल लोड साधारणतः३०० KW इतका वाढण्याची शक्यता आहे. तसेच मंदिर परीसरामध्ये असलेले मेकॅनिकल विभागाचे वर्कशॉप हे श्री साईनाथ हॉस्पीटलकडील सबस्टेशनच्या शेजारी शिफ्ट होणार असल्याने सदरच्या वर्कशॉपचा इलेक्ट्रीकल लोड हा अंदाजे ५० KW इतका वाढणार आहे. उपरोक्त सर्व मिळून इलेक्ट्रीकल लोडचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | इलेक्ट्रीकल लोड |
|---|---|---|
| ०१) | श्री साईनाथ हॉस्पीटलचा सध्याचा इलेक्ट्रीकल लोड | २४० KW |
| ०२) | व्दारावती इमारतीचा सध्याचा इलेक्ट्रीकल लोड | २९५ KW |
| ०३) | व्दारावती इमारतीवरील सोलर सिस्टीमचा सर्व गिझर बॅकअप सिस्टिमचा इलेक्ट्रीकल लोड | १९२ KW |
| ०४) | श्री साईनाथ हॉस्पीटल इमारतीवरील वाढीव तिस-या मजल्याचा इलेक्ट्रीकल लोड | १५० KW |
| ०५) | व्दारावती इमारतीमध्ये बसविण्यात येणा-या ए.सी.व टि.व्ही.संचचा इलेक्ट्रीकल लोड | २०० KW |
| ०६) | भविष्यात बांधण्यात येणा-या वाढीव इमारतीचा इलेक्ट्रीकल लोड | ३०० KW |
| ०७) | वर्कशॉपचा इलेक्ट्रीकल लोड | ५० KW |
| | **एकुण इलेक्ट्रीकल लोड -** | **१४२७ KW** |

श्री साईनाथ हॉस्पीटल व व्दारावती इमारत येथील जनसेट व सबस्टेशन १९९९ साली बसविण्यात आलेले आहेत. त्यांना आता २० वर्षे झाल्याने व तेथील इलेक्ट्रीकल लोड सतत वाढत असल्याने ओव्हरलोडमुळे जनसेट व इतर मशिनरी गरम होऊन बंद पडत आहे. तसेच एखादेवेळी जनसेट व ट्रान्सफॉर्मर तसेच स्विच गिअर्स फेल होण्याची शक्यताही नाकारता येत नाही. तसेच सन २००४ मध्ये श्री साईनाथ हॉस्पीटल तात्पुरते स्थलांतरित झालेले असल्यामुळे विद्युत विभागामार्फत त्या वेळेस तेथील वाढीव लोडकरीता ओव्हरहेड केबल टाकून तात्पुरत्या स्वरुपाचे पॉवर पॅनेल तयार करुन बसवून देण्यात आले होते. तरी आता सदरील ओव्हरहेड केबल्स काढून नविन केबल खरेदी करुन त्या अंडरग्राऊंड करुन टाकाव्या लागणार आहेत. तसेच तात्पुरते तयार करुन बसविले पॉवर पॅनेल्स काढून त्याठिकाणी नविन पॉवर पॅनेल, याठिकाणच्या सबस्टेशनमधील जनरेटर सेट, ट्रान्सफॉर्मर, क्युबिकल, इलेक्ट्रीक पॅनेल, केबल इत्यादी खरेदी करुन बसवावे लागणार आहेत.

सध्याची जनरेटर रुमची साईज ही त्याकाळच्या २५० केव्हीए जनसेटच्या साईजनुसार बांधण्यात आली होती. यामध्ये त्यापेक्षा जास्त क्षमतेचा जनसेट बसू शकत नाही. शिवाय याच रुममध्ये डिस्ट्रीब्युशन पॅनेल असल्याने विस्तारास वाव राहिलेला नाही. त्यामुळे याठिकाणच्या नविन ट्रान्सफॉर्मर क्युबिकल,सबस्टेशन,नविन १०१० केव्हीए चे दोन जनरेटर व पॅनेल बोर्ड या नविन यंत्रणेकरीता जादा जागा लागणार असल्याने साईआश्रमच्या धर्तीवर नविन जनरेटर रुमचे बांधकाम हे सध्याच्या जनरेटर समोरील मोकळया जागेमध्ये बांधकाम विभागामार्फत करावे लागणार आहे.

त्यानुसार उपरोक्त विद्युत विभागामार्फत करावयाच्या कामाचा खर्च हा शासनमान्य सी.एस.आर.२०१७-२०१८ प्रमाणे तयार केलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | C.S.R. No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 7-3-12 | Supplying & erecting 3 x 185 sq.mm 11 kV, XLPE(E) armoured cable on wall/ceiling or laid in provided trench / pipe in an | 100 Mtrs. | 2426.09 | 02,42,609.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | approved manner as per specification No. CB-HT. | | | |
| 02) | 7-5-13 | Providing and erecting Heat shrinkable outdoor termination kit for 11 kV (E) XLPE HT cable 3x150 to 185 sq. mm. with necessary material as per specification no. CB-JT/HT. | 02 Nos. | 13399.34 | 00,26,798.68 |
| 03) | 7-5-2 | Providing and erecting Heat shrinkable indoor termination kit for 11 kV (E) XLPE HT cable 3x150 to 185 sq. mm. with necessary material as per specification No. CB-JT/HT | 06 Nos. | 10459.34 | 00,62,756.04 |
| 04) | 10-2-22 | Providing printed instruction chart for treating persons suffering from electric shock, printed in English & Marathi and duly laminated. | 02 Nos. | 135.24 | 00,00,270.48 |
| 05) | 10-2-23 | Provided pair of duly tested rubber hand gloves as per IS :340715 suitable for working on 22kV supply. | 01 No. | 658.56 | 00,00,658.56 |
| 06) | 6-4-2 | Supplying, erecting, testing, commissioning 11 KV H.T. metering cubical (Compact Type) approved by MSEDCL/Licensee fabricated with 2mm.(14 SWG) M.S.sheets with supporting angle and channel, painted with powder coating / epoxy paint of required shade copper bus bar size 25x6 mm electronic security lock and heavy duty mechanical lock, with counter meter for measuring no of times the opening of doors, top side cover ( C.T.P.T COVER) interlock with meter doors, epoxy coated 3 nos C.T having required ratio between 5/5A to 100/5A burden 10 VA class 0.5 I.L.12/28/75 KVP epoxy terminal block suitable for provided trivector meter, and provision for incoming and outgoing cables etc complete duly tested by Licensee with necessary Test Certificates and erected on provided plinth/ C.C foundation | 01 No. | 154358.23 | 01,54,358.23 |
| 07) | 9-1-5 | Supply, Installation, Testing and commissioning of UL Certified / CPRI Tested Maintenance Free Earthing comprising of electrode of 17.2 mm diameter low Carbon Steel with 250 micron Molecular Copper Bonded Earthing Rod of Length 3m along with 25 kg Carbon Based environment friendly back fill Ground Enhancing compound required to fill up the excavated eartg with required quantity as per specification no. EA-MOBI | 41 Nos. | 14315.45 | 05,86,933.45 |
| 08) | 10-2-24 | Providing round bottom FIRE Bucket of 9 Litres capacity as per IS : 2546 made out of 24 gauge G.I. sheet with extra handle at bottom duly painted white inside and red outside with FIRE Mark, on provided stand/ wall hook. | 08 Nos | 505.68 | 00,04,045.44 |
| 09) | 10-2-25 | Providing floor mounting stand for keeping 4 Nos. of FIRE buckets 1500mm in length, 900mm in height frame made out of 30x30x4 mm. angle iron with cross supports for legs, welded with 4 hooks & duly painted with one coat of red lead & two coats of silver paint. | 02 Nos | 3932.54 | 00,07,865.08 |
| 10) | 9-2-2 | Supplying and erecting copper strip of required size used for earthing on wall and/or any other purpose with necessary copper clamps fixed on wall painted with bituminous paint in an approved manner with joints required. as per specification No (EA-EP). | 1000 Kgs. | 862.01 | 08,62,010.00 |
| 11) | 10-2-29 | Supplying and fixing PVC Synthetic elastomer electrically insulating mat with class B insulation conforming to IS: 15652 – 2006 & CPRI tested having 2.5 mm thickness upto 11 kV | 30 Sq.Mtr s | 5442.53 | 01,63,275.90 |
| 12) | 7-1-23 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 3½core 240 sq mm aluminium conductor with continuous12.97 sq mm (8 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/AL | 7000 Mtrs. | 1368.86 | 95,82,020.00 |
| 13) | 7-7-11 | Supplying & erecting Flange type brass cable glands for 3½core 240 sq mm for PVC armoured cable as per specification No. CB-GL | 85 Nos. | 368.68 | 00,31,337.80 |
| 14) | 7-10-10 | Supplying & erecting crimping type aluminium lugs forcable 240 sq mm complete as per specification No. CBCL/AL | 350 Nos. | 88.20 | 00,30,870.00 |
| 15) | 7-6-7 | Supplying & laying (including excavation) 25 cm dia RCC Hume pipe of standard thickness at required depth up to 90 cms. below road / ground surface, for covering provided cable & necessary back filling with light ramming to make the road/ground surface as it was (Except bitumen carpet). | 200 Mtrs. | 727.94 | 01,45,588.00 |
| 16) | Page.342 S.no.23 of DSR | Providing and laying of concrete pipe of 450 mm dia. in proper line, level, slope including neck. collars, excavation, laying, fixing with collars in cement morter1:1and refilling the trench complete | 700 Mtrs. | 859.20 | 06,01,440.00 |
| 17) | 7-2-8 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 2 core 2.5 sq mm copper conductor continuous 5.48 sq mm (12 SWG) | 100 Mtrs | 157.58 | 00,15,758.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/CU | | | |
| 18) | 6-7-15 | Supply, and erecting Syncronised 250 KVAR, 440 V Three phase, 50 cycles, THYRISTER SWITCHED MICRO APFC PASSIVE FILTER PANEL, consisting of suitable steps of APP type capacitor units confirming to IS- 13585 ( Part – I) 1994 with harmonic filter reactors, as per specification no ESD-APFC | 03 Nos | 646651.82 | 19,39,955.47 |
| 19) | 7-2-31 | Supplying, erecting & terminating PVC armoured cable 4 core 4 sq mm copper conductor continuous 5.48 sq mm (12 SWG) G.I. earth wire complete erected with glands & lugs, on wall/ trusses/pole or laid in provided trench/ pipe as per specification no. CB-LT/CU | 300 Mtrs. | 295.18 | 00,88,554.00 |
| 20) | Non C. S. R. | Providing and construction (including excavation) brick masonry (9" Brick Work) inspection cable chamber 900mm x 900 mm x 900mm internal side size with RCC chamber cover of size 900 mm x 900 mm x 75 mm thick with lifting arrangement including laying of angle size as 75 x 75 x 6 mm to be fixed / embedded on the top of chamber, filling screened sand and smooth internal plaster etc including watering, streaking joint on exposed faces, rocking at joint on exposed faces and watering complete and clearing the site by removing debris & making the site good. | 45 Nos. | 8700.00 | 03,91,500.00 |
| 21) | 6-1-1 | Supplying and erecting Iron, sheet metal work consisting of CRCA Sheets, Various sections of iron, Plates, Chequered Plates, Rods, Bars, MS pipes, etc. for panel board or any other purposes complete with bending, cutting, drilling and welding complete erected at the position with necessary materials duly painted with one coat of red oxide and two coats of enamel paint to match the switchgears or as per directions by the authority | 2000 Kgs. | 265.776 | 05,31,552.00 |
| 22) | Non C. S. R. | Supplying, installation, testing and commissioning of Power Panel as per specification and relevant is standard specification :-<br>Incomer:- 630 A. MCCB = 01 No.<br>Outgoing:- 01). 250 A. MCCB = 06 Nos.<br>02). 125 A. MCCB = 10 Nos.<br>KWH Meter = 01 No. ( Electronics )<br>Voltmeter = 03 Nos. ( 440 volt )<br>Ammeter = 03 Nos. ( 440 volt ) | 01 No. | 365300.00 | 03,65,300.00 |
| 23) | Non C. S. R. | Supplying, installation, testing and commissioning of Power Panel as per specification and relevant is standard specification :-<br>Incomer:- 400 A. MCCB = 01 No.<br>Outgoing:- 01). 250 A. MCCB = 04 Nos.<br>02). 125 A. MCCB = 04 Nos.<br>03). 63 A. MCCB = 06 Nos.<br>KWH Meter = 01 No. ( Electronics )<br>Voltmeter = 03 Nos. ( 440 volt )<br>Ammeter = 03 Nos. ( 440 volt ) | 04 Nos. | 332000.00 | 13,28,000.00 |
| 24) | Non C. S. R. | Supplying and Erecting approved make Compact Substation with 2500 kVA,3 phase, 50 c/s ONAN Type UNIPACK 21KA for 3 Sec. SF6 insulated Non-Extinsible Compact switchgear (Type DV-NE) consisting of one No. Direct Cable madule and One No. Fixed Manual Vacuum Circuit Breaker in SF6 insulated stainless steel enclosure, with series trip, self powered microprocessor based numerical over current relay (IDMTL + Inst.) protection. Interconnection between HT switchgear and transformer shall be using 1Cx3x200 sq.mm Al. unarmorured XLPE Cable.Copper wound transformer 2500KVA 11KV/433V DYn11 Oil filled, INDOOR TYPE TRANSFORMER BUSHINGS,hermatically sealed transformer with corrugated wall,without conservator type of design & Top Normal Porcelein Bushings for HT & LT with Off load tap switch of rating +5% to -10% @2.5%. Temp Rise - Oil/Winding Energy Efficiency level 2 ) - Max @ 50% Loading : As per IS 1180 and Max @ 100% Loading : As per IS 1180 and Impednace As per IS 1180 with LV PANEL-1600 AMPS ALUMINUM BUSBAR ( 100% for Phase and 50% for Neutral, Current Density - 1amp/sqmm) with Outgoings 1600Amps 433V 4P 50Hz 50KA ICOG Fixed Manual Type Air Circuit | 01 No. | 5415000.00 | 54,15,000.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Breaker (ACB) with Microprocessor based release for Overload , short circuit & earth Fault protection, Multifunctional Meter with Class 1.0Accuracy with RS 485 Port, RYB, ON/OFF Trip Indications, OUTDOOR ENCLOSURE having IP54 degree of protection for HT & LT switchgear compartment & IP23 degree of protection for Transformer compartment, Powder /Colour Caoated Enclouser, with Interconnection Between HT switchgear & Transformer using 1Cx3x200 Sq.mm XLPE AL Single core cable. Interconnection between Transformer & LT switchgear using Al. Busbars. Internal earthing connections by using 50x6 mm GI Strips including Transformer Neutral, Complete as per specification No SSTR/ COMP with necessary permission of Electrical Inspector | | | |
| 25) | Non C. S. R. | AMF PANEL:- AMF panel similar make as per the DG set suitable for 1010 KVA, 3 phase, 415 volt, 50 cycles, AC diesel generating set complete of scope as detailed below,<br>01). Power module A pair of Electromechanically interlocked contactors (For mains and generator) overload relay for generator contractor. Neutral contactors for mains and generator, Power sockets for connections.<br><br>02). Control and metering module:<br>Line voltage monitor,<br>Generator voltage monitor,<br>Ammeter 3 times attempts starts facility,<br>Air circuit breaker of capacity – 1600 Amp,<br>Rating for Auto / manual operation.<br>Auto / manual switch,<br>Emergency stop push button,<br>Manual start push button,<br>Frequency meter,<br>Engine hour meter,<br>Two earthing studs,<br><br>03). Protection module:<br>The engine shut down in the unlikely event of Low lube oil pressure,<br>High cylinder head temperature,<br>V belt failure,<br><br>04). Indicator with alarm,<br>Load on generator.<br><br>05). Indicators:<br>Load on mains,<br>Engine fails to start,<br>Emergency stop,<br>Battery charger. | 02 Nos | 743400.00 | 14,86,800.00 |
| 26) | Non C. S. R. | Supplying and erecting Diesel Generating Set 1010 KVA continuous rating, 3 phase, 415 volts, 50 cycles A.C. supply comprising of a totally enclosed water cooled diesel engine with multy-cylinder developing suitable BHP not less than 154 BHP at 1500 RPM with 10% overload for one hour in 24 hours with standard accessories like fly wheel, lubricating oil cooler, “A” class governer, heavy duty fuel and lubricating oil filter, oil bath air filter, lubricating oil pressure guage, end exhaust manifold, standard set of tools with adjustable spanners, screw drivers, feeder guage, cylinder head to cover, joint cylinder head to exhaust, element lube oil filter, techocum hour counter, 12/24 volts electric starting equipment complete with standard battery, dynamo, cutouts, ammeter, necessary wiring, pressure gauge, starter etc. and heavy duty residential type exhaust silencer and vertical hot air duct both logged with asbestos rope, save oil trays, exhaust piping of required length, standard wall/ floor mounted fuel tank with level indicator and piping and drip proof alternator, self excited, self regulated, screen protected, with static excitation system, capable of delivering the rated system | 02 Nos. | 7245200.00 | 1,44,90,400.00 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | output at 415 volts, 3 phase, 0.8 PF, 50 HZ, 4 wire, running at 1500 RPM, conforming to IS-4722-1968 with voltage regulation +/- 5% of rated voltage from no load to full load. Both the engine and alternator fitted on a common fabricated steel base plate with antivibration mountings and both connected to each other by flexible flange coupling. The alternator and control panel shall be connected with provided suitable capacity armoured cable and complete with Accoustic enclosure ( canopy ) made out of 18 SWG-CRCA Sheet, sound absorbing material used of ROCKWOOL of 64 density and 100 mm thick conforming to IS:8183. The resin bonded ROCKWOOL covered from inside the canopy by perforated sheet with ¾ mm holes, sound level not more than 75 DB at a distance of 1 mtr, as PVCT norms complete with erecting, commissioning and satisfactory testing as per requirement with first filling of fuel, oil etc. with guarantee of complete system for one year with optaining all necessary certificate from Electrical Inspector. (Extra separate 1000 Ltr.Diesel Tank) | | | |
| 27) | Non C. S. R. | Supply, installation, testing and commissioning of Main Distribution Panel with ON/OFF indicator with Digital Meter of Voltmeter, Ampere and 03 nos. three phase KW Meter, 03 nos. LED Indicator for Incoming supply, LED Indicator for every main switch for ON passion and four pole Bus Bar as per specification and relevant is standard specification :-<br>**A). M. S. E. B. Incomer:-**<br>01). 2000 A. 4 POLE ACB = 01 No.<br>**B). From M. S. E. B. to DG1 & DG2 AMF Panel:-**<br>01). 1600 A 4 POLE ACB = 02 Nos.<br>**C). For APFC Panel:-**<br>01). 1600 A 4 POLE ACB = 01 No.<br>**D). For M. S. E. B. Bypass:-**<br>01). 1600 A 4 POLE ACB = 02 Nos.<br>**E). From DG1 & DG2 AMF Panel:-**<br>01). 1600 A 4 POLE ACB = 02 Nos.<br>**F). For Bus Coupler:-**<br>01). 1600 A 4 POLE ACB = 01 No.<br>**B). Out Going:-**<br>01). 1000 A FOUR POLE ACB = 02 Nos.<br>02). 800 A. FOUR POLE MCCB = 04 Nos.<br>03). 400 A. FOUR POLE MCCB = 14 Nos.<br>04). 250 A. FOUR POLE MCCB = 10 Nos.<br>05). 125 A. FOUR POLE MCCB = 10 Nos.<br>05). 100 A. FOUR POLE MCCB = 10 Nos<br>06). 63 A. FOUR POLE MCCB = 10 Nos<br>07). 1600 A FOUR POLE ACB = 01 Nos. | 01 No. | 6574750.00 | 65,74,750.00 |
| 28) | Non C. S. R. | Supply, installation, testing and commissioning of change over Panel with ON/OFF indicator with Digital Meter of Voltmeter, Ampere and 03 nos. three phase KW Meter, 03 nos. LED Indicator for Incoming supply, LED Indicator for every main switch for ON passion and four pole Bus Bar as per specification and relevant is standard specification :-<br>**A). M. S. E. B. Incomer:-**<br>01). 1600 A. 4 POLE ACB = 01 No.<br>**B). From Dwaravati Substation Panel:-**<br>01). 1600 A 4 POLE ACB = 01 Nos.<br>**C). 1600 A change over Switch = 01 Nos.**<br>**D). Out Going:-**<br>01). 1600 A. 4 POLE ACB = 01 No. | 01 No. | 1620000.00 | 16,20,000.00 |
| | **Amount Rs.:-** | | | | **4,67,50,406.12** |
| | **Less 20% Amount Rs.:-** | | | | **0,93,50,081.22** |
| | **Net Amount Rs.:-** | | | | **3,74,00,324.89** |
| | **Round Up Rs.:-** | | | | **3,74,00,325.00** |

**मागणी**:- उपरोक्तप्रमाणे

०१). श्री साईनाथ हॉस्पीटलमधील जुन्या इमारतीचा संपुर्ण लोड तसेच आता श्री साईनाथ हॉस्पीटलमध्ये बांधकाम करण्यात येत असलेल्या वाढीव तिस-या मजल्याचा संपुर्ण लोड, व्दारावती इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील ८० रुममध्ये पुर्वी बसविण्यात आलेले ८० नग ए.सी.तसेच आता तिस-या मजल्यावरील ८० रुम्समध्ये बसविण्यात येणारे ८० नग ए.सी.चा वाढीव इलेक्ट्रीकल लोड, व्दारावती इमारतीमधील चौथ्या मजल्यावरील ८० रुममध्ये पुर्वी बसविण्यात आलेले ८० नग टि.व्ही.संच तसेच आता तिस-या मजल्यावरील ८०

रुममध्ये बसविण्यात येणारे ८० नग टि.व्ही.संचचा वाढीव इलेक्ट्रीकल लोड, व्दारावती इमारतीवरील सोलर सिस्टिमच्या सर्व गिझर बॅकअप सिस्टीमचा वाढीव इलेक्ट्रीकल लोड व भविष्यातील प्रस्तावित इमारतींकरीता वाढीव लोड गृहीत धरुन ट्रान्सफॉर्मर, जनरेटर, क्युबीकल, इलेक्ट्रीक पॅनेल व केबल खरेदी करणेकरीता (बांधकाम खर्च वगळून) रक्कम रुपये ३,७४,००,३२५/- मात्र अपेक्षित खर्च आहे.

०२). सदरच्या १०१० केव्हीए जनसेट-०२ नग व २५०० केव्हीए सबस्टेशन, जनरेटर रुम व पॅनेल रुमचे बांधकामाचे इस्टीमेट हे बांधकाम विभागामार्फत मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर होऊन त्यास मा.व्यवस्थापन समितीची बांधकाम विभागाने मान्यता घेऊन तातडीने कार्यवाही करणे आहे.

०३). उपरोक्तप्रमाणे अ.क्र.०१ व ०२ करीता मा.व्यवस्थापन समितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर दोन्ही एकत्रित खर्चास महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणेकरीता विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेशी पत्रव्यवहार करावा लागणार आहे.

०४). महाराष्ट्र शासनाची मान्यता झाल्यानंतर इलेक्ट्रीकल कामाचे व जनरेटर रुम तसेच सबस्टेशनच्या बांधकामाचे कामाकरीता बाहेरील ठेकेदार / पुरवठादार यांचेकडून ई-निविदा मागविणेकामी मराठीतील, व इंग्रजीतील जादा खपाच्या वृत्तपत्रांच्या मुंबई-पुणे येथील आवृत्तीत जाहिरात देऊन तसेच संस्थानचे वेबसाईटवर जाहिरात अपलोड करुन ई- निविदा बोलविणेस तसेच ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर ई-निविदा खरेदी समितीसमोर उघडून दरांचा तुलनात्मक तक्ता निर्णयासाठी स्थानिक उपसमितीसमोर सादर करणे आहे.

विभागाचा अभिप्राय /स्पष्ट मत- तरी उपरोक्तप्रमाणे अ.क्र. ०१ ते ०४ करीता मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.४२१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ हॉस्पिटल तसेच व्दारावती भक्तनिवास इमारतीचे वाढीव लोड करीता ट्रान्सफॉर्मर, जनरेटर व क्युबिकल इलेक्ट्रिकल पॅनल व केबल खरेदी करुन बसविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.३,७४,००,३२५/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. १०१० केव्हीए जनसेट-०२ नग व २५०० केव्हीए सबस्टेशन, जनरेटर रुम व पॅनेल रुमचे बांधकामासाठी येणाऱ्या अपेक्षीत खर्चाचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा,व्यवस्थापन समितीचे मान्यतेनंतर एकत्रित खर्चाचा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा,असे ठरले.**

**(कार्यवाही- विद्युत विभाग/बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९** **संस्थान माहिती केंद्र हैद्राबाद, बंगलोर व चेन्नई या ठिकाणी संस्थान प्रकाशने (साहित्य) वाहतुक कंपनीमार्फत पाठविणेचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम:- कलम नं.१७ (२) 'ठ' -"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

कलम नं. १४ पोटकलम (४) -मुख्य कार्यकारी अधिका-यास, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, ज्यांच्याकरिता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केलीली नसेल आणि जे त्या विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा त्या संस्थानला भेट देणाऱ्या यात्रेकरूंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी, त्यांच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल असे, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम पार पाडण्याचा किंवा कोणतेही कार्य करण्याचा निदेश देता येईल आणि तसेच, असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते कार्य करण्यासाठी लागणारी पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाची रक्कम , त्या विश्वस्त व्यवस्थेच्या निधीतून चुकती करता येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी, या कलमान्वये केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याबद्दलच्या कारणांसह, समितीला मान्यतेसाठी ताबडतोब सादर करील.

प्रास्तविक- संस्थानद्वारे हैद्राबाद, बंगलोर, चेन्नई येथे माहिती व सुविधा केंद्र सुरु करण्यात आलेली आहेत. तेथे संस्थान प्रकाशनांची (पुसतके, फोटो, सी.डी. व डायरी-कॅलेंडर्स) विक्री केली जाते. तसेच ऑनलाईनद्वारे रुम बुकींग, देणगी व दर्शन- आरती यांचीही सुविधा पुरवली जाते. सदर माहिती केंद्रांद्वारे विक्री करण्यात येणारी संस्थान प्रकाशने ट्रान्सपोर्ट सेवेद्वारे त्या-त्या माहिती केंद्राच्या ठिकाणी शिर्डी कार्यालयाकडून पाठविली जातात.

सन २०१८-२०१९ वर्षाकरिता घाटगे पा. ट्रान्सपोर्ट, शाखा कोपरगांव या वाहतूक कंपनीचा दर दरपत्रके मागवून मान्य करण्यात आलेला होता. त्यांनी सादर केलेला दरांचा तपशिल खालील प्रमाणे:-

| अ.नं. | घाटगे पा. ट्रान्सपोर्ट कं. शाखा. कोपरगांव | मान्य झालेला दर (प्रती किलोसाठी) |
|---|---|---|
| १. | हैद्राबाद | ७.५० |
| २. | बंगलोर | ८.०० |
| ३. | चेन्नई | ८.५० |

सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रु. ६५,२८९/- मात्र इतका खर्च आलेला आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी याकामी नव्याने दरपत्रके मागवून न्युनतम दरधारक वाहतूक कंपनीशी करार करणे आवश्यक होते तथापि लोकसभा निवडणूक २०१९ ची आचारसंहिता लागु असल्याने दरपत्रके मागविणे शक्य नसल्याने घाटगे पा. ट्रान्सपोर्ट, शाखा कोपरगांव यांना सन २०१८-१९ च्या मान्य दरात काम करण्याबाबत विचारणा करण्यात आली होती त्यास अनुसरून, घाटगे पा. ट्रान्सपोर्ट, शाखा कोपरगांव यांनी सन २०१८-१९ च्या दरात काम करण्यास सहमती दर्शविली होती. त्यामुळे आचारसंहिता संपेपर्यंत घाटगे पा. ट्रान्सपोर्ट, शाखा कोपरगांव यांचेमार्फत पूर्वीचे दराने तीनही माहिती केंद्रांना प्रकाशने साहित्य पाठवण्यात आलेले आहे याकामी रक्कम रु. ४०,०८८/- इतका वाहतुक खर्च झालेला आहे.

विभागाचा अभिप्राय– दि.१०.०३.२०१९ ते ३०.०५.२०१९ या कालावधीत लोकसभा निवडणूक २०१९ ची आचारसंहिता असल्यामुळे तसेच सदरचे काम थांबविता येणे शक्य नसल्याने उपरोक्त नमुद अधिनियम १४ (४) ला अधिन राहून तसेच मा. व्यवस्थापन समितीचे कार्योत्तर मंजूरीस अधिन राहून घाटगे पा. ट्रान्सपोर्ट, शाखा कोपरगांव यांचेमार्फत प्रकाशने साहित्य पाठविण्यात आलेले आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुस्तके/फोटो व इतर साहित्य वाहतुक कंपनीमार्फत पाठविणेकामी साधारणत रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) मात्र अपेक्षित आहे. याकामी दरपत्रके मागवून कार्यवाही करता येईल.

प्रस्ताव- तरी आचारसंहितेच्या कालावधीत तीनही माहिती केंद्रांना घाटगे पा. ट्रान्सपोर्ट, शाखा कोपरगांव यांचेमार्फत पाठविण्यात आलेल्या पुस्तके/फोटो साठी रक्कम रु.४०,०८८/- चे खर्चास तसेच सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुस्तके/फोटो व इतर साहित्य वाहतुक कंपनीमार्फत पाठविणेकामी रक्कम रु.१,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) मात्रचे खर्चाचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर .

**निर्णय क्र.४२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१०.०३.२०१९ ते ३०.०५.२०१९ या कालावधीत संस्थान माहिती केंद्र हैद्राबाद, बंगलोर व चेन्नई या ठिकाणी संस्थान प्रकाशने (साहित्य) वाहतुक कंपनीमार्फत पाठविणेकामी आलेल्या रक्कम रु.४०,०८८/-मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुस्तके/फोटो व इतर साहित्य वाहतुक कंपनीमार्फत पाठविणेकामी दरपत्रके मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,००,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०** **पुस्तके/फोटो व इतर साहित्याचे हमाली कामाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम:- कलम नं.१७ (२) 'ठ'

"श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

कलम नं. १४ पोटकलम (४) -मुख्य कार्यकारी अधिका-यास, आकस्मिक निकडीच्या परिस्थितीत, ज्यांच्याकरिता त्या वर्षाच्या अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद केलीली नसेल आणि जे त्या विश्वस्त व्यवस्थेच्या मालमत्तांच्या परिरक्षणासाठी किंवा त्या संस्थानला भेट देणाऱ्या यात्रेकरूंच्या सेवेसाठी किंवा त्यांच्या सुरक्षेसाठी, त्यांच्या मते तात्काळ पार पाडणे किंवा करणे आवश्यक असेल असे, पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाचे कोणतेही काम पार पाडण्याचा किंवा कोणतेही कार्य करण्याचा निदेश देता येईल आणि तसेच, असे काम पार पाडण्यासाठी किंवा ते कार्य करण्यासाठी लागणारी पाच लाख रुपयांपेक्षा जास्त नसेल अशा खर्चाची रक्कम ,त्या विश्वस्त व्यवस्थेच्या निधीतून चुकती करता येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी, या कलमान्वये केलेल्या कार्यवाहीची माहिती त्याबद्दलच्या कारणांसह, समितीला मान्यतेसाठी ताबडतोब सादर करील.

प्रास्तविक- प्रकाशने विभागामार्फत संस्थान प्रकाशित पुस्तके /फोटो/ सी.डी. व कॅलेंडर ,डायरी याची साईभक्तांना सवलतीच्या दरामध्ये विक्री केली जाते.त्याकामी प्रकाशने विभागाचे सबस्टोअरकरीता मध्यवर्ती भांडार विभागातून संस्थान वाहनातून पुस्तके /फोटो/ सी.डी. व कॅलेंडर ,डायरी भरणे, ते उतरून घेणे व त्याची व्यवस्थित थप्पी लावून घेणे इत्यादि हमाली कामासाठी दरवर्षी दरपत्रके मागवण्यात येतात. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी श्री किसन वाल्मीक गाढे, सोनेवाडी यांचेकडून हमालीचे काम करुन घेण्यात आलेले आहे. याकामी सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षात रक्कम रु. ८९,६५७/- इतका खर्च आलेला आहे. श्री गाढे यांच्याशी केलेल्या हमालीच्या कराराची मुदत मार्च २०१९ अखेर संपलेली आहे.

सन -२०१८-२०१९ चे दर खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | दर (प्रती क्विंटल) |
|---|---|---|
| १. | भांडार विभागातून आणलेली पुस्तके संस्थान वाहनातून उतरविणे व सबस्टोअरला रचणे | ५.०० |
| २. | भांडार विभागातून संस्थान वाहनात पुस्तके/फोटो भरणे | ६.९० |
| ३. | सर्व कामाची वाराई | २०.९० |

सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी याकामी नव्याने दरपत्रके मागवून न्युनतमदरधारक हमाल यांच्याशी करार करणे आवश्यक होते तथापि लोकसभा निवडणूक २०१९ ची आचारसंहिता लागु असल्याने दरपत्रके मागविणे शक्य नसल्याने श्री.किसन वाल्मीक गाढे यांचेकडे सन २०१८-१९ च्या मान्य दरात काम करण्याबाबत विचारणा करण्यात आली होती त्यास अनुसरून, श्री.किसन वाल्मीक गाढे यांनी सन २०१८-१९ च्या दरात काम करण्यास सहमती दर्शविली होती. त्यामुळे आचारसंहिता संपेपर्यंत प्रकाशने साहित्याचे उपरोक्त नमुद अधिनियम १४ (४) ला अधिन राहून हमाली काम श्री.किसन वाल्मीक गाढे यांचेकडून करुन घेण्यात आलेले आहे याकामी रक्कम रु. ८,९१५/- इतका हमालीचा खर्च झालेला आहे.

विभागाचा अभिप्राय –दि.१०.०३.२०१९ ते ३०.०५.२०१९ या कालावधीत लोकसभा निवडणूक २०१९ ची आचारसंहिता असल्यामुळे तसेच सदरचे काम थांबविता येणे शक्य नसल्याने उपरोक्त नमुद अधिनियम १४ (४) ला अधिन राहून तसेच मा. व्यवस्थापन समितीचे कार्योत्तर मंजूरीस अधिन राहून श्री.किसन वाल्मीक गाढे यांचेकडून हमाली काम करुन घेण्यात आलेले आहे.

सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुस्तके/फोटो व इतर साहित्याचे हमाली कामाकरीता साधारणत- रक्कम रु.१,२५,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पंचवीस हजार) मात्र अपेक्षित आहे. याकामी दरपत्रके मागवून कार्यवाही करता येईल.

प्रस्ताव- तरी आचारसंहितेच्या कालावधीत श्री.किसन वाल्मीक गाढे यांचेकडून करुन घेण्यात आलेल्या हमाली कामापोटी रक्कम रु.८,९१५/- चे खर्चास तसेच सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुस्तके/फोटो व इतर साहित्याचे हमाली कामासाठी रक्कम रु.१,२५,०००/- (अक्षरी रुपये एक लाख पंचवीस हजार) मात्रचे खर्चाचा प्रसताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.४२३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१०.०३.२०१९ ते ३०.०५.२०१९ या कालावधीतील पुस्तके/फोटो व इतर साहित्याचे हमाली कामापोटी झालेल्या रक्कम रु.८,९१५/- चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली. तसेच सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षाकरीता पुस्तके/फोटो व इतर साहित्याचे हमाली कामाकरीता दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. रु.१,२५,०००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१** **श्री साई दैनंदिनी-२०२० छपाईकामी येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४-कलम १७ ठ.

श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय- दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२१६.

सन-२०२० ची श्री साई दैनंदिनी व विविध प्रकारच्या दिनदर्शिका संस्थानमार्फत प्रकाशित करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.४,६८,२५,०००/- मात्रचे

खर्चास तसेच प्रस्तावीत केलेल्या श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका नगाचा शिल्लक साठा संपत आल्यास २५ टक्के जादा छपाई मंजूर दरात करून घेण्यास व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

प्रास्तविकः- सन-२०२० ची श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामी मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.२१६ नुसार रू.४,६८,२५,०००/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

श्री साई दैनंदिनी-२०२० बाबत मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचेशी झालेल्या चर्चेत सदरहू दैनंदिनी तिरूपती देवस्थानचे सन-२०१९ चे धर्तीवर(एका पानावर एकच तारीख तसेच नियमीतपणे राबविल्या जाणा-या उपक्रमांची माहिती) छपाई करावी,असे निर्देश देण्यात आले होते. संस्थानने प्रकाशित केलेल्या श्री साई दैनंदिनीत एका पानावर दोन तारखा मुद्रित करण्यात आलेल्या होत्या, तर तिरूपती देवस्थानच्या दैनंदिनीत एका पानावर एकच तारीख मुद्रित करण्यात आलेली आहे.

उपरोक्त निर्देशास अनुसरून मे.प्रिंन्ट प्लस प्रा.लि.मुंबई यांना नमूने तयार करावयास सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे त्यांनी दि.२४.०७.२०१९ रोजी नमूने तयार करून इकडील कार्यालयास सादर केले आहेत. सदरचे नमूने दि.२४/०७/२०१९ रोजी मा.कार्यकारी अधिकारी सो.यांचे अवलोकनार्थ ठेवण्यात आले आहेत.

विभागाचा अभिप्रायः- तिरूपती देवस्थानचे दैनंदिनीप्रमाणे एका पानावर एकच तारीख मुद्रित केल्यास त्या त्या तारखेचा तपशिल लिहीण्यास अधिक जागा मिळू शकेल तसेच संस्थानतर्फे नियमीतपणे राबविल्या जाणा-या उपक्रमांची माहिती दिल्यास ती माहिती बहुसंख्य साईभक्तांपर्यंत पोहोचू शकेल.

यापुर्वी प्रस्तावित केलेल्या साई दैनंदिनीत मागील वर्षीच्या दैनंदिनीप्रमाणेच एका पानावर दोन तारखा मुद्रित करण्याच्या हिशोबाप्रमाणे एकूण-२९६ पानाची दैनंदिनी तयार होते. त्यानुसार अंदाजे छपाई रक्कम रू.१००/- गृहीत धरून त्याप्रमाणे २,२५,००० नगास रू.२,२५,००,०००/-एवढया खर्चास मान्यता मिळालेली आहे. परंतू तिरूपती देवस्थानच्या धर्तीवर एका पानावर एकच तारीख मुद्रित करावयाची झाल्यास एकूण ४३२ पानांची दैनंदिनी मुद्रित करण्यास मे.प्रिन्ट प्लस प्रा.लि.मुंबई यांनी अंदाजे रू.१३०/- पर्यंतचा खर्च अपेक्षित आहे, असे समक्ष सांगितले आहे. त्यासाठी अंदाजे रक्कम रू.(१३०/- x २,२५,०००) = रू.२,९२,५०,०००/- एवढा एकूण अपेक्षित खर्च होणार आहे. तरी पुर्वी मंजूर करण्यात आलेला २,२५,००,०००/- खर्च वजा केल्यास अतिरिक्त (२,९२,५०,०००-२,२५,००,०००) = रू.६७,५०,०००/- एवढा वाढीव खर्च येणार आहे.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशाप्रमाणे तिरूपती देवस्थानचे धर्तीवर श्री साईबाबा संस्थान प्रकाशित श्री साई दैनंदिनी-२०२० प्रकाशित करावयाची ठरल्यास पानांची संख्या वाढणार असल्याने त्याप्रमाणे येणा-या वाढीव खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेची मान्यता घेता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्तावः- तरी विभागाच्या अभिप्रायात नमूद केलेप्रमाणे श्री साई दैनंदिनी -२०२० प्रकाशित करणेकामी वाढीव रक्कम रू.६७,५०,०००/- च्या खर्चास मान्यता मिळणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.४२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई दैनंदिनी-२०२० तिरूपती देवस्थानच्या धर्तीवर (एका पानावर एकच तारीख) छपाई करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ६७,५०,०००/-मात्रचे वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- प्रकाशने विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२२ **संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबीतांचा वैद्यकीय बीलाचा परतावा रक्कम रु.८,७४,९०५/-मात्र आदा करणेस मंजूरी मिळणेबाबत.**

प्रस्ताव- अधिनियम २००४ मधील तरतुद –व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –१) जा. नं. एसएसएस-वशी रुग्णालय ५८२-९७ दि. १६/०१/१९९९. २) मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०९/१०/२०१६ निर्णय क्र. ६९० (६) अन्वये रु. २०,०००/- पर्यंत मा. कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात तर त्यावरील खर्चाची बिले ही मा. व्यवस्थापन समितीचे सभेच्या मान्यतेने अदा करावी.

प्रास्ताविक – खालील संस्थान कर्मचा-यांची रु. २०,०००/- पर्यंतची खर्चाची मर्यादा संपल्यामुळे रु. २०,०००/- पेक्षा जास्त खर्चाचे बिले परतावा मिळणेकामी सादर केलेले आहेत.

पुढील तक्त्यात नमुद केलेल्या कर्मचा-यांचे बिले परतावा मिळणेबाबत विनंती अर्ज

| अ. नं. | कर्मचा-याचे नाव | कर्मचा-याशी नाते | आजाराचे नाव | डॉक्टरांचे नाव | रुग्णालयाचे नाव | एकूण मागणी रक्कम | एकूण देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | अ. संस्थान रुग्णालयात उपचार घेतलेले - | | | | | | |
| १. | सचिन राजेंद्र क्षिरसागर विभाग- वाहन हुददा-मॅकनिक मोटार | मुलगा | Diabets मधुमेह | डॉ. रंजना साबळे | श्री साईनाथहॉस्पिटल | ४५३६.०० | ४५३६.०० |
| २. | भाऊसाहेब बाबुराव शिंदे विभाग-ज्यु.कॉलेज हुददा-ग्रंथपाल | वडिला | DM Nephropathyकिडनी उपचार | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | २०५६६.०० | २०५३९.०० |
| ३. | राजेश रमणलाल वाकडे विभाग-श्री साईबाबा हॉस्पिटल हुददा-बायोमेडीकल इंजिनिअर | स्वतः | Ulcerative Colities आतडयाच्या सुजेने होणारा अल्सर | डॉ.इंगळे | श्री साईबाबा हॉस्पिटल | ४५७९३.०० | ४५७९३.०० |
| ४. | राजेंद्र साहेबराव डांगे विभाग-विदयुत हुददा- तारतंत्री | मुलगा | Noonas Syndrome अनुवंशिक विकार | डॉ.जाधवर | श्री साईबाबा हॉस्पिटल | १४४९०.०० | १४४९०.०० |
| ५. | सुरवसे संतोष बब्रुवन विभाग- श्री साईबाबा हॉस्पिटल हुददा-भुलतज्ञ | स्वतः | Blood Pressure Diabetes रक्तदाब मधुमेह | डॉ.देवरे | श्री साईबाबा हॉस्पिटल | १२२८८.०० | १२२८८.०० |
| | अ एकूण रक्कम रु. | | | | | ९७६७३.०० | ९७६४६.०० |
| | ब.संस्थान रुग्णालयात उपचार न झालेले संस्थान मान्य यादीत रेफर केलेले | | | | | | |
| ६ | जयश्री शरद शेळके विभाग-श्री साईबाबा हॉस्पि. हुददा-परिचारिका | वडिला | Ca कर्करोग | डॉ.जाधवर | टाटा मेमोरियल हॉस्पिटल,मुंबई | २९५८३.०० | २९५८३.०० |
| ७ | दादा भिकाजी आरणे विभाग-बांधकाम हुददा-मदतनीस | स्वतः | Caकर्करोग | डॉ.राम नाईक | दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल,पुणे | ५२८३१.०० | ४७५५१.०० |
| ८ | वेणुनाथ भाऊसाहेब डांगे विभाग- अग्निशामक हुददा–मदतनीस | मुलगा | TrochealStonosisघश्याची शस्त्रक्रिया | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक पुणे | ४१७३८३.०० | ४१४८९३.०० |
| ९. | अलका दिलिप तुपे विभाग- आरोग्य हुददा-मदतनीस | पती | ChiomilMgelordleukomia रक्ताचा कर्करोग | डॉ.जाधवर | क्युरी मानवता कॅन्सर सेंटर,नासिक | २१३५९.०० | २१३५९.०० |
| १० | सुभाष मल्हारी बंदावणे विभाग- ध्वनिक्षेपण हुददा-पर्यवेक्षेक | मुलगा | Post Operative Renal Transplantv Treatment किडनी प्रत्यारोपण उपचार | डॉ.जाधवर | रुबी हॉल क्लिनिक पुणे | ७१५५२.०० | ७१५५२.०० |
| ११ | परसराम सोमाजी भालेराव विभाग- प्रसादालय हुददा- मदतनीस | पत्नी | DangyEncephalibs | डॉ.काटे | रुबी हॉल क्लिनिक पुणे | १९१२२.०० | १९१२२.०० |
| | ब एकूण रक्कम रु. | | | | | ६११८३०.०० | ६०४०६०.०० |
| | क.संस्थान रुग्णालयात उपचार न झाल्याने संस्थान मान्य यादीत रेफर केले पंरतु तेथे उपचार न घेता निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतले- | | | | | | |
| १२ | परसराम हरिभाऊ जाधव विभाग- ध्वनिक्षेपण हुददा-तारतंत्री | आई | टी एच आर टोटल हिप रिप्लेसमेंट | डॉ.बिडगर | एस एस बी टी हॉस्पिटल घोटी | १३९९६१.०० | १११९६९.०० |
| | कएकूण रक्कम रु. | | | | | १३९१६१.०० | १११९६९.०० |
| | ड.संस्थान रुग्णालयात व संस्थान मान्य यादीत उपचार न घेतलेले रेफर न केलेले अपघात झाल्याने निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले | | | | | | |
| १३. | जोरी नितीन विजय विभाग- लेखाशाखा हुददा-लिपिक टंकलेखक | वडिला | खुब्याची शस्त्रक्रिया | डॉ.कोठारी | कोठारी हॉस्पिटल | ७७१३८.०० | ६१२३०.०० |
| | डएकूण रक्कम रु. | | | | | ७७१३८.०० | ६१२३०.०० |
| | अ+ब+क +ड एकूण रक्कम रु. | | | | | ९२६६०२.०० | ८७४९०५.०० |

सदर बिलांची संस्थान वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये छाननी केली असून देय होणारी एकूण रक्कम रु.८,७४,९०५/-इतकी आहे.

विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत– नियमावली प्रमाणे छाननी केली असुन तसेच रुग्णांना संस्थान मान्य यादीतील हॉस्पिटलमध्ये पुढील उपचाराकरीता पाठविण्यात आले व उपचार घेतले आहेत. तसेच काही निकडीच्या प्रसंगी खाजगी रुग्णालयात उपचार घेतलेले आहेत. सबब सदर रक्कम अदा करण्यास हरकत नाही,असे मत आहे.

प्रस्ताव– उपरोक्त १३ कर्मचारी /कर्मचा-यांवर अवलंबित व्यक्ती यांचे वैद्यकीय बिलाचा परतावा रक्कम रु.८,७४,९०५/- मात्र अदा करण्यास मान्यता असावी.

निर्णय क्र.४२५ **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेल्या कर्मचाऱ्यांनी सादर केलेल्या बीलांची वैद्यकीय देखभाल नियमावली सन-१९९९ अन्वये छाननी केली असून, त्यांची सत्यता पडताळून पाहिलेली असल्यामुळे उपरोक्त १३ कर्मचाऱ्यांना देय असलेली रक्कम रु.८,७४,९०५/-मात्र त्यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हास्पिटल)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२३ **डॉ.अविनाश जाधवर, फिजीशियन यांचा प्रोत्साहन भत्ता वाढवुन मिळणेबाबत दि.१९.०७.२०१९ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- कलम १३ (४) नुसार समितीस संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमन्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (कार्यकारी अधिका-यां व्यतिरिक्त) व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.

परंतु ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही.

आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. ३ "सदर पदांवर नव्याने नियुक्ती करताना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिद्धी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परीक्षा घेऊन नियुक्ती करावी" तसेच अट शर्त अ.नं. ८ मध्ये "समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पद्धतीने भरावी जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही" असे नमुद आहे.

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –

१) मा व्यवस्थापन समिती दि. ०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ दि. ०१/०४/२००९ पासुन एन्जीओग्राफीचे दर कमी करून पुर्वीइतकेच रू. ५०००/- ठेवण्यात यावे.

काही प्रमाणात तुट भरून काढण्याच्या दृष्टीने दर लागु केले असलयाने डॉक्टरांच्या इन्सेन्टीव्ह रकमेत वाढ अथवा घट होणार नाही त्यांना पुर्वी इतकीच इन्सेंन्टीव्ह रक्कम मिळेल अशा प्रमाणात दर लागु करावे.

संस्थान कर्मचा-यांना आवश्यक वैद्यकीय उपचार करण्याबाबत सर्व वैद्यकिय अधिका-यांना सक्त सुचना द्याव्यात, असे ठरले.

२) मा व्यवस्थापन समिती दि. ३०/०६/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ४४०.

सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तुत प्रकरणी दि. २७ जुन २०१८ रोजीचे पत्रान्वये शासनाने श्री साईबाबा रूग्णालयातील डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त प्रोत्साहन भत्ता (Inecentives) मंजूर केलेला असल्याने डॉ जाधवर यांची मागणी मान्य करता येणार नाही. डॉ जाधवर यांनी दि. ०३/०७/२०१८ अखेर पासून राजीनामा मंजुर करणेबाबत अर्ज दिलेला आहे. परंतु डॉ जाधवर यांचे कामकाज समाधानकारक असुन त्यांचे फिजिशियन या पदाचे सेवेची रूग्णालयास आवश्यकता असल्याने प्रशासनाने डॉ जाधवर यांचेशी चर्चा करून, राजीनामा मागे घेणेबाबत विनंती करावी, त्यांनी राजीनामा मागे घेतल्यास पुर्वी प्रमाणेच मासिक मानधन रू.६७,६००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्ता यानुसार पुढील ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले. सध्या साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व साईनाथ रूग्णालयाकरीता ०२ अशी एकुण ५ फिजिशियनची पदे रिक्त आहेत. दोन्ही रूग्णालयांना फिजिशियन डॉक्टरांची आवश्यकता असल्याने तातडीने फिजिशियनची पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन भरती प्रक्रिया राबविणेत यावी, फिजिशियन या पदाची जाहिरात देऊनही डॉक्टर्स उपलब्ध

न झाल्यास वाढीव प्रोत्साहन भत्ता (Incentives) देणेबाबत प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करावा, असे ठरले.

३) मा व्यवस्थान समिती दि. ०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६८७.

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये एकच पुर्णवेळ फिजीशियन डॉ जाधवर कार्यरत आहेत, त्यांचे काम समाधानकारक असुन पुर्णवेळ फिजीशियन या पदांची आवश्यकता असल्याने त्यांना सध्या देण्यात येत असलेल्या प्रोत्साहन भत्यामध्ये ५० टक्के वाढ करणेस मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- डॉ अविनाश जाधवर यांचा दि. १९/०७/२०१९ रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

"मी, डॉ अविनाश लक्ष्मण जाधवर सप्टेंबर २०१५ पासून श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिजिशियन या पदावर कार्यरत आहे. मागील ०४ वर्षापासून श्री साईबाबा हॉस्पिटल मी एकमेव फुल टाईम फिजिशियन आहे. माझी दररोजची रूग्णांची ओपीडी सरासरी १२५ ते १५० इतकी आहे. हॉस्पिटलमध्ये ॲडमीट होणारे रूग्णांपैकी सुमारे २५% रूग्ण मला पहावे लागतात. रात्री अपरात्री इमर्जन्सी रूग्णांना पाहणेसाठी यावे लागते. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिजीशियन या पदासाठी दिला जाणारा प्रोत्साहन भत्ता अत्यल्प आहे. इतर विभागातील काम करणारे डिप्लोमा झालेले डॉक्टरांपेक्षा माझे शिक्षण जास्त आहे. परंतु मला सध्या मिळणारा प्रोत्साहन भत्ता अत्यल्प आहे या तुलनेत डिप्लोमा असलेले डॉक्टरांचे शिक्षण कमी असुन सुध्दा त्यांना देणेत येणारा प्रोत्साहन भत्ता सुमारे ३.५ ते ४.०० लाख एवढा प्रतिमहा भेटतो. त्यांच्या तुलनेत मला मिळणारा प्रोत्साहन भत्ता २५% इतका सुध्दा नाही. फिजिशियन हा संपुर्ण रूग्णालयाचा कणा (Backbone) समजला जातो. बाहेरील रूग्णालयामध्ये या पदावरील डॉक्टरांना काम कमी असुन देखील सर्वात जास्त प्रोत्सहन भत्ता दिला जातो. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये फिजिशियन या महत्वाच्या पदाला सर्वात कमी प्रोत्साहन भत्ता दिला जात आहे. म्हणुन फिजिशियन या पदासाठी मुलाखतीसाठी कोणीही येत नाही. त्यामुळे गेले ०४ वर्षापासुन माझे व्यतिरीक्त कोणही दुसरे फिजिशियन आलेले नाही. तरी मला इतर डीप्लोमाधारक डॉक्टरांना इतका सन्मानजनक ०३ लाख रूपये तरी फिक्स प्रोत्सहन भत्ता मिळावे ही कळकळीची विनंती."

डॉ अविनाश लक्ष्मणराव जाधवर यांना प्रथम दि. १२/०८/२०१५ रोजी फिजिशियन या पदावर श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये संबंधीत पदाचे त्यावेळच्या वेतनश्रेणीनुसार होणारे मानधन रू. ६१,०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्तावर ११ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक दिलेली आहे त्यानुसार ते दि. ०१/०९/२०१५ रोजी कामावर हजर झालेले आहे. त्यानंतर त्यांचे ११ महिनेचा नेमणूकीचा कालावधी संपलेनंतर वेळोवेळी मा व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार त्यांना कंत्राटी पध्दतीने ११ महिने कालावधीसाठी फेरनेमणूका दिलेल्या असुन आता मा व्यवस्थापन समिती दि. ०८/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १४ नुसार, दि. १८/०६/२०१९ रोजीचे आदेशान्वये डॉ जाधवर यांची रू. ६९,०००/- व संस्थान नियमानुसार प्रोत्साहन भत्तावर दि. १६/०६/२०१९ पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता कंत्राटी पध्दतीने नेमणूक केलेली आहे.

डॉ जाधवर यांना माहे एप्रिल २०१७ ते मार्च २०१८ या कालावधीत खालीलप्रमाणे मानधन व प्रोत्साहन भत्ता अदा करणेत आलेला आहे.

| अ नं | महिना | मानधन | प्रोत्साहन भत्ता | एकूण दिलेली रक्कम | अ नं | महिना | मानधन | प्रोत्साहन भत्ता | एकूण दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एप्रिल १७ | ६४००० | ८७,८७० | १५१८७० | ७ | ऑक्टोबर १७ | ६७६०० | ७१,०४० | १३८६४० |
| २ | मे १७ | ६४००० | ७३,६५० | १३७६५० | ८ | नोव्हेंबर १७ | ६७६०० | ९५,७३० | १६३३३० |
| ३ | जून १७ | ६४००० | ६८,०१० | १३२०१० | ९ | डिसेंबर १७ | ६७६०० | ६४,५०० | १३२१०० |
| ४ | जूलै १७ | ६७६०० | २१,१५० | ८८७५० | १० | जानेवारी १८ | ६७६०० | ९१,१७० | १५८७७० |
| ५ | ऑगष्ट १७ | ६७६०० | १,३६,६२० | २०४२२० | ११ | फेब्रुवारी १८ | ६७६०० | ६५,८५० | १३३४५० |
| ६ | सप्टेंबर १७ | ६७६०० | ९३,७५० | १६१३५० | १२ | मार्च १८ | ६७६०० | १,००,६८० | १६८२८० |

डॉ जाधवर यांना वेतन रू. ६७,०००/- व सरासरी इन्सेंटीव ८०,०००/- असे एकुण सरासरी प्रतिमहा रू. १,४७,०००/- देण्यात येत आहे.

मा व्यवस्थापन समिती दि. ०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र ६८७ नुसार डॉ जाधवर यांना दि. ०१/११/२०१८ पासुन पुढील आदेश होईपावेतो सध्या देण्यात येत असलेल्या प्रोत्साहन भत्यामध्ये ५० टक्के वाढ करून अदा करणेत येत आहे.

डॉ जाधवर यांना माहे ऑक्टोबर २०१८ ते माहे मे २०१९ या कालावधीत मानधन व प्रोत्साहन भत्ता खालीलप्रमाणे अदा करणेत आलेला आहे.

| अ.नं. | महिना | मानधन | प्रोत्साहन भत्ता | एकूण दिलेली रक्कम | अ.नं. | महिना | मानधन | प्रोत्साहन भत्ता | एकूण दिलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ऑक्टोबर १८ | ६९००० | ९३०६० | १६२०६० | ५ | फेब्रुवारी १९ | ६९००० | ११९२५० | १८८२५० |
| २ | नोव्हेंबर १८ | ६९००० | ११३०४० | १८२०४० | ६ | मार्च १९ | ६९००० | १३६६२० | २०५६२० |
| ३ | डिसेंबर १८ | ६९००० | १२१८६० | १९०८६० | ७ | एप्रिल १९ | ६९००० | १३२३४५ | २०१३४५ |
| ४ | जानेवारी १९ | ६९००० | १४४२७० | २१३२७० | ८ | मे १९ | ६९००० | १३९४१० | २०८४१० |

सध्या डॉ जाधवर यांना वेतन रू. ६९,०००/- व सरासरी इन्सेंटीव १२४०००/- असे एकुण सरासरी प्रतिमहा रू. १९३९००/- देण्यात येत आहे. डॉ जाधवर यांचे कामकाज समाधानकारक असुन त्यांचे फिजिशियन या पदाचे सेवेची रूग्णालयास आवश्यकता आहे.

श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयातील फिजिशियन या पदाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| रूग्णालय | मंजूर पदे | भरलेली पदे | | | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|---|
| | | स्थायी | कंत्राटी | व्हिजीटींग | |
| श्री साईबाबा हॉस्पिटल | ०४ | ०० | ०१ | ०२ | ०३ |
| श्री साईनाथ रूग्णालय | ०२ | ०० | ०० | ०० | ०२ |

श्री साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व श्री साईनाथ रूग्णालायाकरीता ०२ अशी एकुण फिजिशियनची रिक्त ०५ पदे रिक्त आहेत. साईबाबा रूग्णालयात सध्या एक फिजिशियन कार्यरत आहे व साईनाथ रूग्णालयात सध्या एकही फिजिशियन कार्यरत नाही. फिजिशियन हे अत्यंत महत्वाचे पद असुन रूग्णालयातील इतर सर्व स्पेशालिटी या फिजिशियनचे सल्यानुसार (फिटनेस) ऑपरेशन व औषधोपचार करतात. यामुळे फिजिशियन या पदाची दोन्ही रूग्णालयांमध्ये आवश्यकता आहे. साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व साईनाथ रूग्णालयाकरीता ०२ अशी एकुण ५ फिजिशियनची पदे भरणेकरीता यापुर्वी दि. १४/०८/२०१८ रोजी वॉक इन इंटरव्युवह घेणेत आल्या होत्या फिजिशियन या पदासाठी २ उमेदवार उपस्थित होते दोन्ही उमेदवारांची निवड करून नेमणूक आदेश देणेत आले. तथापि दोन्ही उमेदवार कामावर हजर झालेले नाहीत. याबाबत संस्थानमधील इतर डॉक्टरांशी चर्चा केली असता एवढया कमी मानधनावर फिजिशियन उपलब्ध होणार नाही असे त्यांचे मत आहे.

साईबाबा हॉस्पिटलकरीता ०३ व साईनाथ रूग्णालयाकरीता ०२ अशी एकुण ५ फिजिशियनची पदे भरणेकरीता दि. ०२/०८/२०१९ रोजी वॉक इन इंटरव्युव्ह घेणेकरीता जाहीरात प्रसिध्द करणेत आलेली आहे.

तरी, श्री साईबाबा हॉस्पिटल मधील सध्या कार्यरत व येथून पुढे नव्याने नेमणूक करणेत येणा-या फिजिशियन यांना प्रतिमहा रू.२,०१,०००/- एकत्रित मानधन व मा व्यवस्थापन समिती दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र १९६ नुसार प्रोत्साहन भत्ता देणेकरीता निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

निर्णय क्र.४२६ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सध्या कार्यरत असलेले व येथून पुढे नव्याने नेमणूक करण्यात येणा-या फिजिशियन यांना प्रतिमहा रू.२,०१,०००/- एकत्रित मानधन तसेच मा व्यवस्थापन समितीचे दि.०८/०३/२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१९६ नुसार प्रोत्साहन भत्ता दि.०१.०७.२०१९ पासून देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हास्पिटल)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२४ **कार्डिओलॉस्टि डॉक्टरांचे अर्जानुसार इन्सेटीव्ह मध्ये वाढ करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा भक्तांचे व गोर-गरीबांचे आजार बरे करण्यासाठी विभूतिचा वार करीत असे. बदलत्या काळानुसार साईबाबांचे हे उद्दीष्ट पुढे चालु ठेवण्यासाठी संस्थानने जनरल स्पेशालिटी रुग्णालय सुरु केले. भक्तांची संख्या मोठया प्रमाणावर वाढत गेली व त्याप्रमाणे वैद्यकिय सेवा देणे क्रमप्राप्त असल्याने नवनिर्वाचित व्यवस्थापन मंडळाने शिर्डीसारख्या लहान ठिकाणी सुपरस्पेशालिटी वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सुपरस्पेशालिटी रुग्णालय सुरु करण्याचे ठरविले. सुपरस्पेशालिटी सेवांमध्ये दर्शनाला येणारे भक्त व पंचक्रोशीतील गोर-गरीब जनता यांना अत्यावश्यक असलेली हदयशस्त्रक्रिया, न्युरोसर्जरीविभाग, रेडीओलॉजी विभाग इत्यादी

सुपर स्पेशालिटी सेवा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने व त्यासाठी आवश्यक असलेले सुपरस्पेशालिटी डॉक्टर्स उपलब्ध होऊन टिकुन राहण्यासाठी डॉक्टरांना मासिक वेतनाव्यतिरीक्त रुग्णांना आकारण्यात येणा-या बीलातील काही विशिष्ट रक्कम इन्सेन्टीव्ह म्हणून देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णय संमत झाला. इरत रुग्णालयांच्या तुलनेत कमीत कमी दरात वैद्यकिय सेवा देण्यास अनुसरुन दरपत्रकास मान्यता देण्यात येऊन त्यामध्ये डॉक्टरांना इन्सेंन्टीव्ह देण्याचे ठरविण्यात आले.

अशाप्रकारे मे २००६ पासून श्री साईबाबा हॉस्पिटल कार्यरत झाले. सुपरस्पेशालिटी वैद्यकिय सेवा देण्यासाठी वेळोवेळी दरपत्रकास मान्यता देण्यात येऊन डॉक्टरांना देण्यात येणा-या इन्सेन्टीव्हमध्ये डॉक्टरांच्या उपलब्धतेनुसार व टिकून राहण्यास अनुसरुन वेळोवेळी त्यामध्ये कपात व वाढ करण्यात आली आहे.

तथापी, सन २००६ ते मार्च २०१४ पर्यंत कॅथलॅब प्रोसीजर्स चे पॅकेज दर व त्यावर दिला जाणारा प्रोत्साहन भत्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | कॅथलॅब प्रोसिजर्सचे नाव | पॅकेज दिवस | पॅकेज दर (इम्लांट्स/स्टेंट दर वगळुन) | कार्डियोलॉजिस्ट शेयर | कॅथलॅब ऑपरेटर | इंटेन्सीव्हीस्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | Angiography | २४ तास | ५,००० | १,००० | १०० | ५० |
| | Angioplasty 1 Stent | ३ दिवस | ३९,००० | ८,००० | २०० | १५० |
| | Angioplasty 2 Stent | ३ दिवस | ४४,००० | १०,००० | २०० | १५० |
| | BMV/BPV/BAV | ३ दिवस | २८,००० | ७,५०० | २०० | १५० |
| | ASD/VSD/PDA by Device | ३ दिवस | २८,००० | १०,००० | २०० | १५० |
| | Permanent Pace Maker | ४ दिवस | २२,००० | ८,००० | २०० | २०० |
| | IVC Filter | ४ दिवस | २८,००० | १०,००० | २०० | २०० |
| | Temporary Pacing Lead | ------- | ५,००० | ८०० | --- | --- |
| | Abonded Procedure | २४ तास | ५,००० | ८०० | १०० | ५० |
| | P.O.B.A. | ३ दिवस | ३९,००० | ८,००० | २०० | १५० |
| | Coil Embolization | ३ दिवस | २०,००० | ५,००० | --- | --- |

तसेच ओ.पी.डी., टीएमटी,२-डी इको इ. साठी संस्थान नियतानुसार प्रोत्साहन भत्ता अदा करणेत येत होता. त्यानुसार सन २००६ ते सन २०१३-१४ पर्यंत कॅथलॅब विभागामध्ये झालेल्या प्रोसीजर्स् व त्यावर कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांना दिलेला प्रोत्साहन भत्याची माहिती खालील प्रमाणे-

| अ.नं. | सन | एकुण प्रोसिजर्स | दिलेली एकुण इन्सेटिव्ह रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २००६-०७ | १,३४८ | ३६,६९,२९७ |
| २ | २००७-०८ | ३,२२० | १,०४,४२,२७९ |
| ३ | २००८-०९ | ४,६४७ | १,७९,५६,८३० |
| ४ | २००९-१० | ४,९१५ | १,९३,९५,०३० |
| ५ | २०१०-११ | ५,४८२ | २,४६,२१,१०४ |
| ६ | २०११-१२ | ७,३३२ | ३,४०,७५,३५४ |
| ७ | २०१२-१३ | ९,२५४ | ४,४५,५९,७१० |
| ८ | २०१३-१४ | ९,८०५ | ३,९०,८६,३०० |

परंतु मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचेकडील सिव्हिल अॅप्लीकेशन नं.२७९७/२०१४ दि.१९.०३.२०१४ रोजीचे आदेशानुसार श्री साईबाबा हॉस्पिटलसाठी इन्टरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ६ महिने कालावधीसाठी व व्हिजीटींग पध्दतीने तात्पुर्ती नेमनुक करण्याकरीता मान्यता देण्यात आली होती.

त्यास अनुसरुन प्र.वैदयकिय संचालक यांनी मुलाखतीसाठी बोलवुन मुलाखती घेणेच्या मान्यतेस्तव दि.१९.०३.२०१४ रोजी टिपणी सादर केली होती. सदर टिपणीवर मा.अध्यक्ष साहेब यांनी ३ पुर्णवेळ कंत्राटी कार्डीयालॉजीस्ट व व्हिजीटींग कार्डीयालॉजीस्ट पॅनलवर घेण्यात यावे तसेच सदरच्या मुलाखती घेणेकरीता

मा.उच्च न्यायालय आदेशानुसार कोर्टाशी सलग्न असलेल्या वैद्यकिय अधिकारी, कार्यकारी अधिकारी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी व प्र.वैदयकिय संचालक,रुग्णालये यांचे समितीने उमेदवारांच्या मुलाखती घेऊन पात्र उमदवारांना नेमणुका दयाव्यात. त्यानुसार प्रत्यक्ष ज्या उमेदवारांनी अर्ज सादर केले असे एकुण १३ पैकी ८ उमेदवार मुलाखतीसाठी हजर होते.

सोबतच्या मुलाखत तक्त्यातील अ.न.१ ते ५ चे उमेदवारांनी व्हिजीटींग पध्दतीने पॅनलवर काम करण्यास तयार असल्याचे सांगितले असुन एन्जीओग्राफिचे प्रती प्रोसिजरवर रु.३००/-, एन्जीओप्लास्टी प्रती प्रोसिजरवर रु.३,०००/- व ओपीडी, टीएमटी व टुडीइको इतर तपासणीसाठी संस्थान सध्या देत असलेला इन्सेन्टीव्ह देण्यात यावे असे मान्य केले.

तसेच अ.नं.६ वरील उमेदवार डॉ.मनोहर विश्वसराव शिंदे यांना कंत्राटी इन्टरव्हेशनल कार्डीयालॉजीस्ट मासिक रु.३,००,०००/- एकत्रित मानधन व अ.नं ७ चे उमेदवार डॉ.प्रशांत नारायण पवार यांची पुर्णवेळ इन्टरव्हेशनल कार्डीयालॉजीस्ट या पदावर सर्वसमावेशक रु.१.५० लाख एकत्रित मासिक मानधन ६ महिने कालावधीसाठी नेमणुकीस व अहवालास कार्योत्तर मान्यता मिळणेसाठी दि.१२.०४.२०१४ रोजीचे मा.व्य.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर केले व त्यावर झालेला निर्णय क्र.२७५ खालील प्रमाणे-

"यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशानुसार प्रस्तावीत केलेप्रमाणे इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्ट या पदावर ०६ महिने कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने व व्हिजीटींग पध्दतीने देण्यात आलेल्या तात्पुरत्या नेमणूकास मान्यता देण्यात आली.

तसेच, कॅथलॅब विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व डॉक्टरांना दि.०१ एप्रिल २०१४ पासुन प्रति एन्जोग्राफीसाठी रु.३००/-, एन्जोप्लास्टी व इतर समकक्ष प्रोसिजरसाठी रु.३,०००/- आणि ओ.पी.डी., टीएमटी,२-डी इको इ. साठी सध्या लागू असलेला इंन्सेन्टीव्ह देणेत यावा" असे ठरले.

दि. ०१ एप्रिल २०१४ पासुन कॅथलॅब प्रोसीजर्सचे पॅकेज दर व त्यावर दिला जाणारा प्रोत्साहन भत्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | कॅथलॅब प्रोसिजर्सचे नाव | पॅकेज दिवस | पॅकेज दर (इम्लाट्स/ स्टेंट दर वगळुन) | कार्डियोलॉजिस्ट शेयर | कॅथलॅब ऑपरेटर | इंटेन्सीव्हीस्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | Angiography | २४ तास | ५,००० | ३०० | १०० | ५० |
| २. | Angioplasty 1 Stent | ३ दिवस | ३९,००० | ३,००० | २०० | १५० |
| ३. | Angioplasty 2 Stent | ३ दिवस | ४४,००० | ३,००० | २०० | १५० |
| ४. | BMV/BPV/BAV | ३ दिवस | २८,००० | ३,००० | २०० | १५० |
| ५. | ASD/VSD/PDA by Device | ३ दिवस | २८,००० | ३,००० | २०० | १५० |
| ६. | Permanent Pace Maker | ४ दिवस | २२,००० | ३,००० | २०० | २०० |
| ७. | IVC Filter | ४ दिवस | २८,००० | ३,००० | २०० | २०० |
| ८. | Temporary Pacing Lead | ------- | ५,००० | ३०० | --- | --- |
| ९. | Abonded Procedure | २४ तास | ५,००० | ३०० | १०० | ५० |
| १०. | P.O.B.A. | ३ दिवस | ३९,००० | ३,००० | २०० | १५० |
| ११. | Coil Embolization | ३ दिवस | २०,००० | ३,००० | --- | --- |

त्यास अनुसरुन कॅथलॅब विभागामध्ये दि.०१ एप्रिल २०१४ पासुन झालेल्या प्रोसीजर्स् व त्यावर कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांना दिलेल्या इन्सेटिव्हची माहिती खालील प्रमाणे-

| अ.नं. | सन | एकुण प्रोसिजर्स | दिलेली एकुण इन्सेटिव्ह रक्कम |
|---|---|---|---|
| १ | २०१४-१५ | ५,९१५ | ५१,८१,९३० |
| २ | २०१५-१६ | ४,५७७ | १,०८,३०,४१० |
| ३ | २०१६-१७ | ५,३५५ | १,०९,२०,२४० |
| ४ | २०१७-१८ | ५,५३० | १,१७,००,१२० |
| ५ | २०१८-१९ | ४,५०० | १,०८,४७,३५० |

तसेच दि.२८.०५.२०१५ रोजीचे मा.व्य.समितीचे निर्णय क्र.१५५. निर्णयान्वये कार्डियोलॉजिस्ट डॉक्टरांना लागु झालेल्या प्रोत्साहन भत्ता जा.क्र.एसएसएसटी/एसएसबीएच/१८३/२०१५, दि.०५.०८.२०१५. चे आदेशान्वये माहे जुन २०१५ च्या प्रोत्साहन भत्याची रक्कम कार्डियोलॉजिस्ट डॉक्टरांना अदा करण्यात आलेली

होती, परंतु जा.क्र.एसएसएस/वशी/काअ/२९४६/२०१५, दि.२२/०८/२०१५ रोजीचे आदेशान्वये "श्री साईबाबा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिका-यांना देण्यात येणा-या प्रोत्साहन भत्यामध्ये वाढ करणेविषयी दिनांक ०५.०८.२०१५ चा आदेश काही तांत्रीक बाबींच्या पुर्ततेच्या कारणाने पुढील आदेशापर्यंत स्थगित करणेत येत आहेत." त्यामुळे कार्डियोलॉजिस्ट डॉक्टरांना दि.१ एप्रिल २०१४ रोजी लागू झालेल्या प्रोत्साहन भत्याचे दरा प्रमाणे केलेल्या कामाच्या मोबदल्यानुसार संबंधित डॉक्टरांना प्रोत्साहन भत्ता अदा केला जात आहे.

मागणी:- श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सध्या कार्यरत असलेले कार्डिओलॉजिस्ट डॉ. गगन शर्मा व डॉ. संदिप देवरे हे सध्या श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये पुर्णवेळ ११ महीने कंत्राटी इन्टरव्हेशनल कार्डीयालॉजीस्ट म्हणुन काम पाहत आहे. त्यांनी ०६/०६/२०१९ व दि.१०.०७.२०१९ रोजीचे पत्रान्वये सन २०१४ पुर्वी लागु असलेले प्रोत्साहन भत्ता दर परत लागु करणेबाबत अर्ज केलेला असुन अर्जामध्ये नमुद करण्यात आलेले ठळक मुद्दे खालीलप्रमाणे,

"ह्रदयरोगतज्ञ ही

१. विशेष प्राविण्य असलेली शाखा असुन

२. सर्वात जास्त धोक्याची High risk व Critical शाखा आहे तसेच

३. फक्त हा विभाग व या विभागातील डॉक्टर संपुर्ण विज्ञान शाखेत हे सर्वाधिक धोका असणा-या "Radiation Hazard" (Radiation injury) X-ray मुळे होणा-या धोक्याच्या गंभीरतेखाली येतात.

आपल्या हॉस्पिटलकडून व त्याव्दारे होणा-या आमच्याकडून रुग्णसेवा घडवणा-या साईबाबांच्या आशिर्वादाने वरील सर्व बावींचा विचार व्हावा., तसेच डॉक्टरांचे Incentives २०१४ पुर्वी जसे होते तसे करण्यात यावे ही विनंती "तसचे कार्डियोलॉजिस्ट यांनी MJPJAY कडुन मागवीलेले ई-मेल चे माहितीनुसार MJPJAY या योजने अंतर्गतश्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी इतर हॉस्पिटल पेक्षा जास्त कार्डियाक सर्जरी व प्रोसिजर्स झालेले असुन केवळ कार्डियोलॉजिस्ट डॉक्टरांनी सन २०१६, २०१७ व २०१८ मध्ये केलेल्या एकुण ५,५९६ प्रोसिजर्स पैकी रु.२४,७७,१४,०५६/- इतकी रक्कम श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी नावासमोर दर्शविली आहे.

प्रस्ताव:- उपरोक्त नमुद डॉक्टरांच्या अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्डीओलॉजीस्ट डॉक्टर, श्री साईबाबा हॉस्पिटल यांचा २०१४ पुर्वी लागु असलेला प्रोत्साहन भत्ता परत लागु करणेबाबतच्या विनंती अर्जावर योग्यतो निर्णय होणेसाठी सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सविनय सादर.

निर्णय क्र.४२७ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील कार्डीओलॉजीस्ट डॉक्टरांना सध्या देण्यात येत असलेला प्रोत्साहन भत्ता बंद करुन खालील प्रमाणे सन २०१४ पुर्वी लागु असलेला प्रोत्साहन भत्ता दि.०१.०७.२०१९ पासून देण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ.नं. | कॅथलॅब प्रोसिजर्सचे नाव | पॅकेज दिवस | पॅकेज दर (इम्लांट्स / स्टेंट दर वगळुन) | कार्डियोलॉजिस्ट शेयर | कॅथलॅब ऑपरेटर | इंन्टेन्सीव्हीस्ट |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | Angiography | २४ तास | ५,००० | १,००० | १०० | ५० |
| | Angioplasty 1 Stent | ३ दिवस | ३९,००० | ८,००० | २०० | १५० |
| | Angioplasty 2 Stent | ३ दिवस | ४४,००० | १०,००० | २०० | १५० |
| | BMV/BPV/BAV | ३ दिवस | २८,००० | ७,५०० | २०० | १५० |
| | ASD/VSD/PDA by Device | ३ दिवस | २८,००० | १०,००० | २०० | १५० |
| | Permanent Pace Maker | ४ दिवस | २२,००० | ८,००० | २०० | २०० |
| | IVC Filter | ४ दिवस | २८,००० | १०,००० | २०० | २०० |
| | Temporary Pacing Lead | ------- | ५,००० | ८०० | --- | --- |
| | Abonded Procedure | २४ तास | ५,००० | ८०० | १०० | ५० |
| | P.O.B.A. | ३ दिवस | ३९,००० | ८,००० | २०० | १५० |
| | Coil Embolization | ३ दिवस | २०,००० | ५,००० | --- | --- |

**(कार्यवाही-श्री साईबाबा हास्पिटल)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२५** **ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (Operation Theater Technician) प्रशिक्षणार्थी यांना संस्थानच्या दोन्ही हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षण सेवेसाठी परवानगी मिळणेबाबतचा अध्यक्ष,केशव सुत ग्रामीण आरोग्य व शैक्षणिक विकास मंच यांच्या अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त संदर्भ क्र.०१ अन्वये श्री दत्ता कानडे, व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर राहाता यांचा अर्ज इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्यात आमची संस्था केशवसुत ग्रामीण आरोग्य व शैक्षणिक विकास मंच राहाता, यांचे डॉ.दत्ता कानडे, व्होकेशनल ट्रेनिंग सेंटरराहाता यांचे अंतर्गत महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रम परिक्षा मंडळ महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे मार्फत ऑपरेशन थिएटर टेक्निशियन( १ वर्ष ) हा अभ्यासक्रम राबवण्याची शासनाची परवानगी मिळाली आहे. सदर पत्राव्दारे आपणास विनंती की, आमच्या संस्थेतील प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना संस्थानच्या श्री साईबाबा रुग्णालय व साईनाथ रुग्णालय यामध्ये विनामोबदला तत्वावर प्रशिक्षण सेवा करण्यासाठी परवानगी मिळावी त्याच्यासोबत अनुभवी प्रशिक्षक असणार आहे. सदर रुग्णालयामध्ये सध्या यापुर्वी इतर तीन/चार संस्थेचे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी सेवा देत आहेत त्याप्रमाणे तसी परवानगी मिळावी हि विनंती केलेली आहे.

संदर्भ क्र. दि.०२/०२/२०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं-५६ निर्णय क्र.५६ अन्वये साई इंन्स्टिटयुट ऑफ पॅरामेडीकल सायन्स (बाभळेश्वर ) यांचेकडील ओटी टेक्निशियन व लॅब टेक्निशियन या कोर्सचे शिक्षणघेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयात अनुभवासाठी प्रॅक्टिस करणेस मान्यता देण्यात आली.

पार्श्वभुमी.

१. सदर केशवसुत ग्रामीण आरोग्य व शैक्षणिक विकास मंच राहाता यांचे अध्यक्ष यांनी विनामोबदला सेवा करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान रुग्णालयामध्ये परवानगी मिळावी अशी मागणी केलेली आहे.

२. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये एकुण ०८ ऑपरेशन थिएटर व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये एकुण ०५ ऑपरेशन थिएटर आहे त्यामध्ये विविध ऑपरेशन केले जातात.

३. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ओटी टेक्निशियनची ०६ पदे मंजुर आहे त्यापैकी सर्व पदे रिक्त आहे. श्री साईनाथ रुग्णालयामध्ये ओटी असिस्टंटचे १० पदे मंजुर आहे त्यापैकी ०३ पदे रिक्त आहे.

४. दि.०२/०२/२०१६ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं-५६ निर्णय क्र.५६ अन्वये साई इंन्स्टिटयुट ऑफ पॅरामेडीकल सायन्स (बाभळेश्वर) यांचेकडील ओटी टेक्निशियन व लॅब टेक्निशियन या कोर्सचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थान रुग्णालयात अनुभवासाठी प्रॅक्टिस करणेस मान्यता देण्यात आली परंतु सदर साई इंन्स्टिटयुट ऑफ पॅरामेडीकल सायन्स (बाभळेश्वर) यांचेकडील आजपावेतो ओटी टेक्निशियन प्रशिक्षणार्थी विद्यार्थी अनुभवासाठी प्रॅक्टिस करणेसाठी आलेले नाहीत.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– श्री साईबाबा संस्थान रुग्णालयातील ऑपरेशन थिएटरच्या संख्येच्या व ऑपरेशनच्या प्रमाणानुसार ऑपरेशन थिएटर टेक्निशियनची संख्या फारच कमी आहे. सदरचे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांना श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये प्रशिक्षण सेवेसाठी परवानगी दिली तर ऑपरेशन थिएटर मध्ये सदर प्रशिक्षणार्थींची मदतच होईल व रुग्णांना आधिक तत्परतेने वैद्यकीय सुविधा पुरविता येईल. अशा प्रशिक्षणार्थींना कुठल्याही प्रकारचे भत्ता किंवा वेतन दिले जाणार नाही किंवा मागता येणार नाही, प्रशिक्षणार्थी यांनी बेजबाबदारपणे वर्तन केले तर त्यांची येथील सेवा बंद करणेचा अधिकार हॉस्पिटल प्रशासनाला राहील, या नियम व अटीवर डॉ. दत्ता कानडे,व्होकेशनल ट्रेनिंग सेंटर राहाता यांचेकडील ऑपरेशन थिएटर टेक्निशियन(Operation Theater Technician) प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण सेवेसाठी परवानगी देता येईल असे मत आहे.

प्रस्ताव– तरी सदर ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (Operation Theater Technician) प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांना कुठलेही प्रकारचे भत्ता किंवा वेतन दिले जाणार नाही किंवा मागता येणार नाही, प्रशिक्षणार्थी यांनी बेजबाबदारपणे वर्तन केले तर त्याची येथीलसेवा बंद करणेचा अधिकार हॉस्पिटल प्रशासनाला राहील,या नियम व अटीचे अधिन राहुन डॉ.दत्ता कानडे , व्होकेशनल ट्रेनिंगसेंटर , राहाता यांचेकडील ऑपरेशन थिएटर टेक्निशियन (Operation Theater Technician) प्रशिक्षणार्थी विद्यार्थी यांना श्री साईबाबा संस्थानच्या दोन्ही हॉस्पिटलमध्ये प्रशिक्षण सेवेसाठी परवानगी देणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.४२८** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हास्पिटल)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२६ **आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे अपिल करीता देय होणारी १०% रक्कम रु.१,४६,१२,२५५/- भरुन अपिल कार्यवाही करण्यास व त्यानंतर Amnesty Scheme अंतर्गत देय होणारी साधारणतः रक्कम रु.२६,७०,०९,३४३/- रक्कम अदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला अनोंदणीकृत विक्रेता गृहीत धरुन व्हॅटकर विभागाने आर्थिक वर्ष २००९-१० चे व्हॅट करनिर्धारण करुन दि.२७.०३.२०१८ रोजी रु.२४,२६,२४,४२४/- इतका व्हॅटकर भरणेबाबत आदेश केला आहे. आर्थिक वर्ष २०१० -११ चे व्हॅट करनिर्धारण करण्यात येऊन दि.२५.०३.२०१९ रोजी रु.२१,००,२८,८८४/- इतका व्हॅटकर भरणेबाबत आदेश केला आहे. तसेच पुढील आर्थिक वर्ष २०११-१२ चे संबंधीत आवश्यक कागदपत्रे मागवुन घेतली असुन करनिर्धारण कार्यवाही चालु असुन पुढील आर्थिक वर्षांची करनिर्धारणे करणेबाबत नोटीस दिली आहे.

आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ या कालावधीतील व्हॅटकराबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये वेळोवेळी प्रस्ताव सादर करण्यात येऊन सदर बाब मा.व्यवस्थापन समितीचे अवलोकनार्थ सादर करण्यात आली आहे. मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास अनुसरुन मा.विश्वस्त श्री.जयकर यांचे समन्वयाने मे.जुन्नरकर ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचे मार्फत दि.१३.०२.२०१९ रोजी मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर येथे अपिल अर्ज दाखल करण्यात आला आहे.

मा.व्य.स. चे दि.०६.०६.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७६, १७७ व १७९ अन्वये आर्थिक वर्ष २००९-१० चे अपिल कार्यवाही करिता देय होत असलेली मुळ व्हॅटकराच्या १०% रक्कम रु.७६,११,२९२/- व आर्थिक वर्ष २०१०-११ चे अपिल करिता देय होणारी १०% रक्कम रु.७०,००,९६३/- अशी एकुण रु.१,४६,१२,२५५/- आदा करणेकरिता प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सदर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे पुढील सभेमध्ये सादर करावा असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१९ रोजीचे सभेमध्ये निर्णय क्र.३७० अन्वये,"Administrative Relief अंतर्गत व Amnesty Scheme अंतर्गत किती रक्कम देय होत आहे याची माहिती मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग यांचेकडुन प्राप्त करुन घ्यावी, व्हॅट कामकाजाकरिता सीए सुरेश डी. डॉले यांची नियुक्ती करण्यात यावी. आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे अपिल करिता देय होणारी १०% रक्कम आदा करण्यास व अपिल कार्यवाही करण्यास मान्यता मिळाली आहे व Aministrative Relief व Amnesty Scheme अंतर्गत देय होणा-या व्हॅट रक्कमेची माहिती प्राप्त झाल्यानंतर ॲड.मोहन जयकर यांचे सल्ल्यानुसार व्हॅटबाबत संपुर्ण कार्यवाही करण्यात यावी असे ठरले".त्यास अनुसरुन सीए सुरेश डी. डौले यांची व्हॅट कामकाजाकरिता नियुक्ती करण्यात आली. मा.विश्वस्त श्री.जयकर यांचेकडुन आर्थिक वर्ष २०१०-११ चे अपिल दाखल करण्याकरिता दि.१७.०७.२०१९ रोजी अपिल मसुदा प्राप्त झाला असुन आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे व्हॅट अपिल दाखल करुन त्याकरिता देय होणारी १०% रक्कम रु.१,४६,१२,२५५/- रक्कम भरण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करावा, असे सुचविले आहे.

Amnesty Scheme बाबत मा.सह आयुक्त, विक्रीकर विभाग, नाशिक यांनी दि.१२.०७.२०१९ रोजी ई-मेलद्वारे Amnesty Scheme अंतर्गत रु.६७,६६,६२,३७६/- देय होत असलेबाबत व Administrative Relief अंतर्गत १) For grant of set off tax invoice of purchase is to be produced. २) They should match with sales annexure of sale for J-1 of seller. ३) The supplying dealer is paid tax by filling return. याची पुर्तता करणे अनिवार्य असलेबाबत कळविले आहे. संस्थान कर सल्लागार श्री.शशिकांत कुलकर्णी, नाशिक व सीए श्रेणिक गांधी, पुणे यांनी Amnesty Scheme योजनेचा पर्याय योग्य होईल असे ई-मेलद्वारे कळविले आहे.

तसेच मे. सुरेश डी. डौले ॲण्ड कं., चार्टर्ड अकौंटंट, राहुरी यांची दि.१६.०७.२०१९ रोजी व्हॅट कामकाजाकरिता नियुक्ती करण्यात आली असुन त्यांनी दि.१८.०७.२०१९ रोजीचे पत्राद्वारे व्हॅट संबंधीत Administrative Relief या पर्याया ऐवजी Amnesty Scheme योजनेचा पर्याय सुचविला आहे. Administrative Relief अंतर्गत नोंदणीकृत विक्रेता म्हणुन करनिर्धारण करण्याकरिता सह आयुक्त, नाशिक यांचेकडे Condonation of Delay करिता अर्ज करुन सुरुवातीपासुनचा नोंदणी क्रमांक घेणे,Input Credit व Output Credit घेण्याकरिता पुरवठादारांना खरेदी खर्चात आदा करण्यात आलेली व्हॅट रक्कमेचा लाभ विक्री करण्यात आलेल्या रक्कमेतुन घेण्याकरिता पुरवठादारांनी त्यांची विवरणपत्रे भरतांना संस्थानचे नांवे व्हॅटकर भरल्याचे दर्शविणे आवश्यक होते. तथापि, संस्थान नोंदणीकृत विक्रेता नसल्याने पुरवठादारांनी त्यांचे

विवरणपत्रात इतर व्हॅट या शिर्षकाखाली व्हॅट दर्शविला असल्याने संस्थानचे नांव दिसत नाही व संस्थानचे नांवे व्हॅट रक्कम जमा केल्याचे दर्शविण्याकरिता पुरवठादारांनी संस्थानचा नोंदणी क्रमांक नमुद करुन विवरणपत्र दाखल करणे आवश्यक आहे व संस्थान याकरिता आता नोंदणी क्रमांक घेण्यास प्रस्ताव सादर करुन नंबर उपलब्ध करुन देणार व त्यानंतर सर्व संबंधीत पुरवठादार यांची विवरणपत्रे दुरुस्त करणार

ही बाब संस्थानचे अखत्यारित नसल्याने व J-1 फॉर्म विक्रेत्यांच्या विवरणत्रांशी जुळविणे अनिवार्य असलेबाबत मा.सह आयुक्त, नाशिक यांनी कळविले आहे व तशी तरतुद व्हॅटकर कायद्यात आहे. त्यामुळे Administrative Relief ऐवजी Amnesty Scheme पर्याय योग्य असल्याने त्याप्रमाणे माहिती संकलित करुन दि.२२.०७.२०१९ व दि.२४.०७.२०१९ रोजी प्रत्यक्ष हजर राहुन माहिती सादर केली आहे. विक्रीकर अधिकारी यांनी त्यांना यापुर्वी सादर करण्यात आलेल्या वार्षिक अहवालांवरुन व सध्या पुरविण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन Amnesty Scheme योजनेअंतर्गत करनिर्धारण करुन दि.२५.०७.२०१९ रोजी ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे व्हॅटकर देय होत असलेबाबत कळविले आहे.

| तपशिल | व्हॅटकर रक्कम रु. | व्याज रक्कम रु. | दंड रक्कम रु. | एकुण देय रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ | ३७,९४,६२,६७३/- | ३३,८८,६०,०६७/- | ३७,९४,६२,६७३/- | १,०९,७७,८५,४१३/- |
| Amnesty Scheme अंतर्गत लाभ | १२,९०,६१,३८५/- | २७,८६,९९,३४५/- | ३४,५३,२२,०५१/- | ७५,३०,८२,७८१/- |
| Amnesty Scheme अंतर्गत एकुण देय रक्कम रु. | २५,०४,०१,२८८/- | ६,०१,६०,७२२/- | ३,४१,४०,६२२/- | ३४,४७,०२,६३२/- |

उपरोक्त विक्रीकर विभागाने कळविलेल्या रु. ३४,४७,०२,६३२/- देय करामध्ये आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ करीता अपिल दाखल केल्यास साधारणत: ७ ते ८ कोटीने कर कमी होईल. Amnesty Scheme अंतर्गत पहिला टप्पा मुदत वाढली असुन ती दि.३१.०७.२०१९ अखेर करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात व्हॅटकरात ३०%, व्याजामध्ये ८०% व दंड यामध्ये ९०% सुट मिळण्याच्या तरतुदीनुसार रु.३४,४७,०२,६३२/-रक्कम देय होत असले बाबत विक्रीकर विभागाने कळविले आहे.

Amnesty Scheme अंतर्गत दुस-या टप्प्यात साधारणतः दि.३१.०७.२०१९ नंतर दि.३१.०८.२०१९ अखेर पर्यंत व्हॅटकरात २०%, व्याजामध्ये ७०% व दंड यामध्ये ८०% सुट मिळण्याच्या तरतुदीनुसार साधारणतः रु.४६,०९,२९,६२९/-रक्कम अदा करावी लागेल. म्हणजे साधारणतः रु.११ ते १२ कोटी रक्कम जास्त अदा करावी लागेल. याकरिता कालावधीही अत्यंत महत्वाची निर्णायक बाब ठरत आहे. सदर बाबींचे अवलोकन करता:-

१. आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे अपिल करिता देय होणारी मुळ व्हॅटकराच्या १०% रक्कम अनुक्रमे रु.७६,११,२९२/- व रु.७०,००,९६३/- अशी एकुण १,४६,१२,२५५/- भरुन दि.३१.०७.२०१९ पर्यंत अपिल करनिर्धारण आदेश प्राप्त करणे, सदर रकमेवर Amnesty Scheme अंतर्गत असलेली ३०% ची सवलत साधारणत: रु.४३,८३,६७७/- मिळणार नसल्याची तरतुद व्हॅट कायद्यात आहे. अपिल आदेश प्राप्त झाल्यास Amnesty Scheme अंतर्गत साधारणतः रु.७ ते ८ कोटीपर्यंत व्हॅटकर रक्कम Amnesty Scheme मध्ये कमी होईल.

२. Amnesty Scheme पर्याय स्विकारण्याकरिता दाखल करण्यात आलेले अपिल मागे घेण्याची तरतुद आहे.

३. विक्रीकर अधिकारी, अहमदनगर यांनी STO/AHM-VAT-C-012/Rec/Pre-GST Era/Arr. Settlement/ 2019-20/B-222 dt.24.07.2019 या Courtesy Letter अन्वये Amnesty Scheme अंतर्गत मुळ व्हॅटकर, व्याज व दंड यामध्ये मिळणारी सुट वजा जाता देय होणारी एकुण रक्कम रु.३४,४७,०२,६३२/- आदा करण्यास व आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११ चे अपिल दाखल करुन त्यामध्ये कमी होऊन साधारणतः देय होणारी रक्कम रु.२६,७०,०९,३४३/- व्हॅटकर रक्कम अथवा प्रत्यक्ष मा.उपायुक्त, विक्रीकर विभाग, अहमदनगर यांचेकडे अपिलअंती निश्चित होणारी व्हॅटकर रक्कम अशी एकुण रक्कम अदा करणे.

अशाप्रकारे आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ अखेर व्हॅट करनिर्धारणे, अपिल अनुसार Amnesty Scheme अंतर्गत दि.३१.०७.२०१९ अखेर असलेल्या पहिल्या टप्प्यात देय होणारी रक्कम अदा

करणेबाबत उपरोक्तप्रमाणे मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे निर्णयार्थ सादर.

निर्णय क्र.४२९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २००९-१० व २०१०-११चे अपील दाखल करण्यास, शासनाच्या Amnesty Scheme योजनेत सहभागी होण्यास व विक्रीकर विभागाने Amnesty Scheme योजनेअंतर्गत अपिलमध्ये कमी होणारी व्हॅटकर रक्कम गृहीत धरुन आर्थिक वर्ष २००९-१० ते २०१७-१८ अखेर कळविलेली अशी एकुण रक्कम रु.२६,७०,०९,३४३/-मात्र विहीत पध्दतीने विक्रीकर विभागास आदा करण्यास व त्याअनुषंगाने येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच Amnesty Scheme योजनेचा लाभ घेण्याकरीता मा.उच्च न्यायालयात दाखल असलेली व्हॅटकरा संबधीत अपिल मागे घेण्याची पूर्व अट असल्याने संस्थानमार्फत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेले अपिल मागे घेण्यास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- लेखाशाखा)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.२७ **श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शनरांग इमारतीचे बांधकामास मुदतवाढ मिळणेसाठी ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना दि.३० एप्रिल, २०२० अखेर मुदतवाढ मंजूर करणेबाबत.**

प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद –

अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनयोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय -

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/०८/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५०६ नुसार श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतींचे बांधकाम करणेसाठी ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना जा.नं.एसएसएसटी/ बांधकाम/ २५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८ अन्वये कार्यादेश देणेत आलेला आहे.

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०१/११/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८१ अन्वये, श्री साईबाबा मंदिर दर्शनरांग इमारतीचे काम सुरु करणेची तारीख दि.१९/१०/२०१८ निश्चित करणेत आलेली आहे.

प्रस्तावना– श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांचेमार्फत सुरु आहे. सदरहू इमारतीचे बांधकाम G+2 असून त्यामध्ये खालीलप्रमाणे सुविधांचे नियोजन आहे.

तळमजला - नियोजित दर्शनांग इमारतीमध्ये ०३ भव्य प्रवेश हॉल आहेत, त्यामध्ये भक्तांना मोबाईल व चप्पल लॉकर्स, बायोमेट्रीक पास काऊंटर– ४८, पेड पास काउंटर -२०, लाडू काउंटर– १०, उदी व कापडकोठी काऊंटर–१०, बुक स्टॉल, डोनेशन ऑफिस, चहा / कॉफी काउंटर, सिक्युरिटी चेक एकाच ठिकाणी व एकाच वेळी–४० व्यक्तींची, जीने–११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था इ.

पहिला व दुसरा मजला -भक्तांकरीता बसण्याची व्यवस्था असेलेले एकूण १२ मोठे हॉल (एक हॉल साईज-१५.१० मीटर x ३१.१५ मीटर), चहा/कॉफी काउंटर, विदयुतीकरण व्यवस्था जनरेटर बॅकअपसह, वायुविजन व्यवस्था, उदवाहक/लिफ्ट व्यवस्था - १०, जीने– ११, लेडीज व जेन्टस टॉयलेट व्यवस्था, आर.ओ प्रक्रियेव्दारे शुध्द पिण्याचे पाण्याची व्यवस्था, फायर फायटींग इ.

या व्यतिरिक्त या प्रकल्पात सांडपाणी प्रक्रिया संयंत्र, रॅम्प, प्रथमोपचार केंद्र, संपूर्ण इंटेरीअर वर्क, सायनेजेस, अंतर्गत रस्ते, स्ट्रीट लाईट, इलेक्ट्रीकल सबस्टेशन, जनरेटर व्यवस्था, वायुविजन व्यवथा, लॅण्डस्केपींग, रेनवॉटर हार्वेस्टिंग, पिंपळवाडी रस्त्यावरुन मंदिर परिसरातील जुन्या दर्शनरांगेला जोडण्यासाठी कनेक्टींग ब्रिज, संरक्षण भिंत इत्यादी सुविधांचा समावेश करणेत आला आहे.

सदरहू प्रकल्पाचा ठळक तपशिल व सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| **कामाचे नाव** | श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे बांधकाम करणे. |
| **आर्किटेक्ट** | माथूर ॲण्ड काप्रे असो. नवी दिल्ली. |
| **ठेकेदार** | भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई. |
| **कार्यादेश** | जा.नं.एसएसएसटी/बांधकाम/२५२०/२०१८, दि.२३/०८/२०१८. |
| **मंजूर निविदा रक्कम** | रु.१०९.५० कोटी. |

| | |
|---|---|
| **करारनामा दिनांक** | दि.२२/१०/२०१८. |
| **कामाचा कालावधी** | १२ महिने (दि.१९/१०/२०१८ ते दि.१८/१०/२०१९). |
| **एकूण कामाचे बांधकाम क्षेत्रफळ** | निविदेत नमूद एकूण बांधकाम क्षेत्रफळ – २२,२१४ चौ.मी. (FSI Area.) |
| **कामाची सद्यस्थिती** | सदर प्रकल्पातील मुख्य इमारतीचे फुटींग व आरसीसी कॉलमचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे.<br>प्लिंथ लेव्हलचे ग्रेड स्लॅबचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे.<br>तळमजला स्लॅबचे सुमारे १०० टक्के काम पूर्ण झाले आहे.<br>पहिला मजला स्लॅबचे ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे.<br>दुसरा मजला स्लॅबचे ३० टक्के काम पूर्ण.<br>कनेक्टींग कॉरीडॉरपैकी मंदिर परिसरातील पी.आर.ओ चे समोरील आर.सी.सी फुटींग, कॉलम, प्लिंथ बीम, प्लिंथ ग्रेड स्लॅब व तळमजला स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. |

श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारतीचे एकूण कामामध्ये समाविष्ठ असलेले ESS, STP, UGT, External Services of main building, Connecting Corridor ही कामे अद्याप जागा उपलब्ध नसल्याने ठेकेदार यांना सुरु करता आलेली नाही.

ठेकेदार यांनी दि.२२/०७/२०१९ रोजीचे पत्राने या प्रकल्पातील उर्वरीत कामे पूर्ण करणेसाठी खालील मुद्दे व अडचणी नमूद करुन १९० दिवस म्हणजे दि.३० एप्रिल, २०२० अखेर मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे.

1. Non-availability of Natural Sand –There is no any government auction of natural sand till date, hence we are unable to procure natural sand at the beginning of project.
2. Approval of VSI Quality Artificial Sand – At the same time, we had collected letters from nearby tehsildar regarding non availability of natural sand & submitted to you for approval to use VSI quality artificial sand. Total delay was about 60 days for point 1 and point 2.
3. Joint Holiday and Festival - Due to heavy rush of Sai devotees our site wok progress affected in holidays, festivals like Diwali, Christmas, Year Ending (31st December), Ramnavami, Guru Purnima festival, Total delay was about 40 days.
4. Grade Slab Approval - Due to heavy load of PT Slab it was essential to lay grade slab M20 Grade concrete instead of 1:5:10 mix concrete to avoid settlement. It took some time for approval. We have not claimed any extra cost occurring due to grade slab. Total delay was about 20 days.
5. Connecting Corridor site is not handed over fully till date & also site not handed over to us to start the STP, UGT & ESS work. Total delay was about 70 days.
6. External Services - Our External services were hampered due to site clearance.
7. Transformer yet not shifted.
8. Irregular cash flow due to ESS, UGT and most part to corridor front not available till date.

Considering all above situations and hindrances for the above said project, kindly grant us time extension for about 190 days.

याबाबत प्रकल्पाचे आर्किटेक्ट माथूर ॲण्ड काप्रे असो. नवी दिल्ली यांनी दि.२४/०७/२०१९ रोजीचे पत्राव्दारे वरील मुद्यांचे व अडचणींचा विचार करता ठेकेदार यांनी मागणी केलेप्रमाणे १९० दिवस म्हणजेच दि.३०/०४/२०२० पर्यंत मुदतवाढ देणेस हरकत नाही असे कळविले आहे.

सदर कामासाठी प्रामुख्याने खालील कारणांमुळे विलंब झालेला आहे.

१. ठेकेदार यांना अद्याप ESS, UGT, STP चे कामासाठी जागा उपलब्ध करुन देणेत आलेली नाही. तसेच सध्याचे विद्युत जनित्र स्थलांतरीत न केल्याने कनेक्टींग कॉरीडोरचे काम प्रलंबीत आहे. (एकूण १२० दिवस विलंब).

२. नैसर्गिक वाळूचा लिलाव झालेला नसल्याने कोपरगाव, राहाता, श्रीरामपूर, संगमनेर, वैजापूर तहसिल कार्यालयाचे कार्यक्षेत्रातून वाळू उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे सदर प्रकल्पास Artificial sand वापरणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे मान्यता घेऊन Artificial Sand वापरणेस परवानगी देणेत आली. या प्रक्रियेस काही कालावधी लागलेला आहे. (एकूण १५ दिवस विलंब).

३. कनेक्टींग कॉरीडॉरचे प्लॅनमध्ये किरकोळ बदल करण्यात आले असून गेट नं.०२ जवळ शांतीनिवास इमारतीचे पहील्या मजल्यास न जोडता तो दक्षिण बाजुने प्रशासकिय कार्यालयाचे गेट जवळील pavilion चा sloping slab तोडुन त्याठिकाणी पहील्या मजल्यास सदर कॉरीडोर जोडणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ चे सभेत मान्यता देणेत आली आहे . त्यामुळे साई सभागृह ते शांतीनिवास इमारतीस जोडणा-या कनेक्टींग कॉरीडॉरचे काम प्रलंबीत होते.

४. श्रीं चा पुण्यतिथी उत्सव, नाताळ उत्सव, ३१ डिसेंबर २०१८, २६ जानेवारी, रामनवमी उत्सव, गुरुपौर्णिमा उत्सव तसेच सलग सुटयांचे काळात गर्दीचे नियोजनामुळे साईटवरील कामे बंद ठेवावी लागली आहे. (एकूण २० दिवस विलंब).

५. साईभक्तांसाठी बायोमेट्रीक पास काऊंटरकडे जाण्यासाठी मुख्य इमारतीचे उत्तर बाजूकडील काही भाग ठेकेदार यांना कामासाठी उपलब्ध करुन दिलेला नव्हता दि. २३ जानेवारी, २०१९ रोजी सदर भाग उपलब्ध करुन देण्यात आला. (एकूण २० दिवस विलंब).

६. ठेकेदार यांनी त्यांचे पत्रात वर नमूद केलेल्या ०८ मुद्यांचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर असे दिसून येते की, सदर कामासाठी जवळपास १७५ दिवसांचा विलंब झालेला दिसतो.

विभागाचा अभिप्राय– या कामात समाविष्ट असलेले ESS, UGT, STP चे कामासाठी अद्याप ठेकेदार यांना जागा उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे ठेकेदार यांनी मागणी केलेली १९० दिवसांची मूदतवाढ देणेस हरकत नाही. तथापी सदर कामाचे निविदा शर्तीनुसार काम मुदतीपुर्वी पूर्ण केल्यास प्रती महीना १% याप्रमाणे जास्तीत जास्त २% पर्यंत Incentive देणेची तरतूद आहे. परंतू आता कामाचे मूळ कालावधीत बदल होत असल्याने वाढीव मुदतीसाठी ही शर्त लागू होणार नाही असे मत आहे. त्यामुळे निविदेतील पृष्ठ क्रं. ०५ वरील अ.नं. ०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर दि.३० एप्रिल, २०२० अखेर एकूण १९० दिवसांची मुदतवाढ देणेस हरकत नाही असे मत आहे.

प्रस्ताव– तरी ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन यांना काम पूर्ण करणेसाठी निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं. ०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर दि.३० एप्रिल, २०२० अखेर एकूण १९० दिवसांची मुदतवाढ देणेचे प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.४३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, ठेकेदार यांना ESS, UGT व STP चे बांधकामासाठी अद्याप संस्थानकडून जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पाचे सर्व काम पुर्ण करण्यासाठी या जागा उपलब्ध करणेत आल्यानंतर तेथुन पुढे चार महिन्यांची मुदतवाढ निविदेतील पृष्ठ क्रं.०५ वरील अ.नं. ०७ ची Incentive अदा करणेबाबतची शर्त रद्द करण्याचे अटीवर देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८** **मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावरील सुरु सध्या काम प्रगतीत असलेल्या ध्यानमंदिर हॉलला Sound Insulation फ्लोअरींग करणेसाठी रु.२,४१,८००/- इतक्या अपेक्षीत अंदाजे खर्चास मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुदः- अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवात्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे.त्यातील पोटकलम (क)अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयः- मा. व्यवस्थापन समितीचे दि.२६/०२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १६१.

मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यान मंदिर तयार करणेसाठी स्थापत्य, विद्युत व वातानुकूलन कामे करणेकामी राबविणेत आलेल्या ई- निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक मे. भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई हे आजचे व्यवस्थापन समितीपुढे चर्चेसाठी उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी ई- निविदेतील

मुळ रक्कम रु.४४,१३,६६७.८९ ऐवजी रक्कम रु.४०,००,०००/- मात्र सर्व करांसह दर देऊ केले. सदरहू कामाचे निम्नतम निविदाधारक मे. भानू कन्सट्रक्शन, मुंबई यांनी चर्चेअंती देऊ केलेले सर्व करांसह रक्कम रु. ४०,००,०००/- मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन अंतिम दराबाबत त्यांचेकडून लेखी घेण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

प्रस्तावना- मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये मंदिर परिसरातील साई सत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावर ध्यानमंदिर तयार करणेसाठी स्थापत्य, विद्युत व वातानुकूलन कामे करणेकामी ठेकेदार भानू कन्स्ट्रक्शन, मुंबई यांना इकडील जा. नं. ६१८/२०१९, दि.२७/०५/२०१९ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर काम ठेकेदार यांचे मार्फत अंतिम टप्प्यात आहे. मा. अध्यक्ष महोदय यांनी ध्यानमंदिराचे पाहणी दरम्यान ध्यानमंदिराचे दरवाजे व खिडक्या साऊंड प्रुफ करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार ध्यानमंदिराचे खिडक्या करीता पीव्हीसी विंडो (पडद्यांसह)बसविण्यात आल्या आहेत, अकॉस्टिक डोअर, अकॉस्टिक सिलींग व अकॉस्टिक वॉल पॅनेलिंग ही कामे पुर्णत्वास आहेत.

ध्यानमंदिरामध्ये भक्तांना ध्यानधारणा करणेकामी बाहेरील ध्वनी लहरी या सदरहु हॉलमध्ये येऊन परावर्तीत होऊ नये याकरीता सदरहू हॉलमध्ये फ्लोरींगकरीता Sound Insulation फ्लोअरींग करणेबाबत मा. अध्यक्ष महोदय यांनी निर्देश दिले आहेत. याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr.No | Item | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Providing and fixing Sound Insulation, wear proof, Anti flammability carpet tiles | 195.00 Sqm | 1240/- | 2,41,800.00 |

वरीलप्रमाणे फलोअरींगचे कामासाठी रक्कम रु. २,४१,८००/- मात्र इतका खर्च येईल

प्रस्ताव- तरी ध्यानमंदिराचे फ्लोरींगकरीता Sound Insulation tiles फ्लोअरींग करणेकामी येणारे रु.२,४१,८०० मात्र इतक्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४३१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरातील साईसत्यव्रत हॉलचे पहिल्या मजल्यावरील सुरु असलेल्या ध्यानमंदिर हॉलला Sound Insulation फ्लोअरींग करणेसाठी अंदाजे रक्कम रु.२,४१,८००/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा
विषय नं.२९ **श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम -२००४ मधिल संबंधित तरतूदी –

१. कलम १७ (२) खंड (झ) नुसार विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्यप्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी समिती करील.

२. कलम २१(२) (दोन) नुसार स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीसाठी वाढ होण्यासाठी सहाय्य करणेची तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३-२४/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३५९

२. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०३

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.०८/०१/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.०३ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचेसाठी अद्ययावत Biomethanation (Thermophilic Anaerobic Digestion) तंत्रज्ञानावर आधारित प्रत्येकी १० TPD क्षमतेचे दोन घनकचरा प्रक्रिया युनिटस् संस्थानचे निमगाव कोऱ्हाळे येथील गट नं.१८२ या जागेमध्ये उभारणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.

तसेच प्रथम १० टिपीडी क्षमतेच्या एक Biomethanation Plant साठी कार्यादेश देण्यात यावा व सदर प्रकल्पाचे यशस्वीते बाबत खात्री झालेनंतर दुसऱ्या १० टिपीडी क्षमतेच्या Biomethanation Plant साठी कार्यारंभ आदेश देण्यात यावा, असे ठरले."

तसेच सदरहू प्रकल्पास शासन निर्णय क्र.सा.स.वि-१०१७/१६३४/प्र.क्र.१७६/का.१६ दि.०३/०१/२०१९ व दि.०७/०२/२०१९ रोजीचे निर्णयानुसार रक्कम रु.४,३५,३५,९४६/- मात्र इतक्या किंमतीचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेत आली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार प्रथम मागणी ई-निविदा सूचना जाहिरात जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रात आणि संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती. ई-निविदा मागविणेसाठी दि.११/०२/२०१९ ते दि.०७/०३/२०१९ इतका कालावधी देणेत आलेला होता. याकामाची निविदा पूर्व बैठक दि.२०/०२/२०१९ रोजी सकाळी ११.००वा. संपन्न झाली होती. त्यानुसार सामाईक बदलांचा संच दि.०५/०३/२०१९ रोजी अपलोडकरणेतआला. तसेच ई-निविदा जमा करणेसाठी दि.१४/३/२०१९ पर्यंत मुदत वाढविणेत आली होती. सदरहू मुदतीत दोन निविदाधारकांनी ई-निविदा जमा केल्या होत्या. त्यामुळे याकामी व्दितीय मागणी ई-निविदा सुचना प्रसिद्ध करणेत आली.

दि.०७/०५/२०१९ रोजीचे टिपणीतील मान्यतेनूसार याकामी व्दितीय मागणी (Second Call) ई-निविदा सूचना जाहिरात जिल्हास्तर, राज्यस्तर व राष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रात आणि संस्थानचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली होती. ई-निविदा मागविणेसाठी दि.१०/०६/२०१९ ते दि.२५/०६/२०१९ इतका कालावधी देणेत आलेला होता. याकामाची निविदा पूर्व बैठक दि.१७/०६/२०१९ रोजी झाली होती. त्यानुसार सामाईक बदलांचा संच दि.२१/०६/२०१९ रोजी अपलोड करणेत आला. तसेच ई-निविदा जमा करणेसाठी दि.२९/०६/२०१९ पर्यंत मुदत वाढविणेत आली होती. सदरहू मुदतीत खालील तिन निविदाधारकांनी ई-निविदा जमा केल्या आहेत.

1. SLPP Re-new llp, Bangalore.
2. MailhemIkos Environment Pvt. Ltd., Pune.
3. Organic Recycling System Pvt. ltd, Mumbai.

प्राप्त तिनही ई-निवीदेचे तांत्रिक माहीतीचे लिफाफे खरेदी समितीच्या दि.०३/०७/२०१९ रोजीच्या सभेपुढे (Online) उघडणेत आलेव निवीदाधारक यांनी online जमा केलेल्या कागदपत्रांची तपासणी करुन ई-निवीदांचे Technical Bid Comparative Statement तयार करणेत आले आहे. त्यानूसार निवीदाधारक SLPP Re-new llp, Bangalore हे तांत्रिकदृष्ट्याअपात्रठरतआहेत. तसेच निवीदाधारकMailhemIkos Environment Pvt. Ltd., Pune यांनी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये मागिल पाच वर्षात केलेल्या कामाचा पुर्णत्वाचा दाखला व बिडींग कपॅसीटी संबंधी कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही. तसेच Organic Recycling System Pvt. ltd, Mumbai यांनी बिडींग कपॅसीटी संबंधी कागदपत्रांची पुर्तता केलेली नाही.

सार्वजनीक बांधकाम विभागाचे शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दि.२७/०९/२०१८ मधील मुद्दा क्र.४.५.२ नुसार निविदेच्या पात्रते / अपात्रते विषयी काही शंका निर्माण झाल्यास, "(४) कंत्राटदाराने सादर केलेल्या तांत्रिक व आर्थिक विवारणात संदिग्धता व त्रुटी आढळत असल्यास त्याबाबत स्पष्टीकरण" याप्रमाणे बाबीवर कंत्राटदारांकडून स्पष्टीकरण मागविणे अनिवार्य राहील अशी तरतूद आहे. सदरहू शासन निर्णयानुसार निविदाधारक MailhemIkos Environment Pvt. Ltd., Pune व Organic Recycling System Pvt. ltd, Mumbai यांना दि.०९/०७/२०१९ रोजीचे पत्राने स्पष्टीकरणव पूरक कागदपत्रे ०५ दिवसात सादर करणेबाबत कळविणेत आले होते.

त्यानूसार निविदाधारक MailhemIkos Environment Pvt. Ltd., Puneव Organic Recycling System Pvt. ltd, Mumbaiयांनी कागदपत्र सादर केले आहेत. तथापी सदरहू कागदपत्रांमधून निवीदाधारकयांचे बिडींगकपॅसीटी मधील (B = Value of existing commitments and on-going works to be completed during the Period of completion of works for which bids are invited.)संबंधीत कागदपत्रांचीपुर्तताझालेली नाही.त्यामुळे श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापराकरीता संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेसाठी प्राप्त तिनही ई-निविदा तांत्रिक दृष्ट्या अपात्र ठरत आहेत.

विभागाचा अभिप्राय- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.सीएटी २०१७प्र.क्र.०८/इमा-२ दि.२७/०९/२०१८ मधील शर्त क्र.४.३ नुसार कामाची गुणवत्ता व दर्जा खालावणार नाही याची खात्री करुन

काही अटी शिथील करण्याबाबत तरतुद आहे. त्यानुसार सदरहू ई निविदेच्या किमान पात्रता निकषातील बिडींग कपॅसीटी संबंधीची तरतुद रद्द करुन फेर ई-निवीदा प्रक्रिया राबवीता येईल असे मत आहे.

प्रस्ताव - तरी साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापराकरीता संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेसाठी ई-निविदेच्या किमान पात्रता निकषातील बिडींग कपॅसीटी संबंधीची तरतूद रद्द करुन फेर ई-निवीदा प्रक्रिया राबविणेसाठीमान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.४३२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे संयुक्त वापरासाठी संस्थान निधीतून घनकचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेकामी ई-निविदेच्या किमान पात्रता निकषातील बिडींग कॅपेसीटी संबधीची तरतुद रद्द करुन फेर ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३०** **श्री साईचरित्र पारायण सोहळा–२०१९ निमित्ताने उभारावयाचा सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी प्राप्त झालेल्या ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार वायुनंदन मंडप अॅन्ड डेकोरेटर्स, नेवासा यांना कार्यादेश देणेकामी निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-**

| | | |
|---|---|---|
| १) | कामाचे नाव | श्री साईचरित्र पारायण सोहळा – २०१९ निमित्ताने उभारावयाचा सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत. |
| २) | प्रशासकिय मान्यता | मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीचे सभेतील नि.क्र.३५३. |
| ३) | अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१६,९८,९४०/-. |
| ४) | प्रस्तावित कामाबाबत माहिती | श्री साईचरित्र पारायण सोहळा – २०१९ निमित्ताने उभारावयाचा सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४/०७/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३५३ अन्वये, याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देणेत आली आहे. त्यानुसार याकामी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेत येऊन ई-निविदा मागविणेत आल्या होत्या.<br>याकामात मंडप – ४४,८०० चौ.फूट, स्टेज - १८०० चौ.फूट, कारपेट – ४४८०० चौ.फूट, बॉक्स टाईप कमाण - ०३ नग, बॅरीकेडींग - १२०० र.फूट, स्वागत कक्ष - ०१ नग, ग्रीन रूम - ०४नग, साउंड सिस्टीम, विद्यूत व्यवस्था, इ. कामांचा समावेश आहे. |
| ५) | निविदा तपशील | दि.१७/०७/२०१९ रोजी वर्तमानपत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा सुचना प्रसिध्द करणेत आली होती. दि.२३/०७/२०१९ पर्यंत अंतिम मुदतीत ०४ ठेकदार यांनी ई-निविदा सादर केलेल्या आहेत. |
| ६) | निविदा कालावधी | दि.१७/०७/२०१९ ते दि.२३/०७/२०१९. |
| ७) | तांत्रिक लिफाफा उघडणेची दिनांक व वेळ | दि.२४/०७/२०१९ सकाळी ११.३० वाजता. |
| ८) | निविदा प्रक्रियेत भाग घेणा-या ठेकेदारांची संख्या | ०४ ठेकेदार.<br>१. मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर.<br>२. जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद.<br>३. वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, नेवासा.<br>४. काळे अॅन्ड सन्स, पुणे. |
| ९) | तांत्रिक निविदेत पात्र ठेकेदारांची संख्या | ०४ ठेकेदार.<br>१. मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर.<br>२. जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद.<br>३. वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, नेवासा.<br>४. काळे अॅन्ड सन्स, पुणे. |
| १०) | सर्व निविदाधारकांनी संकेतस्थळावर कागदपत्र जमा केले आहेत काय ? | होय. |
| ११) | सर्व निविदाधारकांनी सुरक्षा अनामत रक्कम | होय. |

| | | |
|---|---|---|
| | (ईएमडी) जमा केली आहेत काय ? | |
| १२) | निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम | रु.१६,९८,९४०/-. |
| १३) | तांत्रिक दृष्टया पात्र ठेकेदारांच्या वाणिज्यीक देकाराचा तपशिलः | |

| अ.नं. | ठेकेदाराचे नांव | निविदा रक्कम (रू.) | शेरा |
|---|---|---|---|
| १. | वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, नेवासा. | **१३,५८,८००/-** | **निम्नतम** |
| २. | जाधव मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद. | १६,२५,२००/- | --- |
| ३. | मेहेत्रे डेकोरेटर्स, अहमदनगर. | २१,९५,०००/- | --- |
| ४ | काळे ॲन्ड सन्स, पुणे. | २२,६७,५००/- | --- |

| | | |
|---|---|---|
| १४) | निम्नतम निविदाधारकाचा तपशिल: | |
| अ) | ठेकेदाराचे नांव | वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, नेवासा. |
| ब) | निविदा रक्कम | रु. **१३,५८,८००/-** |
| क) | निविदा टक्केवारी कमी / अधिक | २०.०२ % कमी. |
| १५) | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम-२००४ मधील तरतूदीनुसार निविदा स्विकारणेचे अधिकार | मा. व्यवस्थापन समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी. |

तरी वर नमूद तपशिलानूसार श्री साईचरित्र पारायण सोहळा – २०१९ निमित्ताने उभारावयाचा कार्यक्रमाकरीता सुपरस्ट्रक्चर मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी पात्र निविंदापैकी निम्नतम दराचे ठेकेदार वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, नेवासा यांची रक्कम रु.१३,५८,८००/- मात्रची निविदा निम्नतम असून त्यांनी सादर केलेला जीएसटी क्रमांक – 27AMXPA4024H1Z1 हा जीएसटी पोर्टलवर (Active) दिसून येत नाही.

तरी निम्नतम दराचे ठेकेदार वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, नेवासा यांना श्री साईचरित्र पारायण सोहळा – २०१९ निमित्ताने उभारावयाचा कार्यक्रमाकरीता सुपरस्ट्रक्चर मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी कार्यादेश देणेबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.४३३ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईचरित्र पारायण सोहळा–२०१९ निमित्ताने उभारावयाचा सुपरस्ट्रक्चर पत्रा मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणेसाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक वायुनंदन मंडप डेकोरेटर्स, नेवासा यांचे रक्कम रु.१३,५८,८००/-मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास व बील आदायगीबाबत नियमानुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३१, निर्णय क्र.४३४ संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय येथे पेशंटचे नातेवाईकांना थांबण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाचे शेड उभारणेस व त्याकामी येणाऱ्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३२, निर्णय क्र.४३५ संस्थानचे साईनिवास अतिथीगृह निवासस्थानातील सोई-सुविधा सुमार दर्जाच्या असुन चांगल्या प्रकारच्या सोई-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत यावेळी सुचना करण्यात आल्या. तसेच याकामी आवश्यकता असल्यास सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३३, निर्णय क्र.४३६ साईभक्तांना काही सुचना करावयाच्या असल्यास त्यासाठी मंदिर परिसरामध्ये विविध ठिकाणी सुचना बॉक्स बसविण्यात यावेत. तसेच संस्थानचा WhatsApp नंबर देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही- बांधकाम विभाग/माहिती तंत्रज्ञान विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३४, निर्णय क्र.४३७ विवेकानंद हॉस्पिटल,लातुर यांना शिर्डी येथे शिबीर घेणेसाठी प्रसादालयाचे वरील हॉल विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावा, तसेच २०० व्यक्तींची राहण्याची व जेवणाची व्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल/प्रसादालय विभाग)

---

आयत्या वेळेचा

विषय नं.३५, निर्णय क्र.४३८ श्री साईबाबा महाविद्यालयाकडील सल्लागार डॉ.अरुण कुंभारे यांना दि.०३.०९.२०१९ पासून पुढे सहा महिने कालावधीसाठी पुर्वीच्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही- सामान्य प्रशासन/श्री साईबाबा महाविद्यालय)

---

वरील निर्णय क्र.३८३ ते ४३८ सर्वानुमते घेण्यात आले.

यानंतर दुपारी.०१.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (दी.म.मुगळीकर,भा.प्र.से) | (सुरेश हावरे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.